# ना० गोपाळ कृष्ण गोखले
## यांचें चरित्र.



# ना. गोपाळ कृष्ण गोखले
## यांचें चरित्र.

मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम् ।
—महाभारते विदुला

लेखक—
प्रो. श्री. रा. पारसनीस एम्. ए.

सन १९२३.

किंमत १२ आणे.

( सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन. )

मुद्रक व प्रकाशक—

रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६

सदाशिव पेठ, पुणें शहर.

# प्रस्तावना.

मुंबई विश्वविद्यालयानें १९२४ सालच्या परमानंद पारितोषिकाकरितां " ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचें चरित्र व कार्य " या विषयावर निबंध मागाविले होते. त्या बक्षिसाच्या निमित्तानें प्रस्तुत चरित्र प्रथम लिहिण्यांत आलें; आणि तें परीक्षकांच्या पसंतीस उतरून त्याला अर्धे पारितोषिक मुंबई विश्वविद्यालयाकडून मिळालें. मराठीमध्यें ना० गोखले यांचीं एक दोन त्रोटक चरित्रें अगोदरच प्रसिद्ध झालेलीं होतीं. प्रस्तुत चरित्र लिहिल्यानंतर दोन चरित्रें प्रसिद्ध झालीं. अशा परिस्थितींत फिरून एक लहानसें चरित्र प्रसिद्ध करण्याचें तादृश प्रयोजन नाहीं असें वाटत होतें. जमविलेल्या सामुग्रीच्या आधारें एक विस्तृत चरित्र लिहावें असाही विचार कांहीं दिवस माझ्या मनांत घोळत होता; परंतु हें कार्य ना० गोखले यांच्या अनुयायीवर्गापैकीं लेखकांकडून केले जात आहे असें त्यावेळीं कळल्यानंतर तो नाद सोडून दिला, आणि आतां ज्या स्वरूपांत चरित्र लिहिलें त्याच स्वरूपांत किरकोळ फेरफार करून तें प्रसिद्ध करीत आहे.

प्रस्तुत चरित्र लिहिण्याची कल्पना सुप्रसिद्ध लेखक व ' महाराष्ट्र'-चें सहसंपादक माझे मित्र श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं सुचविली. एवढेंच नव्हे तर चरित्रलेखनास उपयोगी अशी कांहीं सामुग्रीहि त्यांनीं मला दिली. त्यांच्या मदतीचा उल्लेख करून त्यांचें आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतों. चरित्रलेखनाला खरें साहाय्य तीर्थस्वरूप बापूजी मार्तंड आंबेकर संपादक ज्ञानप्रकाश, यांचें झालें. माहिती कोठें मिळेल हें अचूक सांगणें, ज्ञानप्रकाशाच्या फाइली व भारत-सेवक समाजांतील पुस्तकें देणें व लिहिलेला मजकूर वाचून पाहून त्यांत दुरुस्ती सुचविणें हें तर त्यांनीं केलेंच परंतु त्यांच्याशीं संभाषण करितांना मिळालेल्या माहितीची किंमत अमोल आहे. वास्तविक पहातां ना. गोखले यांचें विस्तृत चरित्र लिहिण्याचें ती. बापुरावांनीं मनावर घेतलें आणि चरित्र लेखनास आवश्यक असणारें स्वास्थ्य त्यांना मिळालें तर ना. गोखल्यांच्या

विस्तृत व सांगोपांग चरित्राची जी उणीव आज भासत आहे ती दूर झाल्यावांचून राहणार नाहीं. मराठी वाङ्मयाच्या सुदैवानें ही कामगिरी त्यांच्या हातून होवो एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

माझे मित्र डॉ. रा. अ. राईरकर यांनीं प्रस्तुत चरित्र प्रसिद्ध करण्याबद्दल प्रोत्साहन देऊन खटपट केली नसती तर हें चरित्र आणखी किती तरी वर्षें तसेंच पडून राहिलें असतें. त्यांनीं केलेल्या मदतीबद्दल त्यांचे जाहीर आभार मानणें त्यांना आवडणार नाहीं; परंतु माझ्या स्वतःच्या समाधानाकरितां हें गोड ऋण नमूद करणें मला अवश्य वाटतें.

श्री. रा. ग. हर्षे वाङ्मयविशारद आणि माझे धाकटे बंधु चि. न. रा. पारसनीस एम्. ए. यांचीहि निरनिराळ्या प्रकारची मदत झाली आहे. या सर्वांचा मी आभारी आहे. तसेंच "चित्रशाळा" प्रेसचे मॅनेजर रा. शंकरराव जोशी यांनीं प्रस्तुत चरित्र छापण्याचें स्वीकारून अल्पावधींत प्रसिद्ध केलें याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

सांगली
फेब्रुआरी १९३३

श्री. रा. पारसनीस.

# अनुक्रमणिका.


लेखकाचे चार शब्द. .... .... ....

प्रस्तावना. .... .... .... ....

उपोद्धात. .... .... .... ....

१ जन्म व विद्याभ्यास. .... .... .... १

२ सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरवात .... .... ११

३ 'सुधारक' व 'सार्वजनिक सभा' .... २९

४ इतर संस्थाः- (अ) कॉंग्रेस (१) (आ)
मुंबई विश्वविद्यालय (इ) प्रांतिक कौन्सिल (ई)
पुणें म्युनिसिपालिटी .... .... .... ३८

५ वेल्बी कमिशन व माफी प्रकरण .... .... ५०

६ खाजगी हकीगत व स्वभावनिरीक्षण .... .... ६२

७ वरिष्ठ कायदेकौन्सिलांतील कामगिरी .... .... ७७

८ कॉंग्रेस (२) .... .... .... ९४

९ मोर्ले–मिंटो सुधारणा .... .... ....११०

१० 'भारतसेवक समाज' व 'रानडे–स्मारक' ....१२१

११ दक्षिण आफ्रिकेंतील सफर .... ....१२८

१२ अखेर! .... .... .... ....१४०

परिशिष्टः–विलायतच्या सफरी .... ....१५१

# संदर्भग्रंथांची सूचीः

सूचना—युनिव्हर्सिटीच्या नियमाप्रमाणें ही सूची शक्य तितकी संपूर्ण केली आहे.

## मराठी पुस्तकें.

( १ ) गोखले घराण्याचा इतिहास ( २ ) प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं लिहिलेलें 'मासिक मनोरंजनां'तील गोखल्यांचें चरित्र ( ३ ) ग. र. अभ्यंकर कृत गोखल्यांचें चरित्र ( ४ ) महात्मा-गांधींचें चरित्र–( सौ. अवंतिकाबाई गोखले ) ( ५ ) लो. टिळकांचें चरित्र ( न. चिं. केळकर ) ( ६ ) 'मासिक मनोरंजन'चा आगरकर अंक ( ७ ) विविध–ज्ञान–विस्तारांतील वाग्भट नारायण देशपांडे यांचा लेख ( ८ ) 'नवयुग' व 'चित्रमयजगत्'मधील गोखल्यांवरील मृत्युलेख ( ९ ) न्या. रानडे यांचें चरित्र ( न. र. फाटक ) ( १० ) आमच्या आयुष्यांतील आठवणी ( श्री. रमाबाई रानडे ) ( ११ ) दादाभाई नौरोजी यांचें चरित्र ( ना. सि. फडके ) ( १२ ) 'केसरी' व 'ज्ञानप्रकाश' यांच्या फायली ( फक्त कांहीं वर्षांच्या ) ( १३ ) टिळकजीवनरहस्य ( आंबेकर ).

## इंग्लिश पुस्तकें.

( 1 ) Speeches of Gokhale. ( 2 ) Life of Gokhale by R. P. Paranjpye. ( 3 ) Recollections, by Viscount Morley. ( 4 ) Life of Sir P. M. Mehta by H. P. Modi. ( 5 ) Life of R. C. Dutt by J. N. Gupta. ( 6 ) Life of Sir Wlliam Wedderburn by S. K. Ratcliff. ( 7 ) Life of A. O. Hume by Sir William Wedderburn. ( 8 ) Indian Unrest-by Sir Valentine Chirol. ( 9 ) New Spirit in India-by Nevinson. ( 10 ) India in Transition-by H. H. The Aga Khan. ( 11 ) How India wrought for freedom-By Annie Besant. ( 12 ) Indian National Evolution-By A. C. Muzumdar. ( 13 ) Reminiscenses of Hon. Mr. Gokhale-by D. E. Waccha. ( 14 ) Souvenir of Gokhale's South African Tour. ( 15 ) Struggle in South Africa-by H. S. L. Polak. ( 16 ) India and the Empire-by B. C. Pal. ( 17 ) A case for Indian Home Rule-by N. C. Kelkar. ( 18 ) Public Services in India-By Hon. Mr. Kunzaru. ( 19 ) Gokhale and Indian Economics-by Prof. V. G. Kale. ( 20 ) Files of 'Leader' 'Maratha' and 'India' ( of some years ).

### Reports, Pamphlets etc.

( 1 ) Reports of the Servants of India Society. ( 2 ) Reports of the Deccan Sabha. ( 3 ) Report of Ranade Economic Institute. ( 4 ) Some Numbers of Quarterly Journal of the Poona Sarvajanik Sabha. ( 5 ) Parliamentary Debates, Volume of the year 1909-(Third Reading of the India Bill in the House of Lords. ). ( 6 ) Montagu-Chelmsford Report 1919.

# उपोद्घात.

'The East bowed low before the blast in patient deep disdain,
She let the legions thunder past,
And plunged in thought again."

—Mathew Arnold.

ज्या दोन राष्ट्रांची संस्कृति समसमान आहे त्यांमध्यें लढा उत्पन्न झाल्यास व्यक्तीला महत्त्व येतें. कारण अशा वेळेस संस्कृतीचा किंवा सुधारणेचा एकान्तिक फायदा कोणत्याही एका राष्ट्राला मिळत नसतो. दोन्ही राष्ट्रांचा त्यांवर सारखाच हक्क असतो आणि युद्धाला तोंड लागलें म्हणजे सुधारणेचा शक्य तो फायदा घेण्याचे प्रयत्न प्रत्येक राष्ट्राकडून केले जातात. संस्कृति समान असली म्हणजे राष्ट्रांचें भाग्य व्यक्तींच्या कर्तृत्वशाली हिंमतीवर अवलंबून असतें. स्वार्थावर निखारे ठेवून व मतभेदाला मूठमाती देऊन राष्ट्रकार्यार्थ सर्वस्व अर्पण करणाऱ्या व्यक्ति राष्ट्रांत ज्या मानानें अधिक त्या मानानें त्या राष्ट्राला यशाचा संभव अधिक. परंतु कलहाच्या दारुण वणव्यांत उडी घेणाऱ्या दोन राष्ट्रांपैकीं एकाला जर श्रेष्ठतर संस्कृतीच्या चिलखताखालीं आपल्या देहयष्टीचें संरक्षण करितां येत असेल तर दुसऱ्या राष्ट्रास आज ना उद्यां नामोहरम व्हावें लागतें. १९ व्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्थानांत चाललेला झगडा केवळ दोन राष्ट्रांमधील नसून दोन संस्कृतींतील होता. कात टाकलेल्या नागिणीप्रमाणें नूतन आवेशानें पाश्चात्त्य संस्कृति संचार करूं लागली होती. तुंबलेल्या जलास पाट फोडिला म्हणजे पाण्याचा अनिरुद्ध ओघ सुरू व्हावा त्याप्रमाणें तेरा चौदा शतकें 'पोप'च्या साक्षात् नियंत्रणाखालीं घालविल्यामुळें यूरोपच्या प्रगतीचा थांबलेला प्रवाह नवजीवनाच्या चळवळीमुळें द्विगुणित वेगानें वाहूं लागला होता. 'जें

आहे' त्याच्याबद्दल असंतोष व 'जें असावें' असें वाटतें तें हस्तगत करून घेण्याची आतुरता यूरोपीय समाजांत प्रस्फुरित होत असल्याचीं चिन्हें दिसत होतीं. **अरिस्टॉटल** व **सेनेका** यांच्या तत्त्वज्ञानाचा पगडा हा वेळपर्यंत यूरोपवर बसला होता; इतका कीं, मध्ययुगीन युरोपांत उदारमतवादित्व व प्रगतिपरता याबद्दल विशेष प्रसिद्ध असलेल्या इंग्लंडमधील ऑक्सफोर्ड युनिव्हार्सिटींत व्यक्तीचें बौद्धिक स्वातंत्र्य हिरावून घेणारा खालील विचित्र नियम दिसून येतो. "Masters and bachelors who do not follow Aristotle Faithfully are liable to a fine of five shillings for every point of divergence." परंतु त्यांचें हें बेसुमार वजन **बेकनच्या** नवीन तत्त्वज्ञानामुळें हळूहळूं नष्टप्राय होण्याच्या पंथास लागलें. हेमंत ऋतूमध्यें पर्णरहित व मृतप्राय दिसणाऱ्या वृक्षाला वसंतऋतूमध्यें पालवी फुटून फलपुष्पाच्या भारानें ते लवूं लागावे त्याप्रमाणें मध्ययुगांत 'पोप'च्या एकतंत्री धर्मसत्तेखालीं कर्तृत्वहीन बनलेला यूरोपीय समाज नवजीवनाच्या चळवळीचें उदक पोटांत जातांच हालचाल करूं लागला व थोड्याच अवधींत त्यानें या नूतनोदित चैतन्याच्या प्रभावानें आपल्या बहुमुखी कर्तृत्वास सुरुवात केली. मध्ययुगांतील विद्यालयें सदोष असलीं तरी त्यांनींच ज्ञानाची लालसा समाजांत जागृत ठेविली होती. धर्मयुद्धामुळें (Crusades) भिन्न संस्कृतीशीं परिचय तर झालाच पण यूरोपीय राष्ट्रांतहि परस्परांशीं संघट्टन वाढलें. धर्ममठांत प्राचीन पुस्तकांचा संचय होतांच. या सर्व कारणसमुच्चयानें नवजीवनाच्या चळवळीस सुरुवात झाली. वाङ्मयक्षेत्रांत '**डांटे**' '**पेट्रार्क**' '**चॉसर**' वगैरे कवींनीं मातृभाषांत ग्रंथरचना करून या चळवळीचा पाया घातला. हा वेळपर्यंत मोहोरबंद असलेल्या ग्रीक संस्कृतीचीं द्वारें उघडलीं

'व्हिटोरिनो'च्या प्रसिद्ध पाठशाळेची स्थापना १४२३ मध्यें झाली. या पाठशाळेंत ग्रीक भाषा व वाङ्मय शिकविण्यांत येई. **राफेल व मायकेल अँजेलोसारखे** लोकोत्तर शिल्पज्ञ, **कोपर्निकस** व **ग्यालिलीओसारखे** ज्योतिर्विद, **कोलंबस मॅगेलनसारखे** धाडसी प्रवासी आणि **केप्लर-न्यूटनसारखे** गणितज्ञ या मंडळींनीं आपल्या शास्त्रेंतील शोधांनीं अवघ्या शतकाच्या अवधींत यूरोपमध्यें बद्धमूल झालेल्या व प्रगतीला हानिकारक होणाऱ्या विचारांच्या मगरमिठींतून यूरोपची सुटका केली. पदार्थविज्ञानशास्त्र व गणितशास्त्र यांनीं आघाडी मारिली. **ग्यालिलीओच्या** टेलिस्कोपनें ग्रहज्योतिषाच्या तत्कालीन समजुती पार बदलून टाकिल्या. १६७४ मध्यें **मॅक्सोनें** आक्सिजनचा शोध लाविला व रसायनशास्त्राचा पाया घातला. **अॅडम स्मिथनें** व्यापारविषयक अस्वाभाविक नियंत्रणामुळें खुल्या व हितकारी स्पर्धेच्या अभावीं देशाचें अपरिमित नुकसान कसें होतें हें सिद्ध केलें. याच सुमारास **जेम्स वॉटनें** वाफेच्या यंत्राचा शोध लाविला आणि १८२५ मध्यें **स्टीफन्सननें** वाहतुकीकडे त्याचा उपयोग कसा करावा हें सोदाहरण दाखविलें. १८३० मध्यें **मँचेस्टर ते लिव्हरपूल** पहिली रेल्वे तयार झाली. इलेक्ट्रिसिटी अथवा विद्युच्छक्तीचा शोध १७५२ च्या सुमारास लागला होता. परंतु यंत्राच्या साहाय्यानें विद्युच्छक्तीचे प्रवाह उत्पन्न करणारा डायनॅमो १८३२ मध्यें **मायकेल फॅराडे** नामक शास्त्रज्ञानें शोधून काढिला. वरील हकिकतीवरून १९ व्या शतकाच्या प्रारंभीं युरोपची स्थिति कशी होती याची थोडीतरी कल्पना वाचकांना येईल.

याच्या उलट हिंदी संस्कृतीचें स्वरूप होतें. पौरस्त्य संस्कृति अवनत होतां होतां एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं तिला हीन व विकृत स्वरूप प्राप्त झालें होतें. हिंदुस्थानच्या भूतकालचीं शिखरें

मानवी दृष्टीला अज्ञात असलेल्या कालामध्यें बुसलीं आहेत आणि वैदिक वाङ्मयरूपी प्रदीपाच्या साहाय्यानें प्रत्यक्ष दर्शन नाहीं तरी अनुमानाची कांस धरून त्यांची उंची किती आहे हें अजमावण्यांत अनेक विद्वानांचे श्रम खर्ची पडले आहेत. वैदिक वाङ्मयाचा काल हा वादग्रस्त प्रश्न आहे. काल कांहींहि ठरो; एवढें मात्र खरें कीं, प्रारंभापासून हिंदी संस्कृति एका विशिष्ट प्रवाहांतून वाहत चालली आहे. हिंदी मनाचा कल प्रामुख्यानें अध्यात्मपर आहे. भौतिकशास्त्रांची सर्वस्वी उपेक्षा आम्ही केली असें म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु भौतिकशास्त्राची जी कांहीं थोडीबहुत सेवा हिंदी राष्ट्राकडून घडली तिचा उगमहि धर्म व अध्यात्मशास्त्र यांच्या अभ्यासांतच सांपडतो. परंतु अध्यात्मशास्त्राला अवास्तव महत्त्व दिल्यामुळें जगाकडे व ऐहिक वैभवाकडे पाहण्याची आमची दृष्टि बदलली. जग हें मिथ्या असून भौतिक प्रगति अशाश्वत अतएव त्याज्य अशी कल्पना फैलावली. वेदांतांतील निवृत्तिपर शिकवण समाजाच्या सर्व दर्जाच्या लोकांमध्यें मुरली. फ्रेंच ग्रंथकार सेनार्त म्हणतो, "The Hindu mind is very religious and speculative; an obstinate guardian of traditions, it is singularly insensible to the joys of action and to the solicitations of material progress." भौतिक शास्त्राकडे उपेक्षेच्या दृष्टीनें पाहात असल्यामुळें आमच्या बौद्धिक शक्ति आध्यात्मिक प्रश्नांचाच खल करण्यांत कामास आल्या आणि त्याचा परिणाम एवढाच झाला कीं, एका तरी शास्त्रांत पारंगता मिळविल्याचें श्रेय आम्हांस संपादितां आलें. परंतु ही मनःप्रवृत्ति कायमची टिकली नाहीं. वेदांबद्दल चुकीच्या कल्पना व तन्मूलक अंधःश्रद्धा भूतकालाकडे अत्यंत आदरपूर्वक पाहण्याची प्रवृत्ति आणि भविष्यकालाबद्दल अवहेलनापूर्वक नैराश्य, या गोष्टींमुळें आमची आध्या-

त्मिक परंपरा देखील आम्हांस उज्ज्वल राखतां आली नाहीं. मूलतः आध्यात्मिक विषयाकडे कल आणि बुद्धीचें स्वातंत्र्य नष्ट झालेलें, साहजिकच तर्कापेक्षां शास्त्रप्रामाण्याला महत्त्व चढलें आणि बुद्धीचा स्वतंत्र विकास खुंटला. १९ व्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्थानची अशी स्थिति होती; आणि पाश्चात्त्य संस्कृतीचा परिचय न होता तर हिंदुस्थान या स्थितींत किती काळ खितपत पडला असतां हें सांगतां येणें कठीण आहे.

ब्रिटिशांच्या संबंधामुळें आम्ही आमच्या स्वातंत्र्यास मुकलों. परंतु वाईटांतूनहि कित्येक वेळां चांगलें सांपडतें त्याप्रमाणें या संबंधामुळें पाश्चात्त्य संस्कृतीचे आम्ही वारसदार बनलों. इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावानें आमच्या लोकांच्या मनांत नवीन आकांक्षा उत्पन्न झाल्या, परंतु ह्या आकांक्षा उद्दीपित होण्यास व समाजांतील प्रत्येक वर्गास जागें करून विचार करण्यास लावण्यास इंग्रजांच्या मध्यवर्तीनें जी पाश्चात्य संस्कृति आमच्या समाजांत खेळविली गेली तीच अधिक कारणीभूत झाली. इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर राजकीय दृष्ट्या फरक घडून आलाच; परंतु इंग्रजांनीं राज्यांत ज्या अनेकविध सुधारणा घडवून आणिल्या त्यामुळें राष्ट्राचें सर्व सामाजिक आयुष्य बदललें जाऊन प्रत्येक घटकेस आपण पूर्वीपेक्षां कोणत्या तरी निराळ्या अशा सत्तेखालीं आहों, अशी जाणीव समाजांतील प्रत्येक व्यक्तीस होऊं लागली. भौतिक शास्त्राची अभूतपूर्व प्रगति झाल्यामुळें यूरोपांत सुद्धां राष्ट्रांच्या आणि व्यक्तींच्या जीवितक्रमांत त्या प्रगतीनें आश्चर्यकारक क्रांति घडवून आणिली. या प्रगतीची हिंदुस्थानला आंच लागून इष्ट वा अनिष्ट असें फरक एथें घडून येण्यास शतकेंचीं शतकें कदाचित् लागलीं असतीं; परंतु जें कार्य शतकांच्यानेंहि होणें कठीण झालें असतें तें कार्य पक्षिणीची

कांहीं फिरविल्याप्रमाणें अत्यंत थोड्या अवधींत इंग्रजांच्या व आमच्या अकल्पित संबंधामुळें घडून आलें.

या संबंधाचा अर्थ प्रथम हिंदी लोकांना उमगला नाहीं. भूतकालीन स्वातंत्र्याकडे ओढा असणाऱ्या लोकांचे जीव नष्ट झालेल्या वैभवाबद्दल हळहळत होते. साहजिकच पाश्चात्य संस्कृति व संस्था यांचें खरें महत्व त्यांना कळलें नाहीं. उलट पाश्चात्य सुधारणांच्या दिखाऊ दिमाखानें दिपलेल्या लोकांना राजकीय पारतंत्र्यापासून देशाचें अहित कोठें व कसें होत होतें हें समजणें शक्य नव्हतें. परंतु वर्तमान परिस्थितीचा सर्व बाजूंनीं विचार करून परकीय सत्तेपासून फायदे कोणते झाले, तोटे कोणते होत आहेत आणि ते निवारण्याचे उपाय सर्व देशाला पटवून सांगणारा महात्मा हिंदुस्थानच्या सुदैवानें लौकरच जन्माला आला. दुर्बल व स्खलनशील मानवजातीच्या उद्धारार्थ संकेतानुरूप पृथ्वीवर प्रसंगोपात्त अवतीर्ण होणाऱ्या थोर विभूतींपैकींच **न्यायमूर्ति रानडे** हे एक होते. बुद्धिमत्ता व दूरदर्शीपणा यांच्या जोरावर **माधवरावजींनीं** राष्ट्राच्या रोगाचें बरोबर निदान केलें. परंतु सरकारच्या नोकरीची रुपेरी शृंखला त्यांच्या पायांत असल्यामुळें त्यांना सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणें करतां आल्या नाहींत. लायक माणसांची कमतरता त्यांना नेहमीं भासे. ही त्यांची अडचण **'गोपाळ कृष्ण गोखल्यांनीं'** अंशतः भरून काढली. इतकेंच नव्हे तर राजकीय आखाड्यांत गुरुच्या अपेक्षेपेक्षांहि अधिक कार्य **गोखल्यांनीं** केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. समानधर्म अंतःकरणांना परस्परांची ओळख लौकर पटते आणि म्हणूनच **रानड्यांची** परंपरा **गोखल्यांनीं** कायम. राखिली. **रानड्यांचीं** तत्त्वें **गोखल्यांनीं** प्रत्यक्ष व्यवहाराच्या प्रखर कसोटीस उतरविलीं असें म्हटलें असतांहि चालेल. **गोखल्यांनीं** केलेल्या या कामगिरीचें परिशीलन करणें हा प्रस्तुत चरित्राचा प्राधान्येंकरून हेतु आहे.



भारतसेवक ना. गोपाळ कृष्ण गोखले.

# ना. गोखले यांचें चरित्र.

## १ जन्म व विद्याभ्यास.

" Through such souls alone
God, stooping, shows sufficient of his light
For us in the dark to rise by. "

कोंकणस्थांच्या इतर कांहीं घराण्यांप्रमाणें गोखले घराणें फारसें इतिहासप्रसिद्ध नसलें तरी त्यांना सातशें वर्षांची प्राचीन परंपरा आहे असें शोधाअंतीं संशोधकांस कळून आलें आहे. कोंकणांत होणारा मुसल्मानांचा जाच व देशावर आल्यानें डोकें वर काढण्यास मिळणारी संधि यामुळें पेशवाईनंतर कोंकणस्थांचीं बरींच घराणीं देशावर येऊं लागलीं. धाडसी स्वभाव व स्थानिक अभिमानाची बंधनें शिथिल असणें किंवा हीं बंधनें शिथिल होतील अशी परिस्थिति निर्माण होणें हें गुण नवीन वसाहत करणारामध्यें प्रामुख्यानें लागतात. कोंकणस्थ लोक तर वरील दोन गुणांबद्दल विशेष प्रसिद्ध. त्यामुळें देशावर कोंकणस्थ घराण्यांच्या शाखा उपशाखा सर्व महाराष्ट्रभर पसरल्या. गोखले घराण्याचेंच उदाहरण घ्या! मध्यप्रांतांतील जिल्ह्यांत स्थायिक झालेल्या गोखल्यांचीं कितीतरी कुटुंबें दाखवितां येतील. एवढेंच नव्हे तर गोखले घराण्याचा प्रसार कर्नाटक, गुजराथ सारख्या महाराष्ट्रेतर प्रांतांतहि झालेला दिसून येतो. गोखले घराण्याच्या एका शाखेला शाहूमहाराजांच्या कारकीर्दींत ' रास्ते ' नांव कसें पडलें हें मराठी क्रमिक पुस्तकांतल्या एका धड्यावरून सर्वांना माहित आहेच. परंतु याविषयीं निराळी एक आख्यायिका रास्ते घराण्यांतील कागदपत्रांवरून उघडकीस आली आहे.

महाराष्ट्रांतील एका सुभ्याची रसद पोंहोचविण्याची जबाबदारी गोखले घराण्यांतील एका पुरुषावर असे. हें काम गोखल्यांनीं इतकें चोख केलें कीं खुद्द बादशहाच्या तोंडून "रसद पोहोंचानेवाला बडा रास्त आदमी है" असे उद्गार निघाले आणि त्यावेळेपासून त्यांना सर्व लोक 'रास्ते' म्हणूं लागले. आख्यायिका कोणचीहि खरी मानिली तरी रास्ते यांचें मूळ नांव गोखले होतें हीं गोष्ट निर्विवाद आहे आणि म्हणूनच घराण्यांतील आनुवंशिक संस्कार व्यक्तींमध्यें प्रादुर्भूत होतात असा विश्वास बाळगणाऱ्या लोकांना ना. गोखल्यांच्या जीवितक्रमांत दिसून येणाऱ्या रास्तपणाचें बीज मूळचेंच त्या घराण्यांतलें आहे असें मानून आपल्या मनाचें समाधान करून घेतां येणें शक्य आहे.

गोखल्यांचें कोंकणांतलें मूळ ठिकाण वेळणेश्वर नांवाचें खेडें. हा गांव चिपळूण तालुक्यांतील गुहागर पेट्यांत आहे. परंतु ना. गोखल्याच्या पूर्वजांनीं वेळणेश्वर हा गांव इ. स. १७७२ च्या सुमारास सोडिला व गोखले घराण्याची एक शाखा ताम्हनमळा म्हणून जवळच असलेल्या एका खेडेगांवीं स्थापिली. ना. गोखल्यांच्या पूर्वजांपैकीं ज्यानें हें स्थानान्तर केलें त्याचें नांव नारायण ऊर्फ बाळाजी महादेव गोखले. बाळाजी महादेव मोठे कर्तबगार होते. ताम्हनमळा या गांवाचें मूळ नांव मळा; परंतु बाळाजी महादेव येथें आल्यापासून जमिनीची मेहनत मशागत इतकी चांगली व आस्थापूर्वक होऊं लागली कीं, थोड्याच वर्षांत गांवाचें उत्पन्न वाढून पेशवे दरबारांत 'ताम्रनभर' वसूल पोंहोचता होऊं लागला. त्यावरून गांवास ताम्हनमळा हें नांव पडलें अशी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. चौगुलेपणाची सनदहि बाळाजी पंतांनीं मिळविली व त्यांच्या पश्चात् ती गोखले घराण्यांत कित्येक वर्षें चालू होती.

बाळाजी महादेव यांचें चिरंजीव **भास्कर बाळाजी**; व त्यांचे चिरंजीव **श्रीधरपंत** हे ना. गोखल्यांचें आजोबा. श्रीधरपंतांना प्रथम कुटुंबापासून दोन व द्वितीय संबंधापासून दोन असे चार मुलगे झाले. **अंताजीपंत** व **कृष्णराव** हे प्रथम कुटुंबापासून झालेले; पैकीं **कृष्णराव** हे आमच्या चरित्रनायकाचे वडील. यांचा जन्म १८३७ सालीं झाला. कोल्हापुरास कृष्णरावांचे एक चुलते मामलतीवर होते. तेथें त्यांचें थोडेंबहुत शिक्षण झालें. गरिबीमुळें वयांत आलेल्या मुलांवर कुटुंबपोषणाची जबाबदारी टाकण्यास अधीर झालेल्या वडिलांच्या आग्रहामुळें म्हणा; किंवा ज्याच्या जोरावर गांवांतील मंडळींकडून 'वाघोबा' ही पदवी संपादली त्या स्वभावसिद्ध हूडपणामुळें शाळेंत मन रमेना म्हणून म्हणा, कृष्णरावांचें शिक्षक लौकरच संपुष्टांत आलें व चुलत्यांच्या वशिल्यानें त्यांनीं कागलास कारकुनीची नौकरी पत्करली. कारकुनीपेशापासून चढत चढत ते पुढें कागलचे फौजदार झाले. आणि अखेरपर्यंत त्याच हुद्द्यावर होते.

गोपाळरावांचें आजोळ कोतळूकास ओकांच्या घरीं होतें. तेथील हरिपंत ओक यांची मुलगी कृष्णरावांस दिली होती. कोतळूकास **गोपाळरावांचा** जन्म वद्य ९ शके १७८८ म्हणजे ९ मे १८६६ बुधवार रोजीं सायंकाळीं झाला. गोपाळरावांची जन्मकुंडली खालीं दिल्याप्रमाणें आहे.




कुंडलींतील ग्रहयोग ज्योतिषशास्त्रज्ञांच्या मतें पुढें दिल्याप्रमाणें आहेत. शनि लग्नकेंद्रांत उच्च आहे. त्याचें फळ म्हणजे गोखले लोकांचे पुढारी झाले हें होय. चंद्र व गुरु समक्षेत्रीं आहेत; यावरून राजमंदिरीं गौरव व पुत्रसुखाचा अभाव हें सिद्ध.

होतें. याशिवाय भार्यावियोग, परदेशगमन, वक्तृत्व वगैरे गोष्टीहि कुंडलींतील ग्रहयोगांवरून स्पष्ट होत आहेत. ग्रहयोग कांहींहि असोत; परंतु जन्माला आलेलें हें बालक हिंदुस्थानच्या भवितव्याचीं सूत्रें आणखी चाळीस वर्षांनें हालवील अशी कल्पना तरी कोणास आली असेल काय? अथवा ही कल्पना तरी मनांत कशी येणार? आपल्या कल्पना सभोंवतालच्या परिस्थितीनें मर्यादित केल्या जातात आणि आपल्या हांवऱ्या मनाची धांव परिस्थितीच्या ठराविक चाकोरीपलीकडे सहसा जात नाहीं; परंतु आपण जरा विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं बालकामध्यें प्रच्छन्न दिव्यत्व आहे. बालक हें एखाद्या उत्तम संगमरवरी शिलाखंडाप्रमाणें आहे आणि त्या शिलाखंडापासून कुशल मूर्तिकार जशी सुंदर मूर्ति निर्माण करितो त्याचप्रमाणें बालकांतील अन्तर्हित दिव्यत्व शिक्षणाच्या प्रभावानें प्रकाशांत आणिलें तर हींच बालकें विभूतिपदाला चढलेलीं दिसून येतात. बालकाच्या बलहीन दिसणाऱ्या देहांत जगाला जागृत करणाऱ्या जीवज्योतीचें कदाचित् वास्तव्य असेल, त्याच्या डोळ्यांतील तेज मानवजातीच्या विचारांत क्रांति घडवून आणणाऱ्या अद्भुत बुद्धिसामर्थ्याचें कदाचित द्योतक असेल आणि त्याचा तो विशाल भालप्रदेश त्याच्या अलौकिकत्वाचा कदाचित् निवेदक असेल! पण याची कल्पना नसल्यामुळें कितीतरी अमूल्य रत्नें कालोदधीच्या तळाशीं खितपत पडलीं असतील!

गोखल्यांच्या वयाचीं पहिलीं दहा वर्षें कागल येथेंच प्राथमिक शिक्षण घेण्यांत गेलीं. मोठ्या माणसांचें लहानपण हा एक कौतुकाचा विषय असतो. गोखल्यांनीं आपलें लहानपण कसें घालविलें, भावी मोठेपणाचीं चिन्हें त्यांच्या बालपणाच्या स्वभावांत दिसत होतीं काय, या व अशा सारख्या गोष्टी जाणण्याबद्दल वाचकांची जशी उत्सुकता असते तशीच ती पुरविण्याची चरित्रकाराची इच्छाहि तीव्र असते.

परंतु इच्छा कितीहि प्रबळ असली तरी उपयोग काय ? केवळ प्रबळ इच्छा शक्तीच्या जोरावर जगांत कामें कोठें होत असतात ? साधनें अनुकूल असावीं लागतात. कागलास मराठी शाळेंत असतांना घडलेल्या कांहीं गोष्टी प्रसिद्ध आहेत. एकदां मास्तरांनीं एक उदाहरण करून आणण्यास सांगितलें असतां सबंध वर्गांत **गोखल्यांचेंच** उदाहरण फक्त बरोबर होतें. साहजिकच मास्तरांना कौतुक वाटलें व त्यांनीं **गोपाळला** शाबासकी दिली. परंतु त्याचा परिणाम अगदींच अनपेक्षित झालेला दिसून आला. शाबासकीमुळें गोपाळला आनंद तर झाला नाहींच परंतु रडें कोसळलें ! कारण गोपाळनें दुसऱ्याला विचारून तें उदाहरण करून आणिलें होतें. दुसऱ्याच्या मदतीनें मिळालेल्या मानाचा स्वीकार करणें **गोपाळला** अत्यंत अपमानास्पद वाटलें. एवढ्या ल्हान वयांत देखील **गोपाळच्या** मनाचा सरळपणा पाहून मास्तरांना कौतुक वाटलें.

**कागलास** फक्त मराठी शिक्षणाची सोय होती. तें संपल्यानंतर गोपाळराव आपल्या वडील बंधूसमवेत इंग्रजी शिक्षणांकरितां कोल्हापुरास येऊन राहिले. १८७४।१८७५ च्या सुमारास गोखले कोल्हापुरास प्रथम आले असावे. त्यावेळीं त्यांचें वय नऊ वर्षांचें होतें. इतक्या ल्हान वयांत आईबापांच्या शीतल प्रेमछत्रापासून दूर राहाण्याचा प्रसंग येणें म्हणजे ती एक आपत्तिच होय. एक तर वडील माणसांचा वचक कमी झाल्यामुळें मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होण्याचा संभव असतो. पण त्याशिवाय दुसराहि एक तोटा होतो. ल्हान मुलांचें शीलसंवर्धन होण्यास कुटुंबांतील प्रेमळ वातावरण हितकारक असतें. या वातावरणापासून दूर राहण्याचा प्रसंग अगदीं कोमल वयांत आला तर स्वभाव विद्वेषी बनण्यास मदत होते. जगांत पदोपदीं येणाऱ्या भल्याबुऱ्या अनुभवास तोंड देण्याचें सामर्थ्य न आल्यामुळें जगासंबंधीं मत अत्यंत कलुषित होतें आणि

लहानपणीं बनलेला स्वभाव सहसा पालटत नाहीं. सुदैवानें गोख-ल्यांच्या जीवितक्रमावर एर्थील आयुष्याचा इष्ट तोच परिणाम झाला. मिळालेल्या स्वातंत्र्याचा त्यांनीं इष्ट ध्येय संपादणीकडेच उपयोग केला आणि लहानपणीं जगाच्या आलेल्या अनुभवावरून गोखले पक्के आशावादीच बनले. कोल्हापुरांत असतांना त्यांना अत्यंत गरीबींत आपला शिक्षणक्रम पुरा करावा लागला. खाणावळींत शेवटल्या दरानें जेवावयाचें. चैनीकरितां किंवा अनवश्यक खर्चाकरितां एक पैसा देखील खर्च करावयाचा नाहीं असा त्यांचा निश्चय असे. स्वाभि-मान व दारिद्र्य यांचें स्वभावतःच वांकडें आहे. त्यामुळें द्रव्यहीन मनुष्याला पुष्कळवेळां आपली मानखंडना निमूटपणें सहन करावी लागते. गोखल्यांच्या विद्यार्थीदशेंत त्यांच्यावरही असे प्रसंग अनेक आले असें सांगतात. परंतु त्या त्रासास न जुमानतां ध्येयाकडे नजर ठेवून गोखल्यांनीं आपला अभ्यासक्रम चालविला.

गोखले १८८१ सालीं मॅट्रीकच्या परीक्षेस बसले व त्यांत यशस्वी झाले. पुढील शिक्षणाची कोल्हापुरास सोय होती. राजाराम कॉलेजांत त्यावेळीं कॉलेजच्या पहिल्या वर्षाचा फक्त वर्ग होता. आहे त्या संधीचा फायदा घेण्याचें गोखल्यांनीं ठरविलें व कॉलेजांत नांव दाखल केलें. शाळेंतून कॉलेजांत हें स्थित्यंतर विद्यार्थ्यांच्या आयुष्यांत अत्यंत महत्त्वाचें असतें. त्यांच्या खऱ्या आयुष्याला कॉलेजपासूनच प्रारंभ होतो असें म्हटलें असतां चालेल. शाळा आणि कॉलेज हीं विद्या संपादन करून भावी जीवन-कलहाकरितां तयारी करण्याचीं ठिकाणें आहेत. एवढ्या एका गोष्टींतलें साम्य वगळलें तर शाळा व कॉलेज यांमधील महदंतर दृग्गोचर होतें. शाळेंतील आयुष्य आचार व विचार ह्यांच्या स्वातं-त्र्यास प्रतिकूल असतें आणि आयुष्याच्या सुरवातीस असे निर्बंध

असणें हितावहच असतें. परंतु कॉलेजमध्यें आल्यानंतर हा मनु पालटतो. बहुविधप्रकृतीच्या व्यक्तींशी संबंध येतो. मानवी हृदयाचे एकेक कप्पे आपल्यापुढें उघडूं लागतात; जगाचा खरा अनुभव येण्यास सुरवात होते. विचार स्वातंत्र्यास वाव मिळतो; आचारस्वातंत्र्यास संधि सांपडते. एकंदरींत भावी आयुष्यांतील प्रत्येक कृत्य आपण ज्या एका व्यक्तीगत तत्त्वज्ञानाच्या आधारावर करीत असतो त्या तत्त्वज्ञानाच्या उभारणीस अनुकूल असें वातावरण कॉलेजमध्यें असतें. जगाचा विस्तृत अनुभव, मानवी स्वभावाचें यथार्थ ज्ञान व कर्तव्याची जाणीव या गोष्टी विद्यार्थ्यांना सामान्यतः कॉलेजमध्यें कळूं लागतात. शील (Character) व कॉलेजमधील वातावरण यांचा निकटचा संबंध आहे. म्हणूनच कॉलेजमधील आयुष्याला सामान्य विद्यार्थि-वर्ग इतकें महत्त्व देतो; म्हणूनच कॉलेजला शेवटला प्रणाम करितांना त्याच्या मनांला जरा वैषम्य वाटतें आणि म्हणूनच कॉलेजकडे विद्यार्थिदशा संपल्यानंतर कृतज्ञतापूर्वक शेवटची दृष्टि फेंकतांना त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहून तो त्या नेत्रसुखाला आंचवतो. कॉलेजबद्दल ही भावना विद्यार्थ्यांच्या मनांत दृढतर होण्यास आमच्या इकडील कॉलेजें व विश्वविद्यालयें अधिक कार्यकर्तीं झालीं पाहिजेत. इंग्लिश शिक्षणपद्धति व शिक्षणसंस्था या संबंधानें कॅनिंगनें पुढील प्रमाणें उद्गार काढिले आहेत. "It is in her public schools and universities that the Youth of England are, by a discipline which shallow judgements have sometimes attempted to undervalue, prepared for the Duties of public life. I believe that England would not be what she is without her system of public education and that no other country can become what England is without the advantages of such a system!"

आपल्याकडील शिक्षणसंस्थासंबंधीं यथार्थत्वानें असें उद्गार काढण्याची वेळ कधीं येईल ?

शाळेंतून कॉलेजांत आल्यावर **गोखल्यांच्या** आचार व विचारांत काय काय फरक झाले हें निश्चितपणें कळण्यास आज कांहीं साधनें उपलब्ध नाहींत. कॉलेजमध्यें असतांना त्यांची दिनचर्या कशी होती, अभ्यास करण्याची त्यांची पद्धति, अभ्यासाव्यतिरिक्त त्यांनीं केलेलें वाचन, कॉलेजमध्यें असतांना शिक्षकवर्गापैकीं किंवा सहाध्यायी मित्रमंडळींपैकीं कोणाचा त्यांच्या मनांवर विशेष दाब होता अथवा कॉलेजमध्यें असतांना आपल्या भावी आयुष्याबद्दलची त्यांचीं सुखस्वप्नें व मनोरथाचे मनोरे कशाप्रकारचे असत ही माहिती कळल्यास त्यांच्या जीवनचरित्रावर खात्रीनें अधिक प्रकाश पडेल. **गोखल्यांचें** कॉलेजशिक्षण तीन कॉलेजांत मिळून झालें. **गोखले राजाराम-कॉलेजांतून** सन १८८२ सालीं पहिली परीक्षा पास झाले. दुसऱ्या वर्षाची पहिली सहामाही **डेक्कन-कॉलेजमध्यें** व दुसरी सहामाही राजाराम-कॉलेजमध्यें त्यांनीं काढिली. पुढील वर्षाची सोय **कोल्हापुरास** नसल्यामुळें त्याकरितां त्यांना मुंबईस **एल्फिन्स्टन कॉलेजांत** जावें लागलें आणि त्या कॉलेजमधूनच गणित ऐच्छिक विषय घेऊन ते १८८४ सालीं दुसऱ्या वर्गांत बी. ए. ची परीक्षा पास झाले.

**गोखल्यांच्या** कॉलेजमधील आयुष्यक्रमांतील एकदोन गोष्टी नमूद करून ठेवण्यासारख्या आहेत. कोल्हापूरच्या महाराजांना इंग्रज सरकार बरोबर वागवीत नाहीं अशी लोकांची तक्रार होती. त्यांतल्यात्यांत स्टेटकारभारी रा. ब. **माधवराव बर्वे** यांच्या विरुद्ध लोकमत बरेंच प्रक्षुब्ध होतें. '**केसरी**' व '**मराठा**' या पत्रांनीं हें लोकमत आपल्या पत्रांतून प्रसिद्ध केलें. रा. ब. बर्वे यांनीं त्या

पत्रांच्या चालकांवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली आणि योग्य पुरावा ऐनवेळीं कोर्टापुढें मांडतां न आल्यामुळें टिळक-आगरकरांना डोंगरीच्या किल्ल्यांत चार महिने साध्या कैदेंत काढावे लागले. टिळक-आगरकरांच्या स्वार्थत्यागाबद्दल महाराष्ट्राला सहानुभूति वाटतच होती. परंतु ही शिक्षा सहन करण्यांत त्यांनीं दाखविलेल्या धैर्यानें तर ही सहानूभूति अधिकच वाटूं लागली. टिळक-आगरकरांच्या करितां एक फंड उभारून त्यांच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्याचें महाराष्ट्रानें ठरविलें. ह्या चळवळीचें लोण कॉलेजच्या विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन पोहोंचलें. त्यांनींहि ह्या फंडास यथाशक्ति हातभार लावण्याचें ठरविलें. राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं 'भ्रांतिकृत् चमत्कार' या शेक्सपिअरच्या नाटकाचा प्रयोग करून प्रयोगाचें उत्पन्न सदरहु फंडास दिलें. या नाटकांत गोखल्यांनीं गोसाविणीची भूमिका घेतली होती.

गोखले हे एक मेहनती विद्यार्थी म्हणून आपल्या सहाध्यायी मित्रमंडळींत प्रसिद्ध होते. नेमलेलीं पुस्तकें त्यांना मुखोद्गत असत. अमुक शब्द पुस्तकांत कोठें व किती वेळां आला आहे हें ते तेव्हांच सांगत व आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ पुस्तकांतील वाक्यें भराभर पाठ म्हणून दाखवीत. त्यांची अभ्यासाची ही पद्धत त्यांच्या वर्गबंधूंच्या चेष्टेचा विषयच बनून राहिली होती. वर्गातील कोणाही विद्यार्थ्यानें यावें आणि अमुक शब्द अमुक पानांवर किती वेळां आला आहे असें थट्टेनें विचारावें आणि गोखल्यांनीं सरळ मनानें त्या प्रश्नांचीं उत्तरें होकारात्मक किंवा नकारात्मक द्यावींत. विद्यार्थिदशेंत किंवा विद्यार्थीदशा संपल्यानंतरहि इंग्लिश भाषा आत्मसात् करून घेण्याकरितां गोखल्यांनीं पराकाष्ठेचे परिश्रम केले, व इंग्लिश भाषेवर आश्चर्यकारक प्रभुत्व मिळविलें.

गोखल्यांचें कॉलेजमधील आयुष्य सामान्यतः शांत रीतीनेंच गेलें.

असावें. आपण बरें कीं आपला अभ्यास बरा हेंच त्यांचें कॉलेजमध्ये असतांना ध्येय असावें. तथापि त्यावेळची महाराष्ट्राची परिस्थिति लक्ष्यांत घेतां गोखल्यासारख्या बुद्धिमान् व विचारशील मनाच्य विद्यार्थ्यांमध्यें या नव्या मन्वंतरानें खळबळ उडवून दिली नसेल हे संभवनीय दिसत नाहीं. तरुणाच्या भावनामय अंतःकरणांत देशाभिमानाची ज्योत सदैव जागृत असते. विशेषतः हिंदुस्तानसारख्य परतंत्र देशांत तर गतकालचें वैभव व सांप्रतकालीन अवनति यामधील आत्यंतिक विरोध देशाभिमानी तरुणाच्या मनाला नेहमीं बोंचत राहतो. रानडे यांनीं विद्यार्थीदशेंत लिहिलेल्या निबंधावरून त्यावेळ त्यांच्या मनांत कसले विचार चालत होते याचें अनुमान काढतां येतें कॉलेजमध्यें असतांना टिळक-आगरकरांचें देशाच्या चालू स्थिती बद्दल चालत असलेले निकराचे वादविवाद व त्या वादांचें हमरीतुमरीवर येण्यांत होणारें परिवर्तन प्रसिद्धच आहे. गोखल्यांच्या बाबतींत असा बाह्य पुरावा कांहींच मिळत नाहीं हें खरें! परंतु तरुणांचे हृदय व त्यावेळची हिंदी राष्ट्राची परिस्थिति यांचें ज्ञान ज्याला पूर्णांशानें झालें असेल त्यास तरी या बाबतींत बाह्य पुराव्यावर सर्वस्वी भिस्त ठेवणें उचित वाटणार नाहीं.

## २ सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरवात.

" What the tender and poetic youth dreams today and conjures up with inarticulate speech, is to-morrow the vociferated result of public opinion and the day after is the character of Nations. "

—*Emerson.*

१८८४ च्या अखेरीस गोपाळराव आपल्या वयाच्या १८ व्या वर्षी बी. ए. झाले. त्यावेळीं पाश्चात्यशिक्षणाचा फैलाव फारसा झाला नव्हता. युनिव्हर्सिट्या स्थापन होऊन सारी वीसपंचवीस वर्षेंच झालीं होतीं. त्यामुळें इंग्लिश शिकलेल्या मंडळीस सरकारांत नोकऱ्या तात्काळ मिळत असत. बी. ए. पर्यंत मिळणारें शिक्षण कोणत्याही एका धंद्याला उपयोगीं पडणारें नसून विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींचा विकास करून त्यांची संस्कृति वाढविणारें असतें. मन सुसंस्कृत झालें, भाराभर पुस्तकें वाचण्याची व पचविण्याची शक्ति प्राप्त झाली तरी ही विद्या ' अर्थकरी ' नसते. त्याकरितां बी. ए झालेल्यांना सरकारी किंवा खाजगी नोकरी अथवा वकीली, डॉक्टरी, एन्जिनीअरिंग सारख्या स्वतंत्र धंद्याचा मार्ग पाहावा लागतोच. त्यांतल्यात्यांत गोपाळरावावरील जबाबदारी विशेष प्रकारची असल्यामुळें पोटापाण्याचा प्रश्न परीक्षा झाल्यामुळें त्यांच्या पुढें दत्त म्हणून उभा राहिला. वडिलांच्या पाठीमागें त्यांच्या थोरल्या बंधूंनीं गरिबींत काळ कंठून गोपाळचें शिक्षण केलें होतें. शिक्षणाला पैसे देतांना गोपाळनें मोठे झाल्यावर हे पैसे परत करावे अशी त्यांची इच्छा असणें संभवनीय नव्हतें. परंतु शिक्षणक्रम एकदांचा संपल्यावर गोपाळनें आपल्या शिरांवरील संसाराचा भार हलका करावा, आपण आपलें कर्तव्य केलें, आतां गोपाळनेंहि आपलें

कर्तव्य करावें अशी जर त्यांनीं अपेक्षा केली असेल तर त्यांत दूषणीय असें कांहींच नाहीं. ही अपेक्षा आपले वडील बंधू करीत आहेत याची जाणीव **गोपाळरावांना** होती. बी. ए. होईपर्यंत आपण पुढें काय करावयाचें ह्या प्रश्नाचा फारसा विचार त्यांनीं केलेला दिसत नाहीं आणि केलाच असला तर शिक्षणखात्यामधील नोकरीला त्यांच्या भावी आयुष्याच्या पटांवर स्थान नव्हतें असें अनुमान काढितां येईल. बी. ए झाल्यानंतर **गोखल्यांनीं पुणें न्यू इंग्लिश स्कूलांत** मास्तरची नोकरी पत्करली आणि त्यांनीं मनांत आणिलें असतें तर पुण्याच्या अनुकूल वातावरणांत त्यांना एम् ए. चा अभ्यास सहज करितां आला असता. परंतु शिक्षणखात्यांत नोकरी करण्याचा त्यांचा प्रथमपासूनच विचार नसावा. म्हणून एम्.ए. च्या नादीं न लागतां ते प्रथम एन्जिनीअरिंग कॉलेजांत जाऊं लागले. परंतु लौकरच त्यांनीं तो नाद सोडला. याचें कारण डेक्कन कॉलेजमध्यें Jurisprudence चा वर्ग सुरू झाला होता हें होय. पुण्यास राहून वकिलीच्या पहिल्या वर्षाची परीक्षा देण्याची आयतीच सोय झालेली पाहून या संधीचा फायदा घेण्याचा त्यांनीं तात्पुरता निश्चय केला. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस जाण्याचा त्यांच्या मनांत विचार आलाहि होता. परंतु द्रव्याभावीं हा विचार अव्यवहार्य म्हणून सोडून देणें भाग पडलें. न्यू इंग्लिश स्कूल मध्यें नोकरी करावयाची व घरीं Jurisprudence च्या परीक्षेचा अभ्यास करावयाचा, अशा रीतीनें १८८५ साल हां हां म्हणतां गेलें. या वर्षीं त्यांनीं पुणें हायस्कूलांतील देशपांडे नांवाच्या मास्तराशीं सहकार्य करून पब्लिक सर्व्हिस परीक्षेचा एक क्लास काढिला. हा क्लास देशपांडे व गोखले आळीपाळीनें घेत असत. प्रत्येकीं दरमहा या क्लासचें उत्पन्न पस्तीसपासून चाळीस रुपयांपर्यंत होत असे. शाळेंत पगार पस्तीस रुपये मिळत होता. अशा रीतीनें त्यांना दरमहा साठसत्तर रुपयेपर्यंत प्राप्ति होत असे. यांतील खर्चापुरती

रक्कम ठेवून बाकीची ते आपल्या वडील बंधूंकडे पाठवित असत. १८८५ सालच्या अखेरीस ते Jurisprudence च्या परीक्षेस बसले व त्यांत यशस्वीहि झाले आणि पुढील अभ्यासाकरितां त्यांनीं मुंबईचा रस्ता धरिला असता; परंतु अकल्पित रीतीनें दैवानें त्यांच्या भावी आयुष्यास कलाटणी दिली.

गोखल्यांनीं एक सहामाही डेक्कन कॉलेजमध्यें काढिली होती. परंतु त्यावेळीं पुण्यास ज्या अनेकविध चळवळी चालत होत्या त्यांत प्रत्यक्ष भाग घेणें तर दूरच राहो परंतु अप्रत्यक्ष रीतीनें तरी गोखल्यांचा त्यांच्याशीं संबंध येणें संभवनीय नव्हतें. परंतु १८८५ सालीं न्यू इंग्लिश स्कूलांत मास्तर होऊन आल्यानंतर ही स्थिति पालटली. डेक्कन कॉलेज हें गांवापासून दूर असल्यामुळें समुद्रांत दोन बाजूंनीं घुसलेल्या दोन डोंगराच्या बेचक्यांत बसलेल्या एखाद्या बंदरासारखें आहे. शहरांत होणाऱ्या वादळामुळें उत्पन्न झालेल्या लाटा तेथपर्यंत पोंहोंचण्यास कधीं कधीं इतका अवधि लागतो कीं सागराचें रुद्र रूप एकवार पाहण्याच्या लालसेनें आलेल्या लोकांना निराश होऊन परत जावें लागतें; कारण तेवढ्या अवधींत समुद्र आपलें स्वाभाविक स्वरूप धारण करितो सुद्धां. १८८५ सालीं गोखले शहरांतच राहण्यास आल्यामुळें कमलिनीपत्रांवरील जलबिंदुप्रमाणें त्यांना सार्वजनिक चळवळीपासून सर्वस्वीं अलिप्तता राखतां येणें शक्य नव्हतें. शिवाय, पूर्वीप्रमाणें त्यांचा आतां विद्यार्थीपेशा राहिला नव्हता. मनावरील अभ्यासाचें दडपण किंचित् कमी झाल्यामुळें सभोंवार दृष्टिक्षेप करण्यास त्यांना आतां फुरसत होती. पुणेंशहरच्या इतिहासांत १८८५ साल हें अनेक कारणांनीं चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे. महाराष्ट्रांतील चळवळींचें केंद्र म्हणून अगोदरच पुण्याची प्रख्याति ! त्यांत १८८५ सालानें पुण्यांत एकच धुमाकूळ उडवून

दिला. वर्ष सुरू झालें त्याच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे २ जानेवारी १८८५ रोजीं **न्यू इंग्लिश स्कूलच्या** स्थापनेपासूनच गर्जत असलेलें **फर्ग्युसन कॉलेज** गद्रेवाड्यांत उघडण्यांत आलें. परमेश्वरी इच्छेनें आपला मूलभूत संकल्प सिद्धीस गेलेला पाहून प्रसंग पडल्यास तुफान दर्याला पालाण घालण्याची धमक आमच्या अंगांत आहे असा आत्मविश्वास कॉलेजच्या संस्थापकांना वाटूं लागला. उलट अवघ्या चार वर्षांत शाळेचें रूपांतर कॉलेजांत करून इतरहि चार-दोन संस्था यशस्वी रीतीनें चालविल्यामुळें ही नव्या दमाची मंडळी लाथ मारतील तेथें पाणी काढतील असा लोकांनाहि भरंवसा वाटूं लागला. प्रथमपासूनच या तरुण मंडळींकडे लोकांचें लक्ष होतें. कोल्हापूर प्रकरणानें तर जास्तच वेधलें आणि आतां तर या लोकांना मंडळीबद्दल सानंद अभिमान वाटूं लागला. सामान्य जनतेच्या या मनोवृत्तिचे **गोखलेही** वांटेकरी असण्याचा पूर्ण संभव आहे. ता. ५ मार्च १८८५ रोजीं फर्ग्युसन कॉलेजच्या नवीन इमारतीची कोणशिला बसविण्याचा समारंभ मुंबई इलाख्याचे त्यावेळचे गव्हर्नर **सर जेम्स् फर्ग्युसन** यांच्या हस्ते मोठ्या थाटानें झाला. याप्रसंगाचें वर्णन देतांना **केळकर** आपल्या **टिळकचरित्रांत** लिहितात—"सबंध बुधवारच्या रस्त्यावर प्रचंड मंडप-दुतर्फा नक्षीचें काम, शुभ्र छत, जंगी हंड्या, झुंबरें, बाहेर उंच कमान, सर्वत्र निशाणांची गर्दी, केळीच्या खांबाची लांबच लांब तोरणें, अशा रीतीनें रस्त्याचा दिवाणखाना बनवून दिला होता!" १८८५ सालीं बरेच वादग्रस्त प्रश्न प्रथमतःच सार्वजनिक चर्चेस निघाले 'युद्धस्य वार्ता रम्या' या न्यायानें सुधारक व उद्धारक एकमेकांवर हल्ले प्रतिहल्ले कसे चढवीत आहेत हें पाहण्याची उत्सुकता वाचकवर्गांत उत्पन्न झाल्यामुळें 'केसरी'कडे सर्वांचे डोळे लागून राहत असत. बालविवाहाच्या चालीस पूर्णपणें आळा पडून

असंमत वैधव्य समाजांत कमी प्रमाणांत दिसून यावें ह्या हेतूनें मलबारी शेटजींनीं आदल्या सालापासून चळवळ सुरू केली होती. बालविवाह समाजांतून नाहींसा व्हावा याबद्दल सर्वांचेंच एकमत होतें. परंतु बालविवाह बंद पाडण्याकरितां उपाययोजना काय करावी याबद्दल मतभेद उत्पन्न होऊन दोन तट पडले. मलबारीशेटचें म्हणणें असें होतें कीं, सामाजिक सुधारणा करण्यास परकीय सरकारचेंहि सहाय्य घेण्यास प्रत्यवाय नसावा. तेव्हां बालविवाहाच्या विघातक रूढीपासून आमच्या समाजाची सुटका व्हावयाची असेल तर अल्पवयांत विवाह झालेल्यांना सरकारी नौकरी देण्यांत येऊं नये, कोणत्याही परीक्षेस बसण्याची परवानगी असूं नये, हे व अशासारखे कायदे सरकारनें अवश्य केले पाहिजेत. विरुद्ध बाजूचें मत असें होतें कीं, समाजांतल्या चाली कायदे करून बंद पडावयाच्या नाहींतच परंतु धार्मिक बाबतींत हात घातल्याबद्दल सरकारला वचनभंगाचें पातक मात्र लागेल. १८८५ सालीं या वादाच्या दंगलींत 'केसरी' नें प्रामुख्यानें भाग घेतला होता आणि या वादाच्या चर्चेपासूनच 'आधीं सामाजिक का आधीं राजकीय!' ह्या वादग्रस्त विषयाच्या विवेचनास सुरवात झाली. या बड्या वादळाबरोबरच एका स्थानिक चळवळीच्या वावटळीचा उल्लेख करणें अवश्य आहे. हिंदुस्थानांत स्थानिक स्वराज्याचा पाया सन १८८५ सालीं घातला गेला. हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षाबद्दल सहानुभूति बाळगणारे लोकप्रिय व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दींत स्थानिक स्वराज्याचा कायदा पास झाला. स्थानिक स्वराज्याचा प्रारंभ १८५० च्या २६ व्या आक्टानें झाला होता. सरकारनें ह्या कायद्यान्वयें एक मॅजिस्ट्रेट व त्याच्या हाताखालीं कांहीं कमिशनर नेमून शहरची सुधारणा करणें व आरोग्य राखणें हें काम त्यांच्याकडे सोंपविलें. १८७३ सालीं जेथें-

जेथें विद्याप्रसार होऊन सार्वजनिक कामाची लोकांत आस्था सरकारला दिसून येई तेथें तेथें गांवांतील लोकाकडे ही व्यवस्था सोंपविण्यांत येऊं लागली; परंतु म्युनिसिपालिटीमध्यें लोकनियुक्त सभासद अद्याप नव्हते. लॉर्ड रिपनच्या स्थानिक स्वराज्याच्या कायद्याप्रमाणें अर्ध्याहून कमी नाहींत इतके सभासद निवडून देण्याचा हक्क प्रमुख प्रमुख शहरांना देण्यांत आला. इतर कांहीं शहरांप्रमाणें पुण्यासहि हा हक्क मिळाला व म्युनिसिपल निवडणुकीची पहिली दंगल १८८५ च्या आरंभीं झाली. रानडे व कुंटे परस्परविरुद्ध पक्षाला सामील झाल्यामुळें तर या दंगलीस विशेषच रंग चढला. निवडणुकीचा हक्क प्रथमच लोकांना मिळत होता; त्याचा लोकांनीं नीट उपयोग करून लायक माणसें म्युनिसिपॅलिट्यांमध्यें धाडावींत या दिशेनें रानड्यांनीं प्रयत्न सुरूं केले. कुंटे सरकारपक्षाला मिळाले व लोकप्रतिनिधींना निवडणुकींत यश येऊं नये म्हणून निरनिराळ्या वार्डांत सभा भरवून व्याख्यानें देण्याचा उपक्रम त्यांनीं केला. तेलंगांच्या आवाजांतील गोडवेपणा व रानड्यांचें गांभीर्य कुंटे यांच्याजवळ नसलें तरी वक्तृत्वबाजींत ते दोघांनाहि हार जाणारे नव्हते. अस्खलित वाणी, जोरदार भाषा आणि किंचित् ग्राम्य व चटोर विनोद यामुळें त्यांची भाषणें परिणामकारक होत असत. परंतु रानड्यांच्या मुत्सद्दीगिरीमुळें कुंट्यांच्या विरोधाला लवकरच आळा बसला. निवडणुकीसंबंधीं होणाऱ्या या व्याख्यानांपैकीं कित्येक प्रसंगांना गोखले जातीनें हजर राहिले आहेत.

१८८५ साल पुण्याच्या इतिहासाप्रमाणेंच गोखल्यांच्या आयुष्यांतहि महत्त्वाचें आहे. सामान्यतः कोणाहि व्यक्तीच्या आयुष्यांत शिक्षणक्रम संपून जीवितक्रमाचें साधन हस्तगस्त होईपर्यंतचा काल नाजूक असतो. धंदेवाईक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गोष्ट निराळी.

शिक्षण संपल्याबरोबर ते अनुकूल परिस्थिति पाहून आपला धंदा सुरू करितात. परंतु बी. ए पर्यंतचें केवळ सांस्कृतिक शिक्षण ( cultural education ) घेणारे विद्यार्थी परीक्षा पास झाल्यानंतर नदीच्या प्रवाहांत अनिर्दिष्ट दिशेनें वाहत जाणाऱ्या काष्ठखंडाप्रमाणें अनुकूल प्रतिकूल परिस्थितीच्या लाटांच्या हेलकाव्याबरोबर कोणत्या बंदरास लागतील याचा नेम सांगवत नाहीं. आयुष्याचें ध्येय ( Misson of life ) जरी निश्चित झालें असलें तरी त्यास उपकारी असें जीवितक्रमाचें साधन ( vocation ) उपलब्ध झालें नाहीं तर विद्यार्थीदशेंत केलेले संकल्प जागच्या जागींच थिजतात. तरुणांच्या महत्त्वाकांक्षी उत्साहाला योग्य दिशा व संधि मिळाली तर त्यांच्या अंतर्हित शक्तींचा विकास होऊन महत्कार्य करण्याचें सामर्थ्य त्यांच्या बाहूंत येतें. ध्येय व जीवितक्रमाचें साधन हीं एकमेकांला परिपोषक आहेत. पुष्कळदां असेंहि घडून येतें कीं, ध्येयाची अस्फुटहि कल्पना नसतां केवळ जीवितक्रमाच्या साधनानें उत्पन्न केलेल्या अनुकुल परिस्थितीमुळें जीवितकार्याचा सुगावा लागून एखाद्या व्यक्तीच्या हातून अंतिम साध्याची मजल मारिली जाते. गोखल्यांच्या आयुष्यांत १८८५ साल क्रान्तिकारक होतें. कोणत्या बंदराच्या आश्रयानें ते आपलें भावी आयुष्य कंठणार याचा निकाल या सालीं लागणार होता. वकीलीचा अभ्यास ते यासाठीं करीतच होते; परंतु पुण्याच्या सार्वजनिक चळवळीमुळें त्यांचें लक्ष देशाच्या वर्तमान स्थितीकडे वळलें. **टिळक–आगरकर व डेकन एज्युकेशन सोसायटींतील** इतर आजन्म सभासद यांचा आदर्श त्यांच्यापुढें होताच व साधल्यास देशसेवेचा तोच मार्ग स्वीकारण्याची कल्पना त्यांच्या मनांत यावेळीं प्रादुर्भूत झाली असावी. इकडे सोसायटीनें कॉलेज याच सालीं सुरू केल्यामुळें नवीन होतकरू हुशार व उत्साही मंडळींची जरूरी चालकांना भासूं लागली. एक वर्षभर न्यू इंग्लिश स्कुलांत शिक्षक या नात्यानें

नोकरी केल्यामुळें **गोखल्यांची** कर्तबगारी चालक मंडळींच्या दृष्टोत्पत्तीस आली होतीच. **गोखल्यांना** सोसायटींत सामील करून घेण्याचा त्यांनींहि प्रयत्न सुरू केला. पुढील सालीं **गोखले** न्यू इंग्लिश स्कुलांत शिक्षकाचें काम करीत होतेच; परंतु एल् एल्. बी ची हजिरी भरण्याकरितां मुंबईस मधूनमधून जात असत. यावर्षी वकीलीचा अभ्यास जरी त्यांनीं चालू ठेविला होता तरी त्यांचें चित्त डेक्कन एज्युकेशन सोसायटी व तींमधील सभासद यांच्याकडे ओढलें जात असे. या वर्षीं सोसायटींतील सभासदांशीं त्यांचा अधिक संबंध आला आणि ज्या उच्च हेतूनें ही मंडळी प्रेरित झाली होती त्या हेतूंचें बीजारोपण गोखल्यांच्या हृदयांत यावेळीं होऊं लागलें. अखेरीस १८८६ सालच्या उत्तरार्धांत गोखल्यांनीं सोसायटीस मिळण्याचा निश्चय केला व तो तात्काळ अंमलांतहि आणिला.

हिंदी राजकारणांत पुढें आलेले बहुतेक लोक पूर्ववयांत शिक्षक किंवा वकील असलेले दिसून येतात हा एक विचित्र योगायोगच म्हटला पाहिजे. **दादाभाई नौरोजी** व **न्यायमूर्ति रानडे** या दोघांनीं एल्फिन्स्टन कालेजांत अध्यापकाचें काम केलें होतें. **विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर** या मंडळींचा तर शिक्षणव्यवसायांत जन्म घालविण्याचा निश्चयच होता; आणि एक टिळकांखेरीज दोघांनीं तो तडीसहि नेला. दुर्दैवानें **चिपळूणकर आगरकर** हे अल्पायुषी ठरले ! **गणेश व्यंकटेश जोशी** यांचा सर्व जन्म शिक्षकाची नौकरी करण्यांतच गेला. **डॉ. भांडारकर** संस्कृतचे प्रोफेसर व प्राच्य विद्यासंशोधक म्हणूनच विशेष प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रांतच अशी वस्तुस्थिति आढळून येतें असें नाहीं. बंगालचे अनभिषिक्त सम्राट् म्हणून एके कालीं प्रसिद्धीस आलेले **बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** प्रेसिडेन्सी कॉलेजांत इंग्लिशचे प्रोफेसर होते. त्याच कॉलेजांत **सर**

जगदीशचंद्र बोस पुढें सायन्सचे अध्यापक बनले. बाबू बिपिनचंद्र पाल यांच्या आयुष्याचीं दहाबारा वर्षें कटक, सिल्हेट व बंगलोर येथील शाळांत शिक्षकाचें काम करण्यांत खर्ची पडलीं आहेत. पंडित मदनमोहन मालवीय व ना. शास्त्री यांनींहि कांहीं थोडे दिवस शिक्षकाचा पेशा पत्करिला होता. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत अपयश आल्यामुळें बाबू अरविंद घोष यांना बडोद्याच्या कॉलेजांत इंग्लिशचे प्रोफेसर नेमण्यांत आले होते. विशेष बारकाइनें तपास केल्यास ही यादी आणखीहि फुगवितां येण्याजोगी आहे. याच यादींत गोपाळराव गोखल्यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे; कारण शिक्षण व राजकारण या दोन्ही शाखांत त्यांनीं अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली आहे.

१८८७ सालीं कॉलेजमध्यें आल्यापासून तो १९०२ सालीं कॉलेज सोडून जाईपर्यंत गोखल्यांना प्रसंग पडेल तसे निरनिराळे विषय शिकवावे लागत. पहिलीं चार वर्षें त्यांना फक्त इंग्लिश शिकवावें लागे. गोखल्यांचा ऐच्छिक विषय गणित; परंतु त्यांनीं इंग्लिश भाषा व वाङ्मय यांचा अभ्यास आवडीनें व परिश्रमपूर्वक केला असल्यामुळें त्यांच्याकडे इंग्लिश शिकविण्याचें काम देण्यांत आलें. शिवाय गणित विषय शिकविण्यास टिळक होतेच. फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंग्लिशचे मुख्याध्यापक प्रोफेसर वासुदेवराव केळकर हे होते. केळकर व गोखले यांच्या शिकविण्यांत बरीच तफावत असे. केळकर हे गोखल्यांच्या मानानें ज्यास्त अनुभवी; शिवाय शिक्षकांच्या अंगीं अवश्य लागणारे गुण त्यांना स्वभावतःच साध्य होते. माफक अभिनय, आवाजांतील आरोहावरोह व मार्मिक सहृदयता यामुळें केळकरांचें शिकवणें विद्यार्थ्यांना मनोरंजक वाटून वाङ्मयाच्या अभ्यासाबद्दल त्यांच्यामध्यें आवड उत्पन्न करणारें होत

असे. इंग्लिश वाङ्मयाचें त्यांचें ज्ञानहि विस्तृत व खोल होतें. असें सांगतात कीं, सरकारी कॉलेजांतील युरोपिअन प्रोफेसरांनीं पुस्तकांतील अवघड म्हणून जो भाग शिकवितांना गाळावा तेवढांच नेमका **प्रो. केळकर** विद्यार्थ्यांना समजावून देत असत. **केळकरांशीं** तुलना केली असतां **गोखल्यांचें** शिकविणें फिकें पडावें यांत नवल नाहीं. चांगलें शिकवितां येणें ही एक कला आहे आणि इतर कलेप्रमाणें अभ्यासानें कांहीं एका विवक्षित मर्यादेपर्यंतच त्यांत प्रावीण्य संपादन करितां येतें. **गोखल्यांच्या** हाताखालीं इंग्लिश शिकण्याची संधि ज्या विद्यार्थ्यांना मिळाली त्यांपैकींच **डॉ. परांजपे** हे आहेत. **गोखल्यांच्या** शिकविण्याच्या पद्धतीबद्दल ते लिहितात.

"*Gokhale's* teaching of English suffered from comparision with that of his colleague, *Prof. Kelkar*. *Gokhale* was methodical in the extreme. He never slurred even over the easiest passages; took great pains in explaining all the allusions and especially the historical references; but his teaching was not calculated to give one the love of literature as such if it was not already there". जें पुस्तक शिकवावयाचें असेल त्या पुस्तकाबद्दल व ग्रंथकाराबद्दल शक्य तितकी माहिती मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यामुळें माहितीच्या दृष्टीनें त्यांचीं व्याख्यानें विद्यार्थ्यांना उपयुक्त होत असत.

सोसायटींतील अंतःस्थ भांडणें विकोपास जाऊन १८९० सालच्या अखेरीस **टिळकांना** सोसायटी सोडावी लागली. त्यामुळें गणित शिकविण्याची जबाबदारी **गोखल्यांच्यावर** येऊन पडली. गणित विषय असा आहे कीं त्याचें सतत अध्ययन व अध्यापन चालू राहिलें तरच तो डोक्यांत ताजा रहातो. परीक्षा झाल्यापासून आतांपर्यंत गणिताकडे

पाहाण्याचें गोखल्यांना कारण पडलें नव्हतें. सहा वर्षांनीं पुनः हा विषय शिकविण्याची जबाबदारी अंगावर पडल्यामुळें गोखल्यांना परिश्रम करून आपल्या ज्ञानाला उजळा द्यावा लागला. परंतु गणित विषय शिकवितांना त्यांना अडचण भासूं लागल्यामुळें म्हणून म्हणा अथवा त्या विषयाची आवड मूलतःच कमी म्हणून म्हणा गोखल्यांनीं गणित विषय एका वर्षाच्या वर कॉलेजांत शिकविला नाहीं. १८९२ च्या प्रारंभीं प्रो. कर्वे सोसायटीला येऊन मिळाले; त्यांच्या गळ्यांत गणित विषय शिकविण्याची जबाबदारी टाकून गोखले आपल्या आवडीचे विषय शिकविण्यास मोकळे झाले.

इंग्लिश बरोबरच गोखले इतिहास व अर्थशास्त्र हे विषय शिकवीत असत. इतिहास व अर्थशास्त्र हे त्यांच्या आवडीचे विषय असल्यामुळें त्या विषयांचें त्यांचें अध्ययन संपूर्ण असे. हिंदुस्थानच्या इतिहासापेक्षां त्यांना प्राचीन व अर्वाचीन यूरोपचा इतिहास फार पसंत पडे. इतिहासाच्या ज्ञानाचा खरा उपयोग म्हणजे पुढील मार्ग दाखविणें. हिंदुस्थानच्या इतिहासापेक्षां यूरोपचा इतिहास हें कार्य करण्यास अधिक लायक आहे असा त्यांचा विश्वास होता. इतिहास शिकवितांना बरेंच वेळां जाणून बुजून ते विषयांतर करीत व यूरोपच्या इतिहासावरून वर्तमानकालीन भारतवर्षानें कोणते धडे घेणें जरूर आहे हे विशद करून सांगत असत. इतिहासापेक्षांहि अर्थशास्त्राचें त्यांचें अध्ययन खऱ्या प्रोफेसराला शोभेसें होतें. त्यांना थोडी फुरसत मिळाली असती तर अर्थशास्त्रामध्यें नवीन सिद्धान्तांची भर टाकण्याची त्यांची मनीषा फलद्रूप झाली असती. परंतु उत्तरोत्तर गोखल्यांच्या सार्वजनिक कार्याचा व्याप इतका वाढला कीं, त्यांना कोणत्याही एका विषयाला वाहून घेऊन त्यांच्यामध्यें वैशिष्टय कमाविणें अशक्य झालें.

अध्यापनाखेरीज **गोखल्यांना** सोसायटीचें इतर काम बघावें लागे. भांडणें होऊन सोसायटींत फूट पडण्यापूर्वी फंड जमविण्याचें काम **नामजोशी** यांच्याकडे असे. **टिळकांच्या** बरोबर **नामजोशी** सोसायटींतून बाहेर पडल्यामुळें हें काम **गोखल्यांच्याकडे** आले. फंड जमविण्याचें काम किती यातायातीचें व किचकट असते याची कल्पना तें काम करणारालाच येणें शक्य आहे. परंतु हें काम **गोखल्यांनीं** आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून अश्रांत मेहनत करून समाधानकारक केलें. सोसायटीच्या आंतर व्यवस्थेंत **गोखले** प्रामुख्यानें भाग घेत असत. बरेंच वर्षेंपर्यंत **गोखले** सोसायटीचें सेक्रेटरी होते आणि या नात्यानें सोसायटीतर्फे सरकारशीं होणारा सर्व पत्रव्यवहार त्यांनाच बघावा लागे. कोणत्याही संस्थेची प्राथमिक घटना कामचलाऊ असते. याचें कारण पुढें येणाऱ्या अडचणींची योग्य कल्पना प्रारंभीं असणें शक्य नसतें. त्यामुळें घटनेंत प्रसंग पडेल तसा फेरफार करावा लागतो. १८९७ सालीं प्लेग व रँड आणि **आयर्स्ट** यांचे खून यामुळें पुण्याचें वातावरण बरेंच प्रक्षुब्ध झालें होतें. सरकारची करडी नजर चोहोंकडे फिरूं लागून जेथें तेथें अराजकतेचा वास सरकारला येऊं लागला. डेक्कन **एज्युकेशन सोसायटी** केवळ शिक्षणविषयक एक संस्था. कॉलेजचें काम संभाळून इतर सार्वजनिक काम करितां आलें तर करावयाचें असा मंडळींचा बाणा असे. परंतु त्यांतहि सरकारला राजद्रोह दिसून येऊं लागला. म्हातारपणीं जुलमी **औरंगजेबाला** भेटीस येणारा प्रत्येक इसम मारेकरी आहे किंवा काय अशी शंका ममतेचा पाश तडातड तोडून तारुण्यांत केलेल्या दुर्विलसिताच्या आठवणीमुळें वारंवार येत असे; तशीच सरकारची शंकेखोर वृत्ति बनली होती आणि त्याला थोडींबहुत कारणेंहि पण झालीं होतीं. **वेल्बी कमिशन** पुढें साक्ष देण्यास गेले असतांना सोसायटीचे एक प्रमुख सभासद

प्रो. गोखले यांनीं ब्रिटिश सैनिकांची बदनामी करणारा कांहीं मजकूर प्रसिद्ध केला. सोसायटीमधीलच दोघां सभासदांनीं चालविलेल्या 'सुधारक' पत्रांत सरकारविरुद्ध बरेच कडक लेख येत असत. टिळकांनीं सुरू केलेल्या शिवाजी उत्सवात प्रो. भानु यांचें व्याख्यान झालें. या कारणामुळें सोसायटीच्या कारभारांत आपला हात असावा असें सरकारास वाटूं लागलें. अगदींच आवश्यक असलेल्या नियंत्रणाव्यतिरिक्त सरकारचे कोणतेंहि बंधन स्वीकारावयाचें नाहीं असें चालकांचें ब्रीद होतें व सध्यां आहेही. हें धोरण सांभाळून सरकारचा रोष तर होऊं द्यावयाचा नाहीं असा बदल घटनेंत करणें जरूर पडलें. रानड्यांनीं या कामीं मध्यस्थी केली. ते स्वतः, डॉक्टर भांडारकर व मुंबई हायकोर्टाचे एक जज्ज मि. फुल्टन यांची कमेटी नेमून तिची नेमणूक सोसायटीच्या कामकाजावर असावी अशी रानड्यांची योजना होती. परंतु डॉ. भांडारकर यांच्या दुराग्रहामुळें ती सिद्धीस गेली नाहीं. पुढील तीन वर्षांत सोसायटीच्या सभासदांनीं राजकारणांत कसलाहि भाग घेऊं नये; राजकीय विषयांत वाहिलेल्या वर्तमानपत्रांचें संपादकत्व स्वीकारूं नये; परंतु आपल्या सहीवर राजकीय विषयांवर लिहिण्यास हरकत नाहीं आणि राजकीय सभांच्या कार्यकारी मंडळांत सभासदांचें नांव नसावें या व अशा अटींवर तडजोड होऊन हें प्रकरण मिटलें. आगरकरांच्या पाठीमागें सोसायटींत गोखले प्रमुख झाले व अंतर-व्यवस्थेचीं सर्व कामें त्यांनाच करावीं लागलीं. वरील प्रकरणांतहि सरकारचा रोख इतर सभासदांपेक्षां गोखल्यांच्यावर अधिक होता. कारण सार्वजनिक कार्यांत गोखल्यांच्या इतकें कोणी पडत नव्हतें. हें प्रकरण सभासदांना अनुकूल अशा रीतीनें मिटवून सरकारची समजूत काढण्याचें बहुतेक श्रेय गोखल्यांना आहे.

१९०२ सालच्या अखेरीस गोखल्यांनीं सोसायटीशीं आपला

साक्षात्संबंध तोडला. त्यांची मुदत भरण्यास आणखी दोन वर्षांचा अवधि होता; परंतु इतर सार्वजनिक कार्याचा व्याप वाढल्यामुळें त्यांनीं हक्काच्या रजेचा फायदा घेतला. १९सप्टेंबर १९०२ रोजीं फर्ग्युसन कॉलेजमधलि विद्यार्थ्यांनीं त्यांना मोठ्या प्रेमानें व आदरानें निरोप दिला. या सुमारास हिंदी राजकारणांत एक नवीनच पक्ष उदय पावत होता. तरुणपणीं अननुभवी मनाचा ओढा जहालपणाकडे अधिक असतो आणि राजकीयदृष्ट्या परतंत्र असणाऱ्या हिंदुस्थानसारख्या देशांत प्रस्थापित सरकाराविरुद्ध लिहिण्यांत व बोलण्यांत येणाऱ्या भाषेच्या कडकपणावर देशभक्तीचें मोजमाप सामान्य जनतेकडून करण्यांत येत असल्यामुळें देशाभिमानी तरुणांचीं मनें जहालपक्षाकडे आकर्षिलीं जातात. १९०२ सालचे कालेजमधील विद्यार्थी या नियमाला अपवाद नव्हते. त्यांची सहानुभूति गोखल्यांच्या पक्षापेक्षां टिळकांच्या राष्ट्रीयपक्षाकडे अधिक होती. परंतु सार्वजनिक कामांतील ही मतभिन्नता गोखले व विद्यार्थी यांच्यामधील प्रेमाच्या आड कधींच आली नाहीं, हें वरील समारंभावरून सिद्ध होतें. गोखल्यांनीं या प्रसंगीं केलेलें भाषण फारच हृदयस्पर्शी आहे. त्यांच्या मनांत ज्या अनेकविध विचारांचें व विकारांचें काहूर माजलें होतें त्याचें आविष्करण करण्याचा त्यांनीं या भाषणांत प्रयत्न केला आहे. वियोगाचे सर्वच प्रसंग दुःखकारक असतात; परंतु चिरसहवासानें जेथील प्रेमाचे रज्जू दृढतर होतात त्या संस्थांचा शेवटला निरोप घेणें म्हणजे तें एकप्रकारचें दिव्यच आहे अशी सुरवात करून अठरावर्षांपूर्वीं शपथपूर्वक केलेला संकल्प ईश्वरकृपेनें सिद्धीस गेल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. दिवसेंदिवस शरीरप्रकृति खालावत चालल्यामुळें व सार्वजनिक कार्याचा मोह अनावर झाल्यामुळें आपल्याला सोसायटी सोडून जावें लागत आहे याबद्दल गोखल्यांनीं खेद प्रदर्शित केला आणि सरतेशेवटीं सर्व विद्या-



प्रोफेसराच्या पोषाकांत ना. गोखले. [ पृ. २४ ]

र्थ्यांना संस्थेबद्दल योग्य अभिमान बाळगण्याविषयीं कळकळीची विनंति केली. गोखल्यांच्या इंग्लिश भाषेचा उत्तम नमुना म्हणूनहि हें भाषण एकवार वाचण्याजोगें आहे.

याच प्रकरणांत गोखल्यांच्या अंकगणिताचा उल्लेख केला पाहिजे. कॉलेजला येऊन मिळाल्यानंतर अंकगणित तयार करण्याचें काम त्यांनीं मनावर घेतलें आणि थोड्याच अवधींत तें तयारहि केलें. अंकगणिताची पहिली आवृत्ति शिराळकर आणि कंपनीकडून १८८७ सालीं छापविली. पुढें १८९६ सालच्या जून महिन्यांत मॅकमिलन आणि कंपनीनें त्यांचें अंकगणित प्रथम प्रसिद्ध केलें. तेव्हांपासून आतांपर्यंत अंकगणिताच्या एकंदर बावीस आवृत्त्या निघाल्या. त्याव-रून त्याची लोकप्रियता अजमावतां येण्याजोगी आहे. गोखल्यांना अंकगणित लिहिण्याची स्फूर्ति एकाएकी कशी झाली हें कळत नाहीं. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केल्यानंतर शाळेंत क्रमिक पुस्तकें कोणतीं लावावयाचीं ह्याबद्दल चालकांना अडचण भासत असावी असें दिसतें. आणि दुसऱ्या कोणीतरी लिहिलेलीं पुस्तकें लावण्यापेक्षां आपणच पुस्तकें तयार कां करूं नये असा विचारहि या कर्तृत्व-शाली मंडळींचया मनांत आला असणें संभवनीय दिसतें. प्रि. आपटे यांनीं शाळेंत उपयोगीं पडतील अशी संस्कृत पुस्तकें तयार करण्याचें काम चालविलेंच होतें. टिळकहि शाळेंतील विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां यंत्रशास्त्रावर Mechanics एक छोटेसें पुस्तक लिहित होते असें तत्कालीन वृत्तपत्रांत आलेल्या पोंचीवरून कळतें. गोख-ल्यांचा गणित हा ऐच्छिक विषय; तेव्हां शालोपयोगी अंकगणित तयार करण्याचें काम त्यांच्यावर सोंपविलें गेलें असल्यास नवल नाहीं. आणखी असेंहि म्हणतां येईल कीं, बीजगणित व भूमिति या विषयांवर इंग्लिशमध्यें जशीं चांगलीं पुस्तकें आहेत तशीं अंक-

गणितावर इंग्लीशमध्यें सुद्धां पुस्तकें नसावीत. कसेंहि असो, **गोखल्यांचें** अंकगणित लौकरच लोकप्रिय होऊन त्याचा खप अतोनात वाढला आणि अंकगणिताचें उत्पन्न **गोखल्यांच्या** वार्षिक उत्पन्नाची एक बाबच होऊन बसली.

**गोखल्यांच्या** सार्वजनिक आयुष्यक्रमास सोसायटींत सामील झाल्यापासूनच सुरवात झाली. बाल्यावस्थेंतील संस्थांची भरभराट चालकांच्या कुवतीवर अवलंबून असते, आणि व्यक्तींच्या महात्म्यामुळें संस्था कार्यक्षम व लोकप्रिय होतात. परंतु नांवारूपास चढलेल्या संस्था व्यक्तींना समाजाच्या निदर्शनास आणतात. **गोखले** सोसायटीचे सभासद झाले त्यावेळीं संस्थेचा बालकभाव कायमच होता. परंतु जन्मकालाच्या बलवत्तर ग्रहयोगामुळें हें बालक प्रथमपासूनच सर्वांच्या प्रीतीस पात्र झालें. त्यामुळें गोखले सोसायटींत आले तेव्हां गोखल्यांच्या आगमनानें सोसायटीच्या नांवलौकिकांत विशेषशी भर पडण्यापेक्षां डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजन्म सभासद म्हणून **गोखल्यांचा** दर्जा मात्र वाढला व इतर सार्वजनिक कार्य करणाऱ्या संस्थांमध्यें त्यांचा प्रवेश अनायासें झाला. सोसायटीचे हे उपकार **गोखले** यांनीं सव्याज कसें फेडलें हें वरील हकिकतीवरून वाचकांच्या प्रत्ययास येईलच. याच मुदतींत **गोखल्यांचा** इतरहि कांहीं संस्थांशीं संबंध आला, त्याची हकीकत यथाक्रम येईलच. परंतु सोसायटीमध्यें कराव्या लागणाऱ्या विविध कामांमुळें त्यांना जो बहुविध अनुभव आला, जीवितकार्य पार पाडण्यास आवश्यक भासणाऱ्या गोष्टींची पूर्वतयारी करण्यास त्यांना येथें जशी संधि मिळाली, तो अनुभव व ती संधि त्यांना इतर कोणत्याहि संस्थेंत काम करितांना तितक्या प्रमाणांत लाभली नाहीं. इंग्लिश ही राजदरबारची भाषा तर आहेच; परंतु हिंदुस्तानची ती

सध्यां तरी ' राष्ट्रीय ' भाषा आहे. निरनिराळ्या प्रांतांत दळणवळण सुरू होण्यास भाषाभिन्नत्व आड येत असे. ही नडवणूक इंग्लिश भाषेनें अंशतः तरी दूर केली आहे. इंग्लिश भाषा चांगली बोलतां व लिहतां येत नसल्यामुळें इतर सर्व दृष्टीनें योग्य असलेले लोक हिंदी राजकारणांत मागें पडल्याचीं उदाहरणें सांपडतात. इंग्लिश भाषेच्या या दुहेरी उपयोगामुळें अखिल हिंदुस्तानच्या राजकारणांत नांव कमाविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारांना इंग्लिश भाषेवर परिश्रमपूर्वक प्रभुत्व मिळविणें अत्यंत आवश्यक असते. **गोखल्यांना** कॉलेजमध्यें कित्येक वर्षें इंग्लिश शिकवावें लागत असल्यामुळें इंग्लिश भाषेवर प्रभुत्व मिळविण्याची ही संधि त्यांनीं वाया जाऊं दिली नाहीं. गणिताच्या अध्ययनानें त्यांच्या विचारांना व्यवस्थितपणा तर आलाच. पण गणिताचें खरें सहाय्य त्यांना अर्थशास्त्राचा अभ्यास करितांना झालें. आंकडेशास्त्र हें एक अर्थशास्त्राचें प्रमुख अंग आहे आणि आंकड्यांचा योग्य उपयोग करितां येण्यास गणितशास्त्रांतल्या कांहीं कांहीं कल्पनांचें ज्ञान आवश्यक आहे. हिंदी राजकारणांत गोखल्यांना जें पुढारीपण मिळालें व वरिष्ठ कायदेकौन्सिलांत त्यांचें जें तेज पडलें त्यांस इतिहास व अर्थशास्त्र यांचें अध्ययनच कारणीभूत झालें. सुमारें सात आठ वर्षें त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजांत हा विषय शिकविला. त्यामुळें राजकीय पुढाऱ्यांना आवश्यक लागणारे प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें त्यांचें ज्ञान चोख होतें आणि या ज्ञानाचा उपयोग वर्तमानकालीन राजकीय विषयाकडे ते कसा करीत असत हें त्यांच्या भाषणांवरून कळून येण्यासारखें आहे. इतिहासाच्या ज्ञानाची लालसा त्यांना तीव्र होती. जुन्या कागदपत्रांच्या आधारें एकाद्या प्रकरणाचा विभागशः विचार करणाऱ्या पृथक्करणात्मक पद्धतीपेक्षां ( Analytical ) त्याचा साकल्यानें ( Synthetical ) विचार करणें त्यांना अधिक

पसंत असे, आणि हाहि विचार ते मुख्यतः राजकीयदृष्ट्या करीत. इतिहासाच्या अध्ययनानें विचारांचें क्षितिज वाढतें व कोणत्याहि गोष्टीचा निर्णय करितांना साधक बाधक प्रमाणें पाहण्याचें वळण बुद्धीला लागतें. संकुचित कल्पना व त्यामुळें विचारांत येणारा एक-कलीपणा जाऊन जगाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन उदार व विस्तृत होतो. इतिहासाच्या अध्ययनाचा हाच परिणाम गोख-ल्यांच्या मनांवर झालेला दिसून येतो. याहिपेक्षां सोसायटींत राहि-ल्यानें गोखल्यांना सार्वजनिक कामाचा जो प्रत्यक्ष अनुभव आला त्यालाच विशेष महत्त्व दिलें पाहिजे. सोसायटींत आल्यापासून अध्यापनाबरोबर इतरहि कामांत त्यांचा सल्ला विचारण्यांत येऊं लागला. थोड्याच अवधींत जुन्या सभासदांइतकें गोखल्यांचें महत्त्व वाढलें. पुढें सोसायटींत भांडणें होऊन फूट पडली. त्यांस सार्वजनिक विषयांच्या मतभेदाबरोबर गोखल्यांचा अल्पावधींतील हा उत्कर्षहि थोड्याफार अंशानें कारणीभूत झाला असें कित्येकांचें मत आहे. संस्थेच्या कामामुळें मोठमोठ्या लोकांच्या ओळखी झाल्या. सार्व-जनिक कार्याकरितां फंड जमविण्याच्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव आला आणि लोकांच्या मदतीनें चाललेल्या संस्था कोणत्या तत्त्वांवर चालविल्या पाहिजेत याची माहिती झाली. या ज्ञानाचा, अनु-भवाचा व माहितीचा भावी कार्याकडे किती उपयोग झाला हें पुढील हकिकतीवरून दिसून येईलच.

# ३ ‘ सुधारक ’ व ‘ सार्वजनिक सभा. ’

“Whatever fate awaits our labours, one thing is clear. We shall be entitled to feel that we have done our duty and where the call of duty is clear, it is better even to labour and fail than not to labour at all”.

—G. K. Gokhale.

फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रोफेसर झाल्यामुळें गोखल्यांना जीवितक्रमाचें साधन मिळालें. त्यांच्या आयुष्यास निश्चितता आली आणि कॉलेजचें काम सांभाळून इतर सार्वजनिक कार्य करण्यास सवड सांपडूं लागली. गोखल्यांच्या कर्तबगारीस कॉलेजमधील कार्यक्षेत्र अपुरें पडूं लागलें. प्रारंभीं करांगुलीसारखा दिसणारा व पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून आवेशानें वहात येणारा नदीचा क्षुद्र प्रवाह डोंगरपठारांवर स्थिर होऊन पुढील मार्ग आक्रमूं लागला म्हणजे उत्तरोत्तर त्याचा व्याप वाढणारच. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत असतांना त्यांनीं General war in Europe या विषयांवर एक लेखमाला लिहिल्याचें समजतें. परंतु इंग्रजी लिहिण्याची त्यांची हौस कधीं काळीं लिहिलेल्या एखाद्या निबंधानें भागण्यासारखी नव्हती आणि ती पुरवून घेण्याची संधि त्यांना लौकरच मिळाली. ‘ न्यू इंग्लिश स्कूल, ’ ‘ केसरी ’ व ‘ मराठा ’ आणि इतर एक दोन संस्था सामुदायिक प्रयत्नानें चालविण्याचा मूळचा संकल्प मतभेद व स्वभाववैचित्र्य यामुळें तडीस गेला नाहीं. वर्तमानपत्रें धंद्याच्या दृष्टीनें किफायतशीररीतीनें चालत नव्हतीं. त्यांचा खर्च सोसायटीलाच प्रथम भागवावा लागे. आंतबट्ट्याचा व्यापार करणारीं हीं वर्तमानपत्रें चालकांनीं आपल्या जबाबदारीवर चालवावीं व दोन्ही संस्थांचा

जमाखर्च निरनिराळा ठेवावा असें नंतर ठरलें. अद्याप वर्तमानपत्रें कोणाच्याहि एकाच्या मालकीचीं झालीं नव्हतीं. त्यामुळें नफानुकसानीचें ओझें सर्व चालक मंडळीवर सारखेंच पडे. सामाजिक बाबतींत निर्भीड लेख लिहिण्याचा **आगरकरांचा** सांप्रदाय असे. याच सुमारास **मलबारी शेटजींच्या** बालविवाहनिषेधाच्या चळवळीमुळें सामाजिक विषयावरील वाद रंगांत आला होता. '**केसरी**'च्या संपादकीय वर्गांत सामाजिक प्रश्नांवर मतैक्य नसल्यामुळें '**केसरी**' मध्यें परस्परविरुद्ध मतांचें लेख येऊं लागले. तेव्हां वर्तमानपत्रें कोणातरी एकाच्या मालकीचीं असून त्यांचें एक धोरण असावें असें ठरलें. **आगरकरांच्या** लेखांचें झणझणीत अंजन समाजाच्या डोळ्यांत खुपूं लागलें आणि त्याचा परिणाम वर्तमानपत्रांच्या खपांवर होतो कीं काय अशी भीतिहि पण वाटूं लागली. एकाच्या कृतीबद्दल दुसऱ्यानें प्रायश्चित्त कां भोगावें! असाहि एक अवांतर मुद्दा निघून अखेरीस कर्जासक्त छापखाना व वर्तमानपत्रें यांचा बोजा **टिळक-केळकरांनीं** आपसांत उचलला आणि तेव्हांपासून '**केसरी**' पत्र एकाच्या मालकीचें व एका मताचें निदर्शक झालें. एक तिऱ्हाईत लेखक या नात्यानें स्वतःच्या सहीवर **आगरकरांना** लेख लिहितां आले असते; परंतु ज्या ठिकाणीं एकेकाळीं अनिरुद्ध संचार केला त्याच ठिकाणीं दुसऱ्याच्या सौजन्याचा फायदा घेऊन केवळ मोहबतीखातर राहणें **आगरकरांच्या** मानी स्वभावास कसें रुचणार! **केसरीशीं** संबंध तुटल्यानंतर थोड्याच अवधींत **गोखल्यांच्या** सहाय्यानें दसऱ्याच्या सुमुहूर्तावर **आगरकरांच्या** '**सुधारका**'चा अवतार झाला.

त्याकाळचीं बहुतेक वर्तमानपत्रें द्विभाषात्मक असत. **सुबोधपत्रिका, इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश** वगैरे पत्रांतून कांहीं मजकूर इंग्लिश व बाकीचा मराठी येत असे. '**केसरी**' पत्रहि द्विभाषात्मक निघालें

असतें; परंतु त्यांस एका स्वतंत्र इंग्लीश पत्राची जोड देण्यांत आल्या-मुळें तो प्रसंग 'केसरी' वर ओढवला नाहीं. सरकार व परप्रांतीय लोक यांच्या सोयींकडे लक्ष देऊन अशी व्यवस्था करण्यांत येत असावी असें वाटतें. सामाजिक प्रश्न प्रांतिक स्वरूपाचें असल्यामुळें त्याचें विवेचन मराठींतून करणें श्रेयस्कर होतें; आणि हें काम आग-रकरांच्याकडे होतें. गोखले राजकीय विषयांवर आणि तेंसुद्धां बहुधा इंग्लिशमध्यें लिहीत असत. 'Shame! Shame! My Lord! Shame!' हा त्यांचा लेख मुंबईचे त्यावेळचे गव्हर्नर लार्ड रे यांना इतका आवडल्याचें सांगतात कीं तेव्हांपासून ते 'सुधारक' पत्राचे वर्गणीदार बनले. क्वचितप्रसंगीं गोखले मराठी लेखहि लिहीत असत. त्यांनीं एकदां शिवाजीच्या चरित्रांतील एका भागांवर कल्पित गोष्ट लिहिली होती असें त्यांनीं स्वतःच सांगितलें. गोखले काय अथवा आगरकर काय दोघांपैकीं कोणीहि 'सुधारका'पासून प्राप्तीची आशा केली नव्हती. पत्र अंगावर पडूं नये एवढाच त्यांचा हेतू होता आणि पहिल्या वर्षी तो सफलहि झाला. कसाबसा पत्राचा खर्च-वेंच भागवितां येईल इतकी प्राप्ति पहिल्या वर्षी झाली आणि संपाद-कांना कागदाची रद्दी विकून मिळालेल्या पैशांवर आपलें समाधान करून घ्यावें लागलें. दुसऱ्या वर्षी शंभर रुपये प्रत्येकाच्या वांट्यास आले; आणि पुढील वर्षांत ही मिळकत दीढीदुप्पटीनें वाढूं लागली. परंतु गोखल्यांचा इतर संस्थांशीं संबंध आल्यामुळें त्यांचें कार्यक्षेत्र इतकें विस्तृत होऊं लागलें कीं, त्याला कोठेंतरी मर्यादा घालून आकुंचित करण्याची आवश्यकता भासूं लागली. प्रत्येक संस्थेशीं संबंध ठेवून त्या संस्थांच्या कामांत ढवळाढवळ करण्याची हौस सार्वजनिक कामांत लक्ष घालणाऱ्यांपैकीं कित्येकांना असते. आपली काम कर-ण्याची शक्ति व सार्वजनिक कार्याची जबाबदारी यांत योग्य प्रमाण

न ठेविल्यामुळें संस्थेची कार्यहानि तर होते, शिवाय असें प्रमाण न ठेवणारावर नालायकीचा दोषारोप येतो. या कारणास्तव **गोखल्यांनीं सुधारकांशीं** असलेला आपला संबंध तोडला असावा. **सुधारकांत** सर्वच विषय येत असले तरी **आगरकराच्या** अमदानींत सामाजिक विषयांनाच प्राधान्य मिळालेलें दिसून येतें. **केसरीशीं** संबंध ठेवून सामाजिक सुधारणाविषयीं समाजांत जागृति व सहानुभूति उत्पन्न करणें शक्य नाहीं असें आढळून आल्यामुळेंच **आगरकरांनीं ' सुधारक '** काढिला आणि ते मृत्युवश होईपर्यंत याच मूलभूततत्त्वानुसार **' सुधारकांत '** लेख येत असत. गोखल्यांचा कल प्रथमपासूनच सामाजिक विषयांपेक्षां राजकीय विषयांकडे अधिक होता. राजकीय विषयांचा अभ्यास करण्यास संधि सांपडून त्या अभ्यासाचा देशालाही उपयोग करितां येईल अशाच संस्थांतून काम करण्याचें त्यांनीं इतःपर पत्करिलें. या दृष्टीनें पाहतां **' सुधारक '** त्यांना विशेष उपयोगीं पडणें संभवनीय नव्हतें. कदाचित् या कारणामुळें सुद्धां **गोखल्यांनीं ' सुधारका ' च्या** संपादकीय वर्गांतून आपलें नांव काढून घेतलें असावें.

सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरुवात करितांना गोखल्यांना ज्या संस्थांमध्यें प्रामुख्यानें काम करावें लागलें त्यामध्यें **डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या** खालोखाल पुण्याच्या **सार्वजनिक सभेला** स्थान दिलें पाहिजे. परकीयांचें राज्य स्थापन झालें ही भावना हिंदी लोकांत प्रथमपासूनच जागृत असली तरी ब्रिटिश राज्यामुळें राष्ट्राचें हित अथवा अनहित कोणच्या दृष्टीनें होत आहे हें कळून येण्यास कांहीं वर्षें जावीं लागलीं. परकीय सरकार धर्मांत जोंपर्यंत हात घालीत नाहीं तोंपर्यंत राजकारणाबद्दल बहुजन समाज उदासीन होता; आणि सुशिक्षितांची पहिली पिढी यूरोपीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेमुळें भारून गेल्यानें

पाश्चात्य धर्म व संस्था यांच्याबद्दल सुशिक्षित लोकांत आदराधिक्यच दिसून येई. परंतु पाश्चात्य विद्या आणि तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासानें दृष्टि विशाल होऊन राष्ट्राच्या परिस्थितीचा सर्वांगीण विचार लौकरच होऊं लागला. राजकीयदृष्ट्या हिंदुस्तानचें एकीकरण ब्रिटिश अमदानीखालीं प्रथमच झालें. ब्रिटिश साम्राज्यापूर्वी हिंदुस्थानांत एकराष्ट्रीयत्वाची भावना म्हणजे एक अर्थशून्य कल्पना होती. हिंदुस्थानांत वसत असणाऱ्या वैचित्र्यांतून एकीची प्राणप्रतिष्ठा होण्यास राजकारण हें समान अधिष्ठान ब्रिटिशांच्या अंमलाखालीं मिळालें आणि एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत अंकुर फुटूं लागले. त्याचेंच दृश्य फल म्हणजे राजकारणांत भाग घेणाऱ्या प्रांतानिहाय संस्थांची स्थापना. सरकार राष्ट्रहितैक दृष्टीनें प्रेरित झालें आहे आणि राज्यव्यवस्थेंत जर कांहीं व्यंगें दिसत असलीं तर तीं केवळ लोकांना काय पाहिजे हें सरकारास न कळल्यामुळें असा विश्वास सुशिक्षित लोकांस त्यावेळीं वाटत होता. मुंबईची 'बॉम्बे असोशिएशन', कलकत्त्याची 'ब्रिटिश इंडिअन असोशिएशन', व पुण्याची 'सार्वजनिक सभा' या सर्व संस्था उपरिनिर्दिष्ट हेतूनेंच स्थापन झाल्या होत्या.

**सार्वजनिक सभा** पहिल्या दोन सभांच्या मानानें बरीच उशीरा स्थापन झाली असली तरी सरकारदरबारीं मान्यता, लोकप्रियता व देशहितोपकारी कर्तबगारी या प्रत्येक बाबतींत वरील दोन्ही संस्थांना तिनें लौकरच मागें टाकिलें. सभा १८७० सालीं स्थापना झाली. पुढील सालच्या नोव्हेंबरांत **न्या. मू. रानडे** यांची बदली पुण्यास झाली. तेव्हांपासून तों तेलंगांच्या मागून मुंबई हायकोर्टाच्या जज्जाच्या जागेवर नेमणूक होईपर्यंत सभेचें सर्व काम **रानड्यांच्या** देखरेखीखालींच चालत असे. सभेवर **रानड्यांचें** अतोनात प्रेम

होतें. त्या एका संस्थेस नांवारूपास आणून सरकार व लोक यांची सभेस मान्यता मिळविण्याकरितां त्यांनीं जितकी खटपट केली तितकी दुसऱ्या कोणत्याही संस्थेच्या वांट्यास आली नाहीं आणि **रानड्यांच्या** अमदानींत सभेनें जें महत्त्वाचें कार्य केलें तितकें तेव्ह्याच अवधींत दुसऱ्या कोणत्याही सभेनें केलें असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. या सर्व सभेच्या कामांत **रानड्यांना गोखल्यांचें** फार सहाय्य झालें. सभेच्यातर्फे सरकारांत वेळोवेळीं जे अर्ज पाठविण्यांत येत असत त्यांकरितां निरनिराळीं पुस्तकें व सरकारी रिपोर्ट पाहून माहिती गोळा करण्याचें त्रासदायक काम **गोखल्यांना** करावें लागे. हे सर्व अर्ज एकाच विषयावर असत असेंहि नाहीं. राज्यव्यवस्थेच्या निरनिराळ्या शाखाउपशाखांमधील अन्याय सरकारच्या नजरेस आणून कित्येक प्रसंगीं सरकारलाहि आपल्या कारभाराची दिशा बदलण्यास लावावयाचें हें कांहीं लहानसहान काम नव्हतें. परंतु हें काम करितांना **गोखल्यांनीं** प्रयत्नांची कसूर होऊं दिली नाहीं. म्हणूनच थोड्या अवधींत ते आपल्या गुरूच्या विश्वासास व लोकांच्या आदरास पात्र झाले. अर्ज आणि एतद्देशीय व परदेशस्थ प्रसिद्ध पुढाऱ्यांबरोबर लोकहिताच्या बाबींसंबंधानें पत्रव्यवहार करणें या कामाखेरीज १८९० सालापासून तों सभेचा व त्यांचा संबंध तुटेपर्यंत **गोखल्यांना** सभेच्या त्रैमासिकाच्या संपादकत्वाचेंहि काम बघावें लागे. त्रैमासिकाचे पूर्वीचे संपादक **सीताराम हरि चिपळूणकर** यांच्या मागून संपादकत्वाच्या जागीं **गोखल्यांची** सर्वानुमतें योजना झाली. त्रैमासिकाचें काम जबाबदारीचें व तें योग्यरीतीनें आपल्या हातून पार पडणार नाहीं तेव्हां माझ्यापेक्षां अधिक योग्य गृहस्थांना हें काम पाहण्यास सांगा, असें **गोखल्यांनीं** विनयपूर्वक सभेच्या चालकांना कळविलें. गोखल्यांची कर्तबगारी सभेस पूर्णपणें कळली होती आणि अखेरीस ही जबाबदारी **गोखल्यांच्याच** अंगावर

टाकण्यांत आली. **गोखल्यांनीं** चालकांना लिहिलेल्या पत्रांत विनयाचाच बराचसा भाग होता असें आतां म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. गोखल्यांच्या संपादकत्वाखालीं त्रैमासिकाचे एकंदर २७ अंक निघाले व ४९ लेख प्रसिद्ध झाले. प्रत्येक लेखावर लेखकाचें नांव घालण्याचा प्रघात त्यावेळीं नसल्यामुळें गोखल्यांनीं लिहिलेले लेख नक्की कोणते हें ओळखण्यास किंचित् प्रयास पडतात. **चार्लस् ब्रॅडला, लॉर्ड रे** साहेबांची कारकीर्द, **मोहडा** बिल वगैरे लेख तर निःसंशय त्यांचेच आहेत.

**सार्वजनिक सभेंत** प्रवेश झाल्यामुळें **गोखल्यांचा** अनेकरीतीनें फायदा झाला हें निर्विवाद आहे. सभेकडून सरकारकडे विविध विषयांवर अर्ज पाठविण्यांत येत असल्यामुळें हिंदुस्थानची राज्यव्यवस्था आणि आर्थिक परिस्थिति यांचा कसून अभ्यास **गोखल्यांना** करावा लागला. कॉलेजमध्यें त्यांना इतिहास व अर्थशास्त्र हे विषय शिकवावे लागत; त्यामुळें जगांतील प्राचीन व अर्वाचीन राज्यव्यवस्थांचा त्यांचा अभ्यास होताच. त्यांत हिंदुस्थानच्या विशिष्ट राज्यव्यवस्थेच्या व आर्थिक परिस्थितीच्या ज्ञानाची भर पडली. अशातऱ्हेनें राजकीय पुढाऱ्याला आवश्यक लागणाऱ्या माहितीची पूर्णता त्यांना करितां आली.

१८९६ च्या ऑगस्टमध्यें सार्वजनिक सभेशीं असलेला आपला संबंध **गोखल्यांना** तोडावा लागला आणि याला कारण सभेंतील अंतःस्थ भांडणें. हिंदुस्थानच्या राजकारणांत गेल्या तीस वर्षांत जे दोन पक्ष अस्तित्वांत आले आहेत त्यांस महाराष्ट्रांत तरी या भांडणापासून सुरवात झाली असें दिसून येईल. हिंदुस्थानसारख्या परतंत्र देशांतील राजकारणांत तरी मतभेदाच्या पिशाचिकेचा संचार होण्यास वाव मिळूं नये असें सहृदयांनीं वाटणें साहजिक आहे. परंतु या मत-

भेदाचीं पाळेंमुळें दोन्ही पक्षांच्या मनोभूमिकेंत फार खोलवर रुजलीं आहेत आणि राजकीय विषयांवरील मताभिन्नता हें त्यांचें केवळ बाह्य स्वरूप आहे असें या दोन पक्षांच्या विचारसरणीची विशेष बारकाईनें छाननी केली असतां दिसून येतें. सार्वजनिक आयुष्यांत प्रथम दोनच पक्ष होते. एक सुशिक्षितांचा व दुसरा प्राचीन परंपरेच्या अभिमान्यांचा. परंतु १८८५ सालच्या सुमारास महाराष्ट्रांत सामाजिक विषयांवर मतभेद होऊन सुशिक्षितांमध्यें दोन तट पडले. या दोन तटांनाच पुढें राजकीय पक्षांचें स्वरूप प्राप्त झालें. इतर प्रांतांत सामाजिक व धार्मिक मतभेद असतांना देखील राजकिय रणक्षेत्रावर खांद्यास खांदा लावून राष्ट्रकार्य करण्यास पुढारी लोक प्रवृत्त झाले, असा वस्तुस्थितीचा दिसणारा देखावा महाराष्ट्रांत केवळ इष्टध्येयरूप होऊन बसला. सामाजिक मतभेदामुळें स्वज्ञातिबांधवांच्या रोषास पात्र होणारे **लाला लजपतराय** किंवा विसपंचवीस हजार इस्टेटीच्या मालकी हक्कांवर केवळ सुधारकी मतामुळें पाणी सोडणारे **बिपिनबाबू** राष्ट्रीयपक्षाचे पुरस्कर्ते म्हणून महाराष्ट्रेतर प्रांतांतच प्रसिद्धीस आले. मद्रासेकडील राष्ट्रीयपक्षाचे आधारस्तंभ **जी. सुब्रह्मण्य अय्यर** पक्के सुधारक होते. परंतु महाराष्ट्रीय राष्ट्रीयपक्षाचें सामाजिक चळवळीसंबंधीं धोरण कधीं उघड विरोधाचें, तर कधीं उदासिनतेचें, आणि फारच झालें तर मुग्ध सहानुभूतीचें असे. त्यामुळें जहाल म्हटला म्हणजे सुधारणाविन्मुख व सुधारक म्हणजे नेमस्त अशीं समीकरणें महाराष्ट्रांत मांडण्यांत येऊं लागलीं. वास्तविक पहातां '**सार्वजनिक सभा**' अशी एक संस्था होती कीं, जेथें सामाजिक प्रश्नांवरील मतभेद विसरून जाऊन दोन्ही पक्षांतील लोकांना राजकारणांत सारखाच भाग घेतां यावा. सभेचें धोरणहि सर्वसंग्राहक असे. ज्याला ज्याला म्हणून सार्वजनिक कार्याची हौस असेल मग तो सरकारी नौकर असो अगर स्वतंत्र धंदेवाईक असो–देशाच्या दारुण दुर्दैवानें होरपळणारा

तरुण आत्मा असो, अगर एकेकाळीं सरकारी मान्यतेस पावलेला व संतति आणि संपत्ति या दोन्ही दृष्टीनें सुखी असणारा वयोवृद्ध पेन्शनर असो—अशा सर्व वर्गांच्या लोकांना सार्वजनिक कार्याकरितां जवळ करणें हा सभेच्या अनेक हेतूंपैकीं एक हेतु होता. परंतु १८९६ सालच्या प्रारंभीं सार्वजनिक सभेचा कबजा सर्वस्वी एका पक्षानें घेतला. तेव्हांपासून महाराष्ट्रांत तरी दोन राजकीय पक्ष अजीबात अलग झाले. वर्षारंभीं सभेच्या नवीन निवडणुकी होत असत. टिळकपक्षानें नवीन सभासद करून सार्वजनिक सभेंत बहुमताच्या जोरावर क्रांति घडवून आणिली. जुन्या अधिकारी वर्गास चाट मिळून नवीन अधिकारी नेमिले. गोखल्यांची चिटणीसाच्या व त्रैमासिकाच्या संपादकाच्या जागेवरील नेमणूक कायम करण्यांत आली होती. परंतु आपल्या बाजूचें सभेंत बहुमत नसल्यामुळें गोखल्यांनीं त्या जागांचा राजीनामा दिला.

सार्वजनिक सभेंत दोन्ही पक्ष राहिले असते तर राष्ट्रहिताची कितितरी कामें सभेनें केलीं असतीं. संघटना ही अजब शक्ति आहे. वाऱ्यावर वावडीप्रमाणें उडत जाणाऱ्या गवताच्या काड्यांचा मोळ बांधिला तर लोहमय शृंखलेचें सामर्थ्य त्याच्यांत येतें व तो मत्त मतंगजासहि बांधूं शकतो. परंतु देशाच्या दुर्दैवामुळें महाराष्ट्रांतील दोन्ही पक्षांना एकाच संस्थेंत सुखानें नांदतां आलें नाहीं. दोन तीन महिन्यानंतरच ता. ४ नोव्हेंबर १८९६ रोजीं गोखल्यांनीं नवीन सभा स्थापिली. ही नवीन सभा स्थापतांना गोखल्यांना अत्यंत वाईट वाटलें. डेक्कनसभेच्या जाहीर पत्रकांत ते लिहितातः—
"It need hardly be said by those whose best work was given so long to the *Sarvajanik Sabha*, that this step has been taken most reluctantly and after a severe mental struggle. The rupture of old ties in

the case of some, as dear and strong as any ties could be is always painful, but there are occasions when public duty requires even this great sacrifice." सभा स्थापिली खरी; पण गोखल्यांना सुद्धां विसकटलेली घडी पुनः नीट बसवितां आली नाहीं. डेक्कन सभेतर्फे पहिला अर्ज ता. १८ नोव्हेंबर रोजीं अवर्षण व दुष्काळसंबंधीं सरकारकडे पाठविण्यांत आला. परंतु पुढें सभेच्या कामांत शिथिलता उत्पन्न झाली; आणि सभा स्मृतिमात्र उरली. १३ फेब्रुवारी १९०९ रोजीं गोखल्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा पुनः स्थापन करण्यांत आली आणि तेव्हांपासून सभा आपल्या मगदूराप्रमाणें काम करीत आहे.

---

# ४ इतर संस्था.

( १ ) कॉंग्रेस, १८८९ ते १८९६. ( २ ) मुंबई विश्वविद्यालय. ( ३ ) प्रांतिक कौन्सिल, मुंबई. ( ४ ) पुणें शहर म्युनिसिपॅलिटी.

" What are great gifts but correlative of great work? We are not born for ourselves but for our kind, for our neighbours, for our country; it is but selfishness, indolence, a perverse fastidiousness, an unmanliness and no virtue or praise, to bury our talent in a napkin."

—Newman.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें काम करीत असतांनाच 'सुधारक' व ' सार्वजनिक सभा ' या संस्थांबरोबरच इतरहि संस्थांशीं गोखल्यांचा संबंध आला. हिंदुस्थानांत सार्वजनिक काम करणाऱ्या आस्थेवाईक माणसांची वाण असल्यामुळें श्रमविभागाचें तत्त्व आजमितीस मुळींच अस्तित्वांत नाहीं म्हटलें तरी चालेल. एकाच विषयाच्या पाठीमागें लागलेली कांहीं थोडीं माणसें सोडलीं

तर सार्वजनिक कामांत पडणाऱ्या एकाच व्यक्तीला प्रसंग पडेल तशीं विविध कामें करावीं लागतात. **गोखले** पुण्याचे रहिवासी म्हणून त्यांना शहरम्युनिसिपॅलिटीसारख्या स्थानिक संस्थांच्या कामाकडे पहावें लागलें. कालेजांतील एक प्रोफेसर म्हणून मुंबई-विश्वविद्यालयाशीं त्यांचा संबंध आला आणि राजकारणाची जात्याच हौस असल्यामुळें प्रांतिक कौन्सिल व कॉंग्रेस यांमध्यें त्यांनीं आपण होऊन भाग घेण्याचें ठरविलें. या विविध संस्थांतून त्यांनीं केलेल्या कामगिरीचें निरूपण प्रस्तुत प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

**कांग्रेसचा** जन्म ही हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत सुवर्णाक्षरानें लिहून ठेवण्यासारखी गोष्ट आहे. **रशिया** वगळला तर यूरोपखंडाएवढा आकार, प्रचंड व वैचित्र्यपूर्ण लोकसंख्या, भिन्न संस्कृतींच्या अनुयायांची वस्ती, नानाविध धर्म पाळणारे आणि पृथक् भाषा बोलणारे समाज हें ज्या हिंदुस्थानचें स्वरूप आहे त्यांतील अनिर्वाह्य भेद कायम ठेवूनहि ब्रिटिश अंमलाखालीं अभिन्नत्वाची भावना निर्माण करणें कसें शक्य आहे हें कांग्रेसनें सिद्ध करून दाखविलें आहे. समान दुःखें, समान राजकीय आकांक्षा व समान व राज्यव्यवस्थेखालीं निवास यामुळें हिंदुस्थानचें एकीकरण होणें शक्य झालें. हिंदुस्थानच्या एकीकरणाची ही कल्पना प्रथम केव्हां प्रादुर्भूत झाली हें नक्की सांगतां येणें कठीण आहे. परंतु या कल्पनेला १८८५ सालीं स्थापन झालेल्या कांग्रेसनें मूर्तस्वरूप दिलें! एवढें मात्र खरें! कांग्रेसचा जन्म झाला त्यावेळीं **गोखल्यांची** विद्यार्थिदशा नुकतीच संपली होती. राष्ट्रांतल्या घडामोडीकडे त्यांचें लक्ष वेधिलें जात होतें. पुढारी म्हणविणारे लोक राष्ट्रोद्धरणार्थ करीत असलेल्या प्रयत्नांची दिशा कांग्रेसच्या कामकाजावरून दिसून येत होती; आणि सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरवात करितांना इतर राष्ट्र-

वीरांनीं स्वीकारलेल्या दिशेनें लोकसेवेचा मार्ग चोखाळावयाचा अशी इच्छा **गोखल्यांच्या** अंतःकरणांत उदित होणें अगदीं शक्य होतें. या सुमारास **गोखल्यांचा** आणि **कांग्रेसचा** जो एकदां संबंध जडला तो अखेरपर्यंत कायम होता. १९०३ व १९१३–१४ या सालच्या अधिवेशनास ते हजर राहूं शकले नाहींत. १९०३ सालीं मद्रासला कांग्रेस झाली; परंतु त्यावेळीं **गोखल्यांना** वरिष्ठ कायदेकौन्सिलचे एक सभासद या नात्यानें एका सिलेक्ट कमेटीवर काम करावयाचें असल्यामुळें कांग्रेसला हजर राहतां आलें नाहीं. शेवटल्या दोन वर्षीं प्रकृतीचें अस्वास्थ हें गैरहजिरीचें कारण होतें. **गोखल्यांच्या** कांग्रेसमधील कामगिरीचे दोन भाग पडतात. एक १८८९ ते १८९६ व दुसरा १८९७ ते १९१४. या प्रकरणांत पहिल्या भागांतीलच हकीकत देणें युक्त होणार आहे.

१८८९ सालीं मुंबईला कांग्रेस भरली. हिंदुस्थानचे कैवारी मि. **चार्लस ब्रॅडला** हे हजर राहणार असल्यामुळें या अधिवेशनास विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें. याच कांग्रेसमध्यें **गोखल्यांचें** पहिलें भाषण झालें. प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांची सुधारणा व्हावी अशा अर्थाचा एक ठराव होता. त्यावरील एका भागावर **टिळकांनीं** एक उपसूचना सुचविली आणि **गोखल्यांनीं** तिला अनुमोदन दिलें. **टिळक आणि गोखले** यांचें यानंतरचे संबंध व हिंदी राजकारणांत त्यांनीं खेळलेले डाव लक्षांत घेतां **टिळकांनीं** पुढें मांडलेल्या उपसूचनेस **गोखल्यांनीं** अनुमोदन दिलें, यांत एकप्रकारचें औचित्य आहे असें कोणास वाटण्याचा संभव आहे. परंतु **टिळकांनीं** मांडलेली उपसूचना मूळ कांग्रेसपक्षाची म्हणजे **रानडे**-पक्षाची होती आणि मद्रासिलोकांचा तिला विरोध होता. तेव्हां या उपसूचनेस **गोखल्यांनीं** अनुमोदन दिलें ह्यांत कौतुकावह असें

कांहींच नाहीं. याच कांग्रेसमध्यें स्टेटसेक्रेटरींनीं प्रसिद्ध केलेल्या पत्रकांवर **गोखल्यांचें** भाषण झालें. समकालीन परीक्षांची मागणी नाकारण्यांत आली व वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यांपैकीं साऱ्या १०८ नोकऱ्या हिंदी लोकांकरितां ठेवल्या आहेत, तेव्हां कंपनीसरकारचा अंमल बरा होता असें म्हणण्याची पाळी आली आहे असें **गोखल्यांनीं** या भाषणांत सांगितलें.

१८९५ सालीं कांग्रेस पुण्यास भरण्याचें ठरलें. पुण्याचे पक्षभेद हिंदुस्थानांत गाजत होते. त्यामुळें कांग्रेस कशी काय पार पडते याची सर्वांना चिंता लागून राहिली होती. **गोखले** स्वतः स्थानिक चिटणीसांपैकीं एक होते. पुण्यांत दोन पक्ष झाल्यामुळें कांग्रेसच्या अधिवेशनाची तयारी करणें मोठ्या कष्टाचें काम होऊन बसलें. परंतु प्रतिकूल परिस्थिति असतांनासुद्धां कार्यसिद्धि करणें यांतच थोर माणसांचा थोरपणा दिसून येतो. दोन पक्षांतील भांडणें इतकीं विकोपास गेलीं कीं दोन्हीं पक्षांच्या चिटणीसांना एकत्र काम करणें अशक्य होऊन **टिळकांनीं** अखेर राजीनामा दिला. शहरांत दुही उत्पन्न झाल्यामुळें कांग्रेसकरितां फंड गोळा करणें जड झालें. ज्या राष्ट्रीय सभेच्या मंडपांत लोकांना अप्रिय असणारी सामाजिक परिषद भरविली जाणार त्या सभेकरितां लोकांनीं पैसे कां म्हणून द्यावे असा युक्तिवाद विरुद्धपक्षाच्या मंडळींनीं सुरू केला. अखेरीस हा वाद कांग्रेसच्या नियोजित अध्यक्षापर्यंत जाऊन धडकला आणि पुण्यांतील वाद थांबत असतील तरच मी कांग्रेसचें अध्यक्षत्व स्वीकारीन असा निर्वाणीचा बाण **सुरेंद्रबाबूंनीं** सोडल्यावर हा वाद एकदांचा थांबला. वादाचें स्वरूप व शहरांतील सामान्य जनतेचें **टिळकपक्षाला** असलेलें पाठबळ लक्षांत घेतां **गोखल्यांना** कांग्रेसकरितां किती दगदग सहन करावी

लागली असेल याची कल्पना होते. अखेरीस राष्ट्रीयसभेचें अधिवेशन पुण्याच्या लौकिकास साजेसें व निर्विघ्नपणें पार पडलें. गोखल्यांच्या श्रमाचें सार्थक झालें. 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते'.

यासालीं मिठावरील कराबद्दलच्या ठरावांवर गोखल्यांनीं फारच हृदयस्पर्शी व आवेशपूर्ण भाषण केलें. याच विषयावर १८९० सालच्या कांग्रेसमध्यें ते बोलले होते. मीठ हें दररोजच्या आवश्यक अशा वस्तूंपैकीं एक असल्यामुळें त्यावरील कर शक्य तितका कमी असणें जरूर आहे. या भाषणांत हिंदी रयतेचें त्यांनीं काढलेलें कारुण्यपूर्ण शब्दचित्र पाहिलें म्हणजे गोखले स्वतः भावनावश होऊन कसें बोलत असत याची कल्पना येते. भाषणांतील एक वाक्य असें होतें:—

" He compared the prosperous merchant with the striving, shrunken, shrivelled up Indian ryot, toil ng and moiling from dawn to dark to earn his scanty meal, patient, resigned, forbearing beyond measure, entirely voiceless in the Parliament of his rulers, and meekly prepared to bear whatever burdens God and man might be pleased to impose upon his back. "

१८९७ सालीं माफी प्रकरणामुळें गोखल्यांच्या विषयीं जनतेचें मत जरा कलुषित झालें होतें. उमरावतीस लोकांनीं गोखल्यांना बोलून दिलें नाहीं, असें म्हणतात. जातां जातां गोखल्यांनीं श्रोत्यांना असें बजाविलें कीं एक दिवस असा येईल कीं, माझें भाषण ऐकण्यास तुम्ही आतुर झालेले असाल. गोखल्यांचे हे उद्गार Indian Social Reformer मध्यें प्रसिद्ध झाले होते. १८९७ सालापासून १९०४ पर्यंत गोखल्यांनीं

प्रत्यक्ष कॉंग्रेसमध्यें भाषण केलें नाहीं. तथापि ते कॉंग्रेसच्या अधिवेशनांस हजर रहात असत आणि विषयनियामक कमिटीमध्यें भाग घेत असत.

कॉंग्रेसच्या स्थापनेला दोन चार वर्षें झालीं नाहींत तोंच इलाखानिहाय प्रांतिक सभा भरविण्याचा बूट निघाला. एखाद्या तत्त्वाचें अनुकरण होऊं लागलें म्हणजे तें त्याच्या लोकप्रियतेचें व मोठेपणाचें चिन्ह समजण्यास हरकत नाहीं. पहिली **मुंबई इलाखा परिषद १८८८** सालीं भरली आणि या पहिल्याच परिषदेंत **गोखल्यांचें** भाषणहि झालें. परिषद मुंबई इलाख्याच्या नांवावर जरी भरत असली तरी वस्तुतः पाहातां पुणेकरांचीच ती सभा होती. १८९२ पर्यंत परिषदेचीं अधिवेशनें **पुण्यासच** झालीं आणि या अधिवेशनास सिंध, गुजराथ व कर्नाटक या दूरच्या प्रांतांतून फारसे प्रतिनिधि आले नाहींत; इतकेंच नव्हे तर मुंबईच्याहि पुढाऱ्यांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. प्रांतिक परिषदेच्या प्रारंभींच्या कालांत **टिळकांबरोबर गोखलेहि** चिटणिसाचें काम पहात होते. कार्यबाहुल्यामुळें **गोखल्यांनीं १८९१** सालीं आपल्या जागेचा राजिनामा दिला.

× × ×

**मुंबई-विश्वविद्यालयांतील** नियामक मंडळांत **गोखल्यांचा** प्रवेश सन १८९५ सालीं झाला. ते अखेरपर्यंत **सेनेटचे** सभासद होते. सुमारें वीस वर्षांच्या या कालांत युनिव्हर्सिटीकरितां त्यांना प्रत्यक्ष असें काम फारच थोडें करितां आलें. विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांतून इतिहासविषयाचें उच्चाटन करण्याचा घाट सरकारनें मध्यंतरीं घातला होता. हिंदुस्थानांत जी अराजकता दृष्टीस पडते त्याचें कारण पाश्चात्त्यांच्या इतिहासाचें अध्ययन अशी सरकारनें

आपली समजूत करून घेतली होती. शिक्षणक्रमांतून इतिहास विषय वगळला तर हिंदी सुशिक्षितांमध्यें दिसून येणाऱ्या असंतुष्टतेस कांहीं तरी आळा बसेल अशी सरकारला आशा वाटत होती. हिंदुस्थानांतील असंतुष्टतेला दडपून टाकण्याकरितां सरकार जो उपाय योजीत होते त्याच्या युक्तायुक्ततेबद्दल मतभेद होता आणि गोखल्यांनीं लोकपक्षाची बाजू घेऊन सरकारचा हा प्रयत्न हाणून पाडला. इतिहासाच्या अध्ययनाचें महत्त्व गोखले आपल्या स्वतःच्याच उदाहरणावरून पूर्णपणें जाणत होते. हिंदुस्थानांतील भावी तरुण-पिढी इतिहासाच्या अध्ययनापासून मिळणाऱ्या फायद्यास मुकावी हें त्यांना केव्हांहि मान्य होणें शक्य नव्हतें. गोखल्यांच्या विरोधा-मुळें सरकारला आपला हेका सोडावा लागला.

विश्वविद्यालयांत राहून विश्वविद्यालयाकरितां गोखले यांना विशेष कांहीं करतां आलें नाहीं. परंतु त्यांनीं वरिष्ठ कायदेकौंसिलांत विश्वविद्यालयांची स्वतंत्रता राखण्याकरितां अटोकाट प्रयत्न केले. कर्झनशाहीमध्यें हिंदी युनिव्हर्सिट्यांची सुधारणा करणारा कायदा पास झाला. उच्च तऱ्हेचें पाश्चात्य शिक्षण देशांत प्रसृत होणें सरकार व लोक या दोघांच्याहि दृष्टीनें इष्ट होतें. हिंदी युनिव्हर्सिट्यांची सुधारणा होत असल्यास त्यांमध्यें तत्त्वतः प्रतिकारणीय असें कांहींच नव्हतें; परंतु विश्वविद्यालयांतून उच्च प्रतीचें शिक्षण देणें अथवा शिक्षण घेण्यास अनुकूल संधि उत्पन्न करणें हा हेतु सुधारणांच्या मूळाशीं नसल्यामुळें युनिव्हर्सिट्यांची सुधारणा करणाऱ्या कायद्याला लोकप्रतिनिधींना विरोध करावा लागला. कौन्सि-लपुढें बिल मांडतांना ऑ. मि. रॅले यांनीं पाश्चात्त्य शिक्षणापासून हिंदुस्थानचा फायदा किंवा तोटा झाला आहे काय असा प्रश्न उप-स्थित करून त्याला द्यर्थी उत्तर दिलें. असंतोषी पदवीधर व नापास

झालेल्या विद्यार्थ्यांचें लटांबर हे तोटे त्यांना दिसत होते आणि या अनिष्टापासून देशाची मुक्तता करण्याच्या हेतूनें सरकारनें हें बिल पुढें आणिलें होतें. गोखल्यांनीं बिलाच्या या मूलतत्त्वावरच घाला घालून असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला कीं असंतोषी पदवीधर आणि अयशस्वी उमेदवार पाश्चात्त्य शिक्षणामुळें निर्माण झाले नसून मागणी व पुरवठा यांमध्यें योग्य प्रमाण राहिलें नाहीं त्याचा तो परिणाम आहे. नवीन कायद्याप्रमाणें विश्वविद्यालयांची पुनर्घटना झाली तरी ही संख्या कमी होईल असें नाहीं. शिक्षणाच्या प्रसारामुळें देशांत सुशिक्षित लोकांचा एक मोठा वर्ग तयार झाला आहे. आपल्या निसर्गसिद्ध हक्काची जाणीव आणि ते संपादन करण्याची तीव्र आकांक्षा त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाली आहे, परंतु दुसऱ्या बाजूला सर्वशक्तिमान् सरकार त्या हक्कांचा मक्ता सोडण्यास नाखूष आहे. हेंच देशांतील असंतोषाचें मूळ कारण आहे. गोखल्यांनीं आपल्या भाषणांत रॅलेसाहेबांचे सर्व मुद्दे सप्रमाण खोडून काढिले; परंतु अखेर व्हावयाचें तेंच झालें !

बिल पास झाल्यानंतर त्या अनुरोधानें विश्वविद्यालयांची घटना होऊन काम सुरळीत चालावें, एतदर्थ गोखल्यांनीं आपला सर्व मतभेद विसरून जाऊन प्रयत्न केले. परंतु पुढील सालीं विश्वविद्यालयांच्या बाबतींतच सरकारला विरोध करण्याचें त्यांच्या नशिबीं आलें. १९०५ सालीं The Universities Validation Act कौन्सिलपुढें आला. युनिव्हर्सिट्यांच्या चॅन्सेलर्सनीं बेकायदेशीर रीतीनें काढलेल्या नोटिसांचें समर्थन करणें हा या बिलाचा उद्देश होता. गोखल्यांनीं या बिलाला एकाच मुद्द्यावर विरोध केला. कायदे करणारें मंडळ व कायदे जनतेकडून अंमलांत आणणारें कार्यकारी सरकार यांचे परस्पर संबंध कसें असावयास

पाहिजेत याबद्दल सहसा वाद होण्याचें कारण नाहीं. परंतु अनैसर्गिक अशा कितीतरी गोष्टी हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत प्रत्यहीं घडून येतात. वस्तुतः पाहतां कायदे बनविणारें मंडळ कार्यकारी नोकरशाहीपेक्षां श्रेष्ठ. इंग्लंडमध्यें सर्व सत्ता पार्लमेंटच्या हातांत असते आणि कार्यकारी सरकार म्हणजे पार्लमेंटनें पसार केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करणारी एक सत्ता आहे. नोकरशाहीच्या एखाद्या अन्यायाच्या वर्तनाला कायदेशीर स्वरूप देण्याकरितां मागाहून कायदे करणें म्हणजे कायदेकौन्सिलचें महत्त्व कमी करण्यासारखें आहे. वाटेल तसें बेकायदेशीर वर्तन प्रथम करावयाचें आणि नंतर त्या वर्तनास कायद्याची मदत मागावयाची! मनसोक्त पापाचरण करावयाचें व केलेल्या आचरणावर पांघरूण घालण्याकरितां शास्त्राची मदत घेऊन तें पाप होतच नाहीं असें सिद्ध करण्यापैकींच हा प्रकार होता. सोयीप्रमाणें शास्त्रें फिरवितां येतात तर शास्त्रें तरी पाहिजेत कशाला? अशा तऱ्हेचा युक्तिवाद **गोखल्यांनीं** पुष्कळ केला.

+ + +

मुंबई प्रांतिक कौन्सिलमध्यें मध्यभागातर्फे १८९९ मध्यें **गोखले** निवडून आले. परंतु मुंबई प्रांतिक कौन्सिलमध्यें त्यांनीं सारें दोनच वर्षें काम केलें. तेवढ्या मुदतींत प्रांतिक कौन्सिलपुढें दोन महत्त्वाचीं बिलें विचाराकरितां आलीं होतीं. दोन्ही बिलांच्या वादविवादाच्या वेळीं **गोखल्यांनीं** केलेलीं भाषणें महत्त्वाचीं होतीं. म्युनिसिपॅलिट्यांची सुधारणा करणारें बिल प्रथम ज्या स्वरूपांत सादर केलें होतें त्यावरून १८८४ सालीं रिपनसाहेबांनीं दिलेलें स्थानिक स्वराज्याचे हक्क हिरावून घेण्याचा सरकारचा मानस आहे कीं काय असें लोकांना वाटूं लागलें. सिलेक्ट कमिटीमध्यें मूळच्या बिलामध्यें बरेच महत्त्वाचे फेरबदल झाल्यामुळें बिलाला लोकप्रतिनिधींचा पाठिंबा मिळाला.

बिलामध्यें फेरफार सुचविण्याकरितां नेमलेल्या सिलेक्ट कमिटीमध्यें गोखले होते आणि त्यांनीं सुचविलेल्या सर्वच सूचना मान्य झाल्या नाहींत तरी **'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः'** या न्यायानें जेवढें मिळालें तेवढें पदरांत पाडून घेतलें. बिलावर भाषण करितांना **गोखल्यांनीं** बिलाच्या दोषार्ह भागांवर टीका करून तडजोड म्हणूनच हें बिल या स्वरूपांत आम्ही मान्य करीत आहों, आम्हांला तें सर्वस्वीं पसंत नाहीं असें **गोखल्यांनीं** सरकारला बजाविलें. **लँड रेव्हेन्यू बिलावरील** वादविवाद याहीपेक्षां महत्त्वाचा झाला. सदरहू बिल रयतेच्या केवळ हिताकरितां म्हणून सरकारनें कौन्सिलपुढें आणिलें होतें. **शुद्ध हेतूनें प्रेरित होऊन केलेल्या कर्माचा विपाक नेहमीं हितप्रदच होतो असें नाहीं.** शिवाय आपली उपाययोजना बरोबरच ठरेल याचाहि नियम सांगतां येत नाहीं. बिलाचें रूपांतर कायद्यामध्यें झालें तर तें शेतकरीवर्गाला सावकाराच्या मगरमिठींतून अंशतः तरी मुक्त करील असें सरकारास वाटत होतें. उलटपक्षीं लोकप्रतिनिधींची अशी पक्की खात्री होती कीं, सदरहू बिलानें शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा दूर होणें तर राहोच पण त्यामुळें त्यांची स्थिति अधिक शोचनीय मात्र होईल. प्रस्तुतच्या बिलानें शेतकरी वर्गाची स्थिति एक रेसभर तरी सुधारत आहे अशी माझी जर कोणीं खात्री करून दिली तर मी आपला सर्व विरोध बाजूला सारून व मत बदलल्याबद्दल होणाऱ्या टीकांचा मारा सहन करून बिलाला अनुमोदन देण्यास तयार होईन असें **गोखल्यांनीं** सांगितलें. महाराष्ट्रांत व इतर ठिकाणीं सभा भरवून बिलाबद्दल विरुद्ध लोकमत व्यक्त करण्यांत आलें. जनता व लोकप्रतिनिधी यांचा विरोध न जुमानतां सरकार बिल पास करून घेणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां सर **फिरोजशहा मेथा** सारख्या स्वाभिमानी पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं बिल पास होण्याचे वेळीं सर्व

लोकप्रतिनिधींनीं कौन्सिलांतून उठून जाण्याचें ठरविलें. **सर फिरोज-शहांनीं** केलेला हा संकल्प कितपत योग्य व न्याय्य होईल अशी शंका **गोखल्यांनीं** प्रदर्शित केली. परंतु फुटून वागून बरोबर राहण्यापेक्षां तुमच्याबरोबर चुकण्यांत सुद्धां मला विशेष आनंद आहे, असें लिहून आपल्या मतानुसार वागण्यास मी तयार आहें असें आश्वासन **गोख-ल्यांनीं मेथांना** दिलें होतें. बिलावरील मतें मोजण्याच्या वेळीं पूर्वी केलेल्या संकल्पाप्रमाणें **मेथा** व त्यांच्यामागून **गोखले, खरे, सर भालचंद्र** आणि **गोकुळदास पटेल** वगैरे लोकप्रतिनिधि कौन्सिल सोडून चालते झाले. लोकांच्या प्रतिनिधींच्या मताला यत्किंचित्हि मान सरकारला द्यावयाचा नसेल तर कौन्सिलचा फार्स तरी पाहिजे कशाला ? **लोकप्रतिनिधींनीं नेहमीं सरकारच्या मतास मान तुकाविली पाहिजे असाच जर आग्रह असेल तर लोकप्रतिनिधीं-ऐवजीं निर्जीव दगडी पुतळेच सरकारला या कामीं अधिक उपयोगीं पडतील व पडले असते असा युक्तिवाद सर फिरोज-शहांनीं केला.** सभासदांच्या या वर्तणुकीचा देशांत लौकरच गव-गवा झाला. लोकांचे प्रतिनिधी म्हणजे सरकारच्या हातांतलें केवळ बाहुलें नसून त्यांनाहि स्वतःचें डोकें व स्वतंत्र विचार करण्याची शक्ति असते असें आपल्या स्वाभिमानयुक्त वर्तनानें सिद्ध करून दाखविल्याबद्दल देशी वर्तमानपत्रकारांनीं कौन्सिलच्या सभासदांची पाठ थोपटली; परंतु त्याचबरोबर सभासदांचें हें वर्तन अयोग्य आहे एवढेंच नव्हें पण बेकायदेशीरहि आहे आणि सर-कारनें त्यांजवर या बेकायदेशीर वर्तनाबद्दल खटले कां भरूं नयेत हेंच आम्हांस समजत नाहीं इतकें म्हणण्यापर्यंत प्रतिकूल टीकेची मजल गेली होती.

× × ×

पुणें शहर म्युनिसिपॅलिटीच्या निवडणुकीस गोखले कधींहि उभे राहिले नाहींत असें समजतें; परंतु वेल्बी-कमिशनपुढील साक्षीनंतर ते परत आल्यावर म्युनिसिपॅलिटीमध्यें गोखले हे सरकार-नियोजित सभासद झाले. सरदार दोराबजी पदमजी यांच्या-मागून १९०२ सालीं ते म्युनिसिपॅलिटीचे अध्यक्ष झाले; आणि १९०५ सालापर्यंत ते या पदावर होते. १९०५ सालीं त्यांना इंग्लंडमध्यें जावें लागल्यामुळें त्यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अंगावर घेतलेलें प्रत्येक काम आस्थेनें करावयाचें हा गोख-ल्यांचा बाणा; त्याप्रमाणें त्यांचें येथीलहि काम झालें. म्युनिसिपॅ-लिटीमध्यें प्रवेश झाल्यामुळें तेथील कामाची प्रत्यक्ष माहिती गोख-ल्यांना झाली आणि वरिष्ठ कायदेकौन्सिलमध्यें गेल्यावर त्यांना तिचा फार उपयोग झाला.

स्थानिक काम उत्तम रीतीनें करणें हा म्युनिसिपॅलिट्या आणि लोकलबोर्डें अशा संस्थांचा हेतु असतो हें खरें! परंतु हें करितांना सार्वजनिक काम संघशक्तीनें करण्याचें शिक्षण लोकांना मिळावें हाहि एक हेतु डोळ्यापुढें ठेविला पाहिजे हें जॉन स्टुअर्ट मिलचें मत गोखल्यांना मान्य होतें. सरकारी अधिकारी म्युनिसिपॅलि-ट्यांच्या कामांसंबंधीं कधीं औदासिन्य दाखवितात तर कधीं नको तेथें आपला हात शिरकावण्याचा प्रयत्न करितात. हिंदुस्थानांत लोकमताप्रमाणें चालणाऱ्या राजकीय संस्था अद्याप बाल्यावस्थेंत असल्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांची करडी नजर सहन करण्याची ताकद त्यांच्यामध्यें अद्याप आली नाहीं. हिंदुस्थानच्या प्राचीन भूमींत स्थानिकस्वराज्याचें बीज नुकतेंच कोठें पेरलेलें आहे; त्यांना अंकुर फुटतात न फुटतत तोंच सरकार विरोधी वर्तन करील तर ते कोमेजून जाण्याची भीती आहे. लोकांच्या उत्साहास सरकारच्या सहानुभूतीची जोड मिळाली तर स्वराज्याचा वृक्ष वाढीस लाग-

ण्याची कांहीं तरी आशा. तेव्हां म्युनिसिपॅलिट्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होईल एवढ्या पुरता सरकारचा ताबा असावा, असें गोखल्यांचें मत होतें. गोखल्यांची दुसरी तक्रार अशी होती कीं म्युनिसिपल अक्टान्वयें लोकहिताचीं जीं कामें म्युनिसिपॅलिट्यांनीं करावीं अशी सरकारची अपेक्षा असते तीं कामें करण्यापुरता पैसा म्युनिसिपालिट्यांजवळ सरकारनें ठेविलेला नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांचेंहि मत गोखल्यांच्याच प्रमाणें होतें. Decentralisation Commission पुढें साक्ष देतांना सर हर्बर्ट रिस्ले म्हणाले " It must be admitted that the resources of district boards and municipalities are not sufficient to enable them to work up to modern standards of administration. In municipalities this is most conspicuously the case. " जरूरीपेक्षां जास्त कर घेतल्यामुळें हिंदुस्थानच्या तिजोरींत कांहीं वर्षे जी शिल्लक पडत असे तिचा विनियोग म्युनिसिपॅलिट्या व लोकलबोर्डें यांना मदतीदाखल वांटण्याकडे व्हावा असें गोखले प्रतिपादन करीत असत.

---

## ५. वेल्बी कमिशन व माफीप्रकरण.

" Only remember that in my creed waste of public money is like the sin against the Holy Ghost. "

—Lord Morley to Lord Minto.

१८५७ सालच्या बंडानंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या हातून हिंदुस्थानचा कारभार काढून घेतला व तेव्हांपासून हिंदुस्थान हें एक साम्राज्यांतील घटकावयव समजण्यांत येत असून विलायत सरकारच्या साक्षात् नियंत्रणाखालीं सध्यां त्याचा कारभार चालत

असतो. पूर्वी हिंदुस्थानच्या तिजोरीवर कंपनीचा पूर्ण ताबा असल्यामुळें ज्या ज्या वेळीं ब्रिटिश मुत्सद्दी हिंदुस्थानवर जादा खर्च लादण्याचा प्रयत्न करीत त्या त्या वेळीं कंपनी त्याचा इनकार करीत असे. १८५७ सालानंतर ही स्थिति पालटली. तत्त्वतः जरी पार्लमेंटचा ताबा हिंदुस्थानसरकारच्या बजेटावर असला तरी त्या अधिकाराचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारांत क्वचित्‌च होतो. स्टेटसेक्रेटरीनें हिंदुस्थानावर जादा खर्च लादला तर हिंदुस्थानसरकारकडून विरोध होईल तेवढाच काय तो! अशा परिस्थितींत हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवस्थेची चौकशी करण्याची जरूरी ब्रिटिश सरकारास वारंवार भासली आहे. कंपनीकडून ब्रिटिशपार्लमेंटनें हिंदुस्थानचा कारभार आपल्याकडे घेतल्यापासून अशा चौकशी कमिट्या थोड्याफार अंतरानें वेळोवेळीं नेमण्यांत आल्या आहेत. पहिली कमिटी १८७० च्या सुमारास नेमिली. दुसरी लॉर्ड डफरिनच्या कारकीर्दींत नेमिली होती. पण या दोन्हींपेक्षां महत्त्वाची व खुद्द पार्लमेंटनें नेमलेली अशी कमेटी म्हटली म्हणजे १८९७ सालचें वेल्बी कमिशन होय.

वेल्बी कमिशन नेमलें गेलें त्यावेळीं हिंदुस्थानसरकारची आर्थिक परिस्थिति अत्यंत शोचनीय होती. १८७७ सालीं मद्रास इलाख्यांत भयंकर दुष्काळ पडला. दुष्काळग्रस्तांना मदत करण्यास सरकारच्या तिजोरींत पैसे नव्हते आणि करवाढीशिवाय सरकारला दुसरा उपाय सुचेना. हिंदुस्थानसरकारचें लष्करी धोरण खर्चाचें होतें. अफगाण सरहद्दीवर रशियाच्या स्वारीच्या भीतिनें युद्धाची कडेकोट तयारी ठेवण्याकरितां सरकारला लष्करी खर्च वाढवावा लागला. याच सुमारास ब्रह्मदेशाचा ब्रिटिश साम्राज्यांत समावेश केला गेला. नवीन जिंकलेल्या प्रांताची राज्यव्यवस्था राखणें व तदनुषंगिक सुधारणा करणें यांना प्रथम बराच खर्च करावा लागला.

१८७६–७७ पासून अफूचें उत्पन्न हळूंहळूं कमी होत चाललें होतें. परंतु या सर्वांपेक्षां १८८३ पासून १८९६ पर्यंत रुपयाचा जो कल्पनातीत भाव उतरला त्यामुळें तर हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिति फारच खालावली. हिंदुस्थानसरकाराला इंग्लंडमध्यें पाठवाव्या लागणाऱ्या पैशांमध्यें ह्या बारा वर्षांत साडेनऊ कोटींची वाढ झाली. सर्व बाजूंनीं तिजोरींत येणारी ही तूट भरून काढण्यास करवाढीखेरीज दुसरा उपाय दिसत नव्हता आणि सरकारनें त्या उपायाचा अवलंब केला. १८८६ सालीं प्रथम मिळकतविर कर लादण्यांत आला आणि पुढील एकदोन वर्षांत मिठावरील कर विरुद्ध लोकमताची पर्वा न करतां दीढीदुप्पटीनें वाढविण्यांत आला. आयात मालावर शेंकडा पांचटक्के जकात हिंदुस्थानसरकारनें ठेविली होती. परंतु त्यावेळीं संरक्षक जकातीचें तत्त्वच मान्य नसल्यामुळें १८७८ सालीं ही जकात उठविण्यांत आली. रमेशचंद्र दत्त म्हणतात, "The duty was actually repealed when Southern India had not yet recovered from the Madras famine of 1878, when new cases on land had recently been added to the land revenue, when the Famine Insurance Fund created by special taxes had disappeared, when the estimated budget showed a deficit and when troubles and a vast expenditure in Afganistan, brought about in quest of a scientific frontier, were impending." अशा रीतीनें या बारा वर्षांच्या अवधींत सरकारचा खर्च वाढत होता व त्यामुळें कराची बेसुमार वाढ झाल्यानें हिंदी लोक जादा कर सहन करण्यास असमर्थ झाले होते. ह्या अडचणींतून मार्ग काढावा कसा हें सुचविण्याकरितां १८९५ सालीं पार्लमेंटनें लॉर्ड वेल्बी यांचे अध्यक्षतेखालीं एक रॉयल कमिशन नेमिलें.

अध्यक्षाखेरीज या कमिशनवर जी. एन्. कर्झन, टी. आर. बुचनन, सर वुइलिअम वेडरबर्न, दादाभाई नौरोजी, डब्ल्यु. एस्. केन वगैरे सभासद होते. हिंदुस्तानतर्फे मुंबई, कलकत्ता व मद्रास मधून प्रत्येकीं एकेक असे तीन साक्षीदार बोलाविण्यांत आलें. गोखले स्वतः डेक्कनसभेचे प्रतिनिधि म्हणून गेले होते.

वेल्बी कमिशनपुढें जे साक्षीदार साक्षी देण्याकरितां बोलाविले होते त्यांना प्रथम आपली लेखी साक्ष कमिशनपुढें सादर करावी लागे आणि लेखी साक्षीच्या अनुरोधानें साक्षीदाराची उलट तपासणी घेण्यांत येई. कमिशनच्या सूचनेप्रमाणें न्या. मू. रानडे व रा. ब. जोशी यांच्या मदतीनें गोखल्यांनीं आपला लेखी पुरावा सिद्ध केला. परंतु कमिशनवर सर्व लोक हिंदुस्थानच्या किंवा इंग्लंडच्या राजकारणांत मुरलेले, अर्थशास्त्राच्या अध्ययनाबद्दल नांवाजलेले व साम्राज्याच्या आंतरव्यवस्थेंत प्रत्यक्ष अनुभव घेतलेले असल्यामुळें त्यांच्या आडव्यातिडव्या प्रश्नांच्या माऱ्या-पुढें गोखल्यांचा टिकाव कसा लागतो याचीच चिंता सर्वांना लागून राहिली होती. अवघें तीस वर्षांचें वय, प्रत्यक्ष कामाचा फारसा अनुभव नाहीं; अशा स्थितींतहि गोखल्यांची साक्ष इतर कसलेल्या साक्षीदारांच्या तोडीची झाली हें त्यांस खरोखर भूषणा-वह आहे. १२ व १३ एप्रिल १८९७ रोजीं गोखल्यांची उलट-तपासणी घेण्यांत आली. कमिशनच्या सूचनेप्रमाणें गोखल्यांनीं आपल्या पुराव्याचे हिंदुस्थानच्या तिजोरीवरील नियंत्रण खर्चाची वाढ व इंग्लंड आणि हिंदुस्थान यामधील खर्चाची वांटणी असें तीन भाग केले होते. प्रथमारंभींच त्यांनीं कमिशनच्या असें नजरेस आणिलें कीं ब्रिटिश साम्राज्याच्या इतर भागांत कर देणाऱ्या लोकांच्या संमतीनें देशाच्या उत्पन्नाचा व्यय करण्यांत येतो, परंतु हिंदुस्थानांत

कर देणाऱ्या लोकांचा तिजोरीवर हक्क नाहीं, आणि देशाच्या उत्पन्नाची वांटणी करितांना हिंदुस्थानसरकारास केवळ हिंदी प्रजेचेच हितसंबंध सांभाळतां येत नाहींत. कित्येक रकमा अशा रीतीनें खर्ची पडतात कीं त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष फायदा कर देणाऱ्या लोकांस बिलकुल मिळत नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांत परतंत्र हिंदुस्थानास समान हक्क नाहींत याची जाणीव हरघडीं होत आहे. शांततेच्या कालांत प्रत्यक्ष लढाई सुरुं असल्याप्रमाणें युरोपियन लष्कर ठेवणें, मुलकी व लष्करी खात्यांतील वरिष्ठ नोकऱ्यावर हिंदी लोकांचा हक्क नसणें, पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्याच्या विस्ताराचा खर्च हिंदुस्थानच्या तिजोरीवर लादणें वगैरे गोष्टी गोखल्यांनीं वरील विधानाच्या पुष्ट्यर्थ कमिशनच्या पुढें मांडिल्या. हिंदुस्थानच्या तिजोरींतून होणाऱ्या या सढळ खर्चास विरोध करावयाचा म्हटला तर तेंहि शक्य नाहीं. कारण प्रांतिक सरकार, मध्यवर्ती सरकार व भारतमंत्री या तिघांकडून हा खर्च केला जातो आणि प्रजेच्या पुढाऱ्यांना त्यांना खराखुरा विरोध करतां येण्यास वावच ठेवला नाहीं. गोखले आपल्या साक्षींत लिहितात. " The position virtually amounts to this that it is the administration of the finance of one conntry by the executive Government of another under no sense of responsibitily to those whose finances are so administered " ही अनिष्ट स्थिति पालटावी म्हणून गोखल्यांनीं कांहीं सूचना केल्या होत्या. तीस वर्षांपूर्वीं राजकीय आकांक्षांचें क्षेत्र संकुचित होतें. त्यामुळें त्यांच्या सूचना सध्यां अगदींच नेमस्त आहेत असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. कांहीं सूचना अमलांतहि आल्या आहेत. त्यांची शेवटली सूचना अशी होती कीं हिंदुस्थानांत जे व्हाइसराय म्हणून येतात ते अर्थशास्त्रांत पारंगत असून राष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीचें उत्तम ज्ञान असलेले असावेत.

इंग्लंडच्या मुख्य प्रधानकीचें पद विभूषित करणारे **वॉलपोल, पिट्, डिस्राएली व ग्लॅडस्टन** वगैरे मंडळी अर्थशास्त्रामध्यें प्रवीण होती. अशा तऱ्हेचा एखादा प्रसिद्ध पुरुष हिंदुस्थानांत व्हाइसराय म्हणून पाठविला तर हिंदुस्थानचा कारभार व्यवस्थित चालेल असा विश्वास **गोखल्यांनीं** प्रदर्शित केला होता.

हिंदुस्थानचा राज्यकारभार वरिष्ठ सरकार व प्रांतिक सरकार यांमध्यें विभागला गेला असल्यामुळें परस्परांना समाधानकारक वाटेल अशी उत्पन्नाची विभागणी करण्याचे प्रयत्न आतांपर्यंत अनेकवार झाले. परंतु हा प्रश्न अद्यापिहि कायमचा सुटलेला नाहीं. **गोखल्यांनीं** आपल्या साक्षींत या प्रश्नाचा विचार केला आहे. १८७१ पूर्वी देशाच्या जमाखर्चाची सर्व व्यवस्था वरिष्ठ सरकार बघत असे. आपापल्या प्रांतांतून कर गोळा करून वरिष्ठ सरकारकडे पाठवावें आणि वरिष्ठ सरकारकडून मिळणाऱ्या रकमेंतून होईल तेवढ्या प्रांताची व्यवस्था ठेवावी एवढेंच काम प्रांतिक सरकारकडे असे. परंतु या व्यवस्थेचे दुष्परिणाम लौकरच दिसून आले. मिळालेल्या पैशाचा काटकसरीनें उपयोग करून प्रांतांत सुधारणा करण्यास प्रांतिक सरकारास प्रोत्साहन मिळत नसे. **लॉर्ड मेयोच्या** कारकीर्दीत प्रांतिक सरकारास कांहीं उत्पन्नाचीं व कांहीं खर्चाचीं खातीं तोडून देण्यांत आलीं. या व्यवस्थेंत एक दोष होता. खर्चाची वाढ एकसारखी होत होती. परंतु त्या प्रमाणांत उत्पन्न वाढत नव्हतें. किंबहुना उत्पन्न वाढण्यास वावच नव्हता. **लार्ड लिटनच्या** कारकीर्दीत प्रांतिक सरकारकडे आणखी कांहीं खातीं सोंपविलीं. दर पांच वर्षांनीं प्रांतिक सरकारच्या जमाखर्चाची वरिष्ठ सरकारकडून तपासणी होऊन वरिष्ठ सरकार आपल्या खर्चाकरितां दरवर्षी ठराविक रकम प्रांतिक सरकाराकडून घेत असे. प्रांतिक सरकारनें पांच वष काटकसरीनें कारभार चालवून कांहीं बचत करावी तो वरिष्ठ सरकार त्याचा फायदा

घेण्यास तयारच ! प्रांतिक सरकारची स्थिति सुधारण्याकरितां **लार्ड-डफरीननें** नेमलेल्या फायनॅन्स कमिटीनें केलेल्या सूचनाच **गोखल्यांनीं** कमिशनपुढें मांडिल्या. वरिष्ठ सरकार व प्रांतिक सरकार यांचें आर्थिक संबंध शक्य तितकें पृथक् करणें हाच या सर्व सूचनांचा हेतु आहे आणि **मॉंटेग्यु-चेम्सफर्ड** रिपोर्टमध्येंहि हें तत्त्व मान्य केलें आहे. ( vide section 200. Our first aim has therefore been to find out some means of entirely separating the resources of the central and provincial governments.)

**गोखल्यांच्या** साक्षीच्या शेवटल्या भागांत हिंदुस्थानांतील राज्यकारभाराच्या वाढत्या खर्चाचें परीक्षण करून त्याचें वास्तविक स्वरूप कमिशनपुढें मांडिलें होतें. राष्ट्राच्या खर्चांत वाढ होणें ह्यांत तत्त्वतः भिण्यासारखें कांहींच नाहीं. परंतु ज्या हेतूस्तव ही वाढ झाली आहे त्याकडे आपणाला लक्ष पुरविलें पाहिजे. इंग्लंड, फ्रान्स व इटली वगैरे देशांच्या खर्चामध्यें गेल्या तीस वर्षांत अशीच वाढ झाली होती. परंतु त्यांच्या व हिंदुस्थानच्या परिस्थितींत पुष्कळच तफावत आहे लोकमताच्या योग्य नियंत्रणाखालीं इतर देशांत वाढलेला खर्च त्यांच्या वाढत्या वैभवाचें द्योतक आहे; परंतु परकीयांच्या सदोष सत्तेखालीं अनियंत्रित राज्यकारभारामुळें वाढणारा हिंदुस्थानचा खर्च मात्र देशांतील संपत्तीचा ओघ परदेशांकडे कसा चालला आहे याचा निदर्शक आहे. साम्राज्याचा विस्तार करण्याचें धोरण व जिंकलेल्या प्रांताची व्यवस्था व रक्षण करण्याची आवश्यकता ह्यामुळें करवाढी होऊनहि राष्ट्रांत शिक्षणाचा फैलाव करण्यास सरकारास पैशाची सवड सांपडत नाहीं. यानंतर हिंदुस्थानचा लष्करी खर्च दिवसेंदिवस कसा वाढत आहे, एवढें लष्कर हिंदुस्थानला अनवश्यक कसें आहे



ना. गोखले.– [ पृ. ५६ ]
वेल्बी–कमिशनच्या वेळीं इंग्लंडास जातांना.

आणि तत्प्रीत्यर्थ इतका खर्च सोसणें हिंदुस्थानच्या शक्तीबाहेरचें कसें आहे, हें **गोखल्यांनीं** सप्रमाण सिद्ध करून दाखविलें.

वेल्बीकमिशनपुढील **गोखल्यांची** साक्ष हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें एकंदरींत चांगली झाली. उलट तपासणीचे वेळीं उत्तरें देतांना **गोखल्यांनीं** आपली मनःसमता ढळूं दिली नाहीं. हिंदुस्थाननें **गोखल्यांना** परीक्षेस धाडलें होते आणि परीक्षेंत यशस्वी होतात कीं नाहीं हें मोठ्या आतुरतेनें लोक पाहत होते. कारण या परीक्षेंतील जयापजयावर हिंदुस्थानच्या पुढारीपणाचें पारितोषक त्यांना मिळावयाचें होतें. आपल्यावरील ही जबाबदारी **गोखले** पूर्ण ओळखून होतें. या जबाबदारींतून भारतवर्षाच्या शुभ आशीर्वादानें ते पार पडले असें म्हणण्यास हरकत नाहीं. **महाराष्ट्रांत उदय पावणाऱ्या या ताऱ्याचें तेज अखिल हिंदुस्थानांत फाकूं लागलें.** देशाच्या दूरदूरच्या भागांतही **गोखल्यांच्या** कीर्तिकुसुमांचा परिमल दरवळत राहिला आणि सन १८८८ सालीं म्हणजे **गोखल्यांच्या** वयाला बावीस वर्षेंहि पुरीं झालीं नव्हती त्यावेळीं गोखले हे पुढेंमागें काँग्रेसचें अध्यक्षपद अलंकृत करतील असें मुंबई प्रांतिक परिषदेमध्यें रा. ब. **मुधोळकर** यांनीं केलेलें भाकीत लौकरच खरें ठरेल, अशी आशा प्रत्येकास वाटूं लागली.

वेल्बी कमिशन पुढील साक्षीमुळें हिंदुस्थानांतील कानाकोपऱ्यांतून प्रसंशोद्गाराचे प्रतिध्वनि **गोखल्यांचे** कानीं येत होत. राजकीय मतवैचित्र्यामुळें गोखल्यांच्या विरुद्ध प्रतिकाराचें धोरण स्वीकारिलेल्या केसरीपत्रानेंहि "**प्रो. गोखले यांनीं एवढी लांबची सफर केल्याचें व आपल्या अनुभवी आणि विद्वान गुरुच्या शिकवणीचें चीज केलें**" अशी कबूली दिली. **आपल्या वर्तनानें गुरुला संतोष देण्यापलिकडे सच्छिष्याला आनंददायक**

अशी दुसरी कोणती गोष्ट असणार ? साक्षीबद्दल माधवराव रानड्यांचें अनुकूल मत झालेलें पाहून गोखल्यांना धन्यता वाटली. मनुष्याचें भावडें मन स्वकीयांच्या स्तुतीला अधिक आतुर झालेलें असतें. युद्धांत जय मिळवून स्वदेशास परत येणाऱ्या प्राक्कालीन वीराप्रमाणें हिंदुस्थानांत गेल्यावर आपलें स्वागत लोक स्वाभिमानानें करतील असे मनोरथ गोखले करीत होते. परंतु निर्भेळ सुख मानवाच्या नशिबीं नसावें अशी विधात्याची इच्छाच दिसते आणि गोखले तरी या इच्छेला अपवाद काय म्हणून असतील ?

गोखले इंग्लंडला गेले त्याच सालीं एक नवीन रोग हिंदुस्थानांत प्रादुर्भूत झाला व आतांपर्यंत त्यानें देशांत बराच धुमाकूळ घातला आहे. कित्येक प्राणांचा त्यानें अपहार केला आहे ! कित्येक कुटुंबांना आश्रयविहीन करून देशोधडीला लाविलें ! भरल्या घराला स्मशानाची रया आणिली व शहरेंचीं शहरें ओसाड पाडलीं ! रोग नवीन असल्यामुळें लोक व सरकार यांना त्याचा प्रतिबंध कसा करावा हें प्रथम कळेना. सरकारनें प्लेगव्यवस्थेकरितां मि. रँड यांना स्पेशल अधिकारी नेमिलें. शहरांतील घरें तपासण्याचें व तीं धुण्याचें काम मि. रँड व त्यांच्या हाताखालीं असलेल्या गोऱ्या लष्करी शिपायांकडे सोपविण्यांत आलें. १७ फेब्रुआरीपासून पुण्यास मि. रँड साहेबांचा कांहींसा कडक अंमल सुरू झाला. शिपायांचें लोकांशीं वर्तन असभ्य व निर्दयतेचें होतें. त्यांनीं शहरतपासणी करितांना अनेक अत्याचार केले अशी बोलवा होती. लोकांचा समज झाला कीं, या अत्याचाराच्या मुळाशीं मि. रँडसाहेबच आहेत. ता. १६ मे रोजीं प्लेगची तपासणी थांबण्याचें ठरलें. परंतु रँडसाहेबाविरुद्ध लोकांच्या मनांत अढी बसली होती ती कांहीं निघाली नाहीं. महाराणी सरकारच्या राज्याला साठ वर्षे झालीं म्हणून ठिकठिकाणीं डायमंड ज्युबिलीप्रीत्यर्थ उत्सव करण्यांत येत होते. पुण्यासहि हा

उत्सव साजरा करण्यांत आला. ता. २२ जून रोजीं रात्रीं उत्सवाच्या समारंभापासून परत येत असतांना पूर्वीचें वैर स्मरूनच की काय रँड व आयर्स्ट या दोघांचा खून करण्यांत आला.

प्लेगमध्यें गोऱ्या अधिकाऱ्यांच्या व शिपायांच्या हातून जीं अनन्वित कृत्यें झालीं त्यांचा वर्तमानपत्रांतून गवगवा झाला. परंतु त्याला प्रांतिक स्वरूप होतें. हिंदुस्थानच्या इतर भागांत याचे प्रतिध्वनि उमटतील असें कोणाला वाटलें नाहीं. मग पांच हजार मैलांवर असलेल्या इंग्लंडमध्यें याची वार्ता तरी कळली असती कीं नाहीं ही शंकाच आहे. परंतु रँड व आयर्स्ट या दोघांचा खून झाल्याबरोबर हिंदुस्थान व इंग्लंड योगनिद्रेंतून जागे झाले. महाराष्ट्रांत आतां बंड उभारलें जाणार अशी भुमका उठली. हिंदुस्थानांतील लोकांना खून कां झाले याचीं पूर्वकारणें माहीत होतीं; म्हणून अशा बाजारबातम्यावर विश्वास ठेवणारे लोक फारसे नव्हते. परंतु इंग्लंडमधील लोकांना प्लेगच्या कालांतील जुलुमांची कांहींच कल्पना नसल्यामुळें त्यांचा वरीलसारख्या लोकवार्तेवर विश्वास बसणें स्वाभाविकच होतें. इंग्लंडमध्यें बद्धमूल होत चाललेल्या या मताचा निरास होण्यास काय उपाययोजना करावी असा प्रश्न गोखले व हिंदुस्थानबद्दल चिंता वाहणारे इंग्लंडमधील इतर गृहस्थ यांच्यापुढें येऊन पडला. प्लेगमधील अत्याचाराबद्दल गोखल्यांना खासगी पत्रांतून हकिकती कळल्याच होत्या आणि वेळावेळीं तीं पत्रें त्यांनीं तेथील मित्रमंडळींना दाखविलीं होतीं. त्या पत्रांच्या आधारांवर गोखले यांनीं मँचेस्टर गार्डिअनला एक पत्र लिहावें आणि त्यांत प्लेगमधील अत्याचाराचा उल्लेख करावा असें दादाभाई नौरोजी, वेडरबर्न वगैरे मंडळींच्या खासगी रीतीनें एकदोन सभा होऊन ठरलें. ता. २ जुलै १८९७ च्या मँचेस्टर गार्डिअनच्या अंकांत गोखल्यांची मुलाखत

प्रसिद्ध झाली. प्लेगच्या अत्याचारासंबंधीं केलेल्या विधानांबद्दल इंग्लंडमधील वर्तमानपत्रांत बराच वाद माजला. या सर्वांस उत्तर देण्याकरितां ता. १५ जुलैच्या **मँचेस्टर गार्डिअनच्या** अंकांत **गोखल्यांनीं** एक पत्र लिहिलें. त्यामधील खालील वाक्य खासगी रीतीनें आलेल्या पत्रांवर **गोखल्यांचा** किती विश्वास होता या दृष्टीनें पाहणारास महत्त्वाचें वाटल्यावांचून राहणार नाहीं. " Among these letters there are two from two friends whom I have known for years and who are incapable of consciously misleading me. "

ता. ३० जुलै रोजीं **गोखले** स्वदेशास परत आले. मायभूमीच्या किनाऱ्याला **गोखल्यांचे** पाय लागताहेत तोंच मुंबईच्या पोलिस कमिशनरनें त्यांच्यावर वारंट बजाविलें. ब्रिटिश सैनिकांची बेअब्रू करणारीं विधानें पुराव्यानिशीं सिद्ध करण्यास कोर्टांत हजर तरी रहा, नाहींतर ' क्षमस्व ' म्हणून माफी मागण्यास तयार व्हा असा पेंच गोखल्यांच्यापुढें टाकिला. गोखल्यांनीं पुरावा मिळविण्याची थोडीफार खटपट केली आणि त्यांत यश येण्याचा संभव बराच कमी आहे असें दिसून येतांच गोखल्यांनीं सरळ मनानें माफी मागितली.

**गोखल्यांच्या** माफीबद्दल अनुकूल प्रतिकूल मतें ऐकूं येतात. एका पक्षाचें म्हणणें असें होतें कीं माफी मागण्यांत **गोखल्यांनीं** वाजवीपेक्षां ज्यास्त तत्परता दाखविली. ज्या दोन विधानांबद्दल माफी मागावी लागली, त्यांपैकीं एकास बिलकुल पुरावा नव्हता आणि दुसरें अतिशयोक्तिपूर्ण होतें. तथापि सोजिरांनीं प्लेगच्या वेळीं अत्याचार केले नाहींत असें सिद्ध होत नाहीं, आणि इतर अत्याचारांबद्दल पुरावा गोळा करतां येणें शक्य होतें. दुसऱ्या पक्षाचें असें मत होतें कीं सरळ मनाच्या मनुष्याला प्रामाणिकपणाचा जो

मार्ग घेतां येणें शक्य होता, तोच गोखल्यांनीं अवलंबिला आणि त्याबद्दल गोखले स्तुतीस पात्र आहेत. रानडे, वेडरबर्न, वगैरे मंडळींना गोखल्यांची या प्रसंगाची वर्तणूक पूर्णपणें मान्य होती. गोखल्यांना स्वतः मात्र या प्रसंगाची विस्मृति पडण्यास बराच कालावधि लागला. माफीप्रकरणामुळें त्यांच्या कोमल मनाला धक्का बसला. गोखल्यांच्या सार्वजनिक आयुष्याची इतिश्री येथेंच होते कीं काय अशी त्यांच्या स्नेह्यांना भीति वाटूं लागली. माफीविरुद्ध माजलेल्या प्रतिकूल टीकेच्या काहुरामुळें सार्वजनिक आयुष्यांत अजीबात अंग काढून घ्यावें असे निराशेचे विचार गोखल्यांच्या मनांत येऊं लागले. मनाच्या फाजील कोमलतेमुळें गोखल्यांना राजकारणाचा संन्यास करूं देणें म्हणजे देशाचें अपरिमित नुकसान करण्यासारखें आहे हें न्या. मू. रानडे जाणून होते. त्यांनीं गोखल्यांना या प्रसंगीं धीर दिला.

हळूंहळूं गोखल्यांच्या बद्दल लोकांचें व सरकारचें मन निवळूं लागलें. पुढील सालीं सरकारनें नेमिलेल्या प्लेगकमिशनचे गोखले हे एक समासद होते. यावेळीं त्यांनीं केलेलें काम इतकें प्रसंशनीय होतें कीं दोन वर्षांपूर्वीं ज्या सँढर्स्ट साहेबांनीं गोखल्यांच्या विधानाबद्दल सणसणीत टीका करून त्यांना माफी मागण्यास भाग पाडलें त्यांच्यावरच गोखल्यांच्या प्लेग कमिशनमधील कामगिरीबद्दल प्रशंसोद्गार काढण्याची पाळी आली. लॉर्ड सँढर्स्ट साहेबांचें हें भाषण गोखल्यांच्याबद्दल सरकारचा दृष्टिकोण कसा बदलला आहे याचें उत्तम द्योतक आहे. त्यांतील एक वाक्य खालीलप्रमाणें होतें.

"Anxious as I was two years ago, to refute the damaging statements of *Prof. Gokhale*, no less anxious am I now to avow that there is no more hardworking, generous and sympathetic worker amongst the plague volunteers than Prof. Gokhale."

# ६ खासगी हकीकत व स्वभाव निरीक्षण.

" Every living man is a visible mystery; he walks between two eternities and three infinitudes."

—*Carlyle.*

व्यक्तीच्या अथवा राष्ट्राच्या आयुष्याची संतत धारा एकदां सुरू झाली म्हणजे नदीच्या प्रवाहाप्रमाणें प्रलयसागराला मिळेपर्यंत त्यांत कधींहि खंड पडत नाहीं. तेव्हां एक भाग एथें संपून दुसऱ्या भागास अमक्या ठिकाणीं सुरवात होतें असें म्हणतां येत नाहीं. परंतु दऱ्याखोऱ्यांतून आवेशानें वाहात येणारा नदीचा प्रवाह सपाट प्रदेशांत संथपणानें वाहण्यास कोठपासून सुरवात झाली अथवा वर्षाचे आठ महिने एका तीरावरून दुसऱ्या तीराला मुलाबाळांनाहि पायींच जातां येणारें प्रवाहाचें क्षुद्र स्वरूप बदलून नौकापर्यटणक्षम असें स्वरूप त्यानें कोठें धारण केलें हें सांगतां येणें शक्य आहे. १९०१ च्या सुमारास गोखल्यांच्या जीवनसरितेच्या प्रवाहाला निराळें वळण लागलें. पूर्वीचें त्याचें आकुंचित स्वरूप जाऊन तो अधिक विस्तृत झाला. पर्वतांचा आश्रय सुटला व सह्याद्रीखोऱ्यांतील अज्ञातवासाचेहि दिवस संपले. त्या प्रवाहाची गंभीरता, भव्यता व विशालता 'हिंदुस्थाना'च्या सर्व भागांतील लोकांना कळून येऊ लागली. इतके दिवस गोखले महाराष्ट्राचे पुढारी होते, परंतु ह्यापुढें ते सर्व राष्ट्राचे पुढारी झाले. पत्नीच्या मृत्युमुळें घरांतील संसाराचा पाश कमी झाला व देशाच्या संसाराकडे चित्त अधिक वेधलें. रानडे याच सुमारास वारले. धीर खचूं न देतां उत्साहानें गोखल्यांनीं ज्या छत्राखालीं काम केलें तें नाहींसें झालें. आपल्यावरील जबाबदारी वाढूं लागली असें गोखल्यांना वाटूं लागलें. वीस वर्षांपूर्वी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला दिलेलें वचन ईशकृपेनें लौकरच पुरें होण्याचें चिन्ह दिसूं लागलें आणि वरिष्ठ

कायदे कौन्सिलमध्यें प्रवेश झाल्यामुळें सार्वजनिक कार्याचें क्षेत्र विस्तृत झालें. या चारी गोष्टी १९०१ सालच्या आगेंमागेंच घडून आल्या. तेव्हां गोखल्यांच्या लोकनायकत्वाला ह्याच सालापासून सुरुवात झाली असें समजण्यास हरकत नाहीं; परंतु पुढील जीवितेतिहास सांगण्यापूर्वी गोखल्यांची गृहस्थिति व आतांपर्यंत दिसून आलेला स्वभाव यांचा वाचकांना या विभागांत परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

गोखल्यांचे वडील १८७९ त वारले, त्यावेळीं गोखल्यांचें वय अवघें तेरा वर्षांचें होतें. मुलगा मोठा कर्तबगार निघून समाजांत मान्यतेला पावलेला पाहण्याचें भाग्य ज्यांना लाधतें अशा नशिबवान् लोकांपैकीं कृष्णराव नव्हते. उतारवयांत उत्साह व धमक यांच्या ऱ्हासाबरोबर मनुष्याची स्वतःसंबंधीं महत्त्वाकांक्षाहि कमजोर होते. अशावेळीं आपल्या मुलाचा चढता काळ पाहून वृद्ध मनाला समाधान वाटतें. त्याचप्रमाणें ज्यांच्या अंगाखांद्यावर आपण खेळलों व 'स्वसुखनिरभिलाष' राहून ज्यांनीं आपलें लालनपालन केलें त्या प्रेमळ वडिलांच्या ऋणांतून मुक्त होण्यास अशा तऱ्हेनें संधि प्राप्त झाली तर कोणत्या सत्पुत्राला सात्त्विक आनंद होणार नाहीं! परंतु कृष्णरावांच्या मृत्यूनें कृष्णराव त्या समाधानाला व गोपाळराव ह्या आनंदाला मुकले. गोखल्यांची आई पुढें १२ वर्षेंपर्यंत जीवंत होती. आपल्या मुलाच्या परीक्षा भराभर पास होत आहेत हें तिनें पाहिलें होतें. मुलगा मिळविता व्हावा व त्याचा चालता संसार डोळे भरून पहावा हीच कायती तिची इच्छा असणार! आणि परमेश्वराच्या कृपेनें ती सफळहि झाली.

गोखल्यांचें पहिलें लग्न १८८० मध्यें त्यांच्या वयाच्या चवदावें वर्षी झालें. हा विवाह वधुवरांना सुखावह झाला नाहीं. गोखल्यांची ही बायको शरीरानें अधू होती असें म्हणतात. विवाहित

परंतु अविवाहित अशा स्थितींत सात वर्षें काळ काढल्यानंतर कांहीं अंशीं कुटुंबांतील इतर मंडळींच्या उग्र आग्रहानें व कांहीं अंशीं स्वतःच्या मुग्धसंमतीनें गोखल्यांचें दुसरें लग्न १८८७ सालीं झालें. या संबंधापासून गोखल्यांना एकंदर तीन अपत्यें झालीं. त्यांचा पहिला मुलगा जन्मल्यापासून पंधरावे दिवशींच वारला. त्यांच्या थोरल्या मुलीचा—काशीताईचा—जन्म १८९३ मध्यें व धाकट्या मुलीचा—गोदुताईचा—१८९६ मध्यें झाला. सार्वजनिक कार्यास वाहून घेतलेल्या व्यक्तींना घरच्या कारभारांत फाजील वेळ दवडतां येत नाहीं. त्यामुळें ते संसाराबद्दल उदासीन असतात असें अनुमान काढणें तर्कशुद्ध होणार नाहीं. गोखल्यांचे आपल्या पत्नीवर प्रेम होतें आणि तिच्या मृत्यूमुळें गोखल्यांना वाटलेली हानि सर फेरोजशहा मेथा यांना लिहिलेल्या एका पत्रांत त्यांनीं व्यक्त केली आहे. ते लिहितात:—'My wife's death had destroyed the principal tie which bound me to family life and a settled home." गोखल्यांची दुसरी पत्नी १९०० सालीं वारली. यावेळीं त्यांचें वय चौतिस वर्षांचें म्हणजे फिरून लग्न करण्याचें असतांहि त्यांनीं तो विचारसुद्धां मनांत आणिला नाहीं हें ध्यानांत धरण्याजोगें आहे.

पत्नीप्रमाणेंच आपल्या मुलीवरहि गोखल्यांचें अत्यंत प्रेम होतें. प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करावें म्हणून गोखल्यांनीं कायदेकौन्सिलपुढें एक बिल आणिलेलें प्रसिद्धच आहे. या बिलाकरितां माहिती मिळविण्यास्तव हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत त्यांना हिंडावें लागलें. एकदां त्यांचा मुक्काम मद्रासेस असतां त्यांची एक मुलगी अत्यवस्थ असल्याबद्दल तार आली. तेथील खर्च मंडळींनीं पुण्यास जाण्याबद्दल गोखल्यांना आग्रह चालविला परंतु हातांतलें काम सोडून जाण्यास गोखले तयार होईनात. त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक !

त्यांनीं एकाएकीं आपला निश्चय केला व जवळच्या मंडळींना म्हणाले, "When I last saw her, she looked upbraidingly in my face and said what have I known of a father's love? The memory of her face makes me return and not your persuasions."

निसर्गाच्या कृपाप्रसादानें शारीरिक सौंदर्याचा गोखल्यांना लाभ झाला होता. फार उंच नाहीं व ठेंगूही नाहीं अशी ती गोखल्यांची गौरकाय सुंदर मूर्ति अवयवाच्या प्रमाणबद्धतेमुळें अधिकच खुलून दिसे. श्रमसातत्यामुळें व्याधिग्रस्त झालेली त्यांची शरीरयष्टि आपल्या स्वाभाविक सौंदर्याला कधींहि मुकली नाहीं. रानड्यांचा चेहरा पाहिल्यावर प्राचीन ऋषींच्या गांभीर्याची आठवण होते, टिळकांच्या चेहऱ्यांत ओजस्विता दिसून येते, तर गोखल्यांच्या वदनावर अभिजाततामूलक मार्दव विलसत आहे असा भास होतो. शारीरिक सौंदर्याला मधुर आवाजाची जोड मिळाल्यानें कोणत्याहि समाजांत त्यांची इतरावर तेव्हांच छाप बसे. प्रथमदर्शनींच अनुकूल ग्रह उत्पन्न होण्यास सौंदर्याची मदत होते आणि सद्गुणामुळें हा गुण दृढावतो. एथें तर सौंदर्य आणि सद्गुण एकसंस्थ असल्यामुळें गोखल्यांच्या बद्दल होणारा अनुकूल ग्रह कायमचाच होत असे. विद्यार्थी दशेंत त्यांना खेळण्याचा फारसा नाद होता किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. कॉलेजमध्यें प्रोफेसर झाल्यानंतर त्यांना टेनिस, क्रिकेट, बिलियर्डस् वगैरे खेळ खेळण्याची संधि मिळाली आणि त्या खेळांमध्यें त्यांनीं पहिल्या प्रतीचें प्राविण्य मिळविलें असें त्यांची समकालीन मित्रमंडळी सांगतात. खेळतांना आपल्या बाजूची सरशी होण्याकरितां त्यांचे आटोकाट प्रयत्न चालत आणि एखाद्या लहान मुलाप्रमाणें प्रतिपक्षाशीं ते भांडत असत. खेळण्याचा नाद उत्तरवयांतहि कायम असल्यामुळें त्यांची प्रकृति निकोप राहिली होती. परंतु विलायतेंत असतांना

...मुळें छाती वरचेवर दुखत असे. शेवटीं त्यांच्या छातीला दार-व्वर असतां अत्यंत परिश्रम करावे शेवटीं पब्लिक सर्व्हिस कमिशन... लागल्यामुळें त्यांची प्रकृति पुष्कळच खालावली.'

**गोखल्यांच्या** स्वभावांत **साधेपणा** होता. वर्गांतील मुलें आपल्या पाठांतराची चेष्टा करण्याकरितांच केवळ अमुक शब्द कोठें आला, अमुक शब्द कितीवेळां आला आहे वगैरे प्रश्न विचारीत आहेत हें त्यांच्या ध्यानींमनींहि नसे. प्रोफेसर झाल्यानंतर **गोखले** एकदां आपल्या सहाध्यापकाकडे आइस्क्रीम खाण्याकरितां गेले. आइस्क्रीम तयार करणें चाललें होतें. आइस्क्रीम तयार करितांना यंत्राच्या भोंवतीं मीठ व बर्फ यांचें मिश्रण घालावें लागतें. त्यामुळें ठराविक शीतता उत्पन्न होते व आंतील दूध गोठूं लागतें. मीठ व बर्फ यांच्या मिश्रणांतून थोडेंथोडें पाणी गळत होतें. स्वभावजन्य अधीरतेनें **गोखल्यांनीं** तें पाणी चाटून म्हटलें, "अहो! आइस्क्रीम तर गोड असतें आणि हें खारट कसें?" मंडळींनीं उत्तर दिलें, "आइस्क्रीम अद्याप तयार नाहीं. तयार झालें म्हणजे तें आपोआप गोड लागूं लागेल." **गोखल्यांच्या भोळ्या मनाला** प्रथम हें खरेंच वाटलें. परंतु पुढें आपली चूक कळून येतांच ते मनांत खजिल झाले. मि० **वाच्छा** व **गोखले** '**वेल्बी**'कमिशनपुढें साक्ष देण्यास इंग्लंडास गेले असतां एकत्रच राहत होते. त्यावेळीं **गोखल्यांचा** स्वभाव निरीक्षण करण्यास मि० **वाच्छा** यांना चांगलीच संधि मिळाली. ते म्हणतात, "**गोखल्यांना** मनुष्यस्वभावाचें ज्ञान असेल परंतु मनुष्यस्वभावाचे ते चाणाक्ष परीक्षक नव्हते. त्यांच्या बालकभावाला प्रतिस्पर्ध्यांचें डावपेंच कळत नसत." व्यवहारांतील कटु अनुभवामुळें **गोखल्यांचा** हा बालकभाव शेवटपर्यंत टिकणें शक्यच नव्हतें.

**गोखल्यांनीं** आपल्या विद्यार्थिदशेंतील काल व्यर्थ न दवडतां

कारणीं लाविला आणि म्हणूनच सार्वजनिक जीवनक्रमास सुरवात केल्याबरोबर **गोखल्यांचा** उत्कर्ष शुक्लपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें प्रतिदिवशीं एकेक वरची पायरी चढूं लागला. बी. ए. झाल्यानंतर **व्हॅर्डस्वर्थच्या** अध्यक्षतेखालीं **गोखल्यांचें 'राजाराम कॉलेजांत'** व्याख्यान झालें. त्याची स्तुति अध्यक्षांनींसुद्धां केली. 'प्रांतिक सभा' व 'कांग्रेस' यांमध्यें त्यांनीं पहिल्यांदा भाषण केलें त्यावेळीं त्यांचें वयास २३ वर्षें देखील पुरीं झालीं नव्हतीं. **'डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें'** प्रवेश झाल्याबरोबर इतर आजन्म सभासदांवर त्यांची इतकी छाप बसली कीं, त्यांच्या वर्चस्वाबद्दल इतर कांहीं जुन्या सभासदांना नुसतें वैषम्यच नव्हे पण हेवाहि वाटूं लागला. न्या. **रानडे** एखाद्याची सहसा निंदा करीत नसत. तसेंच त्यांची स्तुतिहि दुर्मिळ असे. अशा प्रवृत्तीच्या विद्वानांकडूनहि **गोपाळरावांच्या** २४ व्या वर्षीं खालील उद्गार निघावे हें **गोखल्यांच्या** मोठेपणाचें दर्शक नव्हे असें कोण म्हणेल ? **रा. ब. जोशी** यांना पाठविलेल्या एका पत्रांत **रानडे** लिहितात,-"**गोपाळराव** अलीकडे सहा महिने माझ्याबरोबर काम करीत आहेत. या मुदतींतहि त्यांच्या जबर कर्तबगारीविषयीं माझें उत्तम मत झालें आहे. असेल त्या परिस्थितीमध्यें शक्तिसर्वस्व खर्चून काम करण्याची त्यांची तयारी दिसून येते." मोठेपणा मिळविण्यास तपश्चर्या करावी लागते आणि **गोखल्यांनीं** पूर्ववयांतच या तपश्चर्येला प्रारंभ केला होता. विद्यार्थी असतांनाच त्यांची **अचाट स्मरणशक्ति व सतत श्रम करण्याची** तयारी दिसून आली होती. **विनयाच्या कोंदणांत विद्येचें तेज अधिक खुलतें.** साहाजिकच **गोखल्यांची** विद्वत्ता त्यांच्या विनयशीलतेमुळें 'कांचनमणि संयोगा' प्रमाणें 'लोचनानंददायी' व्हावी यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं.

सार्वजनिक कामांत पडणाऱ्या मनुष्याच्या ठिकाणीं धिम्मेपणा लागतो. आज एक गोष्ट केली तर उद्यां तिचीं फलें दृष्टीस पडलीं पाहिजेत असा आग्रह धरल्यास पदोपदीं निराशा होते. गोख-ल्यांच्या स्वभावांत प्रथम प्रथम अधीरता दिसून येत असे. लहानपणीं मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल दोन चार तास उशीरां कळला पण हे दोन चार तास गोखल्यांना युगासमान गेले व परी-क्षेंत आपल्याला यश आलें नाहीं अशी त्यांची खात्री झाली. सार्वजनिक सभेतर्फे सरकारकडे लोकहिताच्या प्रश्नावर वेळोवेळीं परिश्रमपूर्वक तयार केलेले अर्ज जात असत; परंतु सरकार त्यांची नोंद कळविण्यापलीकडे फारशी दरक बाळगीत नसे. या उपेक्षेमुळें वैतागून जाऊन गोखल्यांनीं निराशापूर्ण उद्गार काढले. परंतु न्या. रानडे यांनीं सरकारकडे वरचेवर असेच अर्ज पाठविले पाहिजेत, त्याचा परिणाम आज नाहीं उद्यां केव्हांतरी दिसल्यावांचून राहणार नाहीं, शिवाय सरकारला जागे करण्याबरोबरच आपण लोकांनाहि सार्वजनिक चळवळीचें शिक्षण देत आहों, अशा तऱ्हेची विचार-सरणी त्यांचे पुढें मांडून त्यांचें समाधान केलें. लोकाग्रणीच्या ठिकाणीं धिम्मेपणाप्रमाणेंच लोकनिंदेबद्दल बेदरकार वृत्ति असावी लागते. राजकारणाचें वातावरण मतभेदाच्या पिकाला चांगलेंच मानवतें आणि येन केन प्रकारेण प्रतिस्पर्ध्याची नालस्ती करण्याचा मोह मानवी मनाला अनावर होतो. अशा स्थितींत लोकमताला फाजील किंमत दिली असतां राजकारणाचा संन्यास घेतल्याशिवाय गोखल्यांना गत्यंतरच उरलें नसतें. परंतु टीका कोण लोक करित आहेत या गोष्टीवरून तिला कमीअधिक किंमत द्यावयाची असते. याच तारतम्य बुद्धीनें गोखले लोकांच्या मताचें व टीकांचें मोल करीत असत. माफीप्रकरणामुळें त्यांच्यावर झालेला टीकेचा वर्षाव त्यांच्या मनाला फार झोंबला, याचें कारण

सरकार व ज्यांच्या मतांबद्दल **गोखल्यांना** आदर होता असें त्यांचें देशबांधव यांनीं संगनमत केलें. या प्रकरणामुळें त्यांचें मन बरेंच अशु झालें होतें. वेल्बी कमिशनपुढें मि. **वाच्छा** व **गोखले** यांनीं साक्षी देऊन देशाची जी कामगिरी केली त्याबद्दल या दोघांचा सार्वजनिकरीत्या गौरव करण्याचें मुंबईकरांनीं ठरविलें असतां **गोखल्यांनीं** हें आमंत्रण आभारपूर्वक नाकारिलें. जनतेला तोंड दाखविण्याची त्यांना लाज वाटूं लागली. परंतु सर्वच प्रतिकूल टीकेला ते इतकें महत्त्व देत असतील असें समजणें चुकीचें होईल. जाणून बुजून अशुद्ध हेतूंचा आरोप त्यांच्यावर करण्यांत येत असे, कधीं कधीं त्यांच्या शुद्ध हेतूंचा विपर्यास करून नसत्या गोष्टी त्यांच्यावर लादल्या गेल्या होत्या. परंतु ही टीका पक्षांधतेमुळें झाली असल्याकारणानें ती तात्कालिक स्वरूपाची आहे हें ते जाणून होते. हिची उपेक्षा करणें हाच तिला मारण्याचा उत्तम उपाय आणि **गोखल्यांनीं** तोच अवलंबिला.

राजकारणाखेरीज त्यांनीं इतर दुसऱ्या विषयांची सर्वस्वीं उपेक्षा केली. सामाजिक प्रश्नांवरील त्यांचीं मतें सुधारकांच्या बाजूचीं असत. परंतु त्यांनीं स्वतः कोणत्याहि सामाजिक चळवळींत भाग घेतला नाहीं. वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्यास गेले असतां Victorian Era Exhibition मध्यें 'हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षण' या विषयावर त्यांनीं एक निबंध वाचिला होता. वरिष्ठ कायदे कौन्सिलमधील **बसूबिलाला** त्यांनीं पाठिंबा दिला होता व शेवटीं शेवटीं अस्पृश्यांच्या सुधारणेचा प्रश्न हातीं घेण्याची आवश्यकता त्यांना भासत होती. 'सामाजिक' हा शब्द रूढ झालेल्या आकुंचित अर्थानेंच घेतला तर त्या क्षेत्रांतील त्यांची कामगिरी जवळ जवळ कांहींच नव्हती असें म्हणावें लागतें. धार्मिक बाबींसंबंधानेंहि

त्यांची मतें कळण्यास मार्ग नाहीं. **जास्टिस वीमन** हे पुण्यास सेशन जज्ज असतांना त्यांच्या बरोबर बौद्धधर्माचा अभ्यास थोडाबहुत **गोखले** करीत असत असा एक प्रवाद आहे आणि तो खरा असण्याचा संभव आहे. कारण याच सुमारास **थिऑसॉफिकल सोसायटीला** मिळावें कीं नाहीं याचा **गोखले** विचार करीत होते. थिऑसॉफिकल सोसायटीकडे **गोखल्यांचें** लक्ष गेलें होतें हें **प्रि. परांजपे** यांना मान्य आहे. परंतु थिऑसॉफिकल सोसायटीला ते मिळाले नाहींत असें विश्वसनीय माहितीवरून कळतें असें तें म्हणतात. परंतु १३ सप्टेंबर १९१५ च्या **'लीडर'** मध्यें एका थिऑसॉफिस्टाचें पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांत तो म्हणतो, " ७ मार्च १८९८ रोजीं थिऑसॉफिकल सोसायटीला मिळण्याची इच्छा **गोखल्यांनीं** दर्शविली आणि त्याप्रमाणें त्यांनीं अर्जहि केला. **बनारसच्या** थिऑसॉफिकल सोसायटीच्या दप्तरीं हा अर्ज आहे. या अर्जाचा विचार होऊन ता. २ आगष्ट १८९८ रोजीं ४८२५ नंबरचा डिप्लोमा **गोखल्यांना** देण्यांत आला. १९०७ सालापर्यंत सभासदांच्या पटावर **गोखल्यांचें** नांव होतें." ही हकिगत खरी असण्याचा संभव आहे कारण पुणें येथील थिऑसॉफिकल लॉजच्या पुस्तकालयांतून **गोखल्यांनीं** कांहीं पुस्तकें वाचण्याकरितां नेल्याची नोंद सांपडते.

**गोखल्यांची** सांपत्तिक स्थिति उत्तमपैकीं नसली तरी पुण्यासारख्या शहरीं मध्यमवर्गाच्या कुटुंबाला व्यवस्थित रीतीनें राहतां येण्यासारखी होती. प्रथम त्यांचें मिळकतीचें मुख्य साधन म्हणजे कॉलेजांतील पगार. त्यावेळीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आजन्म सभासदांना दरमहा ७५ रुपये मिळत असत. याखेरीज त्यांना **'शिराळकर** आणि कंपनी'कडून अंकगणिताचे पैसे येत होते. १८९६

साली 'मॅकमिलन आणि कंपनी'नें अंकगणित सर्व हक्कांसह विकत घेतलें. गोखल्यांना कंपनीकडून दरमहा १२०।१२५ पर्यंत प्राप्ति होत असे. मुंबई विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या परीक्षेस इंग्लिश व इतिहास या विषयाचे ते कांहीं वर्षें परीक्षक होते. यापुढील काळांत गोखले प्रांतिक किंवा वरिष्ठ कायदेकौन्सिलचे सभासद अखेरपर्यंत होते. कौन्सिलच्या बैठकीस हजर राहिल्याबद्दल भत्त्याचे कांहीं पैसे त्यांना मिळत असत; कुटुंबाच्या चरितार्थापुरता पैसा घेऊन बाकी सर्व 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी'ला गोखले देऊन टाकीत असत. धनसंचयाची इच्छा असंतोषाची जननी असते; आणि ही चटक मनुष्याला एकदां लागली म्हणजे कितीहि संपत्ति मिळविली तरी समाधान दूरच पळत असतें. गोखल्यांना धनसंचयाचा मोह कधींहि पडला नाहीं. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे गोखले सहा वर्षें संपादक होते. संपादक या नात्यानें त्यांना सभेनें कांहीं रकम दरमहा देऊं केली होती. पण ती त्यांनीं नाकारली. यावेळीं त्यांची सांपत्तिक स्थिति विशेष चांगली नव्हती हें लक्ष्यांत ठेविलें म्हणजे गोखल्यांच्या वरील कृतीचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. पुढें त्यांना पब्लिकसर्व्हिस कमिशनवर सभासद म्हणून नेमिलें. त्यावेळीं ते वरिष्ठ कायदेकौन्सिलचे मेंबर होते. कमिशनवर राहून वेतन घेणारा सभासद सरकारी नोकरच समजला पाहिजे आणि त्याला वरिष्ठ कायदेकौन्सिलचें सभासदत्व सोडलें पाहिजे असा कायदेपंडितांचा सल्ला पडला. परंतु रॉयल कमिशनर म्हणून मिळणाऱ्या दरमहा दोन हजार रुपये वेतनाचा स्वीकार न करितां कमिशनचें काम ऑनररी करण्याचें त्यांनीं ठरविलें व वरिष्ठ कायदेकौन्सिलांतील आपल्या जागेचा राजिनामा देण्याचा प्रसंग अशा रीतीनें टाळला. गोखल्यांना धनसंचयाचा मोह कधींहि पडला नाहीं हें खरें असलें तरी आपल्या पाठीमागें आपल्या कुटुं-

बाची थोडीफार व्यवस्था लावून ठेवण्यास ते विसरले नाहींत. परंतु स्वकष्टार्जित मिळकतीपैकीं राहत्या बंगल्यासुद्धां बराच मोठा हिस्सा त्यांनीं सोसायटीच्या हवालीं केला आहे.

सोसायटी स्थापन झाल्यापासून त्यांनीं आपलें तन, मन व धन सोसायटीकरितां देण्याचा निश्चय केल्यामुळें सार्वजनिक कार्याकरितां उभारल्या जाणाऱ्या फंडाकरितां सढळ हातानें मदत करतां आली नाहीं खरें. पण **गोखले** या हाताचें त्या हाताला कळूं न देतां गुप्त रीतीनें राष्ट्रकार्याकरितां हालअपेष्टा सोसणाऱ्या व्यक्तींना शक्य ती आर्थिक मदत करीत असत. सार्वजनिक फंडाकरितां कोणी रक्कम मागण्यास आलाच तर त्यास सोसायटीकडून मिळणाऱ्या अल्पवेतनांवर फक्त माझा हक्क आहे. बाकी मिळणारे पैसे सोसायटीचे असें स्पष्ट सांगत असत. इतिहासकार **राजवाडे** आणि **गोखले** यांचे मतभेद प्रसिद्धच आहेत. परंतु **राजवाड्यांनीं** सुद्धां देशाकरितां खरा स्वार्थत्याग **गोपाळरावजी गोखल्यांच्या** ठिकाणींच दिसून येतो असे उद्गार काढिले. यावरून **गोपाळरावांच्या** स्वार्थत्यागाची कल्पना येईल.

**गोखल्यांच्या** लोकोत्तर **स्वार्थत्यागाला** प्रेरणा करणारी त्यांची अंतःकरणप्रवृत्ति म्हटली म्हणजे त्यांचा **जाज्वल्य राष्ट्राभिमान.** एक जित राष्ट्र म्हणून साम्राज्यांत राहणें हिंदुस्थानच्या स्वाभिमानास सहन होणार नाहीं. हिंदुस्थानचा भूतकाल काय दर्शवित आहे? ज्या राष्ट्रानें जगांतील अर्ध्याअधिक मानवजातीला आध्यात्मिक विचारांचें पायसदान दिलें, पाश्चात्य राष्ट्रें बाल्यावस्थेंत असतांनाच जेथें वरच्या दर्जाच्या राजकीय व सामाजिक संस्था अस्तित्वांत होत्या, जगांतील संपन्न राष्ट्र म्हणून ज्याचा लौकिक दिगन्त पसरला होता—सारांश ज्यानें एकेकाळीं जगावर स्वामित्व गाजविलें

त्या हिंदुस्थान देशाच्या प्रकृतीस वर्षानुवर्षे जित राष्ट्र म्हणून साम्राज्यांत राहणें कदापि मानवणार नाहीं. आपल्या देशाचें गेलेलें वैभव पुनरपि प्राप्त व्हावें व जगांतील राष्ट्रमालिकेंत त्याला आदराचें स्थान मिळावें अशी **गोखल्यांची** महत्त्वाकांक्षा होती. व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या डायमंड ज्युबिलीचा समारंभ इंग्लंडांत ज्यावेळीं झाला त्यावेळीं हिंदी फौजेची मिरवणूक लंडन शहरांतून काढली होती. या सुमारास **गोखले** इंग्लंडमध्यें होते. तेव्हां त्यांच्या एका मित्रानें म्हटलें, " हिंदी फौजेला मिळालेल्या मानाबद्दल तुम्हांस अभिमान वाटत असेल नाहीं ? " **गोखल्यांनीं** उत्तर केलें. " हिंदुस्थानाला साम्राज्यांत समान दर्जा असतांना ही मिरवणूक निघाली असती तर मला अत्यानंद झाला असता. जित राष्ट्राची फौज म्हणून हिंदी सैनिकांचें प्रदर्शन होत असता कोणा स्वाभिमानी हिंदी मनुष्यास आनंद होईल ? " **गोखल्यांच्या** राष्ट्राभिमानाची अशीच एक गोष्ट १९१५ सालच्या मुंबई प्रांतिक परिषदेमध्यें भाषण करितांना-महात्मा **गांधींनीं** सांगितली. **गोखले** आणि **गांधी** बोटीमधून एकदां प्रवास करीत असतां बोटीवर एका विलायती खेळामध्यें **मि. कॅलेनबॅक** नांवाच्या जर्मन गृहस्थाचा **गोखल्यांनीं** चांगलाच पराभव केला. लहान मुलाप्रमाणें दिसून येणारा त्यांचा उत्साह व आपल्या बाजूची सरशी व्हावी म्हणून त्यांचे चाललेले प्रयत्न पाहून **गांधींना** जरा आश्चर्यच वाटलें. खेळ संपल्यानंतर **गोखले** म्हणाले, "असले खेळ युरोपिअन लोकांबरोबर मी मुद्दामच खेळत असतो. आपल्या देशाच्या इभ्रतीकरितां खेळामध्यें सुद्धां आपण त्यांच्या-मागें नाहीं हें दाखविण्याचा माझा प्रयत्न असतो. "

**गोखल्यांच्या** राष्ट्राभिमानास जातिविशिष्ट किंवा धर्मविशिष्ट स्वरूप कधींहि प्राप्त झालें नाहीं. **गोखल्यांचा देश हाच धर्म होता**

आणि हिंदी जीवांची निरन्तर एकी करणें हेंच त्यांचें धर्माचरण होतें. निरनिराळ्या धर्मांच्या, संस्कारांच्या व कल्पनांच्या अनेक लहान लहान राष्ट्रांचा समूह असलेल्या हिंदुस्थानांत या धर्माचें अनुष्ठान किती अवघड आहे याची त्यांना बरोबर कल्पना होती. मिस् स्ट्रजला पाठविलेल्या पत्रांत गोखले लिहितात," Our problem is an enormously difficult one-I sometimes think that no country in the world was ever callad upon to face such a problem as ours. Endless divisions and sub-divisions in the country; the bulk of the population ignorant and clinging with a tenacity of which only those who are of them can have an adequate idea, to old modes of thought and sentiment; seventy millions of Mahomedans more or less hostile to national aspirations and all power lodged in the hands of a fleeting body of foreign officials, most of whom generally represent your Tory principles at their worst—this is the situation to-day." हिंदुस्थानच्या सद्यःस्वरूपाचें यथार्थ शब्दचित्र वरील उताऱ्यांत प्रतिबिंबित झालें नाहीं असें कोण म्हणेल? परंतु या प्रतिकूल स्थितींहि भविष्यत्कालचें हिंदी राष्ट्र निर्माण करण्यास गोखले पुढें सरसावले.

अल्पवयांतच दिसून आलेल्या गोखल्यांच्या उद्योगशीलतेवर न्या. रानडे यांची नजर गेली होती हें मागें सांगितलें आहे. हीच उद्योगशीलता शेवटपर्यंत कायम राहिली होती. डेक्कन सभेंतर्फे एखादा अर्ज सरकारांत पाठवावयाचा असो अथवा वरिष्ठकायदे-कौन्सिलांतील अंदाजपत्रकासंबंधीं टीकात्मक भाषण तयार करावयाचें असो, हातीं घेतलेल्या प्रश्नाबद्दल सर्व बाजूंनीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा असा गोखल्यांचा क्रम असे. त्यांच्या उद्योग-

शीलतेचीं कित्येक उदाहरणें पुढील प्रकरणांतून येणारच आहेत. सामान्यतः असें दिसून येतें कीं, कोणत्याही प्रश्नाचा सर्व बाजूनें विचार करण्याची मनुष्याला संवय लागली म्हणजे स्वमतप्रदिपादनाची उत्कटता त्याच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं. आपलेंच म्हणणें खरें कशावरून, दुसऱ्यांच्याहि मनांत थोडातरी ग्राह्यांश असणार नाहीं कशावरून, अशा शंका उपस्थित होऊं लागतात आणि तत्त्वावरील निष्ठा अशा अस्थिर व अदृढ पायावर रचिली गेली म्हणजे स्वपक्षसमर्थनाच्या वेळीं थोडीशी ढिलाई दिसून येते. या दोषापासून गोखले अलिप्त होते. **न्यायाधीशाप्रमाणें सर्व बाजूनें एखाद्या प्रश्नाचा विचार करण्याची पात्रता गोखल्यांच्या बुद्धिमध्यें होती.** परंतु त्याचबरोबर एखाद्या कुशल वकीलाप्रमाणें **गोखले** आपल्याला पटलेल्या तत्त्वांचें समर्थन करीत असत. प्राथमिक शिक्षणासंबंधीं व दक्षिण आफ्रिकेंतील त्यांचीं भाषणें, त्यांच्यामध्यें दिसून येणाऱ्या या मनोहर मिलाफाचे उत्कृष्ट निदर्शक आहेत.

**गोखल्यांना** आपलें सर्व आयुष्यभर दुराग्रही सरकार व अज्ञानी जनता यांच्या बरोबर झगडावें लागलें. परकीय सत्तेच्या अमलाखालीं एखादा देश आला म्हणजे तेथील लोकनायकांना दुहेरी कार्य करावयाचें असतें. मुसलमान बादशहांनीं हिंदुस्थान हेंच आपलें निवासस्थान केल्यामुळें हिंदुस्थानच्या उत्कर्षापकर्षाशीं त्यांचीं सुखदुःखें निगडित झालीं होतीं. त्यामुळें जित आणि जेते यांच्या हितसंबंधांत फारसा विरोध दृष्टोत्पत्तीस येत नसे. ब्रिटिश सत्तेखालीं राजा व प्रजा यांच्या भांडणांस निराळें स्वरूप प्राप्त झालें. इंग्लंडांतील लोकमत, हिंदुस्थान सरकार व हिंदी जनता यांमध्यें तिरंगी सामना सुरूं झाला आणि इंग्लिश प्रजाजन व हिंदी जनता यांच्या हिताहितसंबंधांत ज्यावेळीं विरोध

उत्पन्न होतो—आणि असे प्रसंग ब्रिटिश अमदानींत अनेकवार उपस्थित झाले आहेत—त्यावेळीं हिंदुस्थान सरकार हिंदी जनतेच्या हितापेक्षां आपल्याच बांधवांच्या सुखसोयींकडे अधिक लक्ष देतें. अशा परिस्थितींत लोकांच्या पुढाऱ्यांना सरकारच्या कृत्यांचा निषेध करून लोकांच्या वांछित हक्कांची प्राप्ति करून द्यावयाची असते. याशिवाय लोकजागृतीचें दुसरेंहि कार्य पुढाऱ्यांना करावयाचें असतें. हें कार्य करीत असतांना सरकार व लोक यांच्यावर वारंवार टीकास्त्र सोडावें लागतें. वरिष्ठ कायदेकौन्सिलमध्यें सरकार व सरकारी अधिकारी यांच्या डोळ्यांत झणझणीत टीकेचें अंजन घालतांना **गोखल्यांच्या** अंतःकरणाला भीति कधींहि शिवली नाहीं; परंतु या टीकेचा रोंख व्यक्तीपेक्षां तत्त्वाकडे अधिक असे, आणि प्रतिपक्षांबद्दल बोलतांना त्यांची आदरबुद्धि सदैव जागृत असे. त्यामुळें **गोखल्यांच्या** टीकेनें प्रतिपक्षाचीं मनें सहसा दुखविलीं जात नसत. **सर व्हॅलेंटाइन चिरोल** म्हणतात, "कौन्सिलचेंबरमध्यें सरकारी धोरणाची इतकी कडक छाननी करणारा **गोखल्यांच्या** शिवाय एकहि सभासद नव्हता. परंतु टीका करितांनासुद्धां **गोखल्यांना** जबाबदारीची जाणीव असे. टीकेची शिष्टसंमत मर्यादा त्यांनीं कधींहि उल्लंघिली नाहीं." राष्ट्रोद्धाराकडे लक्ष देऊन सतत कार्य करीत राहणें हेंच त्यांचें ध्येय असल्यामुळें सरकारमान्यतेप्रमाणें लोकप्रियतेचीहि पर्वा त्यांनीं कधीं केली नाहीं. **हर्बर्ट स्पेन्सरनें** म्हटल्याप्रमाणें, "If public approbation came well and good, if it did not also well and good, though not so well and good;" अशी त्यांची वृत्ति होती.

## ७ वरिष्ठ कायदेकौन्सिलांतील कामगिरी.

"I am aware that the age is not what we all wish but I am sure that the only means to check its degeneracy is heartily to concur in whatever is best in our time.
—*Burke*

वरिष्ठ कायदेकौन्सिलांत **गोखल्यांचा** १९०२ सालीं प्रवेश झाला. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें **ना. मेथांना** कौन्सिलच्या बैठकीला नियमित वेळेला हजर रहातां येत नव्हतें. अगोदर त्यावेळच्या कौन्सिलच्या घटनेंत लोकप्रतिनिधींची संख्या कमी; त्यांत सरकारला विरोध करून लोकांचें मत कौन्सिलपुढें निर्भीडपणें मांडणारे त्याहून कमी. अशा स्थितींत एक जागा विनाकारण अडवून ठेवणें म्हणजे देशाचें एका दृष्टीनें नुकसान करण्यासारखेंच होतें. प्रकृति लौकर बरी होण्याचें चिन्ह दिसेना, राजिनामा देण्याविषयीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सूचनाहि होऊं लागल्या. अखेरीस **ना. मेथांनीं** आपल्या जागेचा राजीनामा दिला. अशा रीतीनें मुंबई कौन्सिलमधील आपल्या अल्पवयस्क परंतु लायक, अननुभविक परंतु व्यासंगी मित्रांना वरिष्ठ कायदेकौन्सिलचा दरवाजा खुला करून दिला. रिकाम्या झालेल्या जागेसाठीं **गोखल्यांच्या** व्यतिरिक्त **ना. बोमनजी पटेल** व **ना. इब्राहिम रहिमतुल्ला** हे उमेदवार म्हणून उभे राहण्याचा विचार करीत होते. ज्या उमेदवाराला **ना. मेथांची** अनुमति मिळेल तोच यशस्वी होणार हें ठरलेलेंच होतें. ता. १५ जानेवारी १९०१ रोजीं **गोखल्यांनीं ना. मेथांना** एक महत्त्वाचें पत्र धाडलें आहे. हें पत्र वाचलें म्हणजे **गोखल्यांनीं** एखाद्या आज्ञाधारक कनिष्ठ भावाप्रमाणें सार्वजनिक आयुष्यांत त्यांना वडील बंधूप्रमाणेंच वाटणाऱ्या **ना. मेथांच्या** पुढें आपलें हृदय खुलें केलें आहे असें वाटतें.

बहुविध प्रकारच्या विचारांनीं डोकें भारून जावें परंतु उत्कट इच्छा असतांही त्या विचारांचें आविष्करण करण्यास योग्य व्यक्ति व योग्य संधि मिळूं नये असें गोखल्यांचें झालें होतें. पत्राच्या प्रारंभीं पत्नीच्या मृत्यूचा उल्लेख करून कुटुंबपोषणाची आपण काय तजवीज केली आहे हें लिहिल्यानंतर गोखले म्हणतात "कुटुंबपोषणाच्या काळजींतून मी मुक्त झालों आहे; आतां देशाच्या ऋणाचा बोजा मात्र माझ्यावर आहे. इतःपर देशसेवेप्रीत्यर्थ आयुष्य खर्चीं घालण्याचें मी ठरविलें आहे. मला फक्त संधि पाहिजे. माफी प्रकरणाची स्मृति अद्याप ताजी आहे आणि विषदिग्ध शल्याप्रमाणें माझ्या हृदयांत ती बोंचत राहील. ज्या दिवशीं हाऊस ऑफ कॉमन्समध्यें तिरस्करणीय असत्यभाषी (despicable perjurer) म्हणून माझी संभावना करण्यांत आली त्याच दिवशीं मनाशीं मी पक्का निश्चय केला कीं इंग्लंडमधील राजकीय चळवळीच्या प्रगतीकरितां आपलें प्राण वेंचावयाचें ! माझा हेतु सिद्धीस जाण्यास वरिष्ठ कायदेकौन्सिलमधील सभासदत्व उपयोगी पडेल. कोणच्याहि व्यक्तिनिष्ठ महत्त्वाकांक्षेस बळी पडून मी आपल्या मदतीची याचना करीत नाहीं हें लक्ष्यांत धरावें." गोखल्यांची ही याचना फुकट गेली नाहीं. ना. मेथांच्या सहाय्यानें गोखले वरिष्ठ कायदेकौन्सिलांत सर्वानुमतें निवडून आले.

ना. मेथांच्या मागून वरिष्ठ कायदेकौन्सिलमध्यें जाणें व तदनुषंगिक जबाबदारी पार पाडणें हें कांहीं सोपें काम नव्हतें. ना. मेथांच्या पूर्वी लोकप्रतिनिधींचा दरारा सरकारला बिलकूल वाटत नव्हता. सरकारची मर्जी न दुखवितां लोकहिताच्या एखाद्या प्रश्नावर सरकारविरुद्ध मत देतां आल्यास पाहावयाचें अशा मृदुलप्रकृति रावसाहेबरावबहादुरांचाच कौन्सिलमध्यें भरणा अधिक असे. ना.

मेथांनीं आपल्या तडफदारवृत्तीनें हें वातावरण बदलून टाकिलें आणि लोकप्रतिनिधि म्हणजे सरकारच्या ताटाखालचें मांजर हा लोकापवाद नाहींसा केला. त्यावेळच्या कौन्सिलमध्यें लोकप्रतिनिधींना ठराविक कक्षेच्या आंतच रंगण घालण्याची मुभा असल्यामुळें विद्वत्ता व वक्तृत्व यांचें फारसें चीज होत नसे. परंतु सर फेरोजशहा यांची कौन्सिलमधील सरकारच्या कृत्यांचें दोषाविष्करण करणारीं निर्भीड व निरुत्तर कोटिक्रमानें युक्त अशीं भाषणें ऐकल्यावर हें कांहीं पूर्वीपेक्षां निराळेंच प्रकरण आहे अशी सरकारची खातरजमा झाली व लोकांनाहि आपल्या बाजूचें समर्थन करणारा स्पष्टवक्ता पुढारी लाभल्याबद्दल आनंद वाटूं लागला. इतकी उज्ज्वल पृष्ठभूमिका असलेल्या पटावर गोखल्यांना आपल्या भावी आयुष्याचें चित्र रंगवावयाचें होतें.

गोखल्यांचा वरिष्ठ कौन्सिलमध्यें प्रवेश झाला त्यावेळीं लॉर्ड कर्झनची रियासत सुरूं झाल्यास दोनतीन वर्षें होऊन गेलीं होतीं. साहेब स्वतः बुद्धिमान्, महत्त्वाकांक्षी, दीर्घोद्योगी व कर्तृत्वशाली होते. मानव प्राण्याच्या ठिकाणीं पूर्णत्व ठेविलें तर आपल्या आजपर्यंतच्या कीर्तीस कमीपणा येईल असें वाटूनच कीं काय कर्झनसाहेबांना गुणाबरोबर दोषांचेंहि निवासस्थान करण्यास परमेश्वर विसरला नव्हता. गोखल्यांनींच एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें कर्झनसाहेबांचा मुख्य दोष हिंदलोकांच्या आकांक्षाविषयीं बिलकूल सहानुभूति नसणें हा होता. राज्यकारभाराची कार्यक्षमता वाढविणें हें लॉर्ड कर्झनच्या अमदानीचें ध्येय होतें. राज्यकारभाराचें कोणतेंहि खातें दक्ष व चौकस बुद्धीच्या व्हाइसरॉयांच्या नजरेंतून चुकलें नाहीं. बुद्धिमान् माणसांचा आत्मप्रत्यय जितका दांडगा असतो तितकाच त्यांचा दुराग्रह चिवट असतो. एखादी गोष्ट करण्याचें मनानें घेतलें कीं

विघ्नभयांची क्षिति न बाळगतां व इतरेजनांच्या मतांची पर्वा न करितां ती तडीस नेण्यास आपलें शक्तिसर्वस्व खर्चावयाचें ! **लार्ड कर्झन** याच वर्गांतले होते. त्यांच्या हातून चुका होण्यास दुराग्रहाप्रमाणेंच त्यांची आत्मप्रतिष्ठाहि कारण झाली. आरशाच्या घरांत राहणाऱ्या माणसाप्रमाणें दृष्टी फेंकीन तेथें स्वतःचें प्रतिबिंब दिसलें पाहिजे अशी त्यांची महत्त्वाकांक्षा ! अशा कांहींशा प्रतिकूल परिस्थितींत **ना. मेथांची** परंपरा राखण्याचें कार्य **गोखल्यांच्या** शिरावर येऊन पडलें.

१९०९ सालापूर्वी कौंसिलमधील सभासदांना सरकारवर टीका करावयाची झाल्यास अथवा कोणत्याही महत्त्वाचा प्रश्न कौन्सिल-पुढें विचाराकरितां आणावयाचा असल्यास अंदाजपत्रकाच्या वाद-विवादाच्या वेळींच संधि मिळत असे. अंदाजपत्रकामध्यें सर्व खात्यांचा अंतर्भाव होत असल्यामुळें राज्यकारभाराच्या कोणत्याहि भागावर टीका करण्यास सांपडे. कर्झनशाहीच्या सुरुवातीलाच हिंदुस्थानच्या जमाखर्चासंबंधीं कित्येक टीकार्ह प्रश्न उपस्थित झाले. १८९६–९७ व १८९७–९८ या दोन सालांत मिळून सात कोटींची तूट आली. दुष्काळ व वाढता लष्करी खर्च यामुळें ही तूट आली होती. परंतु यापुढें तिजोरींतील शिलक भूमितीश्रेणीनें वाढावी त्याचप्रमाणें वाढूं लागली. १८९९–१९०० सालीं चार कोटींवर शिलक होती आणि पुढील सालींहि अशीच कांहीं तरी शिलक पडेल असा अंदाज दिसूं लागला. सरकारला वाटलें देशाची भरभराट होत आहे. १९०१–१९०२ सालचें अंदाज-पत्रक कौन्सिलपुढें मांडतांना **सर एडवर्ड लॉ** यांनीं हर्षातिरेकानें खालील उद्गार काढले; "In my opinion the question of economic development is one in which those responsible for this financial situation must take the keenest

interest......the realisation of so large a surplus cannot but be a matter of congratulation to India and following the relatively large surplus which we were able to announce last year, it confirms the hope I then ventured to express that if no new ill-fortune overtakes us, we might, as regards finance, look forward to a period of increasing prosperity." शरीरावरील सूज अवयववाढीपासून भिन्न असते आणि या सूजेलाच वाढ समजूं लागलें तर आपल्या हातून होणाऱ्या चुका दोन प्रकारच्या असतात. सूज उत्पन्न होणारी अनकूल परिस्थिति निर्माण करणें ही पहिली चूक आणि सूजेलाच वाढ समजण्यांत आपण भावी प्रगतीची आशा निर्मूलित करतों ही दुसरी चूक. गोखल्यांनीं कौन्सिलमधील आपल्या पहिल्याच भाषणांत ही गोष्ट सर्वांच्या निदर्शनास आणिली.. सात कोटींची शिलक पडणें आणि तें सुद्धां देशावर संकटपरंपरा कोसळत असतां ही गोष्ट जशी अननुभूत तशीच आश्चर्यकारकहि पण आहे. १८९६ सालापूर्वी रुपयाच्या भावांत अनिश्चितपणें फरक होत असल्यामुळें आणि त्याची किंमत कमी कमी होत १३ पेन्सपर्यंत आल्यामुळें इंग्लंडला पाठविण्यांत येणाऱ्या रकमेमध्यें हिंदुस्थान सरकारला अत्यंत तोटा सोसावा लागे. अवघ्या दहा वर्षांत ( १८८४ ते १८९५ ) रुपयाचा भाव उतरल्यामुळें इंग्लंडला पाठविण्याच्या रकमेंत साडेनऊ कोटी रुपयांची वाढ झाली. साहजिकच तिजोरींत अशा रीतीनें पडणारी तूट भरून काढण्याकरितां सरकारला निरनिराळे कर लोकांच्यावर बसवावे लागले. परंतु १८९६ नंतर रुपयाचा भाव १६ पेन्स निश्चित करण्यांत आला आणि हिंदुस्थानसरकारच्या तिजोरींत बचत होऊं लागली. ज्या कारणांकरितां देशामध्यें निरनिराळे कर बसविण्यांत आले तीं कारणें नाहींशीं झालीं तरी सरकारला कर कमी करण्याचें प्रयोजन वाटलें

नाहीं. राज्यामध्यें व्यवस्था राखण्याकरितां जितका पैसा लागतो तितकाच पैसा कराच्या रूपानें सरकारनें घेणें न्याय्य आहे आणि कांहीं कारणामुळें जर सरकारच्या तिजोरींत पैसे ज्यास्त येऊं लागले तर त्याचा विनियोग लोकहिताच्या कार्याकरितां करणेंच उचित! व इतउत्तर असा फाजील पैसा लोकांकडून घेतां येऊं नये म्हणून कांहीं कर सरकारनें माफ करावें. हिंदुस्थानदेशाची धनोत्पादक शक्ति कांहीं गेल्या दोनचार वर्षांत तिजोरीमध्यें सात कोटींची शिल्लक टाकण्याइतकी वाढलेली नाहीं. वरवर विचार करणाऱ्या उथळ डोक्याच्या कांहीं लोकांना तिजोरींतील शिल्लक देशाच्या सुधारलेल्या सांपत्तिक स्थितीचें दर्शक आहे असें मानण्यास पुरेसें कारण वाटलें. पण वस्तुस्थिति निराळी होती, हें गोखल्यांनीं वरील प्रमाणें देऊन सिद्ध केलें. ते पुढें म्हणतात—" The secret of the surpluses was that they were mainly, almost entirely, currency surpluses, resulting from the fact that Goverment still maintained the same high level of taxation which they considered to be necessary to secure financial equilibrium when the rupee stood at its lowest. " जरूरीपेक्षां जास्त कर घेण्याची संवय सरकारला लागली म्हणजे खर्चाच्या बाबतींत हात सढळ होतो आणि वाढलेला खर्च कमी करण्याचें कार्य अत्यंत प्रयासाचें होऊन बसतें. हिंदुस्थान हा गरीबांतला गरीब देश आहे; तेव्हां त्याचा कारभार अत्यंत काटकसरीनें चालविला पाहिजे व करांचें ओझें शक्य तितकें कमी असलें पाहिजे. अशा दोन सूचना गोखल्यांनीं सरकारला केल्या. कोणते कर कमी करितां येणें शक्य आहे हेंहि त्यांनीं दाखविलें. त्यांच्या मतें खालील कर तत्काळ कमी करण्यासारखे होते:—( १ ) मिठावरील कर कमी करणें ( २ ) एक हजाराच्या आंत प्राप्तीवरील कर माफ करणें व ( ३ ) काप-

सावरील जकात उठविणें. तिजोरीमध्यें दरवर्षीं येणाऱ्या शिल्लकेची गोखल्यांनीं लावलेली कारणमीमांसा सरकारला पटली नाहीं; परंतु कर कमी करण्याबाबत गोखल्यांनीं केलेल्या सूचनांपैकीं पहिल्या दोन सूचना सरकारला मान्य करणें भाग पडलें. लँकेशायरवाल्यांचें पार्लमेंटमधील वजन अप्रतिकार्य असल्यामुळें हिंदुस्थानसरकार कापसावरील जकात उठवील हें शक्यच नव्हतें. गोखल्यांची उपपत्ति सरकारला पुढें मान्य करावी लागली. १९०४।१९०५ या सालीं जवळ जवळ चार कोटींची शिल्लक तिजोरींत पडली; आणि आहे हीच व्यवस्था कायम राहिल्यास पुढील सालीं सुद्धां तितकीच शिल्लक पडण्याचा संभव दिसूं लागला. सर एडवर्ड लॉच्या ऐवजीं ना. बेकर फायनॅन्स मेंबर झाले होते. त्यांना गोखल्यांचीं तत्त्वें पसंत पडून त्यांनीं आणखी कर कमी केले व पोस्ट, शिक्षण, शेतकी वगैरे खात्यांवर ज्यास्त पैसा खर्च करण्याचें ठरविलें.

कौन्सिलमध्यें स्वतंत्ररीत्या ठराव आणण्याची परवानगी नसल्यामुळें अंदाजपत्रकावर बोलतांनाच सरकारवर टीका करण्यास किंवा नवीन सुधारणा सुचविण्यास लोकप्रतिनिधींना संधि सांपडे हें मागें सांगितलें आहेच. गोखल्यांच्या अंदाजपत्रकावरील भाषणांतच देशहिताच्या निरनिराळ्या बाबींसंबंधीं विचार केलेला आहे. त्या सर्वांचा समाचार घेणें शक्य नाहीं. परंतु दरवर्षीं ज्या विषयांवर गोखले जीव तोडून सरकारच्या कानींकपाळीं ओरडत होते, त्याबद्दल थोडेसें लिहिणें आवश्यक दिसतें. १८८४–८५ सालीं हिंदुस्थानचा लष्करी खर्च १७.९ कोटी होता. तोच अवघ्या वीस वर्षांत म्हणजे १९०५–१९०६ सालीं जवळजवळ दुप्पट ३२.६ कोटी झाला होता. हिंदुस्थानच्या रक्षणाकरितां हें सैन्य लागत नव्हतें हें उघड आहे; परंतु एशियाखंडांत ब्रिटिशसाम्राज्याचें वर्चस्व कायम राहावें ह्या हेतूनें एवढी मोठी सेना हिंदुस्थानच्या खर्चानें ब्रिटीश सरकारनें

खडी ठेविली होती. यूरोपीय राष्ट्रांत एशियाखंडांतील वर्चस्वाबद्दल यादवी माजली होती आणि ब्रिटिशांना रशिया हा बलवत्तर प्रतिस्पर्धी भेटला होता. त्याच्यावर कुरघोडी करण्यास हिंदुस्थानच्या गरीब रयतेपासून घेतलेल्या कराचा विनियोग त्या कामाप्रीत्यर्थ करणें अन्यायाचें होतें. एशियांतील वर्चस्वाचा वाद साम्राज्य सरकारनें पाहिजे तर खुशाल खेळावा; परंतु मध्यंतरीं गरीब हिंदुस्थानला पिळवटून काढणे योग्य होणार नाहीं असें **गोखल्यांनीं** प्रतिपादन केलें. याच वेळेला लष्करी खात्याची सुधारणा करण्याची योजना सरकारपुढें होती आणि शिलकेंतून या योजनेच्या खर्चास लागणारा पैसा पुरविण्यांत येणार होता. यास **गोखल्यांनीं** हरकत घेतली. तिजोरींत आज शिलक आहे म्हणून पैसे देतांना कांहीं वाटणार नाहीं परंतु दरवर्षी लष्करी खर्चाकरितां पैसे द्यावे लागणार असल्यामुळें हिंदी लोकांवर हा कायमचा बोजाच बसणार आहे. शिवाय या योजनेंतून हिंदी लोकांना तर अजिबात वगळलें होतें. मोठ्या आवेशानें **गोखले** विचारतात:– " May not the Government consider the desirability of pemitting—aye inviting—carefully selected classes from among the children of the soil to share in the responsibilities of national defence ? Both sentimental and financial considerations demand the adoption of a policy of this kind." **कर्झनशाहीमध्यें** हिंदी युनिव्हर्सिटीज् ॲक्ट व Official Secrets Act हे दोन कायदे सरकारनें पास करून घेतले. दोन्ही बिलांना **गोखल्यांनीं** विरोध केला. त्यांपैकीं पहिल्यासंबंधीं हकिकत मागें आलीच आहे; दुसऱ्याबद्दलची हकिकत पुढें विषयानुरोधानें येईलच.

कर्झनसाहेबांनीं आपला राजदंड खालीं ठेविला त्यावेळीं सरकारच्या प्रतिगामी धोरणामुळें देशांत सर्वत्र असंतोष व अराजकता दृष्टीस पडत होती. अशा परिस्थितींत राज्यकारभाराच्या नौकेचें

सुकाणूं लॉर्ड मिंटो यांना हातीं धरावें लागलें. प्रतिकूल प्रवाहांत लोकांच्या अपेक्षेप्रमाणें व स्वतःच्या इच्छेप्रमाणें राज्यकारभाराचें उदार धोरण राखतां येणें व्हाइसरॉय साहेबांना अशक्य होतें. मोर्ले-मिंटो सुधारणा मिंटोसाहेबांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षी अंमलांत आल्यामुळें वरिष्ठ कायदेकौन्सिलचें पूर्वीचें स्वरूप कायम होतें व गोखल्यांना स्वतंत्र ठराव पुढें आणतां आले नाहींत. परंतु अंदाजपत्रकावरील त्यांचीं भाषणें पूर्वीप्रमाणेंच विचारपरिपूर्ण झालीं. कित्येक वेळां त्यांना त्याच त्या विचारांची व सूचनांची पुनरुक्ति करून त्यांची उपयुक्तता सरकारच्या नजरेस आणावी लागे. लष्करी खर्च व पब्लिक सर्व्हिस यासंबंधीं गोखल्यांचीं मतें सरकारला मान्य होणें संभवनीयच नव्हतें. परंतु त्यांच्या इतर बऱ्याचशा सूचना सरकारला ग्राह्य वाटल्या. तिजोरींतील शिल्लक देशाच्या भरभराटीची निवेदक नसून राज्यकारभाराच्या व्यवस्थेकरितां लागणाऱ्या रकमेपेक्षां रयतेकडून कराच्या रूपानें किती पैसा अधिक घेतला याचें द्योतक आहे, हें तत्त्व मान्य होऊन नवीन फायनॅन्स मेंबर मि. बेकर यांनीं कांहीं कर कमी केले, निरनिराळ्या खात्यांना आपल्या व्यवस्थेकरितां अधिक ग्रँट देऊं केली व स्थानिक करांचें उत्पन्न लोकलबोर्ड व म्युनिसिपॅलिट्या यांना बहाल केलें. एवढ्यावरच संतुष्ट होऊन स्वस्थ बसणारांपैकीं गोखले नव्हते. रयतेची सर्वांगीण उन्नति व्हावी म्हणून गोखल्यांनीं एक योजना करून सरकारपुढें ठेविली आणि ती अमलांत आणण्या-करितां पैसे कोठून व कसें आणावयाचें हेंहि त्यांनीं दाखविलें. कर कमी झाले असले तरी तिजोरींत थोडीबहुत शिल्लक पडत असे. शिवाय रूसो-जपान युद्धांत जपान यशस्वी झाल्यामुळें मध्य-एशिआंतील यूरोपीय राष्ट्रांच्या वर्चस्वाला आपोआपच निर्बंध घातला गेला आहे; तेव्हां रशियाच्या भीतीनें पूर्वी इतकेंच लष्कर कायम

ठेवण्याची जरूरी आतां राहिली नाहीं. लष्करी खर्च कमी करण्याची अनुकूल संधि आली आहे. तिचा फायदा घेऊन होईल ती बचत रयतेच्या हिताकरितां खर्च करणें अत्यावश्यक आहे. **गोखल्यांच्या** या प्रतिपादनाचा तात्कालिक फायदा झाला नसला तरी त्याचा पुढील सालच्या अंदाजपत्रकावर परिणाम झाला. १९०७-१९०८ सालचें अंदाजपत्रक सादर करितांना **ना. बेकरनीं** तीन महत्त्वाच्या सुधारणा केल्याचें जाहीर केलें. मिठावरील कर एक रुपयावर आणिला, प्राथमिक शिक्षणाकरितां अधिक ग्रँट दिली व लष्करी खात्याच्या खर्चांत कांटकसर केली. प्राथमिक शिक्षणाकडे सरकारचें लक्ष गेलें म्हणून **गोखल्यांनीं** समाधान व्यक्त केलें आणि सरकार शिक्षण लौकरच मोफत व सक्तीचें करील अशी आशा प्रदर्शित केली. **गोखल्यांना** काय माहित कीं, भविष्यकालांतील कटु अनुभव ह्या आशाबीजाचे अंकुर करपून टाकणार आहे !

पुढील सालच्या बजेटांत दहा वर्षांनंतर हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींत प्रथम तूट आली. उत्तर हिंदुस्थानांत दुष्काळ पडला होता; रुपयाच्या भावांत पुनः कमजास्त फेरबदल होऊं लागला आणि बाजारभाव एकाएकीं चढले. हिंदुस्थानांतील चलनी नाण्याची सदोष पद्धति या अनिष्टाच्या बुडाशीं आहे असें वाटून एकंदर परिस्थितीची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमावें म्हणून काँग्रेसनें मागणी केली. बाजारभावांतील वाढ व चलनी नाणें यांच्यामध्यें कांहीं तरी संबंध आहे असें मानणाऱ्यांपैकीं **गोखले** स्वतः एक होते. १८९३ सालापासून रुपयाच्या वास्तविक व दर्शनी किंमतीमध्यें फरक पडल्यामुळें रुपये वितळविण्याचा प्रघात बंद पडला; आणि प्रत्येक नवीन पाडलेला रुपया अगोदरच अस्तित्वांत असलेल्या रुपयांच्या राशींत भर टाकीत होता. १८९८ सालीं एकंदर १३० कोटी रुपये प्रचारांत असावेत असा सरकारचा अंदाज होता. तदनंतरच्या दहा वर्षांत

शंभर कोटींची भर पडली. या कारणामुळें बाजारभाव कडाडले असण्याचा पूर्ण संभव आहे. सरकारनें कमिशन नेमण्याचें नाकारलें. ना. बेकरनीं गोखल्यांचें आक्षेप खोडून टाकण्याकरितां बरेंच लांबलचक भाषण केलें आणि शेवटचा सिद्धांत म्हणून असें सांगितलें कीं, "as long as Government refrains from coining rupees except upon the demand of trade, there can be no dilution of the currency."

मोर्ले-मिंटोसुधारणान्वयें पुनर्घटित कायदेकौन्सिलच्या कामास १९१० सालच्या प्रारंभापासून सुरवात झाली. सुधारणांच्या योगानें मिळालेल्या स्वातंत्र्यास अनुसरून गोखल्यांनीं राज्यकारभाराच्या विविध प्रश्नासंबंधीं कौन्सिलपुढें ठराव आणिले; दुसऱ्यांनीं आणिलेल्या ठरावांवर भाषणें केलीं व सरकारच्या वतीनें येणाऱ्या परंतु लोकहिताला प्रतिकूल असलेल्या ठरावांना विरोध केला. विषयानुरोधानें याचें आपणाला चार विभाग करतां येतात. (१) आर्थिक Economic (२) लोकक्षोभनिवारक—measures to check popular agitation (३) राज्यकारभारविषयक—Administrative (४) शिक्षणविषयक—Educational. आर्थिक विषयावरील गोखल्यांचीं कित्येक मतें वर दिलींच आहेत. कांहीं ठरावांना तात्कालिक स्वरूप होतें आणि स्थलसंकोचास्तव बाकीच्यांबद्दल लिहितां येत नाहीं. एथें फक्त खुला व्यापार आणि संरक्षकपद्धतीचा व्यापार यासंबंधानें गोखल्याचें मत देणें आवश्यक दिसतें. ता. ९ मार्च १९११ रोजीं ना. दादाभाई यांनीं कापसावरील जकात कमी करण्याचा ठराव आणला होता. त्या ठरावाला अनुमोदन देतांना गोखल्यांनीं हिंदुस्थानच्या सांप्रतच्या परिस्थितींत संरक्षणपद्धतीपेक्षां खुल्या व्यापाराचें धोरण अधिक फायदेशीर कसें आहे तें दाखविलें. खुला व्यापार तत्त्वतः दोषार्ह

नसला तरी जेथें जगांतील सर्वच राष्ट्रें संरक्षणपद्धतीचा स्वीकार करीत आहेत तेथें हिंदुस्थानसारख्या औद्योगिक बाबतींत मागासलेल्या देशानें खुल्या व्यापाराचें धोरण पत्करणें अनिष्टावह आहे असें प्रतिपादन करणाऱ्या लोकांची दिशाभूल होत आहे. संरक्षणपद्धति हें महाभारतांत वर्णिलेल्या एका शस्त्राप्रमाणें आहे. तें शत्रूचा नाश तरी करील किंवा परत उलटून हातांत धरणारालाच मारून टाकील. जोंपर्यंत हिंदुस्तानचा कारभार लोकमतानुसार चालत नाहीं तोंपर्यंत हें शस्त्र आपल्याच अंगावर केव्हां परतेल याचा नेम नाहीं. गोखले म्हणतात, " It is, however, necessary to remember that there are two kinds of protection, the right kind and the wrong kind.........But, Sir, situated as India is, I fear that there is no likelihood of the right kind of protection being available to us and it is my delibes rate conviction that, in our present circumstance the policy of a free trade, reasonably applied is, after all the safest policy for us." याखेरीज अफूप्रकरण व रेल्वेवरील खर्च यासंबंधीं झालेलीं गोखल्यांचीं भाषणें त्या त्या विषयाचा अभ्यास करणारास उपयुक्त वाटल्यावांचून राहणार नाहींत.

सहनशक्तीला सुद्धां मर्यादा असते. हरघडीं इच्छेविरुद्ध गोष्टी होऊं लागल्या म्हणजे प्रतिकारबुद्धि जागृत व्हावयाचीच. कर्झन साहेबांच्या प्रतिगामी धोरणामुळें असंतुष्ट झालेलीं हिंदी लोकांचीं मनें प्रतिकाराचा मार्ग शोधूं लागलीं. बलिष्ठ शत्रूशीं गांठ पडली म्हणजे बलाबलाचा विचार करून परिस्थित्यनुरुप सौम्य उपायांचें अवलंबन करणें विचारी माणसांना मानवतें. परंतु विचारांचें गांठोडें विकाराच्या खुंटीला अडकवून ठेविल्यामुळें दिशाभूल झालेल्या ताज्या दमाच्या तरुणांच्या हातून अघोर कृत्यें घडतात. वंगभंगानंतर असंतोषवृत्तीच्या ज्वालामुखीनें जागृतावस्था धारण केली व अराजक

कृत्यांचा लाव्हा रस बाहेर पडूं लागला. त्यांना निर्बंध घालण्याकरितां कडक उपाय सरकारला आवश्यक वाटूं लागले. कर्झनच्या अमदानींत पास झालेल्या Official Secrets Act प्रमाणें सरकारला लोकांच्या सनदशीर चळवळीलाहि प्रतिबंध करण्याचा हक्क प्राप्त झाला होताच. पण तो अपुरा वाटूनच कीं काय १९०७ सालीं Seditious Meetings Act सरकारनें पास करून घेतला. सरकारनें योजलेला उपाय वस्तुस्थितीच्या मानानें पाहतां बराच कडक होता. त्यामुळें राजद्रोह नाहींसा होण्याच्या ऐवजीं अप्रत्यक्षरीतीनें त्याला प्रोत्साहनच दिल्यासारखें होत होतें हें **गोखल्यांनीं** सरकारच्या नजरेस आणिलें. १९१० व १९११ सालीं वादळ बरेंच शांत झालें होतें. निष्कारण धडपड करितांना श्रमाधिक्यामुळें आलेला थकवा घालविण्याकरितां राष्ट्रांत शांतता नांदत होती म्हणा अगर **मोर्ले-मिंटो सुधारणांनीं दिलेला** स्वराज्याचा हप्ता असंतोषवृत्तीला नियंत्रण घालण्यास समर्थ होता म्हणा, देशांत तात्पुरती तरी स्वस्थता दिसून येत होती. अशा वेळेला Seditious Meetings Act चें पुनरुज्जीवन **गोखल्यांना** असंमत होतें. परंतु त्यांच्या विरोधाचा सरकारावर कांहींएक परिणाम झाला नाहीं. प्रेसबिलाला संमति देतांनासुद्धां नवीन बिलानें सरकारला जो हक्क प्राप्त होणार होता त्याचा योग्य तऱ्हेनें उपयोग केला जावा, अशा तऱ्हेचे उपाय केवळ प्रतिकूल परिस्थिति पाहूनच योजावयाचे असतात, असा सरकारला **गोखल्यांनीं** इशारा दिला होता. परंतु त्याचा कितपत उपयोग झाला हें प्रेसबिलानें घातलेला धुमाकूळ ज्याला माहित आहे त्यास सांगावयास नकोच. गोखल्यांनीं बिलाला संमति दिली हें सर फेरोजशहा मेथांना आवडलें नाहीं असें म्हणतात.

राज्यकारभारविषयक बरेचसे ठराव लॉर्ड हार्डिंज यांच्या

कारकीर्दीत **गोखल्यांनीं** कौन्सिलपुढें मांडिले. त्यापैकीं District Advisory Boards व Resources of Local Bodies या विषयांवरील ठराव बरेच महत्त्वाचे होते. राज्यकारभाराचा जिल्हा हा एक घटक मानिला तर जिल्हाधिकारी व सामान्य जनता यांचा संबंध येण्यास संधिच मिळत नाहीं. **मोर्ले-मिंटो** सुधारणांमुळें वरिष्ठ व प्रांतिक सरकार यांच्यापुढें लोकांची बाजू मांडण्यास संधि सांपडं लागली आहे. सारांश त्यांना थोडेंबहुत प्रातिनिधिक स्वरूप येत चाललें आहे, परंतु स्थानिक स्वराज्याचें हक्क **लॉर्ड रिपन साहेबांनीं** चाळीस वर्षांपूर्वी दिलें तेवढेंच ! त्यांत आतांपर्यंत कांहींएक सुधारणा झाली नाहीं. लोकांचें म्हणणें सरकारला कळावें व लोकांनाहि सार्वजनिक कामाचें शिक्षण मिळावें अशा दुहेरी हेतूनें **गोखल्यांनीं** पहिला ठराव कौन्सिलपुढें आणिला होता. याशिवाय आणखीहि एक फायदा त्यांनीं सुचविलेल्या सुधारणेमध्यें अभिप्रेत होता. तो **गोखल्यांच्याच** शब्दांत देणें योग्य होईल. "The British Government in this country must be our Government, not a Government keeping us at arm's length, but really associating us in a responsible manner with the administration, so that we may feel that it is 'our' Government." दुसऱ्या ठरावानें म्युनिसिपॅलिट्या व लोकलबोर्ड यांचें उत्पन्न कायमचें वाढविण्यास सरकारला सल्ला दिला होता. स्थानिक स्वराज्याच्या संस्थांकडून ज्या कामाची सरकार अपेक्षा करितें त्याला पुरेसा पैसा त्यांच्या हातीं नसल्यामुळें त्यांच्या हातून तें काम बरोबर होत नाहीं. सरकार वरचेवर ग्रँट देतें हें खरें ! परंतु देणें न देणें सरकारच्या मर्जीवर अवलंबून असल्यामुळें त्याचा भरंवसा धरतां येत नाहीं. म्हणून कायम उत्पन्नाची सोय करण्यांत यावी व ती कशी करावी याची चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमावी असें सरकारला सुचविलें होतें.

प्राथमिक शिक्षणावरील गोखल्यांचे ठराव अत्यंत महत्त्वाचे होते. १९१०-११-१२ या तीनही सालीं प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्यांत यावें म्हणून लागोपाठ ठराव आणिलें. या बिलानें देशांत बरीच खळबळ उडवून दिली. अशी एकहि संस्था नव्हती कीं, जिनें ह्या बिलाला पाठिंबा दिला नाहीं. कांग्रेस, ठिकठिकाणच्या प्रांतिक परिषदा, मुस्लीम लीग वगैरे संस्थांनीं बिलाला आपली संमति दर्शविली. देशांतल्या बहुतेक प्रमुख ठिकाणीं सभा भरवून अनुकूल लोकमत प्रकट करण्यांत आलें. देशी वर्तमानपत्रकारच काय परंतु टाइम्स ऑफ इंडिया सारखीं अंग्लो-इंडिअन पत्रें सुद्धां बिलाला सहानुभूति दर्शविण्यांत पुढें आलीं. बिलाला विरोध सरकारकडूनच झाला; आणि सरकारला नापसंत असलेलें बिल पास होण्यासारखी वरिष्ठ कायदेकौन्सिलची रचनाच नव्हती. सरकारविरुद्ध म्हणून कांहीं लोक विरुद्ध होते तर कांहींना सार्वत्रिक शिक्षणाची उपयुक्तताच जाणतां येत नव्हती. कित्येकांना सक्तीचें तत्त्व मान्य नव्हतें तर कित्येक खर्चाला भिऊन मागें घेत होते. कौन्सिलपुढें हें बिल सादर करण्यापूर्वीं गोखले सर्व देशभर हिंडून माहिती गोळा करीत होते. प्रत्येक प्रांतांत जाऊन अधिकारी व पुढारी यांचीं मतें अजमावीत आणि अशा रीतीनें कडेकोट तयारी झाल्यानंतर बिल पुढें मांडिलें. **रयतेचें शिक्षण हें सरकारचें पवित्र कर्तव्य आहे**; आणि गेल्या साठ वर्षांतील प्रगति पाहतां हें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें जात नाहीं असें दिसून येतें. शिक्षण देणाऱ्या संस्था खेडोपाडीं काढणें एवढ्या एकाच मार्गानें इष्ट प्रगति होईल असें दिसत नाहीं. तेव्हां सक्तीहि केलीच पाहिजे आणि सक्ति करावयाची म्हटल्यास शिक्षण मोफत दिलें पाहिजे असा गोखल्यांच्या भाषणाचा इत्यर्थ होता. बिलावर येणाऱ्या सर्व आक्षेपांचें त्यांनीं निरसन केलें आहे. बिल नापास

होणार हें त्यांना अगोदर कळून चुकलेंच होतें; परंतु **गोखल्यांच्या** अंतश्चक्षूंना आशामय भविष्यकाल दिसत होता व आपल्या तत्त्वांचा केव्हांना केव्हां तरी जय हा ठेवलेलाच, अशी अंतर्यामीं खात्री झाली होती. **कर्तव्याच्या अनुष्ठानांतच समाधान मानणाऱ्या थोर विभूतींना पराजयाची मातब्बरी वाटत नसते.**

अत्यंत थोड्या अवधींत वरिष्ठ कायदेकौन्सिलांत **गोखल्यांनीं** जें अपूर्व स्थान पटकाविलें व जी अनन्यसाधारण कामगिरी केली ती पाहिली म्हणजे बुद्धि आश्चर्यानें स्तंभित होते व हृदय आदरानें उचंबळून येतें. आश्चर्यादराचा पहिला आवेग ओसरला व आपण त्याचीं कारणें शोधूं लागलों तर आपणांस काय दिसून येतें ? त्यांचीं कोणतींहि भाषणें आपण वाचिलीं तरी एक गोष्ट विशेष निदर्शनास येतें कीं, त्यांचा त्या त्या विषयाचा अभ्यास शक्य तितका संपूर्ण असे. राज्यव्यवस्थेचें कोणतेंहि अंग कौन्सिलपुढें विचाराकरितां आलें तरी तज्ज्ञाप्रमाणें **गोखले** त्या विषयांवर बोलत असत, एवढेंच नव्हे तर त्यांच्या आक्षेपांना उत्तर देणें सरकारी सभासदांनाहि कठिण जाई. वास्तविक पाहतां सरकारी सभासदांना माहिती मिळविण्याचीं वाटेल तितकीं अनुकूल साधनें उपलब्ध असतात. शिवाय त्यांना तोच एक उद्योग असतो. अशा सभासदांनाहि **गोखले** आपल्या पुराव्यानें कुंठित करीत असत. एकदां **लॉर्ड कर्झन** पर्शिअन गल्फकडे कांहीं कामानिमित्त गेले असतां Official Secrets Bill कौन्सिलपुढें विचाराकरितां आलें. त्यावेळीं **गोखल्यांनीं** केलेल्या प्रतिरोधी टीकेस समर्पक उत्तर व्हाइसरॉयसाहेबांच्या कार्यकारी मंडळांतील एकाहि सभासदास देतां आलें नाहीं. कलकत्त्याच्या 'इंग्लिशमन'नें ही हकीकत प्रसिद्ध करून कार्यकारी मंडळ नेमतांना इतःपर अधिक दक्षता घ्यावी असें सरकारला सुचविलें होतें. असेंहि सांगतात कीं, लष्करीखात्याच्या व्यवस्थेसंबंधीं सरकारविरुद्ध

आणावयाच्या आक्षेपांपैकीं कांहीं आक्षेप सेनापति लॉर्ड किचनेर यांच्या विनंतिवरून गोखल्यांनीं आपल्या भाषणांतून वगळले होते. गोखल्यांच्या मृत्यूनंतर कौन्सिलमध्यें बोलतांना लॉर्ड हार्डिंज म्हणाले:-" In regard to financial and educational questions in particular his attacks were frequently most forcible and incisive, so much so indeed that the abilities of his opponents were frequenty taxed to the utwost to meet his arguments."

अर्थशास्त्र, जमाबंदी ( Finance ) व आंकडेशास्त्र यांचा त्यांनीं कसून अभ्यास करून हिंदुस्थानचें आर्थिक धोरण कसें असावें यासंबंधीं पूर्ण विचारान्तीं कांहीं तत्त्वें शोधून काढिलीं होतीं आणि तीं सरकारच्या गळीं उतरविण्याचा त्यांचा दरवर्षीं प्रयत्न चालत असे. 'There is nothing like figures to bring an argument to book' या मोर्लेसाहेबांच्या वचनावर गोखल्यांचा विश्वास होता. कोणतीहि गोष्ट आंकडे देऊन सिद्ध केली म्हणजे प्रतिपक्षास प्रत्युत्तर देणें कठीण पडतें व आपल्या बाजूची शिबंदी अधिक बळकट होते. आंकडेशास्त्राचा जलवृक्षविरहित वालुकाप्रदेश बघणाराच्या दृष्टीला मनोरम करण्याची त्यांची हातोटी ग्लॅडस्टनसारखी होती असें सर जेम्स मेस्टन यांनीं एकदां उद्गार काढिले. आर्थिक विषयासंबंधीं गोखल्यांचीं भाषणें कित्येक प्रसंगीं सरकारला मार्गदर्शक कशीं होत असत हें आपण पाहिलें आहे. तज्ज्ञांच्या प्रशंसेला किंमत असते; कारण खरें नाणें कोणचें व खोटें कोणचें याची पारख तज्ज्ञांच्याशिवाय इतरांना क्वचितच होते. गोखल्यांच्या सोपपत्तिक व आमूलाग्र अर्थशास्त्रविषयक ज्ञानाची तज्ज्ञांनीं केलेली स्तुतीच वाचकांना सादर करितों. १९०६ सालच्या अंदाजपत्रकावर गोखल्यांचें भाषण झाल्यानंतर व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो म्हणाले,-" Even in England there were very few men on the front benches

capable of such an effort." १९१३–१९१४ सालीं प्रकृतीच्या अस्वास्थामुळें गोखल्यांना कौन्सिलला हजर रहातां आलें नाहीं. तेव्हां सर **गाय फ्लीटवुड विल्सन** यांनीं खालील उद्गार काढले,– "It is difficult for those who served in previons councils to express to those who are new to this Council what a great blank Mr. *Gokhale's* absence creates. It seems to be the play of *Hamlet* without *Hamlet*, and I think we all agree in wishing him a return to good health and a return to the Council next year."

---

## ८ कांग्रेस ( १९०४ ते १९१४ ).

"The future of public will be gravely imperilled if great questions are left to be fought out between ignorant change and ignorant opposition to change."

—*J. S. Mill.*

**कोणत्याही संस्थेस मान्यतेच्या शिखराला पोहोंचण्यापूर्वी उपहास, विरोध व सहानुभूति यांच्या पायऱ्या चढून जाव्या लागतात.** कांग्रेस ही सर्वस्वी प्रातिनिधिक स्वरूपाची असून अखिल राष्ट्राच्या वतीनें बोलण्याचा हक्क तिला पोहोंचतो असें सिद्ध होऊन सरकार व लोक यांमध्यें मान्यता पावण्यापूर्वी उपहासादिक प्राथमिक पायऱ्या तिला चढून जाव्या लागल्या आहेत. आरंभीं कांग्रेस ही हिंदु लोकांचीच फक्त चळवळ आहे असा आक्षेप कोणी पुढें आणिला; तर मूठभर सुशिक्षितांची चळवळ म्हणून तिला कोणी उपेक्षणीय ठरविलें. विरोध मुख्यतः मुसलमान व अंग्लो–इंडिअन

या दोन वर्गांकडून होत होता. स्थापनेला पांच वर्षे पुरीं होतात तोंच १८९० सालीं लॉर्ड लॅन्सडौन यांनीं कांग्रेसचें प्रातिनिधिक स्वरूप मान्य केलें. सर रिचर्ड गार्थ, सर चार्लस् डिल्क, ब्रॉडला, लॉर्ड मोर्ले वगैरे प्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्यांचें कांग्रेसच्या चळवळी-बद्दल अनुकूल मत होतें. १९११ सालीं भारतसम्राट् पंचम जार्ज यांनीं कांग्रेसच्या संदेशाचा स्वीकार केला. सरकारची मान्यता अशा तऱ्हेनें मिळाल्यावर अंग्लो-इंडियनांचा विरोध जागच्याजागींच जिरला. परंतु मुसलमानांनीं मात्र आपला विरोध बरेच दिवस कायम राखिला होता. विरोधांच्या कांटेरी मार्गांतून वाट काढीत काढीत कांग्रेस सर्व देशाची संस्था होत होती. संस्थानच्या भरभराटीला त्यां-मधील व्यक्तींचें कर्तृत्व कारणीभूत होतें. कांग्रेसला देशांत महनीय पद प्राप्त होण्यास ज्या राष्ट्रसूत्रधारांचें परिश्रम कारण झाले आहेत त्यांत गोखल्यांची मुख्यत्वेंकरून परिगणना केली पाहिजे. १८९७ सालानंतर १९०३ पर्यंत गोखल्यांनीं जरी एका दृष्टीनें अज्ञातवास पत्करला होता तरी या मुदतींत सुद्धां कांग्रेसच्या इतर कामकाजांत ते मन घालीत होतेच. त्या अज्ञातवासाच्या कालांत गोखल्यांच्या बद्दलचें लोकांचें मत बरेंच निवळलें; प्रांतिक व वरिष्ठ कायदेकौन्सिलमधील कामगिरी लोकांच्या दृष्टींत भरत होती आणि शुक्लपक्षांतील चंद्रिकेप्रमाणें त्यांची लोकप्रियता वृद्धिंगत होऊं लागली.

१९०५ सालीं गोखल्यांच्या अध्यक्षतेखालीं कांग्रेसचें अधिवेशन झालें. गोखले यावेळीं वरिष्ठ कायदेकौन्सिलचे सभासद होते. परंतु त्यांना अध्यक्षत्वाचा मान मिळण्यास त्यांची इंग्लंडमधील कामगिरी हें तात्कालिक कारण झालें. १९०४ सालच्या कांग्रेसच्या ठरावाप्रमाणें गोखले व लाला लजपतराय हे दोघे इंग्लंडला गेले. लाला लज-पतरायांचा बराचसा काळ न्यूयॉर्क, बोस्टन, शिकागो वगैरे

अमेरिकेंतील शहरांत व्याख्यानें देण्यांत गेल्यामुळें इंग्लंडमधील चळवळ फक्त गोखल्यांनाच करावी लागली. गोखल्यांची ही सफर फारच यशस्वी झाली. गोखल्यांनीं ४९ दिवसांत ४५ व्याख्यानें दिलीं. वंगभंगाची चळवळ व मँचेस्टरच्या कापडावरील बहिष्कार यामुळें हिंदुस्थानाची परिस्थिति कळून घेण्याची उत्सुकता इंग्लंड-मध्यें दिसून येत होती. या सुमारास गोखले तेथें गेल्यामुळें ती उत्सुकता शमण्यास इंग्लिश लोकांना थोडीफार संधि मिळाली. संपूर्ण माहिती व सबळ प्रमाणें यामुळें त्यांच्या व्याख्यानांचा परिणाम लोकांच्या मनांवर फार होत असे. व्याख्यानांच्या परिश्रमामुळें त्यांचा घसा दुखूं लागे. पण औषधें वगैरे लावून त्यांनीं व्याख्यानांचें सत्र चालूच ठेविलें. व्याख्यानांच्या शेवटीं हिंदुस्थानसंबंधीं विविध प्रकारचे प्रश्न श्रोत्यांकडून विचारण्यांत येत. त्यांना उत्तरें देण्यांत गोखल्यांचें चातुर्य व प्रत्युत्पन्नमतित्व दिसून येई. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास देणगी म्हणून स्वराज्य दिल्याचें जगाच्या इतिहासांत एक तरी उदाहरण सांपडतें कां ! असा प्रश्न एका श्रोत्यानें विचारला असतां गोखले म्हणाले, " I admit, there is no such precedent but the last chapter of world's history is as yet to be written." दिसेंबरच्या प्रारंभीं गोखले इंग्लंडहून जेव्हां परत आले तेव्हां संबंध देशांत त्यांच्या कामगिरीबद्दल प्रशंसापर उद्गार निघाले. पुण्यास तर त्यांचें विशेषच स्वागत करण्यांत आलें. या स्वागतसमारंभांत सर्व पक्षाच्या मंडळींनीं भाग घेतला होता. मूळ अभिनंदनपर ठराव सभेपुढें मांडतांना शिष्टाईची कल्पना आपल्या इकडे किती जुनी आहे, हें पौराणिक दाखले देऊन टिळकांनीं सिद्ध केलें व गोखल्यांच्या विलायतेंतील कामगिरीचें गौरवपर वर्णन केलें. 'केसरी'पत्रांत त्यांचा फोटो छापिला होता आणि 'विश्ववृत्ता'च्या पहिल्याच अंकांत इतिहासकार राजवाडे यांचा 'गोखल्यांची

'इंग्लंडांतील कामगिरी' या विषयांवर एक विस्तृत लेख प्रसिद्ध झाला. ममत्वाच्या भावनेमुळें गोखल्यांचें कौतुक महाराष्ट्रानें केलें असा यावर आक्षेप येण्याचा संभव आहे. परंतु इतर प्रांतांनीं त्या सालच्या कांग्रेसच्या अध्यक्षपदाकरितां गोखल्यांचें नांव सुचवून या आक्षेपाला परस्परच उत्तर दिलें.

या सुमारास देशाची परिस्थिति अत्यंत क्षोमकारक झाली होती. १८५७ सालच्या शिपायांच्या बंडाचा भडका राणीच्या जाहीरनाम्यांतील मधुमय अभिवचनांनीं शांत झाल्यानंतर अशान्ततेच्या वणव्यानें कर्झनच्या अमदानींत प्रथम पेट घेतला. लॉर्ड कर्झनची पंचवार्षिक पहिली अमदानी लोकांना फारशी त्रासदायक वाटली नाहीं. एका हिंदी स्त्रीवर अत्याचार करून ठार मारल्याबद्दल रंगूनच्या एका पलटणीला लॉर्ड कर्झनच्या सात्त्विक रोषाचे आघात सहन करावे लागले. पुढील सालीं सियालकोटच्या पलटणींतील शिपायांनीं हाच प्रकार पुनः केला; तेव्हां नुसता शाब्दिक निषेध करून न थांबतां त्यांना शिक्षा करण्यांत आली. हिंदी लोकांच्या अब्रूची मातीच्या मोलानें किंमत करणाऱ्या अंग्लो-इंडियनांच्या अंगाचा व्हाइसरॉयांच्या या कृत्यामुळें तर तिळपापड झाला; परंतु त्याच कारणास्तव हिंदी लोकांना समाधान वाटूं लागलें. सुदैवानें लॉर्ड कर्झनची कारकीर्द येथेंच संपती तर हिंदी लोकांच्या तसेंच त्यांच्या स्वतःच्याहि दृष्टीनें फार चांगलें झालें असतें. कारण हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षामध्यें अद्भुत क्रान्ति घडवून आणणाऱ्या या नवीन जागृतीचा उगम सरकारच्या ज्या प्रतिगामी कृत्यांत सांपडतो तीं सर्व कृत्यें कर्झनसाहेबांनीं आपल्या दुसऱ्या अमदानींत केलीं. राणीचा जाहीरनामा म्हणजे राजकीय हक्कांची भली मोठी सनद नसून केवळ अर्थवाद आहे असें प्रथमच कर्झनसाहेबांनीं सांगितलें. शिक्षणसंस्थांवरील सरकारचा ताबा दृढतर करण्यांत आला. कलकत्ता कार्पोरेशन-

मधील लोकनियुक्त सभासदांची संख्या कार्यक्षमता वाढविण्याच्या हेतूनें कमी करण्यांत आली. Official Secrets Bill सारखीं दडपशाहीचीं बिलें पास करून घेण्यांत आलीं. १९०३ सालच्या कांग्रेसच्या अध्यक्षांनीं हिंदुस्थान सरकारची रशियाच्या एकतंत्री व निरंकुश अंमलाशीं तुलना केली. इतकें झालें तरी लोकमताविरुद्ध वागण्याची कर्झनसाहेबांची हौस पुरली नसावी असें दिसतें आणि म्हणूनच भाषेनें, कायद्यानें, सुधारणेनें व इतिहासानें एकजीव झालेल्या बंगाली लोकांना फोडण्याची इच्छा त्यांच्या मनांत प्रादुर्भूत झाली. बंगालची विभागणी करण्याचा प्रश्न नवीन नव्हता. राज्यकारभाराच्या सोयीकरितां चित्तगांग प्रांत व डाक्का आणि मैमनसिंग हे जिल्हे आसामला सामील करून घेण्याची योजना आसामचे चीफ कमिशनर सर वुइलिअम् वार्ड यांनीं १८९६ मध्यें बंगाल सरकारकडे विचाराकरितां पाठविली. परंतु वार्डच्या मागून येणारे चीफ कमिशनर सर हेन्री काटन यांनीं ही योजना अव्यवहार्य ठरविली. ही जुनी योजना उकरून काढून बंगालची फाळणी करण्यांत राज्यकारभाराच्या सोयीपेक्षां हिंदी लोकांत जी नूतन जागृति उत्पन्न झाली होती तिला निर्बंध घालण्याचा सरकारचा हेतु होता. ता. ३ डिसेंबर १९०३ ला सरकारच्या हेतूची परिस्फुटता झाल्यापासून फाळणी रद्द होण्याकरितां बंगाली लोकांनीं विनंत्या केल्या, अर्ज पाठविले व मोठमोठ्या जाहीरसभा भरवून निषेध प्रदर्शित केला. पण त्याचा तिळमात्र उपयोग न होतां १९०५ सालच्या आक्टोबर महिन्याच्या सोळाव्या तारखेस लेखणीच्या फटकाऱ्यानें बंगालचीं दोन छकलें करण्यांत आलीं. कर्झनसाहेबांनीं आपला हट्ट तडीस नेला पण त्यामुळें बंगाली लोकांच्या अंतःकरणांना घरे पडलीं. सर्व सनदशीर मार्गांची अनुपयुक्तता कळून आल्यावर तरुणांचीं मनें अत्याचाराकडे झुकूं लागलीं व विचारी लोक प्रभावी उपायांच्या शोधास लागले. कर्झन-

साहेबांनीं सुप्तावस्थेंत असलेल्या राष्ट्राचें चैतन्य जागृत केलें व स्वातंत्र्येच्छेच्या जठराग्नीची जाणीव उत्पन्न केली. सुरेंद्रबाबू म्हणतातः—" He has built better than he knew; he had laid broad and deep the foundations of our national life. He has stimulated those forces which contribute to the upbuilding of nations. He has made us a nation and the most reactionary of the Indian Viceroy will go down to posterity as the architect of the Indian National life."

लोकांचीं मनें प्रक्षुब्ध होऊन सरकारविरुद्ध प्रतिकारबुद्धि जागृत झाली होती; आणि नूतन जागृतीचे कांहीं पुरस्कर्ते निर्भेळ स्वातंत्र्याच्या वल्गना करीत होते. एका बाजूला सरकारचें दडपशाहीचें धोरण व दुसऱ्या बाजूला उत्साहप्रधान आणि विवेकशून्य लोकसमुदाय! परस्परविरोधी प्रवाहांच्या लाटा सभोंवार आदळत असतां कांग्रेसची नौका पैलतीराला सुखरूप पोहोंचती करण्यास गोखल्यांच्यासारखा विचारी पुढारी अध्यक्षपदाला लागला हें देशाचें सुदैवच समजलें पाहिजे. गोखल्यांनीं आपल्या भाषणांत लॉर्ड कर्झनला औरंगजेबाची उपमा दिली होती. लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीवर केलेली टीका फारच कडक व झणझणीत होती. ते म्हणाले, " Gentlemen! how true it is that to everything there is an end! Thus even the viceroyaty of *Lord Curzon* has come to a close! ......To him *India* was a country where the Englishman was to monopolise for all time to come all power and talk all the while of duty.......In his scheme of things there was no room for the educated classes of the counrtry......India exists only as a scene of the Englishman's labours, with the toiling millions of the country in the background."

बंगालची फाळणी करण्यांत राज्यकारभाराची यत्किंचितहि सोय होत नसून राष्ट्रीय चळवळीला हागून पाडण्याचा तिचा उद्देश आहे. सर्व राष्ट्रानें एकमतानें विरोध केला असतांहि सरकार आपला हेका सोडीत नसेल तर लोकांच्या हिताकरितांहि सरकारशीं सहकारिता करण्याची मुळींच आशा राहिली नाहीं असें गोखले वैतागानें लिहितात. स्वदेशी चळवळीचा त्यांनीं पुरस्कार केला; परंतु बहिष्काराची चळवळ निर्वाणीचें शस्त्र म्हणून उपयोगांत आणावयाची असते असें त्यांनीं सांगितलें. बहिष्काराची चळवळ द्वेषमूलक असून स्वदेशीला पाहिजे तितकी परिपोषक नाहीं. यानंतर देशाच्या आर्थिक स्थितीचा विचार करून गेल्या तीस वर्षांतील राजकीय प्रगतीचा त्यांनीं आढावा काढिला आहे. गोखल्यांच्या या भाषणांवर अंग्लोइंडिअन पत्रकारांनीं बरीच कडक टीका केली. गोखल्यांनीं कर्झनसाहेबांची औरंगजेबाशीं केलेली तुलना मुंबईच्या टाइम्सकाराला बरीच झोंबली व गोखल्यांनीं आपला नेहमींचा नेमस्तपणा सोडला म्हणून तक्रार केली. गोखल्यांनीं आपल्या भाषणाच्या शेवटीं हिंदी रयत दरिद्री कशी होत आहे हें मृत्यूचें दरहजारीं प्रमाण देऊन सिद्ध केलें होतें. या विधानावर टीका करितांना मद्रास टाइम्सनें प्लेगचे आंकडे जमेस धरल्यामुळें अनुमान बरोबर नाहीं असें म्हटलें होतें. त्यांस गोखल्यांनीं लगेंच उत्तर दिलें आणि प्लेगनें जरी मृत्युसंख्या वाढली असली तरी दारिद्र्य व उपासमार यांनीं निःसत्त्व झालेले लोकच प्लेगला तात्काळ बळी पडतात हें आंकडे देऊन सिद्ध केलें.

या सालींहि इंग्लंडला डेप्युटेशन पाठविण्याचें कांग्रेसनें ठरविलें. त्याप्रमाणें एप्रिल महिन्यांत गोखले इंग्लंडला रवाना झाले. मध्यंतरीं इंग्लंडमधील परिस्थिति बरीच बदलली. कॉन्झर्वेटिव्ह पक्ष जाऊन लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला. निवडणुकीची धामधूम थांबली. त्यामुळें व्याख्यानें देत फिरण्यापेक्षां गोखल्यांना पार्लमेंटमधील सभासदांच्या

भेटी घेणेंच आवश्यक दिसलें. कारण हिंदुस्थानचें भवितव्य पार्लमेंटच्या सहानुभूतीवर बरेंचसें अवलंबून होतें. त्यांनीं सुमारें १५० सभासदांच्या गांठी घेऊन हिंदुस्थानविषयक प्रश्नांमध्यें आम्ही आस्थापूर्वक लक्ष घालीत जाऊं असें अभिवचन त्यांच्याकडून मिळविलें. कॅबिनेटमधील सभासदांच्याहि भेटी घेतल्या. अर्थात् मोर्लेसाहेबांबरोबर त्यांच्या ज्या बैटकी झाल्या त्या विशेष महत्त्वाच्या होत्या. त्यांची हकिकत यथाक्रम वाचकांना सादर केली जाणारच आहे. याखेरीज हिंदुस्थानचे अंडर-सेक्रेटरी मि. एलिस व इंग्लंडचे त्यावेळचे मुख्य प्रधान सर हेन्री कॅम्बेल-बॅनरमन यांनीं गोखल्यांना भेटीस बोलाविलें होतें आणि हिंदुस्थानविषयक कित्येक प्रश्नांचा त्यांनीं बराच खल केला. गोखले आपली कामगिरी संपवून १४ सप्टेंबर १९०६ ला परत आले.

१९०६ सालची कांग्रेस दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखालीं भरली. त्यावेळींच कांग्रेसमध्यें दोन पक्ष दिसून येऊं लागले. लिबरल पक्ष अधिकारूढ झाला आहे त्याला विचार करण्यास कांहीं वेळ द्या, इतक्यांतच घाई करून जहरी उपायांचें अवलंबन करूं नका, आततायीपणा केला तर ज्यास्त मिळणें तर दूर राहोंच पण जें मिळणें शक्य आहे तेंहि दूरावेल असें गोखल्यांचें मत होतें. आघात जितक्या जोराचा तितक्याच जोराचा प्रत्याघात असतो. सरकारच्या दडपशाहीच्या धोरणामुळें हिंदी लोकांचीं मनें इतकीं बिथरलीं कीं, इतके दिवस साम्राज्यांतर्गत स्वराज्य मान्य करणाऱ्या लोकांनाहि ब्रिटिशांचा संबंध नाहींसा करून टाकावा असें वाटूं लागलें. लोकांची महत्त्वाकांक्षा मर्यादित करण्याची कोणाचीहि इच्छा नव्हती, पण ती शक्यतेच्या कोटींत आहे किंवा नाहीं हें पाहणें जरूर होतें. लोकांमध्यें उत्पन्न झालेल्या नूतन जागृतीचा व्यय अव्यवहार्य व अशक्य ध्येयांच्या मागें लागून शब्दांचे फवारे सोडण्यांत होऊं न देतां

त्याचा उपयोग खरोखरच राष्ट्रहित ज्या उपायांनीं साधेल तिकडे करून घ्यावयाचा हें गोखले व त्यांचा पक्ष यांपुढील कार्य होतें. १९०६ सालीं या दोन पक्षांमध्यें अधिकाधिक अंतर दिसून येऊं लागलें. कलकत्ता-कांग्रेसच्या वेळीं बहिष्काराच्या ठरावावर कडाक्याचा वाद झाला व पाल, खापर्डे वगैरे राष्ट्रीय पक्षाची मंडळी विषयनियामक कमिटी सोडून चालती झाली. बहिष्कार हें शस्त्र बंगालनें हातीं धरावें या मुद्द्यांवर सर्वांचें एकमत होतें. परंतु बंगालला सहाय्य करण्याकरितां अखिल राष्ट्रानें त्याचा स्वीकार करावा असा राष्ट्रीय-पक्षाचा आग्रह दिसून येत होता. बहिष्काराच्या ठरावावर कांग्रेस-मध्यें बोलतांना पालबाबूंनीं याच मताचा अनुवाद केला. गोखल्यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं कांग्रेसचा ठराव बंगाल प्रांतापुरता आहे आणि बहिष्कार त्यांनीं अवश्य अंमलांत आणावा, इतर प्रांतांना तो ठराव बंधनकारक नाहीं; मग व्यक्तिशः कोणाचें मत कसेंही असो !

कलकत्ता-कांग्रेसमध्यें दिसून आलेला हा मतभेद पुढील सालांत वाढतच गेला. कांग्रेसच्या दूरदर्शी पुढाऱ्यांनीं राष्ट्रीयसभेचें ठरविलेलें अंतिम ध्येय व तें संपादन करण्याचे मार्ग लोकांच्या विश्वासांतून उतरत होते. ब्रिटिश सार्वभौमत्वाखालील स्वराज्य म्हणजे काय? इतर स्वतंत्र राष्ट्रांतील स्वराज्याच्या धर्तीवर हें स्वराज्य होणार असेल तर ब्रिटिशांचें आधिपत्य राहिलें कोठें? हिंदी लोकांना मिळणाऱ्या या स्वराज्यांत सैन्य व खजिना यांवरील ताबा, औद्योगिक स्वातंत्र्य देशोपयोगी कायदे करण्याची मुभा, ह्या व ह्यासारख्या गोष्टींचा अंतर्भाव होत असेल तर हिंदुस्थानापासून आज जे अनेकविध फायदे होत आहेत त्यांस इंग्लंडला मुकावें लागणार आणि वरील हक्क जर कांग्रेसनें ठरविलेल्या स्वराज्याच्या ध्येयांत समाविष्ट होत नसतील तर त्याला स्वराज्य तरी कसें म्हणावयाचें? साम्राज्यांतील स्वराज्य म्हणजे

केवळ विरोधाभास आहे. तेव्हां अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या धर्तीवर स्वराज्य संपादन करणें हेंच हिंदुस्थानचें अंतिम ध्येय असलें पाहिजे. इंग्लंडला भाग पाडल्याशिवाय खरें स्वराज्य भिक्षांदेहीच्या वृत्तीनें आम्हांस कधींहि मिळणार नाहीं आणि स्वदेशी व बहिष्कार यांचा संबंध राष्ट्रानें स्वीकार करणें हाच एक उपाय स्वराज्यसाधनाला दिसतो. अशा तऱ्हेचीं राजकीय मतें राष्ट्रीयपक्षाचे पुढारी **टिळक व पाल हे देशांत फैलावित होते.** हीं तत्त्वें **गोखल्यांना** अर्थात्च मान्य नव्हतीं. त्यांना एका गोष्टीची विशेषतः चीड आली. १९०६ सालच्या कांग्रेसमध्यें पास झालेल्या ठरावांची ओढाताण करून कांग्रेसलाहि वरील मतें मान्य आहेत असें दाखविण्याचा विरुद्धपक्षाचा प्रयत्न चाललेला असे. त्याला कांहींतरी निर्बंध घातला जावा अशा हेतूनें उत्तरहिंदुस्थानांत १९०७ सालच्या प्रारंभीं **गोखल्यांनीं** एक व्याख्यानाची मोहीम काढली. या व्याख्यानांतून त्यांनीं जीं राजकीय मतें प्रतिपादन केलीं तीं पाहिलीं म्हणजे **त्यांचा दूरदर्शीपणा, देशहिताची खरी कळकळ व व्यावहारिक दृष्टि हे गुण प्रत्ययास येतात.** प्रतिकूल व बलाढ्य सरकार आणि अज्ञानी व प्रगतिविरोधक सामान्य जनता या दोहोंच्या कात्रींत सुशिक्षित वर्ग सांपडला आहे. ब्रिटिश अंमलाविषयीं प्रथम प्रथम वाटणारें प्रेम आतां नष्ट झालें असून सुशिक्षितांची वृत्ति अधिकाधिक असंतोषी होत आहे. अशा स्थितींत आपण काय करावयाचें अथवा आपणाला काय करतां येणें शक्य आहे ? तत्त्वतः निर्दोष असें राष्ट्राचें अंतिम ध्येय आज आपणाला निश्चित करावयाचें नसून व्यावहारिक शक्यता कशाची आहे हें पाहिलें पाहिजे. साम्राज्यांतर्गत स्वराज्याला अशक्य ठरवून त्याचा उपहास करणारे लोक अशक्यतर गोष्टी बोलूं लागले आहेत. साम्राज्यांतर्गत स्वराज्याचें ध्येय व्यवहार्य तर आहेच पण त्याशिवाय ह्या ध्येयाला इंग्लंडमधील

उदारमतवादी लोकांचा पाठिंबा मिळण्याचा संभव असल्यामुळें हिंदुस्थानचें कार्य सुकर होणार आहे. ध्येय संपादन करण्याकरितां सनदशीर मार्गाचाच आपण अवलंब केला पाहिजे. पाशवी शक्तीचा उपयोग, अत्याचार व परकीय सत्तेस हिंदुस्थानावर स्वारी करण्यास उत्तेजन या गोष्टी वर्ज्य करून सरकारला अर्ज व विनंत्या करण्यापासून तों तहत सत्याग्रहापर्यंत सर्व तऱ्हेचे मार्ग सनदशीरच आहेत. ब्रिटिश मालांवर बहिष्कार आणि तोसुद्धां बंगालप्रांतापुरताच गोखल्यांना मान्य होता. ब्रिटिश मालाप्रमाणें ब्रिटिशसरकार व संस्था यावरील सार्वत्रिक बहिष्काराला त्यांचा पूर्ण विरोध होता. हिंदुस्थानच्या भविष्यकालावर गोखल्यांचा विश्वास होता. राष्ट्रकार्य करितांना संकटें येणारच व पदोपदीं निराशा होणारच. तथापि त्यांची पर्वा न करितां उज्ज्वल भविष्य कालावर नजर देऊन आशामय अंतःकरणानें राष्ट्रघटनेच्या कामाला लागलें पाहिजे.

देशांत राजकीय विचारांचे हे दोन प्रवाह सुरू झाल्यानंतर व्यक्तिद्वेषानें तत्त्वनिष्ठेची जागा पटकावली व राजकीय वातावरण दूषित झालें. देशांत दिसून येत असलेल्या दुफळीचा परिणाम कांग्रेसवर झाल्यावांचून राहिला नाहीं. बावीस वर्षें सुरळित चाललेली कांग्रेसची नौका मतभेदाच्या वादळानें झुकत जाऊन अखेरीस पक्षद्वेषाच्या खडकावर आदळली. कांग्रेसच्या इतिहासांत सुरतेचा बखेडा हें एक दुःखद परंतु बोधप्रद प्रकरण आहे. संमतिवयाच्या बिलापासून महाराष्ट्रांत दोन पक्ष निर्माण झाले होते. दोन्ही पक्षाच्या राजकीय मतांमध्यें प्रथमारंभीं बिलकूल फरक नव्हता असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां या क्षेत्रांत तरी दोन्ही पक्षांनीं एकजुटीनें व एकदिलानें काम करण्यास हरकत नसावी हें तत्त्व उपदेशिण्यास जितकें सोपें तितकें त्याचें आचरण दुष्कर असतें! १८९६ सालच्या सार्वजनिक सभेच्या वादामुळें दोन पक्षांची कायमची फारकत झाली,

आणि मतैक्य असो वा नसो एकाच संस्थेंत दोन्ही पक्षांनीं एकसमयावच्छेदेंकरून इतःपर राहणें केवळ अशक्य झालें. महाराष्ट्रांत दृग्गोचर झालेले हे पक्षभेद पुढील दहा वर्षांत सर्व हिंदुस्थानभर दिसून येऊं लागले. बंगालच्या फाळणीला विरोध करण्यांत कोणत्याही पक्षानें कसूर केली नाहीं हें खरें! परंतु तदनंतर सरकारला विरोध करण्यास राष्ट्रानें ज्या उपायांचें अवलंबन करावें असें एका पक्षाला वाटे तें दुसऱ्या पक्षास पटत नव्हतें. १९०५ सालच्या कांग्रेसमध्येंच नवीन पक्षानें डोकें वर काढण्यास सुरवात केली. पक्षभेद विकोपाला जाऊन कांग्रेसमध्यें फूट पडूं नये म्हणून मेथांना हजर राहण्याबद्दल गोखल्यांनीं तारेनें विनंति केली होती. १९०६ सालच्या कांग्रेसचे ठराव दोन पक्षांतील एकी कायम राहावी म्हणून 'त्वयार्धं मयार्धं' या न्यायानें तडजोडीच्या स्वरूपाचे करण्यांत आले होते. पण जेथें मनःप्रवृत्तिमध्येंच मूलतः भेद तेथें ही तकलुपी तडजोड किती काळ टिकणार! तापी नदीच्या तीरांवर या बेगडी ऐक्याला मूठमाती मिळाली व एका पक्षाला कांग्रेसमधून बाहेर पडावें लागलें.

गोखले स्वतः यावेळीं कांग्रेसच्या सूत्रचालकांपैकीं एक होते. सुरतेला जे प्रकार घडले त्याची साद्यंत हकिकत येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. झालेल्या प्रकारांत गोखल्यांचा हात कितपत होता हें पाहिलें म्हणजे झालें! सर फिरोजशहा मेथा बसल्याजागीं राहून कांग्रेसची दिशा ठरवावयाचे पण प्रत्यक्ष कामाचा सर्व बोजा गोखल्यांच्यावरच पडे. त्यामुळें प्रतिपक्षाकडून होणाऱ्या टीकेचा भडिमार सामुदायिक दृष्टीनें नेमस्तपक्षांवर होत असला तरी त्यांत व्यक्तिशः गोखल्यांना उद्देशून बराचसा भाग असे. अवांतर गोष्टी सोडून दिल्या तर राष्ट्रीय पक्षाच्या विरोधाची उभारणी कांग्रेसचें अंतिम साध्य, घटना व धोरण या तीन तत्त्वांवर केली होती. कांग्रेस ही सर्व हिंदुस्थानच्या लोकांची–सर्व राष्ट्रहितेच्छु लोकांची संस्था आहे, तेव्हां सर्व पक्षांच्या

लोकांचा समावेश होऊन कांग्रेसची सर्वसंग्राहकता कायम राहील असेंच कांग्रेसचें ध्येय ठरविलें पाहिजे. राजकीय चळवळींचा अंतिम हेतु सर्वांचा सारखाच असेल असें नाहीं. कान्स्टिटयूशनच्या ठरावांमध्यें राष्ट्रीयपक्षाला असंमत असलेलें 'अंतिम साध्य' घातलें होतें; आणि हें ज्यांना मान्य अशांनाच फक्त कांग्रेसचे दरवाजे खुले ठेविले होते. एका विवक्षित पक्षाचें 'अंतिम साध्य' दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न केला. असंमत असलेल्या 'अंतिम साध्या'ला मान्यता देऊन दांत काढलेल्या नागिणीप्रमाणें दुबळ्या झालेल्या कांग्रेसमध्यें तरी रहा अथवा ती सोडून चालते व्हा असा दुहेरी पेंच राष्ट्रीयपक्षापुढें **ना. गोखल्यांनीं** टाकिला, हा **गोखल्यांच्या**वरील पहिला आरोप होता. कांग्रेसमध्यें राष्ट्रीयपक्षाचे अस्तित्व असह्य झालें म्हणून घटना बदलून राष्ट्रीयपक्षास हांकून लावण्याची युक्ति नेमस्तपक्षातर्फे **ना. गोखल्यांनीं** केली, हा दुसरा आक्षेप व कांग्रेसचा स्वावलंबीपणा वाढून कांग्रेसचें पाऊल पुढें पडावें म्हणून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या ज्या चार ठरावांकरितां कलकत्त्यास राष्ट्रीय पक्ष निकरानें झगडला त्या चतुर्विध कार्यक्रमांत काटाकाट करण्याची दुर्बुद्धि **ना. गोखल्यांना** झाली, हा त्यांच्या वरील तिसरा आक्षेप. या सर्व आक्षेपांस ता. ८ जानेवारी. १९०८ रोजीं निरनिराळ्या वर्तमानपत्रांना एक पत्र लिहून **गोखल्यांनीं** उत्तर दिलें. कांग्रेसचें पूर्वीचेंच अंतिम साध्य "वसाहतींच्या धर्तीवर स्वराज्य" कायम आहे. स्वराज्य हा शब्द कलकत्त्याच्या ठरावामध्यें नसून दादाभाई नौरोजींच्या भाषणांत फक्त आलेला आहे; तेव्हां स्वराज्य हें कांग्रेसचें ध्येय होतें अशी हाकाटी राष्ट्रीय पक्षानें चालविली आहे, पण ती निराधार आहे. कांग्रेस कार्यक्षम होण्यास कांग्रेसची घटना बदलणें कालप्राप्तच होतें. कांग्रेसनें पीछेहाटीचें धोरण स्वीकारलें ह्या आक्षेपांत तर कांहींच अर्थ नाहीं. कारण कलकत्ता कांग्रेसनें पास

केलेले चारी ठराव क्षुल्लक शाब्दिक भेद सोडून दिल्यास जसेच्या तसेच आहेत. ' झळ सोसूनहि ' (even at a sacrifice) हे शब्द स्वदेशीच्या ठरावांत नजरचुकीनें राहिले होते. ही चूक नजरेस आणिल्याबरोबर दुरुस्त करण्यांत आली. बहिष्काराच्या ठरावांत Boycott movement inaugurated in Bengal या शब्दांऐवजीं Boycott of British goods resorted to in Bengal हे शब्द घालण्यांत आले. हा फरक महत्त्वाचा होता हें खरें ! बंगालनें सार्वत्रिक बहिष्काराच्या कडकडीत व्रताचा अंगीकार केला होता, त्यास इतर प्रांतांनींही सहाय्य करावें आणि कांग्रेसचा तसा आदेश आहे असा बहिष्काराच्या ठरावाचा अर्थ गेल्या सबंध वर्ष-भर राष्ट्रीय पक्षाचे पुढारी करीत होते. परंतु बंगालनें उचललेलें बहिष्कार शस्त्र फक्त विलायती मालापुरतें आणि बंगालपुरतेंच आहे असा काँग्रेसच्या ठरावाचा अभिप्रेत अर्थ होता. हा अर्थ असं-दिग्ध भाषेंत सांगण्याकरितां जेवढा शाब्दिक भेद करणें इष्ट होतें तेवढाच केला आहे. राष्ट्रीय शिक्षणावरील ठरावांत केलेला फरक फक्त भाषासौष्ठवाकरितां केला आहे. हे फेरफार तत्त्वतः जरी विशेष हानिकारक नव्हते तथापि त्यावेळचें वातावरण पक्षभेदाच्या हवेनें इतकें दूषित झालें होतें कीं अशा सामान्य शाब्दिक भेदांवरहि नानातऱ्हेचे तर्ककुतर्क लढविण्यांत येऊन नेमस्तपक्षानें कांग्रेसची पुच्छप्रगति कशी चालविली आहे हें भासविण्यापुरता त्यांचा उपयोग प्रतिपक्षानें करून घेतला. ठरावांचा मसुदा तयार करितांना गोखल्यांना कांग्रेसला मागें ओढावयाचें नव्हतें. कलकत्त्यास जे ठराव झाले त्यांची भाषा कांटे-कोरपणाची नसल्यामुळें कांग्रेसच्या नांवावर राष्ट्रीयपक्षानें जीं मतें देशांत प्रसृत करण्याचा सपाटा चालविला होता, त्यास निर्बंध घालून राष्ट्रीय सभेचें ध्येय व कार्यक्रम निःसंदिग्ध भाषेंत सांगाव-याचें हा गोखल्यांचा शाब्दिक फेरफार करण्यांत हेतु होता. देशा-

मिमानाच्या क्षणिक आवेशानें कल्पनेला रिझविणारें अव्यवहार्य ध्येय राष्ट्राच्या पुढें टेवून कांग्रेसचें हंसें करून घेण्याची त्यांची इच्छा नव्हती.

तत्त्वनिष्ठ मतभेदाच्या जोडीला तात्कालिक महत्त्वाचीं आनुषंगिक कारणें मिळून सुरतेला कांग्रेस भरणें अशक्य झालें. सुरतेस नेमस्त-पक्षांच्या प्रतिनिधींच्या परिषदेनें ठरविल्याप्रमाणें एप्रिलमध्यें अलाहाबादला सुमारें शंभर नेमस्तांची सभा भरून कांग्रेसचें कार्य पुढें चालू टेवण्याकरितां कांग्रेसची नवीन घटना तयार करण्यांत आली. यापुढील आठनऊ वर्षें राष्ट्रीयपक्ष कांग्रेसपासून विलगच राहिला. एक पंख मोडला म्हणजे पक्षी जसें दुबळे होतात त्याप्रमाणें राष्ट्रीय-पक्ष बाहेर पडल्यामुळें कांग्रेसची स्थिति झाली. कर्झनशाहीनंतर देशांत जो आवेश व उत्साह दिसून येत होता तो पुढील कांहीं वर्षांत थंडावला यांत शंका नाहीं. राष्ट्रीयपक्षाचे पुढारी सरकारच्या प्रकोपाला बळी पडले हें या स्वस्थतेचें एक कारण होतें. परंतु कांग्रेस आज कित्येक वर्षें ज्या सुधारणा मिळविण्यासाठीं प्रयत्न करीत होती त्या सुधारणा मिळाल्यानंतर देशांत चळवळ करण्यापेक्षां त्यांचा देशाच्या हिताधिक्याकडे फायदा करून घेण्याचीच जरूरी उत्पन्न झाली. हिंदी लोकांना पाहिजे होते तितके हक्क मोर्ले-मिंटो सुधारणांच्या योगानें मिळाले नाहींत हें खरें! परंतु 'मिळालें तें' पदरांत पाडून 'मिळवावयाचें' होतें; त्याबद्दल देशांत चळवळ चालू ठेवणें इष्टच होतें. कांग्रेसच्या अस्तित्वाची कांहींच जरूरी नाहीं असें सर व्हॅलेंटाइन चिरोलसारख्या टीकाकारांनीं म्हणण्यास कमी केलें नाहीं. परंतु या सर्व विरोधाला बाजूला सारून गोखल्यांच्या प्रयत्नामुळें कांग्रेसचें अधिवेशन दरसाल भरत असे. १९१० सालीं वेडरबर्न यांना कांग्रेसच्या अध्यक्षत्वाचा पुनः मान देण्यांत आला. परंतु वेडरबर्नसाहेबांनीं आजारांतून नुकतेंच उठले असल्यामुळें हिंदुस्थानचा प्रवास करण्याची ताकद त्यांच्या अंगांत राहिली नव्हता. त्यांची

पत्नी व सल्लागार डॉक्टर मंडळी हिंदुस्थानाला जाण्याच्या विरुद्ध होती. परंतु सर **वुइलिअमना** सुखरूप पोहोंचतें करण्याची हमी **गोखल्यांनीं** उचलली, आणि **वेडरबर्न**साहेबांना इकडे पाठविण्याबद्दल त्यांच्या पत्नीची संमति मिळविली. मुंबई बंदरावर उतरल्यापासून तो कलकत्त्याहून **वेडरबर्न**साहेबांची इंग्लंडला रवानगी करीपर्यंत त्यांच्याबरोबर सारखें राहून **गोखल्यांनीं** प्रायव्हेट सेक्रेटरीप्रमाणें त्यांचें सर्व काम केलें. अध्यक्षस्थानावरून **वेडरबर्न**साहेबांनीं केलेलें भाषण तयार करण्यांत **गोखल्यांचा** हात होता असेंहि समजतें. १९११ सालच्या कांग्रेसनें **गोखल्यांच्या** प्राथमिक शिक्षणाच्या बिलास पाठिंबा दिला. या वेळेला दक्षिण–आफ्रिकेंतील हिंदी लोकांची दुःस्थिति–हा प्रश्न जनतेपुढें प्रामुख्यानें आला होता. हा विषय कांग्रेसपुढें आणण्याचें काम **गोखल्यांनींच** केलें. **गोखल्यांची** दक्षिण-आफ्रिकेसंबंधीं कामगिरी अत्यंत महत्त्वाची असल्यामुळें त्याचें विवेचन एका स्वतंत्र भागांत करणेंच योग्य होईल. १९१३।१९१४ सालच्या कांग्रेसच्या अधिवेशनांना **गोखल्यांना** प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हजर राहतां आलें नाहीं. १९१३ सालीं **गोखले** येत नाहींत असें कळल्यावर कराचीच्या चारशें नागरिकांनीं आपल्या सह्यांनिशीं **गोखल्यांच्याकडे** एक विनंतिवजा अर्ज पाठविला आणि कांग्रेसमध्यें कांहींहि भाग घेऊं नका, पण आम्हांला फक्त दर्शन द्या अशी त्यांची प्रार्थना केली. कांग्रेसच्या अधिवेशनास हजर राहण्याचें आजपर्यंत अखण्ड चालत आलेलें मत केवळ प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें मोडण्याचें गोखल्यांच्याहि जीवावर आलें. " There is a limit, how much the spirit can do to keep up the body." या वचनाप्रमाणें प्रबल इच्छा असतांहि आदल्या सबंध वर्षभर केलेल्या श्रमाधिक्यामुळें त्यांच्या प्रकृतीस क्षीणता आली होती आणि त्यांना विश्रांतीची अत्यंत जरूरी होती.

त्यामुळें कराचीच्या लोकांचा त्यांना विरस करावा लागला. पुढील सालींहि गोखले कांग्रेसला हजर राहूं शकले नाहींत. वीसपंचवीस वर्षें कांग्रेसशीं असलेल्या संबंधाचा अशा रीतीनें शेवट झाला आणि कांग्रेस व पर्यायानें अखिल हिंदुस्थान गोखल्यांच्या सेवेला अंतरलें.

---

# ९. मोर्लें-मिंटो सुधारणा.

" Has a man talents? He owes them to his country in every way in which they can be serviceable."

—*Jeremy Bentham.*

नागरिकत्वाचे सामान्य हक्क म्हणून जे समजण्यांत येतात त्यांमध्यें देशाच्या राज्यकारभारांत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीनें देशांतील प्रत्येक व्यक्तीचा हात असणें हा एक प्रमुख हक्क गणिलेला आहे. हिंदुस्थानची सर्वांगिण उन्नति व्हावयाची असेल, जगांतील राष्ट्रमालिकेंत श्रेष्ठ स्थान हिंदुस्थानाला संपादन करावयाचें असेल, अथवा मानव जातीच्या प्रगतीला शक्य ती मदत करण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानांतील लोकांना कधीं काळीं प्राप्त होणार असेल तर हिंदी लोकांना नागरिकत्वाचा वरील प्रमुख हक्क मिळणें अत्यंत आवश्यक आहे, असें गोखल्यांचें मत होतें. इंग्रजी अंमलापासून हिंदुस्थानचे अगणित फायदे झाले असतील. पण हल्लीं ज्या पद्धतीनें राज्यकारभार केला जात आहे ती पद्धति अनिष्टावह आहे यांत शंका नाहीं. मोर्लें-मिंटो सुधारणांपूर्वीं हिंदुस्थानचा कारभार अनियंत्रित सरकाराच्याच हातांत होता. लोकमतदर्शक प्रातिनिधिक संस्था नाहींत; देशाच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याची सत्ता नाहीं;

वरिष्ठ दर्जाच्या नोकरींत एतद्देशीयांचा शिरकाव होत नाहीं. इतर देशांतील लोकमताचा सरकारवर कायदेशीर दाब असतो, पण हिंदुस्तानांतील सरकार लोकमताला नैतिक बंधनापेक्षां फारशी किंमत देत नाहीं. अशा अमलाखालीं हिंदुस्थानांतील लोकांचें कर्तृत्व दिवसेंदिवस नामशेष होऊं लागलें. त्यामुळें सरकारपासून फटकून न राहतां राज्यकारभारांत अधिकाधिक हक्क मिळविण्याचे प्रयत्न हिंदी राष्ट्रानें प्रथम केले पाहिजेत असें कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत **गोखल्यांनीं** सांगितलें; आणि त्यांनीं सुचविलेल्या सुधारणांमध्यें कायदेकौन्सिलासंबंधीं सुधारणांना अग्रस्थान मिळालें होतें. १८९२ सालाच्या ॲक्टापासून हिंदी कायदेकौन्सिलांना कांहींसें प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झालें होतें. कॉंग्रेसनें मान्य केलेलें **चार्लस ब्रॅाडलाचें** बिल सरकारला मान्य करितां येईना म्हणून पार्लमेंटनें स्वतःचें हें बिल पास केलें. लोकांना दिले जाणारे हक्क महत्त्वाचे असल्याविना हिंदी लोकांचीं मनें प्रसन्न होणार नाहींत असें **ग्लॅडस्टन** साहेबांनीं या बिलावर टीका करितांना सांगितलें; परंतु या टीकेचा फारसा उपयोग झालेला दिसत नाहीं. कारण या बिलाचें रूपांतर ॲक्टामध्यें होतांना जी नियमावलि तयार करण्यांत आली तिनें बिलाचें मूळचें उदार स्वरूप पार नाहींसें करून टाकिलें. या ॲक्टाबद्दल बोलतांना **गोखल्यांनीं** खालील अन्वर्थक उद्गार काढिले आहेत. " In regard to these rules, I will not say that they have been deliberately so framed as to defeat the object of the Act 1892, but I will say this that if the officer who drafted them had been asked to sit down with the deliberate purpose of framing such a scheme to defeat that object, he could not have done better." **गोखल्यांच्या**

म्हणण्यांत पुष्कळच तथ्य होतें. कारण ज्या संस्थांना कायदेकौन्सिलांत प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क देण्यांत आला त्या संस्था स्वतः फारशा प्रातिनिधिक स्वरूपाच्या नव्हत्या. १९०४ च्या कांग्रेसनें कायदेकौन्सिलांतील लोकप्रतिनिधींची संख्या वाढविण्याबद्दल सरकारला विनंति केली.

हिंदुस्थानच्या सुदैवानें कालहि मोठा अनुकूल आला. स्वयंनिष्ठ व्हाइसरॉय व दुराग्रही सेनापति यांचें भांडण जुंपून कर्झनसाहेबांना राजिनामा द्यावा लागला. याच सुमारास हिंदी आकांक्षांबद्दल सहानुभूति बाळगणारा लिबरलपक्ष इंग्लंडांत अधिकारारूढ झाला व **मोर्ले** भारतमंत्री झाले. या गोष्टीचें **गोखल्यांना** विशेष महत्त्व वाटलें. **बर्क**वरील भक्तीमुळें वाङ्मयक्षेत्रांतील भूमिकेवर **गोखले** आणि **मोर्ले** यांचा प्रथम परिचय झाला होता. **गोखल्यांना** जन्मल्यास पांच वर्षें सुद्धां पुरीं झालीं नव्हतीं तेव्हां ज्या मोर्लेसाहेबांची वाङ्मयक्षितिजावरील उगवता तारा म्हणून सर्व युरोपभर कीर्ति पसरूं लागली, त्यांची व आपली **दृष्टभेट** होईल एवढेंच नव्हे तर हिंदी राजकारणाच्या समान अधिष्ठानावर दोघांच्या जीवितकर्तव्याची वलयें संनद्ध होतील असें **गोखल्यांना** तरी वाटलें होतें काय? **गोखल्यांना** पंडित **मोर्ले** यांच्याबद्दल अत्यंत आदरभाव वाटत होता. **वेल्बीकमिशन**पुढें साक्ष देण्याकरितां ज्या वेळीं **गोखले** गेले होते त्यावेळीं त्यांनीं **मोर्ले**साहेबांची मुद्दाम गांठ घेतली होती. **बर्कचे** आस्थेवाईक अभ्यासक, **मिलचे** पट्टशिष्य व **ग्लॅडस्टनचे** चरित्रकार म्हणून मोर्ले हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाला माहित होते. आणि उदारमतवादी भारतमंत्री लाभला म्हणून **गोखल्यांच्या** प्रमाणें हिंदुस्थानांतील इतरहि कित्येक लोकांना आनंद वाटल्याशिवाय राहिला नाहीं. व्हाइसरॉय **लॉर्ड मिंटो** पूर्वी हिंदुस्थानच्या लष्करी नौकरींत होते आणि रशियाबरोबर झालेल्या युद्धांत

तुर्कींच्या वतीनें लढले होते. कानडाचे गव्हर्नर–जनरल म्हणून त्यांनीं चांगला लौकिक संपादन केला होता. शिपायी व मुत्सद्दी अशा दुहेरी नात्यानें साम्राज्याच्या राजकारणांत भाग घेतल्यामुळें हिंदुस्थानच्या बिकट परिस्थितीची व्यवस्था करण्यास लागणारा अनुभव लॉर्ड मिंटोंनीं मिळविलेला होता. असा अनुभवी व व्यवहारचतुर व्हाइसरॉय कर्झनसाहेबांच्या पावलांवर पावलें टाकीत जाणें शक्य नव्हतें. सहानुभूतिपर व्हाइसरॉय व उदारमतवादी भारतमंत्री या दोघांचा अधिकार हिंदुस्थानच्या दृष्टीनें फायदेशीर झाल्यावांचून राहणार नाहीं अशी आशा हिंदुस्थानांतील लोकांना वाटूं लागली. रूसो–जपान युद्धांत जपानचा विजय झाल्यामुळें आंतरराष्ट्रीय राजकारणांत एक नवेंच प्रकरण सुरू झालें; आणि एशिआ व यूरोपमध्यें बरीच खळबळ सुरू झाली. एशिआटिक राष्ट्रांना आत्मसामर्थ्याची जाणीव होऊं लागली. चीन, इराण व तुर्कस्थान या राष्ट्रांमध्यें लोकायत्त राजसत्ता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न होऊं लागले आणि हें नवीन चैतन्य हिंदी राजकारणांतहि दृश्यमान झालें. यूरोपांतील राष्ट्रांना एशिआखंडांत एक नवीनच प्रतिस्पर्धी निर्माण झाला. अँग्लो–जपानी तहान्वयें इंग्लिशांच्या मदतीनें जपाननें जेव्हां जर्मनी व रशिया यांची चीनमधून हाकालपट्टी केली तेव्हां पुढेंमागें जपानकडून आपल्या व्यापारालाहि धक्का बसण्याचा संभव आहे अशी भीति इंग्लंडला उत्पन्न झाली. अशा परिस्थितींत हिंदुस्थानांवरील प्रभुत्वाची इंग्लंडाला अधिक किंमत वाटूं लागली आणि हिंदुस्थानांतील असंतोष नाहींसा करावा असें इंग्लंडमधील लोकमत तयार होऊं लागलें. सर चार्लस् डिल्क Problems of Great Britain या पुस्तकांत लिहितात:— "Besides trade there is the interest upon capital and India remits so much money for various purposes to England that in this sense too a peaceful

and friendly India seems almost necessary for our existence. I would bid them ( i. e. the people of England ) reflect upon the hopeless insularity that would overtake the British people if deprived of the romantic interest that the possession of India lends to our national life."

अनुकूल परिस्थितीचा पूर्ण फायदा घेण्याचा गोखल्यांनीं निश्चय केला. इंग्लंडकडून हक्क संपादन करावयाचें झाल्यास हिंदुस्थानांतल्या प्रमाणें इंग्लंडांतहि चळवळ केली पाहिजे व हिंदुस्थानचीं गाऱ्हाणीं इंग्लिश जनतेला पटविलीं पाहिजेत, हें तत्त्व गोखल्यांच्या राजकारणाचें एक मुख्य अंग होतें. इतकेंच काय पण आपण स्वतःच इंग्लंडमधील चळवळ करावयाची, पार्लमेंटमध्यें शिरावयाचें व कॅबिनेट मिनिस्टरहि व्हावयाचें असे त्यांचे एके काळीं विचार चालत होते असें त्यांनीं मेथांना लिहिलेल्या एका पत्रावरून दिसतें. हिंदुस्थानच्या वतीनें दादाभाई इंग्लंडांत चळवळ करीत होते आणि तेंच ध्येय गोखल्यांच्यापुढें त्यावेळीं असावें असें वाटतें. परंतु गोखल्यांची जरूरी हिंदुस्थानला फार होती त्यामुळें त्यांची ही मनःकामना सर्वांशीं पूर्ण झाली नाहीं. इंग्लिश जनतेच्या न्यायप्रियतेवर त्यांच्या विश्वास होता. ज्या राष्ट्राचा इतिहास अखिल जगतास स्वातंत्र्याचे धडे देत आहे, ज्यांचें वाङ्मय स्वातंत्र्याच्या तेजोमय विचारांनीं भारलेलें आहे आणि ज्या राष्ट्रामध्यें बर्कनंतर ब्राइट, फॉसेट, ब्रॉडला व अंग्लो-इंडिअनांपैकीं ह्यूम, वेडरबर्न, कॉटन अशांसारखे हिंदुस्थानचे पक्षपाती निर्माण झाले आहेत त्या राष्ट्रांतील जनतेच्या न्यायप्रियतेवर कोण विश्वास टाकणार नाहीं ! अशा जनतेपुढें हिंदुस्थानची वकीली करण्याची संधि मिळण्याची ते वाट पाहत होते. हिंदुस्थान व इंग्लंड या दोन्ही राष्ट्रांत उत्पन्न झालेल्या नवीन परिस्थितीनें अशी संधि गोखल्यांना दिली.

**मोर्ले-मिंटो** सुधारणानिमित्त **गोखले** इंग्लंडला एकंदर तीन वेळां गेले. १९०५ व १९०६ सालीं त्यांना कांग्रेसनें पाठविले होते आणि १९०८ सालीं ते बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएनतर्फे गेले होते. **मोर्ले-मिंटो** सुधारणांना जें स्वरूप प्राप्त झालें त्याला **गोखल्यांच्या** या सफरी बऱ्याच अंशानें कारणीभूत आहेत. १९०५ सालीं निवडणुकीची धामधूम इंग्लंडांत चालू असल्यामुळें त्यांना हिंदुस्थानांतील परिस्थितीची मतदारांना माहिती देण्याचें काम करावें लागलें वगैरे हकिकत मागें आलीच आहे. **मोर्ले** आणि **गोखले** यांची यावेळेस भेट झाली परंतु **मोर्ले** हे नुकतेच अधिकारारूढ झाले असल्यामुळें त्यावेळीं हिंदुस्थानांतील परिस्थितिबद्दल सामान्य विवेचन झालें असेल तेवढेंच ! हिंदुस्थानाला देण्यांत येणाऱ्या सुधारणांच्या हप्त्याविषयीं कांहीं बोलणें झालें असेल असें वाटत नाहींत. पुढील सालीं जेव्हां **गोखले** इंग्लंडास गेले तेव्हां त्यांच्या व मोर्ले यांच्या बैठकी वारंवार होऊं लागल्या. ११ मेला **मोर्ले** लिहितातः " **गोखल्यांशीं** माझें संभाषण झालें. असें संभाषणाचे प्रसंग इतउत्तर अधिकाधिकच येणार. माझ्या कामांत मला **गोखल्यांचा** फार उपयोग होईल अशी आशा दिसत आहे. " **मोर्ले** आणि **गोखले** यांच्यांमध्यें मतभेद नव्हता असें नाहीं. स्वायत्त वसाहतींप्रमाणें हिंदुस्थानाला स्वराज्य मिळावें असें गोखल्यांचें पार्यंतिक ध्येय होते. हिंदुस्थानाला असें स्वराज्य लवकर मिळेल असें मोर्लेसाहेबांना वाटत नव्हतें; परंतु चालू परिस्थितीत काय करावयास पाहिजे यासंबंधी मतैक्य होतें. **मोर्ले** यांच्या बिलाला **गोखल्यांच्यामुळें** पार्लमेंटच्या सभासदांची सहानुभूति मिळाली, हें स्वतः **मोर्ले** यांनीं मान्य केलें आहे. **रमेशचंद्र दत्तहि** यावेळीं इंग्लंडांत असून ते **गोखल्यांना** मदत करीत होते. आपल्या एका पत्रांत ते लिहितात:-

" The present Parliament is quite different from

any that preceded it; there is a large number of earnest members who are all for India and the Labour party feel for India. The credit is due to Mr. Gokhale of having drilled these earnest members in Indian affairs these three months and I have also done my best during the months I have been here."
गोखल्यांनीं अशा रीतीनें भूमिका तयार करून ठेविली असली तरी सुधारणांचा हप्ता पदरांत पडण्यास बराच अवधि लागला. स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार यांमध्यें पत्रव्यवहार सारखा दोन वर्षं चालू होता. कार्यकारी मंडळांत हिंदी सभासदांचा समावेश करावा किंवा नाहीं या मुद्द्यावर बराच खल झाला परंतु स्टेट सेक्रेटरींनीं आपला निश्चय कायम ठेविला आणि प्रथम स्वतःच्याच कौन्सिलमध्यें २६ ऑगष्ट १९०७ रोजीं दोघां हिंदी गृहस्थांची नेमणूक केली. परंतु हिंदुस्थानच्या संतप्त झालेल्या जठराग्नीची भूक एवढ्यातेवढ्या क्षुल्लक देणगीनें शमण्यासारखी नव्हती. जहालपक्ष देशांतील बहुमत आपल्या बाजूचें करून घेत होता आणि १९०७ सालाची कांग्रेस दोन्ही पक्षांचें बलाबल ठरविणार होती. तत्पूर्वी सुधारणांचा मसुदा सरकारनें प्रसिद्ध करावा असें गोखल्यांचें मत होतें, पण सरकारनें तें ऐकिलें नाहीं. मोर्लेसाहेब अधिकारारूढ होऊन इतके दिवस झाले तरी सुधारणांचा मसुदा अद्याप बाहेर पडत नाहीं हें पाहून लोक अधिकच भडकले आणि त्याचा परिणाम कॉंग्रेसचीं छकलें होण्यांत तर झालाच पण अत्याचारी कृत्येंहि अधिक प्रमाणांत होऊं लागलीं, तेव्हां गोखले पुनः एकवार इंग्लंडांत गेले. त्यावेळीं Decentralisation Commission आपला रिपोर्ट तयार करण्याकरितां इंग्लंडला आलें होतें. कमिशनचे एक सभासद म्हणून रोमेशचंद्र दत्त यांचा मुक्कामहि इंग्लंडलाच होता. मागील खेपेप्रमाणें याहि खेपेस गोखल्यांना दत्तांचें पुष्कळच सहाय्य झालें.

या दोघां पुढाऱ्यांच्या कामगिरीचें समालोचन करितांना मि. नटेशन म्हणतातः—" No two men were better suited to work together in such a cause than Mr. Romesh Dutt and Mr. Gokhale. Both moderate in their views, practical in their aims and methods, accurate and well informed in facts, tenacious and persevering in their endeavours, they were in complete agreement in their opinion and were often strangely similar in their style of expression."

हिंदुस्थानचा राज्यकारभार साम्राज्यसरकारनें आपल्याकडे घेतल्याला १९०८ सालीं पन्नास वर्षें पुरीं होत होतीं. या संधीचा फायदा घेऊन हिंदुस्थानाला सुधारणांचा हप्ता देण्याचा निश्चय सरकारी रीतीनें २ नोव्हेंबर १९०८रोजीं राजपुतान्यामध्यें भरलेल्या दरबारांत व्हाइसरॉयसाहेबांनीं जाहीर केला. त्यावेळीं गोखले इंग्लंडांत होते. परंतु आतां इंग्लंडमध्यें कांहीं काम करावयाचें शिल्लक नसल्यामुळें गोखले स्वदेशास परत आले. परत येतांना शेवटल्या भेटीमध्यें कांग्रेस सुधारणांचें स्वागत करावयास चुकणार नाहीं असें त्यांनीं मोर्ले साहेबांना आश्वासन दिलें आणि मोर्ले यांच्या सुधारणा प्रसिद्ध झाल्यावर १९०८ सालच्या कांग्रेसनें सुधारणांचें आनंदानें स्वागत केलें. कांग्रेसनें सुधारणांचें ह्या वर्षीं स्वागत केलें खरें! परंतु पुढल्या सालींच मूळ सुधारणांचें स्वरूप संकुचित करणारे नियम हिंदुस्थानसरकारनें घातल्यामुळें आपली नापसंती स्पष्ट शब्दांत व्यक्त करण्याची कांग्रेसवर पाळी आली. 'सहसा विदधीत न क्रियाम्' या कव्युक्तीचा अनुभव एकंदरींत आला म्हणावयाचा!

सुधारणा प्रसिद्ध झाल्यानंतर आपल्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष झालें आहे, एवढेंच नव्हें तर गोखल्यांनीं इंग्लंडांत जाऊन ही

कारवाई केली, असें कित्येक मुसलमान बंधूंना वाटलें. हा त्यांचा गैरसमज दूर व्हावा म्हणून **गोखल्यांनीं** मोर्लेसाहेबापुढें सुधारणांची जी योजना मांडिली होती ती हिंदुस्थानसरकारच्या संमतीनें प्रसिद्ध केली. मुसलमानांच्या हक्कासंबंधीं हिंदुस्थानसरकारचें जें धोरण होतें तेंच **गोखल्यांनीं** आपल्या योजनेंत कायम ठेविलें होतें, आणि आतां सुधारणा प्रसिद्ध करितांना त्यांत जर कांहीं फेरबदल झाला असेल तर त्याचा दोष **गोखल्यांच्यावर** यत्किंचित्हि येत नव्हता. **गोखल्यांनीं** केलेल्या या स्पष्टीकरणामुळें मुसलमानबंधूंचें समाधान झालें. परंतु **गोखल्यांची** योजना प्रसिद्ध झाल्यानंतर नवीनच वाद उपस्थित झाला. इंडिअन कौन्सिल बिल आणि गोखल्यांची योजना यांमध्यें साहजिकच थोडेंफार सादृश्य होतें. या सादृश्याचा फायदा घेऊन लंडन टाइम्समध्यें 'Thirty years in India' या सहीनें **मोर्ले** यांच्यावर एक टीकात्मक लेख प्रसिद्ध झाला. या लेखामध्यें **मोर्ले** यांनीं दिलेल्या सुधारणा आपखुषीनें दिलेल्या नसून **गोखल्यांनीं** त्यांच्यापासून जबरदस्तीनें मिळविल्या असें ध्वनित केलें होतें. या आक्षेपांस **गोखल्यांनीं** दिलेलें उत्तर लंडन टाईम्सच्या १९ एप्रिल १९०९ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. **गोखल्यांनीं** तयार केलेली योजना व **मोर्ले** यांचें बिल यामध्यें थोडेंफार सादृश्य आहे यावरून **गोखल्यांच्या** सांगण्यामुळें **मोर्ले** यांनीं आपलें बिल तयार केलें असें सिद्ध कसें होईल? मोर्ले यांनीं इतर हिंदी गृहस्थांप्रमाणें **गोखल्यांचीहि** भेट घेतली व त्यांना त्यांच्या मताप्रमाणें एक योजना तयार करावयास सांगितली. आतां **गोखल्यांची** योजना व **मोर्ले** यांचें बिल यांत जें सादृश्य दिसून येतें त्याचें कारण **गोखल्यांनीं** आपली योजना तयार करितांना सर्व बाजूंनीं विचार करून आपल्या मागण्यांवर अव्यवहार्यतेचा छाप बसूं नये अशी खबरदारी घेतली होती. राज्यकारभाराचा

अनुभव व व्यावहारिक दृष्टि यामुळें गोखल्यांच्या कांहीं मागण्या बिलांत समाविष्ट झाल्या असल्या तरी त्या स्वतंत्र रीतीनें हिंदुस्थान सरकारनेंहि आपल्या खलित्यांत सुचविल्या होत्याच असा गोखल्यांच्या उत्तराचा सारांश आहे. लॉर्डांच्या सभेंत बिलाचें तिसरें वाचन झालें त्यावेळीं भाषण करितांना मोर्ले यांनीं आपल्यावरील आक्षेपांस पुढील शब्दांत उत्तर दिलें—"What do people mean when they say that reforms were wrung from the S. of S. by an Indian political leader—a certain Indian political leader well-known to some of your Lordships? Was it not the business of the S. of S. and the Viceroy when they undertake such a scheme for reforms to gather opinion upon proper details of such a scheme from every source, official or unofficial?"

खरा प्रकार असा दिसतो कीं, मोर्ले स्वतः सुधारणा देण्यास अनुकूल होते. परंतु गोखले त्यावेळीं इंग्लंडांत नसते आणि मोर्ले यांना त्यांनीं मदत केली नसती तर सुधारणांचा हप्ता पुष्कळच आकुंचित स्वरूपाचा झाला असता. हिंदुस्थानसरकारची बाजू स्टेटसेक्रेटरी पुढें मांडून त्याची तरफदारी करणारे अँग्लो-इंडिअन इंग्लंडांत पुष्कळ होते. इंडिआ ऑफीसमधील मंडळींचा कल हिंदुस्थानसरकारकडे असण्याचा संभव जास्त. शिवाय हिंदुस्थान सरकार आणि स्टेट-सेक्रेटरी यांच्या दरम्यान दर आठवड्याला पत्रव्यवहार चालतो. त्यामुळें स्वतः मोर्ले यांची इच्छा असूनहि केवळ लोकमत योग्य रीतीनें दर्शविलें न गेल्यामुळें हिंदुस्थानच्या पदरांत बरेच कमी राजकीय हक्क पडले असते; परंतु सुधारणांच्या योजनेला अखेरीस जें स्वरूप प्राप्त झालें त्याला गोखल्यांचेच श्रम कारणीभूत झालें असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. हिंदी वृत्तपत्रें व पुढारी लोक यांचें मत वरीलप्रमाणेंच होतें.

सुधारणा मिळाल्यानंतर **गोखल्यांनीं** त्यांचा कसा उपयोग करून घेतला हें मागील एका प्रकरणांत आपण पाहिलेंच आहे. १९०८ सालीं सुधारणासंबंधीं कांग्रेसमध्यें बोलतांना **गोखल्यांनीं** दोन गोष्टींवर भर दिला होता. इतके दिवस सरकारवर टीका करण्याचें काम आपण केलें; आतां मिळालेल्या हक्कांचा देशाच्या हिताकरितां उपयोग करून घ्यावयाचा असेल तर विध्वंसक टीका करण्याचें सोडून विधायक कार्याकरितां सरकारशीं सहकारिता करण्यास आपण शिकलें पाहिजे, ही पहिली गोष्ट; आणि दुसरी अशी कीं, मिळालेल्या हक्कांचा उपयोग कोणत्याहि विशिष्ट वर्गाकरितां न करतां देशांतील सर्वसाधारण जनतेच्या सुखाकरितां केला पाहिजे. ब्राइट म्हणत असे कीं, The nation in every country dwells in the cottage'. पिढीजाद जहागीरदार किंवा मूठभर सुशिक्षित लोक म्हणजे राष्ट्र नव्हे. **गोखल्यांनीं** वरिष्ठ कायदेकौन्सिलांत आरोग्य, शिक्षण, कराची वाढ वगैरे प्रश्नांसंबंधीं जे विविध ठराव आणिले त्यांचा सर्व रोख सामान्य जनतेच्या हिताकडे होता हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. हिंदुस्थानांतील सुशिक्षितवर्गाला हिंदी शेतकऱ्यांचे हितसंबंध कळत नाहींत अथवा तिकडे त्यांचें दुर्लक्ष असतें असा आरोप सरकार वारंवार करीत असतें. मुंबई कौन्सिलांतील लँड रेव्हेन्यु बिलावरील वादविवादाच्या प्रसंगींहि हाच आरोप सरकारनें पुढें आणिला. परंतु गोखल्यांची कामगिरी पाहतां हा आरोप कितीं निराधार आहे याची साक्ष पटते.

सुधारणांचें **गोखल्यांनीं** स्वागत केलें आणि त्याप्रमाणें कामहि करण्यास प्रारंभ केला; परंतु मिळालेलें राजकीय हक्क अपुरे आहेत याची जाणीव त्यांना होतीच. सुधारणा अंमलांत आल्यानंतर लगेच अधिक हक्काकरितां चळवळ करणें अप्रयोजकपणाचें होतें. नंतर महायुद्ध उद्भवलें. तथापि त्यांनीं महायुद्धानंतर



ना. गोखले व भारत-सेवक-समाजांतील इतर सदस्य. [ पृ. १२० ]

मागावयाच्या सुधारणांची एक योजना तयार करून ठेविली. १९१४ सालच्या पावसाळ्यांत गोखले इंग्लंडांत असतांना युद्धोत्तरकालीन सुधारणाबद्दल ना. आगाखानाशीं त्यांचें बोलणें चालणें झालें होतें. मुंबईस आल्यानंतर सर फेरोजशहा मेथांनाहि त्यांनीं आपली कल्पना सांगितली. पण मेथांना ती सर्वांशीं पसंत पडली नाहीं असें म्हणतात. पुण्यास आल्यानंतर शान्तचित्तानें सुधारणांची योजना तयार केली आणि मरणापूर्वीं अवघे दोनच दिवस ना. आगाखान व सर फेरोजशहा यांच्याकडे त्या योजनेच्या प्रती रवाना केल्या. गोखल्यांची ही योजना ना. आगाखानांनीं १९१७च्या आगस्टमध्यें प्रसिद्ध केली.

---

# १० 'भारतसेवक समाज' व 'रानडे-स्मारक.'

## (१) भारतसेवक समाज.

" A time like this demands
Great hearts, strong minds, true faith and willing
hands,
Men whom the lust of office cannot kill,
Men whom the spoils of office cannot buy,
Men who possess opinion and will,
Men who have honour, men who will not lie. "
—*O. W. Holmes.*

'भारतसेवक समाजा' सारख्या संस्थेची स्थापना करण्याचे विचार गोखल्यांच्या मनांत पुष्कळ दिवस घोळत असावेत असें दिसतें. सार्वजनिक संस्था, कांग्रेस, कौन्सिल वगैरे संस्थांच्या द्वारां राजकारणांत पडल्यानंतर गोखल्यांना असा अनुभव येऊं लागला

कीं, राजकारणांत पडणाऱ्या बऱ्याच लोकांना राजकारणाचें असावें तितकें ज्ञान नसतें. देशाचें हिताहित कशांत आहे आणि देशोन्नति करितां काय उपाययोजना केली पाहिजे याची बरोबर कल्पना फार थोड्यांना असतें. अगोदर देशांत सुशिक्षितांचा भरणा कमी आणि त्यांत गतानुगतिकांचें प्राबल्य! इतर देशांत राजकारणाचा स्वतंत्र विषय म्हणून अभ्यास करणारे लोक असल्यामुळें तेथील सार्वजनिक आयुष्याचा दर्जा कितीतरी उच्च असतो. हिंदुस्थानांत राजकारणाच्या ज्ञानाच्या अभावीं रोग एक व औषध भलतेंच असा प्रकार होऊन राष्ट्राच्या शक्तींचा विनियोग अनाठायीं झालेला दृष्टोत्पत्तीस येतो. गोखल्यांच्या व्याख्यानांत 'such public life as we have in this country' असे शब्द कित्येक ठिकाणीं येतात. पाश्चात्य देशांतील व हिंदुस्थानांतील राजकारणांमध्यें असलेला दारुण विरोध वरील शब्दसमूहानें दर्शविण्याचा गोखल्यांचा हेतु दिसतो. सार्वजनिक आयुष्याचा दर्जा उच्च केला पाहिजे हें तत्त्व कितीहि पटलें तरी या विचारांना मूर्तस्वरूप देणें सोपें नाहीं.

यूरोपमधील **जीझस** सोसायट्यांच्या धर्तीवर एखादी संस्था काढून राजकारणाला वाहिलेले राजकीय संन्यासी निर्माण करून त्यांच्याकडून लोकमताला इष्ट तें वळण लावण्याची कल्पना **गोखल्यांच्या** मनांत १८९७ च्या पूर्वीपासूनच असावी असें दिसतें. इंग्लंडांत त्या सालीं असतांना आपल्याजवळ **गोखल्यांनीं** ही कल्पना सांगितली असें **रँग्लर परांजपे** स्वतः लिहिलेल्या **गोखल्यांच्या** चरित्रांत नमूद करितात. परंतु त्यावेळीं त्यांच्या विचाराला निश्चितता आली होती असें म्हणतां येत नाहीं. १९०१ सालीं **सर फेरोजशहा मेथांना** लिहिलेल्या पत्रांत हिंदुस्थानतर्फे इंग्लंडांत जागृति करण्याचें कार्य अंगावर घ्यावयाचें व शक्य असल्यास पार्लमेंटचे सभासद व्हावयाचें असे विचार **गोखल्यांनीं** प्रदर्शित केल्याचें आपण पाहि-

लेंच आहे. १९०२ सालीं कॉलेज सोडल्यानंतर संस्था स्थापण्याच्या विचारांना चालन मिळालें. सोसायटी स्थापन होण्यापूर्वी कांहीं दिवस मध्यप्रांतांतील **सर बिपिनचंद्र बोस** यांजबरोबर **गोखल्यांचें** झालेलें संभाषण प्रसिद्ध झालें आहे. **सर बिपिनचंद्रांना गोखल्यांची** कल्पना अव्यवहार्य वाटली. बंगाली कादंबरीकार **बंकिमचंद्र** यानें आपल्या 'आनंदमठ' नांवाच्या कादंबरीमध्यें देशोद्धाराकरितां बायकामुलें, घरदार व मालमत्ता यांचा त्याग करणाऱ्या 'संतान' लोकांचा एक संघ असल्याचें दाखविलें आहे. दुराराध्य व्रत स्वीकारणाऱ्या या संतान संघाशीं **गोखल्यांच्या** सोसायटीची तुलना करून कादंबरीकाराची ही कल्पना व्यवहारांत आणतां येईल कीं नाहीं याबद्दल **सर बिपिनचंद्रांनीं** शंका प्रदर्शित केली.

अखेरीस सोसायटी स्थापण्याची कल्पना मुक्रर करण्यांत आली. ता. १२ जून १९०५ रोजीं फारसा गाजावाजा न करितां श्रीयुत **शिवराम हरि** ऊर्फ **आबासाहेब साठे** यांच्या हस्तें सोसायटीच्या इमारतीची कोणशिला बसविण्याचा समारंभ करण्यांत आला. **गोपाळ कृष्ण देवधर, नटेश अप्पाजी द्रवीड,** व **अनंत विनायक पटवर्धन** हे सोसायटीचे पहिले सभासद होते.

स्वार्थत्याग आणि देशाभिमान या दोन तत्त्वांवर सोसायटीची स्थापना करण्यांत आली आहे. देशाकरितां आतांपर्यंत झालेल्या प्रयत्नांनीं सार्वजनिक आयुष्याचा ( public life ) पाया घातला गेला आहे. परंतु या पायावर भविष्यत्कालच्या हिंदी राष्ट्राची उभारणी करण्याकरितां राष्ट्रकार्याला आयुष्य अर्पण करणाऱ्या देशभक्तांच्या परिश्रमांची आवश्यकता आहे. असे राजकीय संन्यासी तयार करण्याकरितां ' भारत सेवक समाजा ' ची स्थापना करण्यांत आली आहे. ' साम्राज्यांतर्गत स्वराज्य ' हें हिंदुस्थानचें ध्येय आहे असा ' समाजा ' चा विश्वास आहे. परंतु पुष्कळसें

कार्य अंतर्मुख स्वरूपाचेंच आहे. हिंदी लोकांमध्यें कर्तृत्व व शील-संवर्धन केलें पाहिजे. हें ध्येय अंतःकरणपूर्वक सतत परिश्रम व कार्यानुरूप स्वार्थत्याग केल्यावांचून साध्य होणार नाहीं. हें कार्य हातीं घेण्यास धार्मिक भावनेनें हिंदी लोकांनीं पुढें आलें पाहिजे. हिंदुस्थान ही धर्मभूमि आहे. हिंदुलोकांना धर्म प्रिय असतो व हिंदुलोक धर्माकरितां प्राणाची आहुती देण्यास तयार होतात असा त्यांचा लौकिक आहे. धर्माबद्दल असणाऱ्या या भावनेचा ओघ देशाकडे वळला पाहिजे. अंतःकरण देशमय झालें पाहिजे व देशांकरितां स्वार्थत्याग करण्याची संधि प्राप्त होतांच हृदय उत्सुकतेनें स्फुरण पावलें पाहिजे. असे राष्ट्रवीर तयार करण्याचें काम '**भारत सेवक समाजानें**' अंगावर घेतलें आहे. समाजाच्या सभासदांना पांच वर्षेंपर्यंत सार्वजनिक कार्याचें शिक्षण घ्यावें लागतें. ह्या पांच वर्षांच्या अवधींत सोसायटी सांगेल तेंच काम सभासदांना करावें लागतें. सार्वजनिक कामांत स्वतःच्या जबाबदारीवर या सभासदांना पडतां येत नाहीं. पांच वर्षांच्या अवधींत अभ्यासानें व अनुभवी सभासदांच्या देखरेखीखालीं केलेल्या प्रत्यक्ष कामामुळें सार्वजनिक कार्य करण्याची पात्रता ह्या सभासदांना आली म्हणजे मग सोसायटीच्या आजन्म सभासदांमध्यें त्याचें नांव दाखल करण्यांत येतें. सभासद होतांना प्रत्येक सभासदाला खालील सात प्रतिज्ञा स्वीकाराव्या लागतात.

( i ) That the country will always be the first in his thought and he will give to her service the best that is in him.

( ii ) That in serving the country he will seek no personal advantage for himself.

( iii ) That he will regard all Indians as brothers and will work for the advancement of all without distinction of caste or creed.

(iv) That he will be content with such provision for himself and his family if he has any, as the society will be able to make.......
He will devote no part of his energies to earning money for himself.

(v) That he will lead a pure personal life.

(vi) That he will engage in no personal quarrel with any one.

(vii) That he will always keep in view the aims of the soceiety and watch over its interests with the utmost zeal doing all he can to advance its work. He will never do anything which is inconsistent with the objects of the society.

सोसायटी स्थापन झाल्यानंतर ती चिरस्थायी होईल किंवा नाहीं याबद्दल पुष्कळांना शंका वाटत होती. **सर फेरोजशहा मेथांना** सोसायटीचीं तत्त्वें मान्य नव्हतीं असें म्हणतात. स्वार्थत्यागबुद्धीच्या इतक्या अत्युच्च कोटीवर चढण्याचें सामर्थ्य फारच थोड्यांना असेल असें त्यांना वाटत होतें. हाच आक्षेप **सर व्हॅलेंटाईन चिरोल** यांनीं घेतला आहे. ते लिहितात, "I doubt if *the Servants of India Society* will be a suceess for long, since people have not sacrificed so much for a secular purpose like love of the country." परंतु **गोखल्यांना** आपल्या संस्थेच्या भविष्यकालाबद्दल कधींही निराशा वाटली नाहीं. प्रारंभींच्या तीन सभासदांखेरीज इतरहि कांहीं सभासद त्यांना येऊन मिळाले व हिंदुस्थानच्या इतर प्रांतांत सोसायटीच्या शाखा स्थापन होऊं लागल्या. ९ डिसेंबर १९१० रोजीं **मिस् स्टूजला** लिहिलेल्या एका पत्रांत **गोखले** म्हणतातः—

"My society is doing very well indeed. Two months ago a branch consisting of six members was opened at Madras for work in Madras presidency. This week another has been opened for work in the Bombay Presidency and the Central Provinces. It consists of seven members and for four permanent assistants. I now feel assured of a career of great usefulness for the society." यानंतर एप्रिल १९१३ मध्यें संयुक्त प्रांताकरितां अलाहाबाद येथें सोसायटीची एक शाखा स्थापण्यांत आली. निरनिराळ्या शाखांमध्यें मिळून सध्यां आजन्म सभासदांची संख्या सोळा आहे. सोसायटीची मुख्य कचेरी पुणें एथें असून सोसायटीचें 'होम' फर्ग्युसन कॉलेज टेकडीच्या दक्षिण बाजूस आहे. याठिकाणीं कांहीं सभासदांची राहण्याची सोय असून राजकीय व इतर अनुषंगिक विषयांवरील पुस्तकांचा अप्रतिम संग्रह सभासदांच्या उपयोगाकरितां ठेवण्यांत आला आहे. सोसायटीच्या कामाचें स्वरूप विविध आहे. राजकीय कामाबरोबरच, स्त्रीवर्गाची उन्नति, सहकारी मंडळ्या, मजूरांचा प्रश्न, अस्पृश्यतानिवारण, दुष्काळग्रस्तांना मदत वगैरे देशोपयोगीं कामेंहि सोसायटीचे सभासद करीत असतात. गोखल्यांनीं आंखलेल्या देशाच्या सर्वांगीण उन्नतीच्या ध्येयानुसार सोसायटीचें काम चाललें आहे असें दिसून येईल.

## २ रानडे स्मारक.

"We can only humbly trust that He who gave Mr. Ranade to this nation may give another like him in the fulness of time. Meanwhile it is our duty to cherish his name, treasure up his example and be true to his teachings in the faith that a nation that has produced a Ranade need not despair of its future."

*G. K. Gokhale.*

न्या. रानड्यांच्या मृत्यूनंतर मुंबई व पुणें येथें दुःखप्रदर्शनार्थ जंगी सभा भरून सर्वानुमतें रानड्यांचें स्मारक करण्याचें ठरलें. मुंबईशहरीं एक स्मारक होत असतां पुण्यास निराळें स्मारक करण्याची आवश्यकता काय, असा आक्षेप कित्येकांनीं घेतला. १८९३ सालीं न्यायमूर्तींच्या शुभासनावर आरोहण केल्यापासून तों अखेरपर्यंत रानड्यांच्या आयुष्यांतील मान्यतेचीं व महत्त्वाचीं वर्षें मुंबई शहरांत गेलीं होतीं हें खरें असलें तरी त्यांच्या सार्वजनिक कार्याचें केंद्र पुणें शहर होतें. १८७० पासून १९०० पर्यंत पुणें शहरांत ज्या निरनिराळ्या संस्था स्थापन झाल्या होत्या त्याला माधवरावजी रानडे यांजकडून स्फूर्ति मिळाली होती. रानड्यांच्या राष्ट्राभिमानाचें क्षेत्र सबंध हिंदुस्थानाइतकें व्यापक असलें तरी पुण्यावर त्यांची अधिक प्रीति होती आणि पुण्यास त्यांचें स्मारक झालें नसतें तर पुण्याला व पर्यायानें सबंध महाराष्ट्राला तें लांछनास्पद झालें असतें. या विचारसरणीचा जय होऊन पुण्यास रानड्यांचें स्मारक उभारण्याचें ठरलें. पुणें स्मारक कमिटीनें महाराष्ट्र व शक्य असल्यास हिंदुस्थानांतील इतर प्रांतांत व मुंबई स्मारक कमिटीनें मुंबई शहर आणि महाराष्ट्रेतर मुंबई इलाखा येथें स्मारकाकरितां वर्गणी गोळा करावी असें उभय कमिटींच्या विचारें ठरलें. पुणें स्मारक कमिटीचे गोखले हे पहिल्यापासूनच सेक्रेटरी होते. महाराष्ट्रातर्फें होणारें रानड्यांचें स्मारक सर्व पक्षाला मान्य होईल असेंच करावयाचें ठरल्यामुळें उच्च प्रतीच्या औद्योगिक शिक्षणाकरितां एक रसायनशाला स्थापन करण्याची व रसायनशाळेलाच जोडून औद्योगिक विषयावरील ल्हानसा पुस्तकसंग्रह ठेवण्याची सूचना पसंत पडली. या स्मारकाकरितां वर्गणी गोळा करण्याचें व इतर व्यवस्था पाहण्याचें काम मुख्यतः गोखल्यांनाच करावें लागलें संस्थेची इमारत व शास्त्रीय शोधाकरितां लागणारीं उपकरणें सिद्ध

झाल्यानंतर ता. १५ सप्टेंबर १९१० रोजीं मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क ऊर्फ लॉर्ड सिडेनहॅम यांच्या हस्तें अनावरण समारंभ मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला व गोखले आपल्या गुरूच्या ऋणांतून मुक्त झाले.

---

# ११ दक्षिण आफ्रिकेची सफर.

"I am convinced myself that there is no more evil thing in this present world than race-prejudice; none at all. I write deliberately, it is the worst single thing in life now. It justifies and holds together more baseness, cruelty and abomination than any other sort of error in the world.

*H. G. Wells.*

१६ नोव्हेंबर १८६० रोजीं हिंदी मजुरांनीं भरलेलें एक जहाज आफ्रिकेच्या किनाऱ्याला लागलें. तेव्हांपासून ब्रिटिश साम्राज्यांतील राजकारणांत एका नवीन प्रश्नाची भर पडली. हिंदुस्थानांतून मुदतबंदीनें पाठविलेल्या मजूरलोकांची स्थिति गुलामाप्रमाणें होत असे. हिंदी मजूरांच्या मेहनतीचीं फळें तेवढीं अत्यंत थोडा मोबदला देऊन आपल्याला कशीं मिळतील इकडे युरोपियन वसाहतवाल्यांचें लक्ष असे. त्याकरितां त्यांनीं जुलमी कायदे केले; हिंदी लोकांना मत देण्याचा अधिकार नाकारण्यांत आला. ट्रॅम अथवा रेल्वे गाडीमधून प्रवास करितांना सुद्धां हिंदी लोकांना अनन्वित हाल सोसावे लागत. नाताळ व ट्रान्सवाल वगैरे वसाहतींतील शहरांतल्या सार्वजनिक हॉटेलमध्यें हिंदी प्रवाशांना उतरण्याची मनाई



दक्षिण आफ्रिकेंत महात्मागांधी-समवेत ना. गोखले.

[ पृ. १२८ ]

होऊं लागली. हिंदी लोकांकडून वाटेल तसे कर चोपून घेण्यांत येत असूनहि शहर-म्युनिसिपॅलिट्यांसारख्या स्थानिक संस्था हिंदी लोकांच्या सुखसोयींकडे पूर्ण उपेक्षा करीत. आफ्रिकेंतील हिंदी लोक कांहीं एक कुरकुर न करितां मुकाट्यानें सर्व कांहीं सहन करीत होते. परंतु सहनशक्तीच्या मर्यादेची परमावधि झाली आणि हिंदी लोक आपल्या निसर्गसिद्ध हक्काकरितां चळवळ करूं लागले. सुदैवानें हिंदी लोकांना योग्य नेता भेटला. हिंदी लोकांची स्थिति पाहून **मोहनदास गांधींचें** अंतःकरण द्रवलें व आपल्या देशबांधवांची स्थिति सुधारण्याचा त्यांनीं मनाशीं पक्का निश्चय केला. गांधींनीं पुढारीपण अंगीकारल्यावर आफ्रिकेंतील हिंदी लोकांमध्यें एकप्रकारचें चैतन्य उत्पन्न झालें. चळवळीला व्यवस्थित स्वरूप येण्याकरितां १८९४ सालीं गांधींनीं इतर पुढाऱ्यांच्या मदतीनें नाताळ इंडिअन कांग्रेस ही संस्था काढिली व आपण स्वतः तिचे सेक्रेटरी झाले.

आफ्रिकेमध्यें चळवळीला कांहींसें स्थाईक स्वरूप दिल्यानंतर **गांधी** हिंदुस्थानांत आले आणि हिंदी लोकांपुढें आफ्रिकेंतील स्थिति खुलासेवार मांडून त्या प्रश्नाकडे हिंदी जनतेचें लक्ष वेधलें. **गांधी** आणि **गोखले** यांचा प्रथम परिचय यावेळेला झाला. तेव्हांपासून तों अखेरपर्यंत **गोखल्यांनीं गांधींना** आफ्रिकेच्या प्रश्नासंबंधीं अत्यंत सहाय्य केलें. १८९६ सालच्या प्रथम भेटीची हकिकत **गांधींनीं** स्वतः एके ठिकाणीं दिली आहे. ते लिहितात, "त्यावेळीं (१८९६ सालीं) हिंदुस्थानांतील प्रमुख पुढाऱ्यांना प्रणिपात करण्याचा सुप्रसंग मला मिळाला. **पण जी शीतलता मला गोखले यांचे भेटींत लाभली ती इतरांपासून मी मिळवूं शकलों नाहीं.** सर्वांनींच माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला हें खरें! परंतु **गोखल्यांनीं** मला प्रेमपाशांत बद्ध करून टाकलें." गोखल्यांनाहि गांधींच्याबद्दल अत्यंत प्रेम व आदर वाटत असे. १९०९ सालच्या कांग्रेसमध्यें आफ्रिकन प्रश्नावर बोल-

तांना गोखल्यांनीं खालील उद्गार काढिले, " Gentlemen, it is one of the privileges of my life that I know Mr. Gandhi intimately and I can tell you that a *purer, a nobler, a braver and a more exalted spirit has never moved on this earth.*-" गांधविरील या प्रेमाधिक्यामुळें तर आफ्रिकन प्रश्नाकडे गोखल्यांचें लक्ष फारच वेधलें. १८९७ सालीं गोखले इंग्लंडला गेले त्यावेळीं आफ्रिकेंतील हिंदी लोक या विषयावर इंडिआ पत्रांत त्यांनीं एक लेख लिहिलेला पहाण्यांत येतो.

१८९९ सालीं बोअरयुद्ध सुरू झालें. हें युद्ध सुरूं होण्याच्या अनेक कारणांपैकीं बोअर सरकार ब्रिटिश इंडिअनांना चांगलें वागवीत नाहीं हें एक कारण लॉर्ड लॅन्सडॉन व मि. जोसेफ चेंबरलेन यांच्यासारख्या वजनदार मुत्सद्दी लोकांकडून सांगण्यांत आलें होतें. साहजिकच लढाई संपल्यानंतर आपल्याला सुखानें राहतां येईल अशी हिंदी लोकांची समजूत झाली, आणि याच आशेवर विसंबून आफ्रिकेंतील व हिंदुस्थानांतील लोकांनीं साम्राज्य सरकारला सर्वतोपरी मदत केली. परंतु समज चुकीची ठरली; अनुभव विरुद्ध आला व बोअर सरकार बरें म्हणण्याची पाळी आली. बोअरसरकारच्या अमदानींत वसाहतींमध्यें येणाऱ्या हिंदी लोकांवर फारसे निर्बंध नव्हते. नवीन होणाऱ्या राज्यव्यवस्थेंत हे निर्बंध दृढतर करण्यांत आले. वसाहतींमध्यें हिंदी लोकांची संख्या बेसुमार वाढत आहे अशी विनाकारण हाकाटी पिटण्यांत आली. वास्तविक पहातां ट्रान्सवालमध्यें हिंदी लोकांची संख्या पांच हजारानें कमी झाली होती. १९०७ सालीं वसाहत सरकारनें आपला प्रसिद्ध Asiatic Law Amendment Act पास केला. हा कायदा पास करण्यांत दोन हेतू होते. नवीन एशिआटिक लोकांना वसाहतींत येण्यापासून दूर ठेवणें व युद्धाच्या पूर्वी असलेल्या लोकांना जबरदस्तीनें रजिस्टर करण्यास लावणें.

**गांधींच्या** प्रमुखत्वाखालीं हिंदी लोकांनीं या कायद्याचा पूर्ण निषेध केला. इंग्लंडला शिष्टमंडळें धाडलीं; परंतु कांहींएक उपयोग होईना. तेव्हां वाटेल तितके हाल सोसूं पण असला जुलमी कायदा मान्य करणार नाहीं असा निर्धार हिंदीजनतेनें केला. आठ हजार हिंदी लोकांपैकीं फक्त पांचशें लोकांनींच आपलीं नांवें रजिस्टर केलीं. **गांधींना** पकडण्यांत आलें. इतर पुष्कळ पुढाऱ्यांना तुरुंगवास घडला. परंतु लौकरच गांधी व जनरल स्मटस् यांच्यामध्यें तडजोड ठरली. ह्या तडजोडीप्रमाणें तीन महिने झाल्यानंतर रजिस्ट्रेशनचा कायदा परत घ्यावयाचा व तोंपर्यंत हिंदी लोकांनीं आपखुषीनें आपलीं नांवें रजिस्टर करावयाचीं असें ठरलें. तडजोडीच्या या अटी **गांधींनीं** पाळल्या. त्यांनीं सर्वांच्या अगोदर आपलें नांव रजिस्टर केलें व दुसऱ्यांना करावयाला लाविलें. लोकांनीं अटी पाळल्या. आतां अधिकाऱ्यांनीं कायदा रद्द करण्याचें आपलें वचन पूर्ण करावें असा हिंदी लोकांनीं आग्रह धरिला. परंतु अधिकारी आपल्या वचनाला जागले नाहींत. या विश्वासघातकी वर्तनामुळें लोक संतापले. सुमारें अडीच हजार लोकांनीं आपलीं रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटें जाळून टाकिलीं. सत्याग्रहाच्या चळवळीला पुनः सुरवात झाली.

अशा आणीबाणीच्या वेळीं गांधींना **गोखल्यांची** फार मदत झाली. सत्याग्रहांत भाग घेतल्यामुळें तुरुंगांत गेलेल्या लोकांपैकीं बहुतेक सर्वजण कुटुंबांचे पोशिंदे असल्यामुळें त्यांच्या पाठीमागें त्यांच्या बायकामुलांची उपासमार होऊं लागली. व्यापारी लोकांचा व्यापार बसला व जवळ जवळ एकहजार कुटुंबें निराश्रित झालीं. या अनाथ कुटुंबांना हिंदुस्थानांतून मदत पाठविण्याचें कार्य **गोखल्यांनीं** आपल्या शिरावर घेतलें. मदत मागण्याकरितां आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत आलेले **गांधींचे** एक युरोपिअन अनुयायी **मि. पोलाक** यांना बरोबर घेऊन हिंदुस्थानांतील प्रमुख प्रमुख शहरीं गोखले

हिंडले. मि. पोलाक यांच्या तोंडून दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या देशबांधवांची हृदयद्रावक कहाणी ऐकूनच हिंदी लोकमत प्रक्षुब्ध झालें होतें आणि प्रत्येकाला सहानुभूति वाटत होतीच. शिवाय गोखल्यांच्या रसवंतीनें मोहित न होणारा धनिक विरळाच! **गोखल्यांनीं** हां हां म्हणतां जरूर तितकी रकम जमविली आणि गांधींच्या करितां पाठवून दिली. इतकें करून गोखले थांबले नाहींत. **गोखल्यांनीं** कांग्रेसची सहानुभूति मिळविलीच होती. पुढील सालच्या कौन्सिलमध्यें नाताळांत मुदतबंदीच्या ठरावानें मजूर पाठविण्याच्या पद्धतीला निर्बंध घालण्यांत यावा अशा अर्थाचा ठराव गोखल्यांनीं आणिला. ठराव पुढें मांडतांना **गोखले** म्हणाले, " I think I am stating the plain truth when I say that no single question of our time has evoked more bitter feelings throughout India—feelings in the presence of which the best friends of British rule have had to to remain helpless—than the continued ill-treatment of Indians in South Africa." या ठरावावर इतर सभासदांचीं अनुकूल भाषणें झालीं आणि त्यांनीं **गोखल्यांच्या** विधानास पुष्टीच दिली. सरकारनें हा ठराव मान्य केला म्हणून मतें घेण्याचें कारण पडलें नाहीं. परंतु तसा प्रसंग आला असतां तर हिंदी-युरोपिअन, सरकारी-बिनसरकारी या सर्व सभासदांनीं गोखल्यांच्या सारखेंच मत दिलें असतें यांत शंका नाहीं. ठराव नाताळमधील मुदतबंदीच्या मजूरांसंबंधीं जरी होता तरी ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानचा दर्जा काय राहणार या प्रश्नाशीं तो निगडित झालेला होता. हिंदी लोकांचा छळ आणि तोहि फक्त मजूरवर्गाचाच एकट्या नाताळांतच होत होता असें नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील सर्वच वसाहतींमध्यें हिंदी लोकांना अपमानास्पद रीतीनें वाग-

विण्यांत येत होतें. सुशिक्षित असो वा नसो, समाजांतील निकृष्ट वर्गांतील असो, अथवा पिढीजाद घरंदाज असो त्याला 'कुली' (हमाल) 'सॅमी' (स्वामी शब्दाचा अपभ्रंश) अशासारख्या तुच्छतादर्शक शब्दांनीं संबोधण्यांत येई. हिंदी लोकांना साम्राज्यांत अस्पृश्यांप्रमाणें वागविण्यांत येत होतें, ही गोष्ट कौन्सिलच्या नजरेस **गोखल्यांनीं** आणिली. नाताळची भरभराट हिंदी मजूरांच्यावर अवलंबून आहे असा कबुलीजबाब नाताळचे माजी मुख्य प्रधान सर **लीज ह्यूलेट** यांनीं दिला आहे. तेव्हां यापुढें हिंदी मजूरांचा पुरवठा नाताळला होऊं नये अशी तजवीज हिंदुस्थानसरकारनें केली म्हणजे तरी वसाहतवाल्यांचे डोळे उघडतील व हिंदी लोकांवरील जुलमी कायदे रद्द करतील अशा कांहींशा प्रतिकारबुद्धीनें **गोखल्यांनीं** वरील ठराव मांडला होता. हिंदुस्थानसरकारानें तो मान्यहि पण केला.

इकडे आफ्रिकेमध्यें निरनिराळ्या वसाहती एकत्र करून त्यांचें एक संयुक्त सरकार बनविण्याचें ब्रिटिश प्रधानमंडळानें ठरविलें. या एकीकरणाच्या वेळीं विलायतेंतील सरकारनें फिरून एकवार हिंदु लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष देऊन ज्या कायद्याच्या योगानें अत्यंत असंतुष्टता माजत आहे ते सर्व कायदे रद्द करावेत अशी युनिअन-सरकारला सूचना केली. ह्याप्रमाणें रजिस्ट्रेशन कायदा बंद करण्याचें युनिअन सरकारनें ठरविलें. पण एक निराळाच कायदा निर्माण करून हिंदी लोकांचे जन्मसिद्ध हक्क हिरावून घेतले. फिरून एकदां हिंदी लोकांचा स्वाभिमान कसास लागण्याचा प्रसंग आला व प्रचंड चळवळ होण्याचा संभव दिसूं लागला.

यावेळीं **गोखले** इंग्लंडमध्यें होते. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करावें अशा अर्थाचा ठराव कौन्सिलपुढें गोखल्यांनीं आणिला होता. अधिकारीवर्गाच्या विरोधामुळें हा ठराव पास होऊं शकला नाहीं. या ठरावास पार्लमेंटची संमति मिळवावी व नंतर हिंदी कायदेकौ-

न्सिलांत हा ठराव आणावा असा हेतु मनांत धरून गोखले यावर्षी इंग्लंडला गेले होते. बर्मिंगहॅम येथील मिस् स्टूजला पाठविलेल्या पत्रांत गोखले आपल्या भेटीचा उद्देश खालील शब्दांत व्यक्त करितात– "I am glad to say I have decided to pay a brief visit to England this year. My object in going this year is to secure parliamentary support to a bill which I have introduced in the Viceroy's Legislative Council, aiming at making elementary education in this country gradually free and compulsory." या संकल्पानुसार मे-महिन्याच्या सुरवातीस ते इंग्लंडला गेले. इंग्लं-मध्यें असतांना घडलेल्या एका समारंभाचा उल्लेख येथें करणें युक्त दिसतें. १९१० सालीं अलाहाबादच्या कांग्रेसचें अध्यक्षस्थान स्वीका-रण्याकरितां **सर वुइलिअम वेडरबर्न** हिंदुस्थानांत आले होते. हिंदमातेची **सर वुइलिअमनीं** जी एकनिष्ठ सेवा केली त्याबद्दल वाटणाऱ्या आदराचें निदर्शक म्हणून इंग्लंडला परत जातेवेळीं **वेड-रबर्न**साहेबांना थैली अर्पण करण्याचें मुंबईकरांनीं ठरविलें. परंतु काम अधिक पडल्यामुळें वेडरबर्न यांच्या प्रकृतीस क्षीणता आली आणि त्यांनीं कलकत्त्याच्या वाटेनेंच इंग्लंडला परत जाण्याचें ठरविलें. मुंबई-करांची निराशा झाली. परंतु पुढें त्यांनीं लेडी वेडरबर्नना त्यांच्या पतीनें हिंदुस्थानच्या केलेल्या सेवेची आठवण म्हणून एक उत्कृष्ट रत्नमाला नजर करण्याचें योजिलें आणि गोखले इंग्लंडला जाण्याचें कळल्यावर हें काम त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें. **गोखल्यांनीं** तें आनंदानें स्वीकारिलें. ता. ४ जुलै १९१२ रोजीं लंडनशहरीं **लेडी स्वॉननें** कांहीं निवडक मंडळींना मेजवानी दिली. त्यावेळीं गोख-ल्यांनीं **सर वुइलिअन वेडरबर्न** यांनीं केलेल्या सेवेचें गौरवपर वर्णन करून त्यांच्या पत्नीस रत्नमाला नजर केली.

आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या झगड्यास यावेळीं भीषण स्वरूप

प्राप्त होत होतें हें वर सांगितलेंच आहे. **गांधींच्या** नेतृत्वाखालीं निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीचा अवलंब हिंदी लोक करणार होते. परंतु तत्पूर्वी तडजोडीचे सर्व कांहीं प्रयत्न **गांधी व गोखले** आपल्या कडून करीत होते. इंग्लंडमध्यें असतांना **गोखल्यांनीं हारकोर्ट, लार्ड ग्लॅडस्टन** वगैरे मंडळींच्या भेटी घेऊन दोन्ही पक्षास मान्य होतील अशा प्रकारच्या तडजोडीच्या अटींचा विचार चालविला होता. आफ्रिकेंतील परिस्थिति प्रत्यक्ष पाहण्याचा त्यांनीं निश्चय केला; कारण आफ्रिकेंतील युरोपिअन लोकांवरच तडजोडीच्या अटी मान्य करणें न करणें अवलंबून होतें. **गोखल्यांनीं** आफ्रिकेला जाऊं नये असें त्यांच्या कित्येक स्नेह्यांना वाटत होतें. हिंदी मनुष्य कितीहि सुशिक्षित असो, त्याचा दर्जा कितीहि मोठा असो, त्यास बोटीवर व आफ्रिकेमध्यें अत्यंत अपमानास्पदरीतीनें वागविण्यांत येत असे. इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेंत जाणाऱ्या बोटीवर एशिआटिक मनुष्याला मज्जाव असे. एखाद्याला घेतलेंच तर अस्पृश्याप्रमाणें वागविण्यांत येई. बोटीवरून उतरल्यावर आंगठा उठवून देण्याची व इंग्रजी भाषेची परीक्षा उतारूकडून घेण्यांत येत असे. या सर्व प्रतिकूल परिस्थितीचा अनुभव गांधीसारख्यांना पूर्वी आलाच होता. अशा तऱ्हेची मानहानि सहन करण्याची पाळी **गोखल्यांच्यावर** येऊं नये अशा सद्धेतूनेंच **गोखल्यांना** आफ्रिकेंत जाण्याच्या विरुद्ध कित्येकांनीं सल्ला दिला. आगबोटीचें तिकिट मिळण्यासच गोखल्यांना थोडीबहुत अडचण भासली परंतु त्यांचा पुढील सर्व प्रवास सुखकर झाला व त्यांच्या स्नेह्यांना वाटलेली भीति निराधार ठरली.

ता. २२ आक्टोबर १९१२ रोजीं **गोखल्यांची** बोट आफ्रिकेच्या किनाऱ्याला लागली. **गोखले** दक्षिण आफ्रिकेमध्यें असेतोंपर्यंत त्यांची सर्व व्यवस्था करण्याकरितां युनिअनसरकारकडून

इमिग्रेशन खात्यांतील मि. **रन्सिमन** यांची योजना झाली होती. आफ्रिकेंतील हिंदी लोकांनीं **गोखल्यांचा** सत्कार केलाच पण या सत्कारांत युनिअन सरकार व युरोपिअन लोक यांनींहि आनंदानें भाग घेतल्यामुळें एखाद्या राजाचाही जो सन्मान होऊं नये तो **भारत-सेवक गोखले** यांचा ठिकठिकाणीं झाला. **गोखल्यांनीं** युरोपिअन लोकांचींहि मनें हरण करून घेतलीं होतीं आणि **गोखल्यांच्या** आगमनानें आफ्रिकेंतील वातावरण पवित्र बनलें आहे असें सर्वांना वाटूं लागलें. **गोखल्यांचीं** ठिकठिकाणीं व्याख्यानें होत. तीं ऐकण्यास यूरोपिअन व हिंदी लोक पूर्वीचा द्वेषभाव विसरून जाऊन एकाच रांगेंत बसत व **गोखल्यांचा** सन्मान करण्यांत त्यांच्यामध्यें अहमहमिका लाग-लेली दिसून येई. **केपटौन, किंवर्ले, जोहान्सबर्ग, दरबान, प्रिटो-रिआ** वगैरे प्रमुख शहरांना त्यांनीं भेट दिली व प्रत्येक ठिकाणीं त्यांचें यूरोपिअन व हिंदी समाजांकडून अश्रुतपूर्व स्वागत करण्यांत आलें. दक्षिण आफ्रिकेंत जाण्यांत तेथील हिंदी लोकांची स्थिति प्रत्यक्ष अवलोकन करावी व दोन्ही समाजांना मान्य होईलशी तड-जोड सुचवावी हा **गोखल्यांचा** हेतु होता; आणि तेवढ्याकरितां त्यांनीं अश्रांत परिश्रम करून मिळेल ती माहिती गोळा केली. **दक्षिण आफ्रिकेची** राजधानी **प्रिटोरिया** येथें **गोखल्यांनीं** जनरल **बोथा** व जनरल **स्मट्स्** यांची भेट घेतली. भेट होण्यापूर्वी जे काळजीपूर्वक परिश्रम घेतले त्याबद्दल गांधी लिहितात–" भेटीच्या आदल्या दिवशीं मि. **कॅलनबॅक** ( महात्मा **गांधींचे** जर्मन अनुयायी ) यांची व माझी परीक्षा घेतली. स्वतः पहाटेस तीन वाजतां उठले. आम्हां दोघांनाहि उठविलें. त्यांना दिलेलें सर्व साहित्य त्यांनीं वाचून ठेवि-लेंच होतें. आतां माझी उलट तपासणी करून त्यावरून स्वतःची तयारी पूर्ण झाली आहे किंवा नाहीं हें ठरवावयाचें होतें........

त्यांच्या उलट तपासणीचें मी काय वर्णन करूं? त्या कामांत घेतलेल्या काळजीची किती प्रशंसा करूं?"

गोखल्यांचें दक्षिणआफ्रिकेंतील कार्य अत्यंत अवघड होतें. स्वकीय आणि परकीय या दोघांनाहि त्यांना संतुष्ट करावयाचें होतें. हिंदी लोकांचे नैसर्गिक हक्क रक्षण करतांना दुसऱ्यांच्या हक्कांवर त्यांना घाला घालावयाचा नव्हता. स्वदेशबांधवांचें अपमानशल्य दूर करितांना परकीयांच्या मनोवृत्तीही लक्षांत घ्यावयाच्या होत्या. स्वदेशाची प्रतिष्ठा वाढवावयाची होती परंतु अन्य देशाचा अपमान करण्याची त्यांची इच्छा नव्हती. आफ्रिकेंतील झगडा जातिविशिष्ट असल्यामुळें तत्संबंधी प्रश्नांचा निर्विकार चित्तानें सांगोपांग विचार होणें जरूर होतें. ब्रिटिश साम्राज्याचे प्रजाजन असलेले हिंदी लोक त्याच साम्राज्याच्या एका विभागांत अपंक्तप्रमाणें वागण्यास तयार होणें शक्य नाहीं आणि त्यांच्यावर लादलेलें अनैसर्गिक व अन्याय्य निर्बंध दूर झालेच पाहिजेत असें गोखल्यांनीं युरोपिअनांना बजाविलें. परंतु त्याच वेळीं त्यांनीं आपल्या देशबांधवांस हेंहि सांगण्यास कमी केलें नाहीं कीं, तात्त्विकदृष्ट्या ब्रिटिश साम्राज्यांतील प्रजाजन या नात्यानें साम्राज्यांत कोठेंहि जाण्यास निर्बंध नसला तरी समतेच्या या तत्त्वाचा व्यवहारांत उपयोग योग्य मर्यादेंतच केला जातो. युरोपिअन लोकांची मुख्य तक्रार अशी होती कीं आफ्रिकेमध्यें हिंदी लोक येण्याचा क्रम आणखी कांहीं दिवस अनिरुद्ध चालू राहिला तर त्यांचें संख्याधिक्य होईल आणि आमची संस्कृति व संस्था यांना धक्का पोहोंचेल. युरोपिअन लोकांची ही भीति निराधार होती. मुदतबंदीनें मजूर पाठविण्याची पद्धत बंद झाल्यामुळें हिंदी लोकांची संख्या वाढण्याची भीति उरली नाहीं आणि तशी भीति वाटत असलीच तर तडजोड म्हणून युरोपिअन लोकांना पाहिजे असलेलें आश्वासन हिंदी लोकांतर्फे देण्यास गोखले

तयार होते. परंतु जे हिंदी लोक आफ्रिकेमध्यें स्थायिक झाले आहेत, त्यांना योग्य रीतीनें वागविण्याचें युनिअन सरकारनें आश्वासन दिलें पाहिजे असा गोखल्यांचा आग्रह होता. आफ्रिकेंतील हिंदी लोकांपैकीं पुष्कळच मुदतबंदीच्या ठरावानें आलेल्या मजूरांचे वंशज आहेत. कित्येकांची मुदत अद्याप संपावयाची आहे. अर्थात् हे हिंदी लोक आपखुषीनें आले नसून युरोपिअन वसाहतवाल्यांच्या हिताकरितांच त्यांना येथें यावें लागलें. हिंदी मजूरांनीं आफ्रिकेंतच वस्ती करून राहावें अशी वसाहतवाल्यांची पूर्वी इच्छा दिसून येत होती. पण आतां हिंदी मजूरांनीं मुदत संपल्याबरोबर स्वदेशास परत जावें म्हणून त्यांच्यावर तीन पौंडाचा कर लादण्यांत आला आहे. तीन पौंडांची डोइपट्टी मुदतबंदी मजूरांना–पुरुष, स्त्रिया, सोळा वर्षांच्या वरील मुलगा आणि तेरा वर्षांवरील मुलगी यांचा यांत समावेश होतो–त्यांची मुदतबंदी संपल्यावर दर वर्षी द्यावी लागत असे. इतका जबर व अन्यायाचा कर पृथ्वीच्या पाठीवर इतरत्र आढळून येईल कीं नाहीं याची शंकाच आहे. माणुसकीला कमीपणा आणणारा हा कर बंद करण्याबद्दल युनिअन सरकारला गोखल्यांनीं विनविलें. युनियनसरकारनेंहि गोखल्यांना मजूरावरचा हा कर काढून टाकूं असें अभिवचन दिलें.

अशा तऱ्हेची कामगिरी करून गोखले १९ नोव्हेंबर १९१२ रोजीं मातृभूमीस परत आले. आफ्रिकेंत शांतता झाली असें त्यांना वाटलें. परंतु आफ्रिकेंतील वर्णद्वेषांत मुरलेल्या युरोपिअन लोकांच्या दुराग्रहामुळें त्यांची अपेक्षा समूळ फसली. तीन पाडाची डोईपट्टी फक्त स्त्रीवर्गाकडून न घेण्याचा ठराव युनिअन सरकारनें केला. गोखल्यांच्या अभिवचनांवर विश्वास ठेऊन हा कायदा आतां रद्द होणार असें हिंदी लोक समजत होते. परंतु त्यांची तीव्र निराशा झाली. शिवाय आगींत तेल ओतावें त्या-

प्रमाणें हिंदु अथवा मुसलमानी पद्धतीनें झालेले विवाह बेकायदेशीर ठरविण्यांत येणारा हिडिस व अपमानकारक कायदा पास करण्यांत आला. आफ्रिकेंतील पुढाऱ्यांनीं **गोखल्यांना** तार करून विचारलें कीं, तीन पौंडाच्या डोईपट्टीचा कायदा स्त्रियांपुरतांच बंद होणार होता कीं काय? प्रधानमंडळानें हा कायदा अजिबात बंद करण्याचें वचन आपणांला दिलें होतें असें **गोखल्यांनीं** कळविलें. **गांधींनीं** आपलें सत्याग्रहाचें व्रत फिरून चालू केलें. मागील खेपेप्रमाणें याहि खेपेस जरूर तें द्रव्यसाहाय्य करण्याचे प्रयत्न **गोखल्यांनीं** केलें. पब्लिक सर्व्हिसेस कमिशनकरितां यासालीं त्यांना हिंदुस्थानांतील प्रमुख शहरीं हिंडावें लागत होतेंच. त्याचा फायदा घेऊन कमिशनच्या कामाबरोबर वर्गणी गोळा करण्याचें कामहि **गोखले** करीत होते; आणि अशा रीतीनें त्यांनीं सुमारें पांच लक्ष रुपये **गांधींच्या** मदतीकरितां पाठविलें.

दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नासंबंधीं हिंदुस्थानांत जागृति व सहानुभूति उत्पन्न करण्याचें सर्व श्रेय **गोखल्यांनाच** दिलें पाहिजे. दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न समाधानकारक कसा सुटेल याची अहोरात्र चिंता त्यांना लागली होती. **महात्मा गांधी म्हणतात,** "शेवटपर्यंत विश्रांति घेण्याचें त्यांनीं नाकारिलें. दक्षिण आफ्रिकेहून पत्रासारख्या लांबलचक मध्यरात्रीं येणाऱ्या तारा त्याचक्षणीं वाचाव्या, जबाब त्याच क्षणीं तयार करावा, तावडतोब **लार्ड हार्डिंजना** तारा कराव्यात, वर्तमानपत्रांत पाठविण्याच्या मजकूराचा मसुदा करावा आणि या सर्व कामाच्या गर्दींत खाण्याचेंहि राहून जावें. निजण्याचेंही बाजूस राहावें." अशातऱ्हेनें अनन्यसाधारण परिश्रम केल्यासारखें दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न **गोखल्यांच्या** हयातींतच अंशतः तरी सुटला हीं त्यांतल्यात्यांत आनंदाची गोष्ट आहे. तीन पौंडांची डोइपट्टी उठली, लग्नासंबंधीं कायदा रद्द झाला व आफ्रिकेमध्यें हिंदी लोकांना जाण्याची

मुभा मिळाली. हा प्रश्न सोडविण्यांत **गोखल्यांची** किती मदत झाले हें **लॉर्ड हार्डिंजच्याच** शब्दांत दिलें असतां **गोखल्यांच्या** कामगिरीचें महत्त्व निदर्शनास येईल. **लॉर्ड हार्डिंज** म्हणाले, "It was largely due to him and his tactful and statesmanlike attitude during his visit to *South Africa* that this thorny question has eventually received a satisfactory solution. On more than one occasion he had given advice which I found to be both sound and useful and I may mention that in the South African emigration question he rendered most loyal and helpful assistance."


---

# १२ अखेर !

"Now is the stately column broke,
The beacon light is quenched in smoke,
The trumpet's silver sound is still
The warder silent on the hill."

—*Sir Walter Scott.*

'वरिष्ट दर्जाच्या नोकरींत हिंदी लोकांचा प्रवेश' ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां सरकारनें सरकारी व बिनसरकारी सभासदांचें मिळून एक कमिशन नेमावें अशा अर्थाचा ठराव ना. सुब्बाराव यांनीं १९११ सालीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत आणिला होता. वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या जात, वर्ण व धर्म यांची अपेक्षा न धरितां हिंदी लोकांस देण्यांत याव्यात अशीं आश्वासनें सरकारनें वारंवार दिलीं आहेत. १८३३ सालीं पार्लमेंटनें आत्मस्फूर्तीनें अशा तऱ्हेचा ठराव



स्मशानयात्रा. [पृ० १४०]

. १८५४ सालीं युरोपिअनांच्या बरोबर हिंदी लोकांना परीक्षेस
याची परवानगी मिळाली. १८५८ सालीं राणीच्या जाहीर-
ांत वरील आश्वासनांचा पुनरुच्चार करण्यांत आला. १८६१ सालीं
ेक्रेटरींनीं कमिशनद्वारां हिंदी लोकांना वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या
द्याव्यात याची चौकशी केली. एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची,
ी कीं, हीं सर्व आश्वासनें अनाहूत व अनाकांक्षित अशीं मिळालीं
त. १८६१ पर्यंत पाश्चात्त्य शिक्षणाचा फैलाव फारसा झाला
ा व त्यामुळें लोकमतहि तयार झालें नव्हतें. १८७०, सालीं
दादाभाई नौरोजींच्या प्रयत्नामुळें वरिष्ठ जागा हिंदी लोकांस
ाव्यात म्हणून हिंदुस्थानांत व इंग्लंडांत थोडीशी चळवळ झालेली
न येते; परंतु यावेळीं सुद्धां चळवळीचा भार हिंदी आकांक्षा-
सहानुभूति बाळगणाऱ्या इंग्लिश लोकांनींच बराचसा उचलला
. १८८६ त Public Services Commission नेमण्यांत
, त्यावेळीं मात्र सरकारचा बदललेला दृष्टिकोण दिसून येऊं
ा. त्या सुमारास सुशिक्षित लोकांचा वर्ग प्रामुख्यानें पुढें येऊं
ा होता. देशांत सुशिक्षित वर्ग नव्हता त्यावेळीं सरकार हिंदी
ांस वरिष्ठ जागा देण्यास उत्सुक होतें; परंतु तो उत्पन्न झाल्या-
र हजारों सबबी सरकारतर्फे पुढें करण्यांत येऊं लागल्या. या-
जवळ जवळ पंचवीस वर्षें हा प्रश्न तसाच पडून राहिला.
तरीं मोर्ले-मिंटो सुधारणानुसार स्टेटसेक्रेटरी, व्हाइसरॉय व गव्ह-
रांच्या कार्यकारी कौन्सिलांत हिंदी लोकांच्या नेमणुका झाल्या.
मणुका अधिकाराच्या दृष्टीनें मोठ्या असल्या तरी संख्येच्या
ीं अल्पच होत्या. त्यामुळें हिंदी लोकांच्या तक्रारी कायम
ल्या. या प्रश्नाचा विचार फिरून एकवार व्हावा या हेतूनें ना-
राव यांनीं वरील ठराव आणिला होता व गोखल्यांनीं त्यास
ादून दिलें होतें. या ठरावाप्रमाणें ५ सप्टेंबर १९१२ रोजीं


पब्लिक सर्व्हिसेस कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनवर **गोखल्यांची** नेमणूक करण्यांत आली. **गोखल्यांच्या** खेरीज **ना. चौवळ** व **जस्टिस अबदुल रहीम** असे दोघेच काय ते हिंदी सभासद होते.

होतकरू हिंदी तरुणांना मोठ्या पगाराच्या जागा मिळविण्याच्याच दृष्टीनें प्रस्तुत प्रश्नाकडे पाहून चालणार नाहीं. भारतभूच्या बालकांना स्वदेशाच्या राज्यव्यवस्थेंत संबंध ठेवूं न देणें हा अन्याय तर खराच ! पण व्यक्तिविषयक अन्यायापेक्षां अखिल राष्ट्राला भोंवणारा अन्याय अधिक जाणवतो. वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यांचा सर्व मक्ता युरोपियनांनीं आपल्याकडे घेतल्यामुळें हिंदुस्थानचें तीन दृष्टीनें नुकसान होतें. गरीब हिंदुस्थानचा राज्यकारभार शक्य तितक्या कमी खर्चांत चालविणें अत्यंत आवश्यक आहे; आणि युरोपिअन अधिकाऱ्यांऐवजीं हिंदी लोक नेमल्याखेरीज हा खर्च कमी होणार नाहीं. लायक हिंदी लोक मिळत असतां युरोपिअन अधिकारी जादा पगारावर नेमल्यामुळें आर्थिक दृष्ट्या हिंदुस्थानचें अत्यंत नुकसान होतें. **सर विलिअम हंटर** यांनीं असेंच मत प्रतिपादिलें आहे. " You cannot work with imported labour as cheaply as you can with Native labour and I regard the more extended employment of the Natives not only as an act of justice but as a financial necessity." भाषा परंपरा व आचार या बाबतींत समान असणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांना आपल्या देशबांधवांच्या सुखसोयी जशा कळतील तशा युरोपिअन लोकांना कशा कळणार ? तसेंच हिंदी अधिकाऱ्यांना जशी लोकांबद्दल सहानुभूति वाटेल तशी युरोपिअनांना वाटणार नाहीं हें उघड आहे. याशिवाय जबाबदारीचीं कामें करण्याची संधि न मिळाल्यामुळें हिंदी लोकांचा नैतिक अधःपात

होतो तो निराळाच! तिसऱ्या तोट्यासंबंधीं बोलतांना वेल्बी कमिशन पुढील साक्षींत गोखले म्हणाले; "There is a moral evil which if anything is, is even greater. A kind of dwarfing or stunting is going on of the Indian race, under the present system. We must live all the days of our life in an atmosphere of inferiority and the tallest of us must bend in order that the exigencies of the existing system may be satisfied.........The full height to which our manhood is capable of rising can never be reached by us under the present system. अशा सर्व दृष्टीनें महत्त्वाचा असणारा हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी कमिशनवर टाकिली होती.

कमिशनच्या कामाला ३१ डिसेंबर १९१२ रोजीं मद्रासेस सुरवात झाली. १९१३ व १९१४ सालच्या हिंवाळ्यांत मद्रास, कलकत्ता, रंगून, दिल्ली, नागपूर, मुंबई वगैरे प्रमुख शहरीं साक्षीदारांच्या साक्षी घेऊन पुरावा गोळा करण्याचें काम कमिशन करीत होतें. हिंदुस्थानांतील पुरावा घेण्याचें संपल्यावर दोन्हीं सालीं कमिशन इंग्लंडला गेलें व तेथील अँग्लो-इंडिअन अधिकाऱ्यांच्या आणि हिंदुस्थानची माहिती असणाऱ्या इतर लोकांच्या साक्षी घेतल्यावर पुरावा घेण्याचें काम संपलें. अंग्लो इंडिअन साक्षिदार हिंदी लोकांबद्दल भरमसाट विधानें करीत. वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या हिंदी लोकांच्या हातांत जाऊं नयेत म्हणून एकजात हिंदी लोकांवर अपात्रतेचा शिक्का मोर्तब करण्याची उत्कंठा या साक्षीदारांमध्यें दिसून येई. हिंदी पदवीधरांची दानत समाधानकारक नसते, त्यामुळें त्यांच्या हातून पक्षपातीपणा होण्याचा जास्त संभव आहे; अधिकार गाजविण्याचा अनुभव नसल्यामुळें योग्य व्यवस्था राखण्याचें काम हिंदी लोकांच्या

कडून होणार नाहीं. जिल्हाधिकारी म्हणून करावयाचीं कामें इतकीं जोखमीचीं व त्रासदायक असतात कीं तीं पार पाडण्यास लागणारें शरीरबल व बुद्धिबल हिंदी लोकांच्या जवळ नाहीं. हिंदी लोक मोठे अधिकारी झाले तर युरोपिअन लोकांना त्यांच्या हाताखालीं काम करावें लागेल व हें त्यांना रुचणार नाहीं. हिंदी लोक नोकरीच्या पाठीमागें फार लागतात व त्यांच्यांत वरिष्ठ अधिकाऱ्यांना लागणारा स्वतंत्र बाणा बिलकूल दिसून येत नाहीं. असे एक ना दोन किती तरी आक्षेप व अडचणी या साक्षीदारांनीं हिंदी लोकांविरुद्ध पुढें आणण्यास सुरवात केली. अशा साक्षीदारांकडून अनुकूल उत्तरें मोठ्या कुशलतेनें काढून घेण्याचें काम गोखल्यांना करावें लागे. मद्रासेस उलटतपासणीच्या वेळीं गोखल्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांना आपलीं कित्येक विधानें भरपूर पुराव्यावांचून केलीं आहेत असें कबूल करावयास लाविलें. साक्षिदारानें दिलेला लेखी पुरावा काळजीपूर्वक वाचून पहाणें, त्यांत जे मुद्दे खोडून काढण्यासारखे असतील त्यासंबंधी नवीन माहिती मिळविणें व दररोज पांच सहा तास कमिशनचें काम करणें—अशा स्थितींत गोखल्यांच्या शरीर प्रकृतीवर बराच ताण बसला. १९१३ सालींच त्यांची प्रकृति बिघडली होती, व जुलै महिन्यांत कमिशनचें काम आटोपल्यानंतर **गोखले** कांहीं दिवस **पॅरिस** व कांहीं दिवस **स्वित्झर्लंडमध्यें** हवापालट करण्याकरितां राहिले होते. पुढील सालचे बहुतेक महिने ते **इंग्लंडलाच** होते. मार्च मध्यें त्यांनीं **हिंदुस्थान** सोडलें; व ते नोव्हेंबरच्या अखेरीस परत आले. त्यावेळीं कमिशनचें सर्व काम संपलें होतें. **गोखल्यांच्या** क्षीण झालेल्या शरीरप्रकृतीस हिंदुस्थानांतील हिंवाळ्याच्या हवेनें जरा आराम पडेल असें वाटल्यामुळें कमिशनचा रिपोर्ट तयार करण्याचें काम एक वर्षभर लांबणीवर टाकलें; आणि १९१५ च्या एप्रिलांत **गोखले इंग्लंडला** कमिशनच्या कामाकरितां जाणारहि होते.



लो. टिळक दहनभूमीवर भाषण करीत आहेत. [पृ० १४४].

साक्षीदारांची उलटतपासणी घेण्यांत गोखल्यांचें चातुर्य दिसून येत असे. कोणच्या साक्षीदाराकडून कशा तऱ्हेची माहिती मिळविण्याचा संभव आहे याचा ते अचूक अंदाज करीत आणि थोडेच परंतु यथोचित प्रश्न विचारून गोखले ती माहिती काढून घेत असत. उलटतपासणीच्या त्यांच्या पद्धतीला अनुलक्षूनच कमिशनचे एक हिंदी सभासद जस्टिस अब्दुल रहीम यांनीं '*Here is a lawyer and an advocate indeed!*' असे उद्गार काढले. स्वतःचीं मतें पुराव्याच्या शिबंदीनें शक्य तितकी बळकट करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्यामुळें प्रतिपक्षांस त्यांचीं मतें खोडून टाकणें जड जाई. असें असूनहि कमिशनच्या सभासदांमध्यें एकोपा राखण्याविषयीं त्यांची तत्परता दिसून येई. गोखल्यांनीं लंडनहून सर फेरोजशहा मेथांना पाठविलेल्या एका पत्रांत कमिशनवरील इंग्लिश सभासदांच्या हिंदी लोकांकडे अविश्वासमूलक पाहण्याच्या दृष्टीचा पूर्ण निषेध केला आहे. १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें इंग्लंडहून परत आल्यानंतर टाइम्स ऑफ इंडिआच्या प्रतिनिधीनें त्यांची मुलाखत घेतली. त्यावेळीं कमिशनच्या रिपोर्टासंबंधीं विचारलें असतां गोखले म्हणाले, "I cannot answer that question; but I may say that I look forward with some confidence to the outcome of our labours." कमिशनचा रिपोर्ट तयार होईपर्यंत गोखले हयात असते तर रिपोर्ट निराळ्याच स्वरूपांत बाहेर पडला असत हें निःसंशय आहे.

गोखले नोव्हेंबरांत हिंदुस्थानांत परत आले, त्यावेळीं त्यासाल्च्या कांग्रेसची तयारी जोरांत चालू होती. सुरतेला दोन पक्षांमध्यें फूट पडल्यापासून राष्ट्रीय पक्ष कांग्रेसपासून अलगच राहिला होता. १९१४ सालापूर्वी समेटाचे कांहीं फुसके प्रयत्न राष्ट्रीय-

पक्षांतील मंडळींनीं करून पाहिले. १९०९ सालच्या **'मराठ्यां'**त संयुक्त राष्ट्रीयसभा भरविण्याबद्दल त्यावेळचे स्वागतकमिटीचे अध्यक्ष **लाला हरकिसनलाल** व कांग्रेसचे सेक्रेटरी **ना. वाच्छा** आणि **खरे** यांचेबरोबर झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे. त्यानंतर १९१० सालीं अलाहाबाद येथें **सर वुइलिअम वेडरबर्न** यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभा भरली. त्यावेळीं संयुक्त राष्ट्रीय सभा भरवावी अशा अर्थाची तार पुण्याहून राष्ट्रीयपक्षातर्फे अध्यक्षांच्याकडे पाठविण्यांत आली. परंतु त्यावेळीं या प्रयत्नांना यश आलें नाहीं. १९१२ सालीं कांग्रेसच्या घटनेंत **गोखल्यांच्या** प्रयत्नानें किंचित् फेरफार होऊन राष्ट्रीय सभेचें द्वार थोडें खुलें करण्यांत आलें. **टिळक** शिक्षा भोगून परत आल्यावर समेटाच्या प्रश्नाला फिरून तोंड लागलें आणि या समेटाच्या प्रकरणांत मध्यस्थी करण्याचा मान **डॉ. ॲनी बेझंट** यांनीं उचलला. कॉंग्रेसच्या नवीन घटनेंत महत्त्वाचे असे दोन फेरबदल केले होते. कॉंग्रेसचें ध्येय ठरविण्यांत आल्यावर तें ध्येय ज्यास मान्य असेल आणि जे आपली मान्यता कॉंग्रेस क्रीडवर सही करून दर्शविण्यास तयार असतील त्यांनाच फक्त कॉंग्रेसचे प्रतिनिधि होतां येईल. दुसरा फरक म्हटला म्हणजे प्रांतिक कॉंग्रेस कमिट्या किंवा कांग्रेसनें मान्य केलेल्या इतर संस्था यांनाच प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क देण्यांत आला. राष्ट्रीय पक्षाला कांग्रेसचें क्रीड मान्य होतें. परंतु प्रत्येक प्रतिनिधीनें या क्रीडला मान्यता दिलीच पाहिजे अशी जबरदस्ती नको होती. प्रांतिक कांग्रेस कमिट्या व इतर संस्था नेमस्तांच्या हातीं असल्यामुळें त्यांच्या संस्थेतर्फे कांग्रेसमध्यें जाणें राष्ट्रीयपक्षाला अपमानास्पद वाटत होतें आणि हाच खरा वादाचा मुद्दा होता. राष्ट्रीयपक्षानें आपले जुने क्रान्तिकारक मार्ग

अनुपयोगी म्हणून टाकून दिले असून देशाच्या सांप्रतच्या परिस्थितींत कांग्रेसनें स्वीकारलेल्या धोरणाची युक्तता त्याला कळून आली आहे; परंतु कांग्रेसमध्यें स्वाभिमानानें प्रवेश करण्याचा मार्ग खुला नाहीं एवढीच काय ती त्यांच्या मार्गांत अडचण आहे. ती दूर करून राष्ट्रीयपक्षास कांग्रेसमध्यें घेण्यास गोखले तयार होते व कांग्रेसघटनेच्या विसाव्या कलमांत बेझंटबाईनीं सुचविलेल्या फरकास त्यांनीं प्रथम मान्यता दिली. परंतु टिळक आणि सुब्बाराव यांच्यामध्यें झालेल्या संभाषणावरून राष्ट्रीयपक्षास कांग्रेसचें धोरण मान्य नाहीं असें गोखल्यांना स्पष्ट दिसून आलें. 'शक्य तेथें सहकारिता व जरूर तेथें विरोध' (association with Government where possible, opposition to it where necessary) हें कांग्रेसचें धोरण बदलून 'शक्य तेथें विरोध व निरुपाय म्हणून सहकारिता' (Opposition where possible association where indispensible) हें धोरण कांग्रेसला मान्य करावयास लावण्याकरितां आज राष्ट्रीयपक्ष निर्बंध स्वीकारूनहि कांग्रेसमध्यें येत आहे, असा प्रतिपक्षाचा हेतु कळून येतांच गोखल्यांनीं मद्रासच्या कांग्रेसचे अध्यक्ष ना. वसू यांना समेटाबद्दल बदललेलें आपलें मत पत्रानें कळविलें. ज्या पत्राबद्दल महाराष्ट्रामध्यें वादाची एवढी धुमश्चक्री माजून राहिली तें हेंच पत्र! ज्या पत्रावरून गोखल्यांच्यावर नानातऱ्हेचे कुत्सित आरोप करण्यांत आले तें हेंच पत्र! आणि ज्या पत्रावरून उद्भवलेल्या वादाची निरवानिरव करीत असतां ना. गोखल्यांना इहलोकाची आपली यात्रा संपवावी लागली तें हेंच पत्र!

मद्रासची कांग्रेस पार पडली परंतु समेट झाला नाहीं. Never can true reconcilement grow where wounds of deadly hatred have pierced so deep! हेंच खरें! परंतु या समेटाच्या वादांतूनच एक पोटवाद निघाला आणि

या जगांतील आयुष्याच्या शेवटल्या महिन्यांतहि गोखल्यांना आपल्या प्रतिपक्षांकडून हेतुविपर्यास, उपहास व निंदा यांचे आघात सहन करावे लागले. अमृतबझारपत्रिकेचे संपादक बाबू मोतिलाल घोस यांनीं १२ जानेवारीच्या अंकांत असें प्रसिद्ध केलें कीं, समेट मोडण्यास मुंबईच्या एका नेमस्ताग्रणीचें पत्र कारण झालें. मद्रासच्या स्वागत कमिटीला पाठविलेल्या या गुप्तपत्रांत टिळकांवर आडून हल्ला करण्यांत आला आहे.( Mr. *Tilak* was stabbed in the dark ) ठिणगी पडण्याचाच अवकाश होता. कलहाग्नीनें पेट घेतला. 'केसरी' पत्रांत गोखल्यांच्यावर टीकेचा वर्षाव सुरू झाला; पत्र बाहेर काढण्याविषयीं आव्हान करण्यांत आलें व फिर्यादी–अर्यादीची भाषाहि निघूं लागली. या टीकेबद्दल ना. सुब्बाराव यांना लिहिलेल्या एका पत्रांत गोखले लिहितात, " The Kesari in particular has been pressing the accusation against me with a virulence of which I can give you no idea. I have carried forbearance to its extreme limit and it is impossible for me to keep silence any longer. " टीका असह्य झाली व साऱ्याहि गोष्टींचा जेव्हां विपर्यास करण्यांत येऊं लागला तेव्हां गोखल्यांनीं ' केसरी ' च्या टीकेस उत्तर दिलें या उत्तराचा थोडक्यांत सारांश असा आहे–" ८ डिसेंबरपर्यंत बेझंट-बाईच्या समेटाच्या सूचनेस मी अनुकूल होतों. टिळकांचें सुब्बा-रावाशीं झालेलें संभाषण कळल्यानंतर टिळक यत्किंचित्‌हि बदललेले नाहींत असें मला आढळून आलें. काँग्रेसला समक्ष हजर राहणें शक्य नसल्यामुळें ना. बसूंना खाजगी रीतीनें पत्र लिहून समे-टाची माझी आशा कशी भंगली हें कळविलें. खासगी रीतीनें पाठविलेलें पत्र प्रसिद्ध करण्यास मी बांधला गेलेलों नाहीं. या उप्पर टिळकांनीं काय करावयाचें असेल तें करावें. "



अग्निस्पर्शापूर्वी. [ पृ. १४८ ]

वाद अशा भराला येत होता. परंतु **गोखल्यांची** प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली होती. मरणापूर्वी कांहीं दिवस **सुब्बारावांना** धाडलेल्या एका पत्रांत ते लिहितात, " गेले कित्येक आठवडे मी माझ्या शरीराकडून इतकें काम करून घेतलें आहे कीं त्याची धारणा शक्ति ( Sustaining power ) आतां अगदीं कमी झाली आहे." यांत अतिशयोक्ति बिलकुल नव्हती. १२ फेब्रुवारीला **सर्व्हंटस् ऑफ इंडिआ** सोसायटीतर्फे आफ्रिकेंतून नुकतेंच परत आलेल्या महात्मा गांधींना फलाहाराची मेजवानी देण्यांत आली. परंतु **गोखल्यांना** याप्रसंगीं हजर राहतां आलें नाहीं. थोडेसें बरें वाटावयाला लागलें कीं **गोखल्यांचीं** कामें सुरु व्हावयाचीं. १७ तारखेला युद्धोत्तरकालीन सुधारणांचा मसुदा तयार करून **ना. आगाखान व सर फेरोजशहा** यांचेकडे रवाना केला. दुसऱ्या दिवशीं आलेल्या पत्रांना उत्तरें लिहिलीं. बाह्यतः सर्व व्यवहार सुरळीत चालले असले तरी आपला अंतःकाळ आतां जवळ येऊन ठेपला आहे हें त्यांनीं ओळखलें होतें. १९ तारखेला सकाळीं ते निरवानिरवीची भाषा बोलूं लागले. आप्तमंडळी व मित्रवर्ग यांचा शेवटचा निरोप घेतला. त्याच दिवशीं रात्रीं दहा वाजून वीस मिनिटांनीं आपला पार्थिव देह सोडून **गोखल्यांचा** आत्मा स्वर्लोकचें सुख उपभोगण्यास निघून गेला. पण छे ! **गोखल्यांचा** आवडता हिंदुस्थान अवनत स्थितींत असतां त्यांना स्वर्गलोकचे उपभोग कसे रुचणार ? " **अठरावे वर्षी बी. ए. विसावे वर्षी प्रोफेसर, एकविसावे वर्षी सार्वजनिक सभेंतील कार्यकर्ते सभासद, चौविसाव्या वर्षी सभेच्या त्रैमासिकाचे संपादक, पंचविसावे वर्षी प्रांतिक परिषदेचें चिटणीस, एकोनतिसाव्या वर्षी राष्ट्रीयसभेचे चिटणीस, एकतिसाव्या वर्षी एका महत्त्वाच्या रॉयल कमिशनपुढील प्रमुख साक्षीदार, चौतिसाव्या वर्षी प्रांतिक कौन्सिलर, छत्तिसाव्या वर्षी वरिष्ठकायदे**

कौन्सिलर, एकूणचाळिसाव्या वर्षीं कांग्रेसचे अध्यक्ष, चाळी-साव्या वर्षीं संस्थांचे संस्थापक"—हीं कामें अल्पवयांत जिच्या आश्रयानें केली त्या जर्जर व निःसत्व झालेल्या देहयष्टीचा त्याग करून कार्योन्मुख आत्म्याला तेजोयुत व उर्जस्वल शरीराची जोड देण्याकरितां गोखल्यांनीं स्वर्लोकची वाट कदाचित् धरली असेल. गोखले अवताररूपानें निराळ्या स्वरूपांत दृश्यमान होण्याचा योग येवो अथवा न येवो गोखल्यांच्या तत्त्वज्ञानाचा जीवंत झरा हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत अखंड वाहणार असेल तर त्यांच्या मृत्यूचा फुका शोक तरी कां करा? कारण—

Were death defeat, much weeping would be right!
It is victory when it leaves surviving faith.

समाप्त

## परिशिष्ट.

# ना. गोखले यांच्या विलायतच्या सफरी.

गोखल्यांनीं विलायतेस एकंदर सात सफरी केल्या. त्या केव्हां, कशाकरितां व कोणत्या उद्देशानें केल्या हें पुढील पानावरील कोष्टकावरून कळून येईल.

१८५७ सालच्या बंडानंतर हिंदुस्थानचा कारभार कंपनीसरकारच्या हातून काढून घेतला. हिंदुस्थान हें साम्राज्यांतील घटकावयव समजण्यांत आलें व तेव्हांपासून पार्लमेंटच्या साक्षात् नियंत्रणाखालीं हिंदुस्थानचा कारभार चालूं लागला. या नवीन योजनेमुळें राज्यकारभाराच्या आंतरव्यवस्थेंत बराच फेरफार झाला व त्याचा परिणाम पर्यायानें राष्ट्राला भोगावा लागला. हिंदुस्थानच्या तिजोरीवर कंपनीचा पूर्ण ताबा असल्यामुळें ज्या ज्या वेळीं ब्रिटिश मुत्सद्दी हिंदुस्थानवर जादा खर्च लादण्याचा प्रयत्न करीत त्या त्या वेळीं कंपनी त्याचा इनकार करून या जादा खर्चाचें लोढणें हिंदुस्थानच्या गळ्यांत न बांधण्याविषयीं तत्पर असे. कंपनीचें बोर्ड जाऊन सर्व सत्ता भारतमंत्र्याच्या हातीं आल्यावर ही स्थिति पालटली. तत्त्वतः जरी हिंदुस्थानसरकारच्या बजेटावर पार्लमेंटाचा ताबा असला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्याचा क्वचितच उपयोग होई. त्यामुळें सर्वतंत्रस्वतंत्र अशा भारतमंत्र्यानें हिंदुस्थानच्या तिजोरीवर जादा खर्चाचें ओझें टाकलें तर त्याला फारसा विरोध होत नसे. यामुळें हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवस्थेंत बराच गोंधळ माजून रहात असे आणि त्यासंबंधी चौकशी करण्याची जरूरी ब्रिटिशसरकारास वारंवार भासली आहे. १८५७ सालापासून अशा चौकशीकमिट्या थोड्याफार

---

* टीपः—सदरहू लेख फेब्रुआरी १९२६ च्या रत्नाकराच्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. ना. गोखल्यांच्या विलायतच्या सफरींविषयीं जी माहिती चरित्रांत समाविष्ट करतां आली नाहीं ती येथें दिली आहे. कांहीं ठिकाणीं द्विरुक्ति झाली आहे पण ती अपरिहार्य आहे.

—लेखक

| | वर्ष | हिंदुस्थान सोडल्याची तारीख | लंडनला पोहोंचल्याची तारीख | इंग्लंड सोडल्याची तारीख | हिंदुस्थानास परत आल्याची तारीख | अजमासे मुक्काम | जाण्याचा हेतु |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८९७ | मार्च | एप्रिल | १४ जुलै | ३० जुलै | ३॥ [illegible] | वेल्बी कमिशन |
| २ | १९०५ | १६ सप्टेंबर | २ आक्टोबर | २३ नोव्हेंबर | ९ डिसेंबर | ४८ दिवस | मोर्ले मिंटो सुधारणा |
| ३ | १९०६ | १४ एप्रिल | २९ एप्रिल | ३० आगस्ट | १४ सप्टेंबर | ४ महिने | |
| ४ | १९०८ | २४ एप्रिल | १० मे | ३ डिसेंबर | १९ डिसेंबर | ६ म. आणि ३ आ | |
| ५ | १९१२ | ३ मे | १९ मे | ७ आक्टोबर (२२ आक्टोबर ते १८ नोव्हेंबर द. आफ्रिकेंत मु.) | १५ [3] डिसेंबर | ७ महिने | प्राथमिक शि. व. द. आ. |
| ६ | १९१३ | १८ एप्रिल | ४ मे | ५ सप्टेंबर | २ आक्टोबर | ४ महिने | पब्लिक सर्व्हिस कमिशन |
| ७ | १९१४ | ५ मार्च | २१ मार्च | ७ नोव्हेंबर | २० नोव्हेंबर | ७ म. आणि २ आ | |

अंतरानें वेळोवेळीं नेमण्यांत आल्या आहेत. १८९७ सालचें वेल्बी कमिशन अशा कमेट्यांपैकींच एक होतें. हें कमिशन नेमलें गेलें त्या वेळीं हिंदुस्थानसरकारची आर्थिक परिस्थिति अत्यंत शोचनीय होती. मद्रास इलाख्यांतील दुष्काळ व तत्प्रीत्यर्थ झालेला खर्च, खर्चाचें लष्करी धोरण, ब्रह्मदेशाख्या नवीन जिंकलेल्या प्रांताची राज्यव्यवस्था व तिला लागणारा प्राथमिक खर्च, आणि हुंडणावळीचा अनिश्चित भाव इत्यादि कारणांमुळें हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिति फारच खालावली. करवाढी-शिवाय सरकारला दुसरा उपाय सुचेना. मिळकतीवरील कर वाढविला; मिठावरील कर दीडपट दुप्पट करण्यांत आला. अशा रीतीनें ह्या बारा वर्षांत एका बाजूनें सरकारचा खर्च वाढत होता व दुसऱ्या बाजूनें कराची बेसुमार वाढ झाल्यामुळें हिंदी लोक जादा कर सहन करण्यास असमर्थ झाले होते. या अडचणींतून मार्ग काढावा कसा हें सुचविण्या-करितां वेल्बी कामिशन नेमण्यांत आलें होतें. लॉर्ड वेल्बीखेरीज या कमिशनवर जी. एन्. कर्झन, टी. आर. बुचमन्, सर वुइलिअम वेडरबर्न, दादाभाई नौरोजी. डब्ल्यू. एस्. केन वगैरे सभासद होते.

वेल्बी कमिशनपुढें गोखल्यांची साक्ष १२ व १३ एप्रिल रोजीं झाली. लेखी साक्ष व उलटतपासणी यांमध्यें गोखल्यांनीं काय सांगि-तलें याचा सारांश देण्याचें हें स्थळ नव्हे. एकंदर हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं गोखले आपल्या साक्षींत लिहितात, "The position virtually amounts to this, that it is the administration of the finances of one country by the executive Government of another, under no sense of responsibility to those whose finances are so administered." ही अनिष्ट स्थिति पालटावी म्हणून गोखल्यांनीं कांहीं सूचना केल्या होत्या. तीस वर्षांपूर्वी राजकीय आकांक्षांचें क्षेत्र संकुचित होतें. त्यामुळें सांप्रत त्यांच्या सूचना अगदींच नेमस्त वाटल्यावांचून रहाणार नाहींत. यापैकीं कित्येक सूचना अमलांतहि आल्या आहेत. वरिष्ठ सरकार व प्रांतिक सरकार यांचे आर्थिक संबंध शक्य तितके पृथक् करावे अशी गोखल्यांची आग्रहपूर्वक सूचना होती आणि मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड रिपोर्ट-

मध्यें हें तत्त्व मान्य झालें आहे. ( Vide section 200, " our first aim has therefore been to find out some means of entirely separating the resources of the central and provincial Governments ).

वेल्बी कमिशनपुढील गोखल्यांची साक्ष हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें एकंदरींत चांगली झाली. हिंदुस्थानानें गोखल्यांना परीक्षेसच घाडलें होतें आणि या परीक्षेतील जयापजयावर हिंदुस्थानच्या पुढारीपणाचें पारितोषिक त्यांना मिळावयाचें होतें. या जबाबदारीची जाणिव गोखल्यांना होती आणि या जबाबदारींतून भारतवर्षाच्या शुभ आशीर्वादानें ते पार पडले असें म्हणण्यास हरकत नाहीं. १७ मे १८९७ च्या अग्रलेखांत केसरीकार लिहितातः—" गोखले यांनीं आपल्या मनःसमतेनें विषयाची मांडणी चांगली केली. प्रो. गोखले यांनीं एवढी लांबची सफर केल्याचें व आपल्या अनुभवी व विद्वान गुरूच्या शिकवणीचें चीज केलें. "

१८९७ ची सफर मुख्यतः वेल्बी कमिशनपुढील साक्षीकरितां असली तरी गोखल्यांनीं इतरही थोडीबहुत चळवळ केल्याचें दिसून येतें. या वेळीं त्यांचा इंग्लंडमध्यें जवळ जवळ तीन साडेतीन महिने मुक्काम होता. हिंदुस्थानच्या राजकारणासंबंधीं ब्रिटिश जनतेला माहिती करून देण्याच्या इराद्यानें दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बानर्जी, एस्. अय्यर आणि गोखले या चौघांनीं मिळून इंग्लंड व स्कॉटलंड देशांत व्याख्यानांचा दौरा काढला होता. याखेरीज गोखले इंडिया पत्रांत हिंदुस्थानसंबंधीं मधूनमधून लिहित असत. दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नाकडेही त्यांचें लक्ष या वेळेपासून वेधलें होतें असें दिसतें. कारण या वर्षीच्या 'इंडिया' पत्राच्या जूनच्या एका अंकांत दक्षिण आफ्रिकेसंबंधीं त्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. या खेपेस ते आयर्लंडलाहि थोडे दिवस गेलें असल्याचें कळतें.

गोखल्यांची ही सफर दुसऱ्या एका कारणास्तव प्रसिद्ध आहे; आणि तें कारण म्हटलें म्हणजे त्यांनीं पुण्यामध्यें सुरू असलेल्या प्लेगव्यवस्थेसंबंधीं केलेलीं विधानें व त्याबद्दल त्यांना मागावी लागणारी माफी.

विश्वासार्ह अशा पुण्यपत्तनस्थ मित्रद्वयांकडून शेगच्या व्यवस्थेसंबंधीं गोखल्यांना जीं पत्रें गेलीं तीं त्यांनीं इंडियन पार्लमेंटरी कमिटीपुढें ठेविलीं. आणि यासंबंधीं 'मँचेस्टर गार्डियन'मध्यें मुलाखत प्रसिद्ध करण्याचें सर्वानुमतें ठरलें. ही मुलाखत २ जुलैला प्रसिद्ध झाली. मुलाखत प्रसिद्ध झाल्याबरोबर इंग्लिश वर्तमानपत्रकारांनीं एकच गवगवा करण्यास सुरवात केली आणि तुम्ही हिंदुस्थानपासून इतके दूर असतां तुम्हांला ही हकीकत कळली कशी अशी पृच्छाही त्यांना करण्यांत आली. गोखल्यांचा खुलासा ता. १५ जुलैच्या 'मँचेस्टर गार्डियन'मध्यें आला आहे. त्यांत ते म्हणतात:—"Among these letters, there were two from two friends whom I have known for years and who are incapable of consciously misleading me." असो. या प्रकरणाचा शेवट कसा झाला, गोखल्यांच्या मनावर त्याचा परिणाम किती झाला आणि गोखल्यांनीं मागितलेली माफी समर्थनीय ठरते किंवा नाहीं याचा विचार करण्याचें हें स्थल नव्हे. गोखले आपल्या पत्रांत लिहितात:—In his own words, quoting Herbert Spencer he did what he considered to be his duty and if public approbation came well and good, if it did not, also well and good, though not so well and good.

दुसरी, तिसरी व चौथी या तिन्ही सफरी मोर्ले-मिंटो सुधारणांसंबंधीं झाल्या असें म्हणावयास हरकत नाहीं; परंतु तिन्ही वेळेला गोखल्यांना करावें लागणारें कार्य एकाच स्वरूपाचें नव्हतें. १९०४ च्या काँग्रेसनें इंग्लंडला प्रतिनिधि पाठविण्याचा ठराव केला. हा ठराव टिळकांनींच पुढें मांडला होता. या ठरावाअन्वयें गोखले व जिना यांना प्रथम पाठविण्याचें ठरलें. परंतु जिनांच्या ऐवजीं लाला लजपतरायांची निवडणूक मागाहून करण्यांत आली असें दिसतें. काँग्रेसचे प्रतिनिधि इंग्लंडांत गेले त्या वेळीं हुजूरपक्ष अधिकारारूढ होता. परंतु तो पक्ष लौकरच अधिकारसंन्यास करणार असून नवीन निवडणूक होणार होती. या नवीन निवडणुकींत ज्या पक्षाची सरशी होणार होती त्यावरच हिंदी राष्ट्राचें भवितव्य कमी-अधिक प्रमाणांत अवलंबून असल्यामुळें हिंदुस्थानतर्फे इंग्लंडांत जे प्रति-

निधि गेले त्यांना तेथील मतदारसंघाकडेच धांव घेणें जरूर होतें. इंग्लंड-मधील मतदारसंघ ज्या पक्षाचे प्रतिनिधि बाहुल्यानें पार्लमेंटांत पाठवील त्यांच्याच हातांत साम्राज्याचीं अधिकारसूत्रें जाणार हें उघड होतें. त्यामुळें गोखले व लाला लजपतराय यांना इंग्लंड व स्कॉटलंड या देशांत व्याख्यानांचा दौरा काढून मतदारांमध्यें हिंदुस्थानसंबंधीं जागृति उत्पन्न करावी लागली आणि त्याचा परिणाम उदारमतवादी पक्षाचा विजय होण्यांत झाला.

या खेपेस गोखल्यांचा इंग्लंडमध्यें मुक्काम जवळजवळ आठ आठवडे होता. जेथें जेथें ते गेले तेथें तेथें त्यांचें उत्तम प्रकारें स्वागत करण्यांत आलें. त्यांचीं व्याख्यानें ठरविण्याचें काम ब्रिटिश इंडिया कमिटीनें आपल्याकडे घेतलें होतें; आणि ४९ दिवसांत त्यांना सुमारें ४५ व्याख्यानें द्यावीं लागलीं. 'डेली न्यूज', 'स्टार', 'मॉर्निंग लीडर' वगैरे वर्तमान-पत्रांमध्यें गोखल्यांसंबंधीं चरित्रपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. मॉर्निंग लीडर लिहितोः—" महाराष्ट्रीय ब्राह्मण आणि त्यांत पुण्याचा असला तर तो एक ब्रह्मराक्षस असला पाहिजे अशी इंग्लंडमध्यें पुष्कळांची समजूत आहे. गोखले महाराष्ट्रीय आहेत, ब्राह्मण आहेत आणि पुण्याचेही पण आहेत. तरी ते सरकारला प्रिय असणाऱ्या लोकांपैकीं एक आहेत. हिंदुस्थानांतील इतर पुढाऱ्यांच्या मानानें ते बरेच तरुण आहेत." गोखल्यांचीं व्याख्यानें इंग्लंडमध्यें पुष्कळांना पसंत पडत असावीं असें अनुमान करण्यास सबळ कारणें आहेत. 'वेस्टमिनिस्टर गॅझेट'मध्यें प्रदर्शित केलेलें मत सामान्यतः सर्व ब्रिटिशजनतेचें निदर्शक असें समजतां येईल. त्या पत्राचे विद्वान् संपादक लिहितातः—" कांहीं हिंदी पुढाऱ्यां-प्रमाणें गोखल्यांच्या ठिकाणीं पल्लवित वक्तृत्व नसलें तरी त्यांची सर्व मदार माहितीवर असल्यामुळें त्यांचीं व्याख्यानें बुद्धीला पटतात. विवेचनशैली, व्यावहारिक दृष्टि, शील व आतांपर्यंत केलेली उत्कृष्ट लोकसेवा ह्याही गोष्टी त्यांचीं व्याख्यानें परिणामकारक होण्यास कारणीभूत होतात." ३ नोव्हेंबर रोजीं लिमिंग्टन येथें गोखल्यांचें व्याख्यान झालें. व्याख्यान संपल्यानंतर एक मजूर गोखल्यांच्याकडे आला आणि कांहीं पैसे त्यांच्याजवळ देऊन म्हणाला, " पुढील दुष्का-

ळाकरितां माझी अल्पशी मदत स्वीकारा." दुष्काळग्रस्तांच्या हालअपेष्टांचे गोखल्यांनीं व्याख्यानांत केलेल्या वर्णनामुळें हा सहानुभूतीचा उमाळा एका गरीब अंतःकरणांतही उत्पन्न झाला. गोखले किंचित् विचारांत पडले. इतक्यांत तो मजूर म्हणाला—" आपण या अल्प मदतीचा स्वीकार केला तर मी उपकृत होईन. यापेक्षां अधिक देतां येत नाहीं याबद्दल मी दिलगीर आहे." गोखल्यांनीं या सफरींत जें कार्य केलें त्यासंबंधीं मि० ओकोनर पॉवर यांनीं खालील उद्गार काढले आहेतः—

" Mr. Gokhale had accomplished that which some of our great ministers during the past ten years had never been able to accomplish with all their eloquence, he had made them think imperially."

पुढील सालीं म्हणजे १९०६ सालीं गोखले इंग्लंडला गेले त्यावेळीं पार्लमेंटच्या निवडणुकीची धामधूम थांबली होती व प्रत्यक्ष कार्याला सुरवात करण्याची संधि आली होती. हिंदी राष्ट्राच्या सुदैवानें मोर्लेसारख्या विचारी व्यक्तीच्या हातांत हिंदुस्थानच्या कारभाराचें सुकाणूं दिलें गेलें. पार्लमेंटमध्येंही बरेच सभासद हिंदुस्थानाबद्दल सहानुभूति बाळगणारे होते. परंतु या सभासदांना हिंदी प्रश्नांबद्दल असावी तितकी माहिती नसे. हिंदी राजकारणांतील अडचणी व त्या दूर करण्याचे मार्ग यांची बरोबर कल्पना त्यांना नसल्यामुळें त्यांच्या हातून सहानुभूति असूनही प्रत्यक्ष कार्य कांहीं झालें असतें असें वाटत नाहीं. या खेपेस कॉंग्रेसतर्फे गोखले इंग्लंडला गेले त्यावेळीं पार्लमेंटमधूनच चळवळ करण्याची अधिक आवश्यकता होती. तेव्हां गोखल्यांनीं आपल्या चळवळीचा मोर्चा तिकडे वळविला आणि हिंदुस्थानचा प्रश्न पार्लमेंटकडून तडीस लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पार्लमेंटच्या सुमारें १५० सभासदांच्या गांठी घेतल्या व हिंदी प्रश्नाकडे आस्थापूर्वक लक्ष देत जाऊं असें अभिवचन त्यांच्याकडून मिळविलें. हिंदुस्थानसंबंधीं पार्लमेंटमध्यें काम करण्याकरितां सुमारें २०० सभासदांची Indian Parliamentary Committee स्थापण्यांत आली. मोर्लेसाहेबांच्याबरोबर त्यांच्या खासगीरीत्या बऱ्याच मुलाखती झाल्या. मुलाखतींमधील हकीकत गुप्त ठेवण्यांत आली होती.

मोर्लेसाहेबांच्या संभाषणावरून गोखल्यांना हिंदुस्थानच्या भविष्यत्काला-बद्दल बरीच आशा वाटूं लागली. गोखल्यांनीं या खेपेस सुमारें वीस-पर्यंत सार्वजनिक व्याख्यानें दिलीं. त्यांच्या व्याख्यानामुळें इंग्लंडमध्यें जी सहानुभूति निर्माण झाली तिचें निदर्शक म्हणून ही गोष्ट नमूद करण्यास हरकत नाहीं कीं, गोखले हिंदुस्थानला परत येण्यास ज्या वेळीं निघाले त्या वेळीं त्यांना निरनिराळ्या संस्थांतर्फे व्याख्यानें देण्याकरितां म्हणून तीस बोलावणीं आलीं होतीं.

१९०८ सालीं एकंदर राजकीय परिस्थिति अगदींच भिन्न होती. या सालीं इंग्लंडला प्रतिनिधि पाठविण्याची कॉंग्रेसला जरूरी भासली नाहीं; इंग्लिश जनता व पार्लमेंट यांमध्यें चळवळ करावयाची ती केली अशी समजूत झाली असावी असें दिसतें; परंतु यावेळीं सुधारणा भट्टींत घातल्या होत्या. मोर्लेसाहेब सुधारणांचें माप हिंदुस्थानच्या पदरांत टाकण्याची तयारी करीत होते. अशा वेळीं त्यांना हिंदी राजकारणाची सर्वांगीण माहिती असलेल्या एखाद्या पुढाऱ्याच्या मदतीची अपेक्षा होती. या कारणास्तव १९०८ सालीं बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनतर्फे गोखले इंग्लंडला गेले. ही सफर कांहींशीं गुप्त स्वरूपाची होती असें दिसतें. इंग्लंडला गेल्याबरोबर रूटरच्या प्रतिनिधीनें त्यांची मुलाखत घेण्याचा प्रयत्न केला. परंतु सुधारणांच्या संबंधींच विचार करण्याकरितां मी येथें आलों आहें, असें मोघम उत्तर देऊन गोखल्यांनीं मुलाखत देण्याचें नाकारलें. या खेपेस गोखल्यांची सार्वजनिक व्याख्यानें दहाच्या आंतच झालीं असतील नसतील. मोर्लेसाहेबांच्यापुढें हिंदी राष्ट्राच्या राजकीय आकांक्षा मांडणें व त्यांना सुधारणासंबंधीं सर्व तऱ्हेची मदत करणें हेंच त्यांचें यावेळीं उद्दिष्ट होतें. या सहा महिन्यांत गोखल्यांनीं जें कार्य केलें त्यासंबंधीं डेली न्यूज हें पत्र म्हणतें, For six months Gokhale has laboured incessantly for the cause of India in London and other of our great cities and he now returns anxious but on the whole inclined to hope, and with renewed confidence in the strength of the high principles of Libjeralism with which Lord Morley's name

is associated. गोखल्यांनीं मोर्लेसाहेबांच्या पुढें सुधारणांची जी मागणी केली ती सवस्वी समाधानकारक होती असें नाहीं; परंतु प्रारंभींची एक पायरी या दृष्टीनें त्या सुधारणा सुचविल्या होत्या आणि त्यांनीं सुचविलेल्या बऱ्याचशा सुधारणा मोर्ले यांना मान्यही झाल्या. या कारणास्तव त्यावेळीं मोर्ले यांच्यावर प्रतिपक्षाकडून असा आक्षेपही घेण्यांत आला कीं, एका हिंदी पुढाऱ्याच्या नादीं लागून सुधारणा देण्याचें मोर्लेसाहेबांनीं ठरविलें. पार्लमेंटमध्यें ११ मार्च १९०९ रोजीं बिलाचें तिसरें वाचन झालें त्या वेळीं भाषण करतांना मोर्ले यांनीं वरील आक्षेपास उत्तर दिलें आहे. त्यांत ते म्हणतातः—What do people mean when they say that reforms were wrung from the S. of S. by an Indian political leader well-known to some of your lordships ? Was it not the business of S. of S.and the Viceroy when they undertake such a seheme for reforms to gather opinion upon proper details from every source official or unofficial ? ”

मोर्ले-मिंटो सुधारणांसंबंधीं गोखल्यांनीं केलेली कामगिरी तत्कालीन हिंदी पुढाऱ्यांपैकीं बहुतेकांस माहीत होती आणि या कामगिरीबद्दल सर्वांनीं त्यांना धन्यवादच दिले आहेत. स्वतः मोर्लेसाहेबांना गोखल्यांच्या मदतीचें महत्त्व अत्यंत वाटत होतें असें दिसतें. ‘ नृपतिकार्य ’ व ‘ जनपदकार्य ’ यांमध्यें एकप्रकारचा स्वाभाविकच विरोध असावा असें दिसतें. हिंदी राजकारणांत तर विरोधाचें स्वरूप बरेंच तीव्रतर आहे. कारण राजा व प्रजा यांच्या हितसंबंधांत एकवाक्यता नसण्यास होणारीं सर्व कारणें येथें दृष्टीस पडतात, यामुळें राष्ट्रकार्य करणाऱ्या हिंदी राजकीय पुढाऱ्यांचे दोन वर्ग झालेले दिसतात. लोकजागृति हें एका वर्गाचें ध्येय असतें तर सरकारला प्रजेसंबंधींच्या कर्तव्याची जाणीव करून देणें हें दुसऱ्या वर्गांतील पुढाऱ्यांच्या प्रयत्नांचें पर्यवसान असतें. परंतु गोखल्यांनीं या वर्षीं केलेलें कार्य पाहिलें म्हणजे ‘ नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ’ या वर्गांत त्यांची प्रामुख्यानें गणना कशी होते याची कल्पना येते. मोर्ले यांनीं खालील उद्गार काढले आहेत, “ It is of vast advantage

that we should be on terms with him; I believe, from all I learn, that his influence on the Indian section in the H. of C. has been most salutary......He has a politician's head, appreciates executive responsibility, has an eye for the tactics of practical common-sense." अशा भूमिकेवर काम करणारा राजकीय पुढारी तारेवरील कसरत करीत असतो. त्याला लोकांच्या आकांक्षा व सरकारची इच्छा यांच्या सीमारेषेवर उभें राहून अंतिम साध्य हस्तगत करून घ्यावयाचें असतें, आणि ही सीमारेषा कोणत्याही बाजूनें उल्लंघिली तर दोहोंपैकीं एकाच्या किंवा प्रसंगीं दोघांच्याही अप्रियतेस पात्र व्हावें लागतें. आपल्याच कर्तबगारीनें दोघांच्याही प्रेमभावास गोखले पात्र झाले यांतच त्यांचें अलौकिकत्व आहे असें आम्हांस वाटतें.

गोखल्यांची इंग्लंडला पांचवी सफर १९१२ सालीं झाली. हिंदुस्थानला सुधारणा मिळाल्या होत्या आणि संपादिलेल्या हक्कांचा योग्य उपयोग करण्याकरितां हिंदी लोकांनीं अविश्रांत श्रम केले पाहिजेत असें गोखल्यांचें मत होतें. हें कार्य करण्यास पुरेसे कर्तृत्ववान् तरुण पुढें येत नाहींत अशी गोखल्यांची तक्रार होती. स्वत: त्यांनीं मात्र दिलेल्या हक्कांचा योग्य उपयोग करून घेण्याचें ठरविलें होतें आणि त्याप्रमाणें त्यांचे प्रयत्न चालूही होते. त्यांनीं नवीन जें कार्य करण्याचें ठरविलें त्यांत प्राथमिक शिक्षणाला साहजिकच सर्वांत अधिक महत्त्व दिलें व तीन वर्षें लागोपाठ प्राथमिक शिक्षणाचें बिल कौन्सिलपुढें मांडलें, परंतु तेथें यश येण्याचें चिन्ह दिसेना म्हणून यासंबंधीं इंग्लंडांत प्रयत्न करून पहावा अशा विचारानें यावेळीं ते इंग्लंडला गेले. बार्मिंगहॅम येथील मिस स्टूजला पाठविलेल्या पत्रांत (२५ जानेवारी १९१२) गोखले आपल्या भेटीचा उद्देश खालील शब्दांत व्यक्त करतात: I am glad to say I have decided to pay a brief visit to England this year. My object in going this year is to secure Parliamentary support to a Bill which I have introduced in the Viceroy's legislative council, aiming at making

Elementary Education in this country gradually free and compulsory. " परंतु इंग्लंडला जाण्याचें हें एकच कारण नव्हतें. दक्षिणआफ्रिकेच्या प्रश्नाकडे गोखल्यांचें लक्ष फार पूर्वीपासून लागलें होतें; गांधींच्याबद्दल गोखल्यांना अत्यंत आदरभाव असल्यामुळें तर ह्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्याचें त्यांनीं ठरविलें असावें असें दिसतें. गांधी आणि गोखले यांची प्रथम भेट १८९६ मध्यें झाली. या भेटीची हकीकत देतांना गांधी लिहितातः— " त्या वेळीं हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख पुढाऱ्यांना प्राणिपात करण्याचा सुप्रसंग मला मिळाला, पण जी शीतलता मला गोखले यांच्या भेटींत लाभली ती इतरांपासून मी मिळवूं शकलों नाहीं. सर्वांनींच माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला हें खरें! परंतु गोखले यांनीं मला प्रेमपाशांत बद्ध करून टाकलें. " अशा प्रेमळ संबंधाचें पर्यवसान एकमेकांस साहाय्य करण्यांत झालें नसतें तरच नवल! कांग्रेस व कौन्सिल यांमधून गोखले शक्य ती चळवळ करीत होतेच. परंतु दक्षिण आफ्रिकेमधील स्थिति प्रत्यक्ष पाहून या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करण्याचें त्यांनीं ठरविलें. तेव्हां इंग्लंडहून परत येतांना दक्षिण आफ्रिकेला भेट देण्याचा त्यांचा बेत कायम झाला.

याशिवाय इंग्लंडमध्यें असतांना घडलेल्या एका समारंभाचा उल्लेख येथें करणें युक्त दिसतें. १९१० सालीं अलाहाबादच्या कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याकरितां सर वुइलिअम वेडरबर्न हिंदुस्थानांत आले होते. हिंदमातेची सर वुइलिअमनीं जी एकनिष्ठ सेवा केली, त्याबद्दल वाटणाऱ्या आदराचें निदर्शक म्हणून इंग्लंडला परत जातेवेळीं वेडरबर्न साहेबांना थैली अर्पण करण्याचें मुंबईकरांनीं ठरविलें. परंतु काम अधिक पडल्यामुळें वेडरबर्न यांच्या प्रकृतीस क्षीणता आली आणि कलकत्त्याच्या वाटेनेंच ते इंग्लंडला परत गेले. मुंबईकरांची निराशा झाली; परंतु पुढें त्यांनीं लेडी वेडरबर्न यांना त्यांच्या पतींनीं हिंदुस्थानच्या केलेल्या सेवेची आठवण म्हणून एक उत्कृष्ट रत्नमाला नजर करण्याचें ठरविलें. गोखल्यांनीं हें काम आनंदानें पत्करिलें. लंडन शहरीं लेडी ॲननें कांहीं निवडक मंडळींना मेजवानी दिली. त्यावेळीं गोखल्यांनीं सर वुइलिअम यांनीं केलेल्या सेवेचें गौरवपर वर्णन करून त्यांच्या पत्नीस

मुंबईकरांतर्फे ती रत्नमाला नजर केली. हा गोड समारंभ ४ जुलै १९१२ रोजीं झाला.

या वेळीं गोखल्यांचा इंग्लंडमध्यें मुक्काम चार महिन्यांवर होता. त्यांच्या पूर्वसंकल्पानुसार त्यांनीं प्राथमिक शिक्षणाच्या संबंधीं कांहीं तरी उद्योग केला असला पाहिजे हें उघड आहे. परंतु त्याचें निश्चित स्वरूप काय असावें याची माहिती प्रस्तुत लेखकांस अद्याप उपलब्ध झाली नाहीं. ही माहिती कोणी प्रसिद्ध केल्यास अथवा ती कोठून मिळण्याचा संभव आहे हें कळविल्यास प्रस्तुत लेखक त्यांचा फार आभारी होईल.

इंग्लंडहून दक्षिण आफ्रिकेंत जाणाऱ्या बोटींवर एशियाटिक मनुष्याला अस्पृश्याप्रमाणें वागविण्यांत येई. क्षणोक्षणीं मानहानीचा प्रसंग. गोखल्यांनीं आफ्रिकेला जाऊं नये असें त्यांच्या कित्येक स्नेह्यांना वाटत होतें. त्याचें कारण तरी अशा तऱ्हेचे मानहानीचे प्रसंग त्यांच्यावर येऊं नयेत हेंच होय. आगबोटीचें तिकीट मिळविण्यास गोखल्यांना थोडीबहुत अडचण भासली; परंतु त्यांचा पुढील सर्व प्रवास सुखकर झाला. ता. २२ आक्टोबर १९१४ रोजीं गोखल्यांची बोट आफ्रिकेच्या किनाऱ्याला लागली. गोखले दक्षिणआफ्रिकेमध्यें असेतोंपर्यंत त्यांची सर्व व्यवस्था करण्याकरितां युनिअन सरकारकडून इमिग्रेशन खात्यांतील मि० रन्सिमन यांची योजना झाली होती. आफ्रिकेंतील हिंदी लोकांनीं तर गोखल्यांचा सत्कार केलाच; पण या सत्कारांत यूनिअनसरकार व युरोपिअन लोक यांनींहि आनंदानें भाग घेतल्यामुळें एखाद्या राजाचाही जो सन्मान झाला नसता तो भारतसेवक गोखले यांचा ठिकठिकाणीं झाला. गोखल्यांचीं व्याख्यानें ऐकण्यास युरोपिअन व हिंदी लोक पूर्वीचा द्वेषभाव विसरून जाऊन एकाच रांगेंत बसत. दोन्ही समाजांना मान्य होईलशी तडजोड सुचवावी हा गोखल्यांचा हेतु होता आणि तेवढ्याकरितां त्यांनीं अश्रांत श्रम करून मिळेल तेवढी माहिती गोळा केली. प्रिटोरिया येथें जनरल स्मटस् व जनरल बोथा यांची भेट घेतली. भेट होण्यापूर्वी गोखल्यांनीं जे काळजीपूर्वक परिश्रम घेतले त्याबद्दल गांधी लिहितात:—"भेटीच्या आदल्या दिवशीं मि० कॅलनबॅक (गांधीं-

चे जर्मन अनुयायी ) यांची व माझी परीक्षा घेतली. स्वतः पहांटेस तीन वाजतां उठले. आम्हां दोघांनाही उठविलें. आम्हीं दिलेले सर्व साहित्य त्यांनीं वाचून ठेविलेंच होतें. आतां माझी उलटतपासणी करून त्यावरून स्वतःची तयारी पूर्ण झाली आहे किंवा नाहीं हें ठरवावयाचें होतें. त्यांच्या उलट तपासणीचें मी काय वर्णन करूं ! त्या कामांत घेतलेल्या काळजीची किती प्रशंसा करूं !" ही सुप्रसिद्ध सफर १८ नोव्हेंबर रोजीं समाप्त झाली.

गोखल्यांच्या शेवटल्या दोन्ही सफरी पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामानिमित्त झाल्या. सरकारी नोकऱ्यांचा हिंदीकरणाचा प्रश्न वेळोवेळीं विचारांत घेतला गेला आहे. मोर्ले–मिंटो सुधारणानुसार स्टेट सेक्रेटरी, व्हाइसरॉय व गव्हर्नर यांच्या कार्यकारी कौन्सिलावर हिंदी लोकांच्या नेमणुका झाल्या. या नेमणुका अधिकाराच्या दृष्टीनें मोठ्या असल्या तरी संख्येच्या दृष्टीनें अल्पच होत्या. त्यामुळें हिंदी लोकांच्या पूर्वीच्या तक्रारी कायमच राहिल्या. वेल्बी कमिशनपुढें दिलेल्या साक्षींत होतकरू हिंदी तरुणांना मोठ्या पगाराच्या जागा न दिल्यामुळें होणाऱ्या त्रिविध नुकसानीचें स्वरूप गोखल्यांनीं दाखविलें होतें. युरोपिअन अधिकारी नेमल्यामुळें गरीब हिंदुस्थानचा राज्यकारभार शक्य तितक्या कमी खर्चांत चालवितां येत नाहीं. दुसरें भाषा, परंपरा व आचार या बाबतींत समान असणाऱ्या हिंदी अधिकाऱ्यांना जशी प्रजेबद्दल सहानुभूति वाटेल तशी उपऱ्या युरोपियनांना वाटणार नाहीं. तिसरा तोटा म्हटला म्हणजे जबाबदारीचीं कामें करण्याची संधि न मिळाल्यामुळें हिंदी लोकांचा नैतिक अधःपात होतो तो निराळाच.

कमिशनच्या कामाला ३१ डिसेंबर १९१२ रोजीं मद्रासेस सुरुवात झाली. हिंदुस्थानांतील पुरावा गोळा करण्याचें काम संपल्यावर १९१३ व १९१४ या दोन्ही सालीं कमिशन इंग्लंडला गेलें होतें. कमिशनवर असतांना करावें लागणाऱ्या कामामुळें गोखल्यांची शरीरप्रकृति बिघडली. १९१३ सालीं इंग्लंडमधील कमिशनचें काम संपल्यानंतर गोखले कांहीं दिवस पॅरिस व कांहीं दिवस स्वित्सर्लंडमध्यें हवापालट करण्याकरितां

राहिले होते. पुढील सालचे बहुतेक महिने ते इंग्लंडलाच होते. १९१४ सालीं कमिशनचें पुरावा घेण्याचें काम अखेरीस संपलें. परंतु गोखल्यांच्या क्षीण झालेल्या प्रकृतीस हिंदुस्थानांतील हिंवाळी हवेनें जरा आराम पडेल असें वाटल्यामुळें कमिशनचा रिपोर्ट तयार करण्याचें काम एक वर्षभर लांबणीवर टाकलें; आणि १९१५ च्या एप्रिलांत गोखले या कामा-करितां इंग्लंडला जाणारही होते. परंतु तशी परमेश्वराची इच्छा नव्हती!

# कवींद्र रवींद्रनाथ टागोर.

(लेखकः—रा. प्र. कानिटकर, एम्. ए.)

नवभारताचे मंत्रद्रष्टे व विश्वबंधुत्वाचे एकनिष्ठ पुरस्कर्ते कविवर्य डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या व्यक्तित्वाची व जीवनध्येयाची जनतेला ओळख करून देण्याच्या दृष्टीनें हें संक्षिप्त चरित्र लिहिण्यांत आलें आहे. रवींद्रबाबूंच्या सतराव्या वाढदिवसाच्या निमित्तानें हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे. रवींद्रबाबूंच्या जीवनचरित्राची व त्यांच्या विश्वधर्माची सांगोपांग व यथार्थ माहिती देणारें हें मराठींत पहिलेंच चरित्र आहे. रवींद्रबाबूंचें काव्य, तत्त्वज्ञान, चित्रकला, गीतांजली, राष्ट्रीय आंदोलन, गांधी व टागोर इत्यादि मार्मिक व विवेचक प्रकरणांनीं व दहा बारा उत्कृष्ट चित्रांनीं हें चरित्र सजविलें आहे. किंमत ६ आणे. ट. ह. शिवाय.

---

किंमत ४ आणे.] **मुलांचे विवेकानंद.** [ट. ह. शिवाय.

(ले०—कृ. ना. सुतार.)

हें पुस्तक म्हणजे एक स्वामींचें गोड व सुबोध भाषेंत लिहिलेलें अल्प चरित्र होय. यांत स्वामींनीं आपल्या अंगीं असलेल्या गुणांचा उपयोग जनतेचा संसार हाकण्यासाठीं कसा केला याची इत्थंभूत माहिती दिलेली आहे. स्वामी हे व्यायामाचे भोक्ते, समाजसुधारक व कट्टे हिंदुधर्माभिमानी असल्यामुळें त्यांनीं समाजांत असलेल्या रूढींचा नाश करून समाज स्थिर व उच्च प्रतीचा करण्याचा प्रयत्न व त्याचप्रमाणें बुडत असलेल्या हिंदुधर्माचा प्रसार सर्व पृथ्वीतलावर आपल्या प्रेमळ, निगर्वी, भारदस्त व समर्पक व्याख्यानांच्या रूपानें कसा केला व त्याचप्रमाणें त्यांनीं केलेल्या हिंदुस्थानांतील व अमेरिकेंतील हिंदुधर्माबद्दलच्या कामगिरीची अल्पशी हकीकत देण्यांत आली आहे.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

"वाङ्मयात्मक तिलाञ्जली"

## त्यागमूर्ति पं. मोतीलाल नेहरू

( लेखक—रा. प्र. कानिटकर, एम्. ए. )

पंडित मोतीलाल नेहरूसारख्या महनीय राष्ट्रोद्धारकाच्या निध अपरिमित हानि झाली आहे. मुत्सद्दीपणा, त्यागवृत्ति, विद्वत्व शिस्त, निग्रही बाणा, कार्यकुशलता इत्यादि गुणसमुच्चयामुळें पं हिंदभूमींत अजरामर होऊन राहील यांत तिलमात्र शंका नाही पंडितजींचें जीवनचरित्र व त्यांचें कार्य दिलें आहे.

पुस्तकांत पंडितजींचे दहा फोटो असून पृष्ठसंख्या १२५ आ. वट ! आकर्षक बांधणी ! किंमत फक्त ८ आणे.

## पंडित जवाहरलाल नेहरू

( लेखक—रा. गो. भिडे, उपसंपादक केसरी. )

या चरित्राची तिसरी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली असून आजतागायतपर्यंतचें चरित्र त्यांत दिलें आहे. हिंदी स्वातं चळीच्या वेळीं हें चरित्र तरुणांस मार्गदर्शक व स्फूर्तिदायक रहाणार नाही. पृष्ठसंख्या १००, किंमत ६ आणे.

## पं. मदनमोहन मालवीय.

( लेखकः—रामकृष्ण गोपाळ भिडे, उपसंपादक, के

सचित्र पृष्ठसंख्या २००. कि. ८ आणे.

सुप्रसिद्ध पुढारी पं. मदनमोहन मालवीय यांचें चरित्र साधार, सुबोध व रसाळ भाषेंत या पुस्तकांत आलेलें अ लेखकानें लिहिलेल्या पं. जवाहिरलाल नेहरू यांच्या च तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या पुस्तकांप्रमाणेंच वीय यांच्या चरित्राचें हें पुस्तकहि उद्बोधक व स्फूर्तिदाय आहे. भरपूर चित्रें असून किंमत अगदींच माफक.

मॅनेजर-चित्रशाळा प्रेस, पु